**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**विधान भवनातील प्रवेशाचा पास मिळणे बाबत**

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मला या ठिकाणी आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, लक्षवेधी सूचना सभागृहात लागल्यानंतर त्यासंबंधात आम्हाला रात्री उशिरा कळविण्यात येते. त्यानंतर सदर लक्षवेधीच्या संदर्भात आम्हाला ब्रिफिंग करण्यासाठी बाहेरुन येणाऱ्या अधिकाऱ्यांना विधान भवनातील प्रवेशाचे पास देण्यात येत नाहीत. आज पुण्यातून दोन चॅरिटी कमिशनर ब्रिफिंग करण्यासाठी आले आहेत. परंतु त्यांना विधान भवनातील प्रवेशाचा पास न दिल्यामुळे ते ब्रिफिंगसाठी विधानभवनात येऊ शकेले नाहीत. अधिकाऱ्यांकडून ब्रिफिंग झाले नाही तर आम्हाला खरी माहिती मिळत नाही. त्यामुळे या सभागृहात उत्तरे देताना अडचण निर्माण होते. तेव्हा याबाबतीत आपल्या कार्यालयाला तसे निदेश देण्याची आवश्यकता आहे. अधिकारी मुंबईच्या बाहेरुन ट्रेनने प्रवास करुन या ठिकाणी ब्रिफिंगसाठी सकाळी येतात पण त्यांना ओळखपत्र न दिल्यामुळे आमचे ब्रिफिंग होत नाही.

**उप सभापती** : या संदर्भात माझी अशी विनंती आहे की, मंत्री महोदयांनी त्यांच्या कार्यालयाला याबाबत सूचना द्याव्यात. ज्या दिवशी त्यांच्या लक्षवेधी सूचना चर्चेला येणार असतील त्याच्या आदल्या दिवशी आमच्या कार्यालयाकडे पास मागितले तर ते त्यांच्या कार्यालयाकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, काही लक्षवेधी सूचना अशा असतात की, त्या चार विभागाशी संबंधित असतात. उदाहरणार्थ आर.डी.डी., रेव्हेन्यू ऑफिसेस, चॅरिटी कमिशनर, विधी व न्याय विभाग परंतु लक्षवेधी सूचनेमध्ये कोणकोणती खाती इन्व्हॉल्व्ह झालेली आहेत हे आम्हाला शेवटच्या मिनिटापर्यंत कळत नाही.

**उप सभापती** : ठीक आहे. आपल्याला पासेस देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

-----

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील वांदे पूर्व रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या बेहरामपाडा येथील गरीबनगर झोपडपट्टीला लागलेली भीषण आग.

**मु. शी.** : मुंबईतील वांद्रे रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या बेहरामपाडा येथील गरीबनगर झोपडपट्टीला लागलेली भीषण आग. यासंबंधी सर्वश्री हुसेन दलवाई, चरणसिंग सप्रा, विजय सावंत, हेमंत टकले, ॲड. उषाताई दराडे सर्वश्री विक्रम काळे, रमेश शेंडगे, सतीश चव्हाण, प्रकाश बिनसाळे, अरुण गुजराथी, अशोक ऊर्फ भाई जगताप, एस.क्यू.जमा, राजन तेली, सुभाष चव्हाण, दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, डॉ,नीलम गोऱ्हे, सर्वश्री परशुराम उपरकर, मनीष जैन, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. हुसेन दलवाई ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील वांद्रे पूर्व स्थानकानजीक असलेल्या बेहरामपाडा येथील गरीबनगर झोपडपट्टीला दि.४ मार्च, २०११ रोजी रात्री लागलेली भीषण आग, या आगीत सुमारे १००० झोपड्या जळून खाक होणे, हजारो लोक बेघर होणे, त्यांचे संसार उघड्यावर येणे, यापूर्वीही गरीबनगर झोपडपट्टीला आग लागण्याचे प्रकार घडणे, पुनर्विकासाच्या वादातून या झोपडपट्टीला वारंवार आग लावली जाते असा आरोप स्थानिकांकडून केला जात असणे, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, राज्य शासनाने या भयानक आग लागण्या मागील कारणांची सखोल चौकशी करुन या आगीत भस्मसात झालेल्या झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनाबाबत शासनाकडून तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

..3..



SMT/ D/ KTG/ 10:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई :सभापती महोदय, गरीबनगर ही झोपडपट्टी रेल्वेच्या जमिनीवर वसवलेली आहे. काही काळ ही झोपडपट्टी अनधिकृत होती त्यानंतर तिला अधिकृत करण्यात आलेले आहे. या झोपडपट्टीमध्ये तीन-तीन मजल्यांचे झोपडे होते. या लक्षवेधी सूचनेला दिलेल्या उत्तरामध्ये या झोपडपट्टीमध्ये एकंदर 1277 कुटुंबे राहतात असे म्हटले आहे. या झोपडपट्टीला आग लागल्या नंतर तेथे अग्नीशमन दलाचे लोक, पोलीस वेळेवर आले असे म्हणावे लागेल. परंतु त्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता नव्हती. माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी भेट दिलेली आहे.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, या सर्व कुटुंबीयांच्या पुनर्वसनाच्या बाबतीत नेमका कोणता विचार करण्यात येत आहे आणि माझा दुसरा प्रश्न असा आहे की, येथील काही लोक असे सांगतात की, मेरे 40 झोपड़े हैं, मेरे 50 झोपड़े हैं, या झोपडपट्ट्या वाढतात त्यात राहणाऱ्यांची काहीच चूक नसते, त्यांना काहीच इलाज नसतो म्हणून ते या झोपडपट्टयांमध्ये भाडे देऊन राहतात. त्यामुळे ती झोपडी प्रत्यक्ष त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांना दिली पाहिजे. मुंबईतील सगळे स्लमलॉर्डस शोधून त्यांच्याकडून सगळया झोपडया काढून घेतल्या पाहिजेत आणि त्या ठिकाणी प्रत्यक्ष जे राहतात त्यांना त्या दिल्या पाहिजे. सभापती महोदय, तीन ते पाच मजल्यांच्या झोपडया बांधण्यात येतात. त्या कशा बांधण्यात येतात हे कळत नाही. म्हणून याचे संशोधन करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भातील शासनाची नेमकी भूमिका या ठिकाणी स्पष्ट करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, सुरुवातीला या झोपडया थोडयाशा ग्राऊंड लेव्हलला उभ्या राहतात आणि हळूहळू त्यावर मजले चढविले जातात. परंतु बऱ्याच वेळा या ठिकाणी थोडासा माणुसकीचा प्रश्न येतो.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

बऱ्याच वेळेला तेथील एकंदर वातावरणाचा सुध्दा परिणाम या सगळ्या गोष्टींवर होतो. परंतु मुंबईतील गेल्या चार पाच वर्षातील एकंदरीत परिस्थिती पाहिली तर रे रोडला किंवा घोडबंदर भागामध्ये आपण गेलो तर रस्त्याच्या कडेला ज्या तीन-तीन मजली, चार-चार मजली झोपड्या होत्या त्या आता निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. रेल्वे स्टेशनच्या बाजूच्या झोपड्या सुध्दा मोठ्या प्रमाणात हटविण्यात आलेल्या आहेत. पुढच्या काळात सुध्दा अशा प्रकारे दोन-दोन मजली, तीन-तीन मजली झोपड्या होऊ नयेत म्हणून शासनाने खबरदारी घेण्याचे ठरविले आहे. खरे म्हणजे महानगरपालिकेने या संदर्भात अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे परंतु शासनाने या संबंधामध्ये कायदा केलेला आहे. या पुढच्या काळामध्ये ज्या भागामध्ये अशा प्रकारे अनधिकृत बांधकामे होतील, अनधिकृत झोपड्या उभ्या राहतील त्या झोपड्या लक्षात आणल्यानंतर किंवा लक्षात आल्यानंतर त्या संबंधामध्ये जर कारवाई करण्यात आली नाही तर त्या भागातील जे वॉर्ड ऑफिसर असतील, जे असिस्टंट कमिशनर असतील, जे कोणी पोलीस अधिकारी असतील त्यांना सुध्दा जबाबदार धरुन त्यांच्यावर अत्यंत कडक कारवाई करण्याचा कायदा विधिमंडळाने पारित केलेला आहे. तो कायदा माननीय राष्ट्रपती महोदयांकडे अंतिम मंजुरीसाठी आहे. त्या कायद्याला मंजुरी मिळाल्यानंतर या गोष्टीला बऱ्याच प्रमाणात आळा बसेल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वांद्रे पूर्व येथे रेल्वे स्टेशनच्या जवळची ही वस्ती आहे. हजारो लोकांच्या जाण्यायेण्याच्या रस्त्यावर ही वस्ती आहे. त्या ठिकाणी आग लागल्यावर आता पंचनामे झालेले आहेत. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, सदर झोपडपट्टी रेल्वेच्या जमिनीवर वसलेली असल्याचे आढळून आले. या बाबतीत शासन पुढे काय करणार आहे ? जे प्रवासी त्या रस्त्यावरुन जातात त्यांना अडथळा न होता निदान त्यांना वांद्रे स्टेशन पर्यंत नीट पोहोचता यावे या दृष्टीने शासन काय पावले उचलणार ? अन्यथा ज्या झोपड्या आहेत त्या रस्ता व्यापावयास लागल्या तर लोकांना जाण्यायेण्यासाठी रस्ता राहात नाही. या बाबतीत शासन काय पावले उचलणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी बाब लक्षात आणून दिलेली आहे त्या संबंधामध्ये महानगरपालिकेला सतर्क राहण्याच्या बाबतीत, प्रवाशांना

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाण्यायेण्याकरिता अडथळा होऊ नये या पध्दतीने बांधकाम होऊ नये किंवा होणार नाही याची काळजी घेण्याचे निदेश देण्यात येतील.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जो प्रश्न विचारला तो बरोबर आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला रेल्वेची जमीन आहे. तो रस्ता बराचसा महानगरपालिकेने नीट केलेला आहे पण तो अपूर्ण असल्यामुळे लोकांना जाण्यायेण्यासाठी त्रास होतो, ही वस्तुस्थिती आहे. आपले विद्यमान मुख्य सचिव हे महानगरपालिकेमध्ये असताना त्यांनी त्या ठिकाणी काही गोष्टी केल्या होत्या. रेल्वे याला परवानगीच देत नाही. रेल्वेची परवानगी घेऊन तो सगळा भाग रिकामा करणे, त्यांचे पुनर्वसन करण्याच्या संदर्भात रेल्वेला विचारणे आणि आता या झोपड्यांचे जे पुनर्वसन होणार आहे ते त्याच ठिकाणी करणार की अन्य ठिकाणी करणार ? आमची अशी सूचना आहे की, त्यांचे पुनर्वसन अन्य ठिकाणी केले तर तो भाग मोकळा होईल. त्या भागामध्ये बेस्टच्या बसेसकरिता बऱ्यापैकी स्थानक उभारता येईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, त्या ठिकाणी 90 टक्के जागा रेल्वे कॉर्पोरेशनची आहे. ही संपूर्ण जागा केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते. त्यांचे जे पुनर्वसन करणार आहोत त्या पुनर्वसनाच्या संदर्भात अजून अंतिम निर्णय झालेला नाही. अंतिम निर्णय झालेला नसल्यामुळे ही जागा मोकळी करुन त्यांना बाजूला अन्य ठिकाणी पुनर्वसित करावे या संदर्भातील निर्णय झालेला नसल्यामुळे आज त्यांचे नक्की पुनर्वसन कोठे होईल हे सांगता येणे कठीण आहे.

**उप सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, या संदर्भात बरेच लोक माझ्याकडे आले होते. वांद्रे पूर्व कडे जाणारा ब्रिज संपूर्ण तुटल्यामुळे शासकीय वसाहतीकडे जाण्यासाठी रस्ता नाही. त्या संदर्भात आपण बघावे. तो पूल तुटलेला आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आगीमुळे लोखंडी पूल वितळून पडला. पश्चिम रेल्वेकडून तो पूल उभारण्याचे काम लवकरच सुरु होईल. दोन्ही बाजूला जागा मोकळी होईल. त्या विभागातील असिस्टंट कमिशनरकडे हा विषय येतो. त्यांना सभागृहाच्या भावना तात्काळ कळविण्यात येतील.

----

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे शहरातील महिला स्वच्छतागृहासाठी अर्थसंकल्पात तरतूद करुनही खर्च न होणे

**मु. शी.** :पुणे शहरातील महिला स्वच्छतागृहासाठी अर्थसंकल्पात तरतूद करुनही खर्च न होणे यासंबंधी सर्वश्री अनिल भोसले, हेमंत टकले, रमेश शेंडगे, ॲड.उषा दराडे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनिल भोसले ( पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहरातील महिला स्वच्छतागृहासाठी अर्थसंकल्पात दीड कोटी रुपयांची तरतूद करुनही माहे फेब्रुवारी, 2011 पर्यंत एकही पैसा खर्च झाला नसल्याने महिला स्वच्छतागृहाचा निधी वर्षभरासाठी केवळ कागदावर असल्याची बाब उघडकीस येणे, याबाबत सखोल चौकशी करुन तातडीने महिला स्वच्छतागृहांची बांधणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात 63 ठिकाणी मुतारी व शौचालये बांधण्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याचे नमूद केलेले आहे. परंतु वस्तुस्थिती ही आहे की, जुन्या हद्दीतील डी.पी. व नवीन हद्दीतील डी.पी.राज्य सरकारकडे अनेक वर्षे पडून आहे. नवीन हद्दीतील डी.पी.मध्ये महिलांच्या शौचालयांसाठी जागा आरक्षित ठेवली जाईल काय, जुन्या हद्दीतील डी.पी.मध्ये बदल करण्यासाठी कार्यवाही सुरु केलेली आहे. त्यासाठी राज्य शासनाकडून सूचना मागविल्या जातील काय आणि त्यानुसार पुणे शहरात सुलभ शौचालये बांधण्यासाठी पावले उचलली जातील काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, पुणे शहराच्या डी.पी.ची मुदत सन 2007 साली संपली आहे. त्यामुळे नवीन डी.पी.तयार केलेला आहे. या संदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत एक बैठक झाली होती. त्यावेळी सर्व लोकप्रतिनिधींच्या सूचना ऐकून घेण्यात आल्या होत्या. पुणे शहराच्या आजुबाजूच्या परिसरात महिलांसाठी शौचालये व मुतारी बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. महानगरपालिकेने त्यासाठी आर्थिक तरतूद केलेली आहे. परंतु शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जागा उपलब्ध होत नसल्यामुळे अडचण होत आहे. नवीन डी.पी.तयार होत आहे त्यामध्ये काही जागा शौचालयासाठी राखून ठेवण्याचे प्रस्तावित केलेले आहे.

त्याचप्रमाणे तेथे एसआरएच्या योजनांनी पकड घेतलेली आहे. त्यामुळे हा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होत आहे. या योजनेला लोकांकडून ज्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला पाहिजे होता तसा मिळत नव्हता. परंतु आता एसआरएचे 120 प्रस्ताव मंजुरीसाठी आलेले आहेत, त्यापैकी 25 एसआरएच्या योजना सुरु आहेत. जसजशा एसआरएच्या योजना पूर्णत्वास जातील तसतसे तेथे खाजगी शौचालये झाल्यामुळे म्हणजे त्या लोकांचे पुनर्वसन झाल्यामुळे या अडचणी बऱ्याचशा कमी होतील.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, महिलांच्या शौचालयांसाठी जागा उपलब्ध होत नाहीत किंवा त्या मिळविण्यासाठी अडचणी येतात असे या निवेदनात मंत्री महोदयांनी म्हटलेले आहे. अधिकाऱ्यांनी तयार करुन दिलेले उत्तर पूर्णपणे असत्य आहे. त्या ठिकाणी बीओटी तत्वावर जागा विकसित करण्यासाठी दिल्या जातात, बिल्डर्सना जागा मिळतात, एसआरएच्या योजना होतात, शाळांसाठी आणि हॉस्पिटलसाठी जागा उपलब्ध होतात पण महिलांच्या शौचालयांसाठी

3...



NTK/ KTG/ D/

श्रीमती दिप्ती चवधरी....

जागा उपलब्ध होत नाहीत, यावर मी तरी विश्वास ठेवण्यास तयार नाही. शासनाने महिलांची चेष्टा सुरु केली आहे काय, महिलांच्या शौचालयांसाठी जागा उपलब्ध होत नाही हे उत्तर असत्य आहे. असे असत्य उत्तर देऊन चालणार नाही. 1987 साली पुणे शहराचा डी.पी.झाला होता. तो डी.पी. आता सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सुधारित डी.पी.मध्ये महिलांच्या शौचालयांसाठी शहरातील जागा राखून ठेवली जाणार आहे की नाही ?

श्री.भास्कर जाधव : मी मघाशी उत्तर देताना असे सांगितले आहे की, सुधारित डी.पी.मध्ये महिलांच्या शौचालयांसाठी काही जागा राखून ठेवण्याचे प्रस्तावित केलेले आहे. सन्माननीय सदस्या असे म्हणाल्या की, शाळांसाठी जागा उपलब्ध होते वगैरे वगैरे. आपल्याला माहीत आहे की, ज्यावेळी नवीन डी.पी.तयार केला जातो त्यावेळी ज्या ठिकाणी आरक्षण असते ते विकसित करण्यासाठी परवानगी दिली जाते. त्याच्या व्यतिरिक्त अशा प्रकारचा बदल करण्यासाठी जोपर्यंत तेथील महानगरपालिका नियम 37 अन्वये ठराव करुन पाठवित नाही तोपर्यंत शासनाला परस्पर बदल करता येत नाही.

श्री.मोहन जोशी : पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील महिलांच्या स्वच्छतागृहांचा हा प्रश्न आहे. पुणे शहरात अनेक शासकीय कार्यालये आहेत, या कार्यालयांमध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. मग परिवहन कार्यालय असेल, जिल्हाधिकारी कार्यालय असेल, फॅमिली कोर्ट असेल अशी अनेक शासकीय कार्यालये आहेत. त्या कार्यालयांमध्ये शौचालये नसल्यामुळे महिलांची गैरसोय होते. या शासकीय कार्यालयांमध्ये शौचालयांची व्यवस्था करण्यासाठी पुणे महानगरपालिकेला शासनाकडून निर्देश दिले जातील काय ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : मी काही आकडेवारी वाचून दाखवितो म्हणजे त्यावरुन या संदर्भात काळजी घेतलेली नाही अशातला प्रकार नाही हे सन्माननीय सदस्यांच्या लक्षात येईल. महिलांसाठी सार्वजनिक शौचालयांचे 320 ब्लॉक असून 218 सीटस् उपलब्ध आहेत. दुसरी सशुल्क शौचालये 430 असून 5347 सीटस् उपलब्ध आहेत. याकडे दुर्लक्ष केलेले आहे अशातला भाग नाही. सार्वजनिक मुता-या 180 असून त्यामध्ये 374 सीटस् आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब देखील तपासून पाहिली जाईल आणि त्याबाबतीत उचित निर्देश देण्यात येतील.

श्रीमती शोभा फडणवीस : राज्यमंत्री महोदयांनी सार्वजनिक ठिकाणी असलेल्या शौचालयाची माहिती दिली. परंतु सरकारी कार्यालयामध्ये जेथे महिला मोठ्या संख्येने काम करतात तेथे खास महिलांसाठी वेगळी अशी शौचालये नाहीत. उदा. न्यायालये, तालुका कार्यालये अशा ठिकाणी खास महिलांसाठी शौचालयाची सोय नसते. तेव्हा त्या ठिकाणी महिलांसाठी शौचालयाची व्यवस्था करण्यात येणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : त्या त्या ठिकाणी जागेची उपलब्धता पाहून निश्चितपणे त्याबाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतील.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मार्च 2011मधील माध्यमिक परीक्षेच्या इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत असलेल्या चुका

**मु.शी.** : मार्च 2011मधील माध्यमिक परीक्षेच्या इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत असलेल्या चुका यासंबंधी श्री. विक्रम काळे, ॲड.उषाताई दराडे सर्वश्री रमेश शेंडगे, हेमंत टकले, व सतीष चव्हाण, वि.प.स. दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद शिक्षक विभाग) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नुकत्याच माहे मार्च, २०११ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक परीक्षेच्या इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत मोठ्या प्रमाणात चुका असल्याने विद्यार्थ्यांचे त्या प्रश्नांचे गुण कमी होणे, पर्यायाने विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत येणारी घट तसेच त्यामुळे त्यांना पुढील शिक्षणासाठी अपेक्षित असलेल्या (विज्ञान, वाणिज्य आणि कला) या शाखेत घ्यावयाच्या प्रवेशात येणाऱ्या अडचणी, याबाबत सखोल चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : नुकत्याच झालेल्या 10वी आणि 12वीच्या बोर्डाच्या परीक्षामध्ये 10वीच्या इंग्रजी विषयाच्या द्वितीय आणि तृतीय भाषा पश्नपत्रिकेमध्ये चुका झालेला आहेत. या चुकाबाबत प्रत्येकी 1 गुण देण्यात येईल असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे आभार मानतो. याच पध्दतीने इयत्ता 12वीच्या भूगोल विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये देखील चुका झालेल्या आहेत. त्या चुका झालेल्या असतील तर 12वीच्या विद्यार्थ्यांना देखील गुण देण्यात येतील काय ? माझा आणखी एक प्रश्न असा आहे की, बोर्डाच्या वतीने जी प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना पुरविली जाते त्या प्रश्नपत्रिकेचा कागद निकृष्ट दर्जाचा, काळाकुट्ट असा कागद असतो. म्हणून पुढील वर्षीपासून 10 वी आणि 12वीच्या परीक्षेच्या वेळी पांढरा-शुभ्र कागद प्रश्नपत्रिकेसाठी पुरविण्यात येईल काय ?

प्रा. फौजिया खान : मार्च 2011च्या 10वीच्या परीक्षेमध्ये प्रश्नपत्रिकेत चुका झालेल्या होत्या. त्यासाठी गुण देण्याचा निर्णय घेतलेला आहे. प्रश्नपत्रिकेमध्ये प्रिंटिंग मिस्टेक झालेली होती. सन्माननीय सदस्यांनी भूगोल विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये देखील चूक झाल्याचे सांगितले. त्या प्रश्नपत्रिकेमध्ये प्रिंटिंग मिस्टेकमुळे किंवा बोर्डाकडून काही चूक झालेली असेल तर त्याबाबतीत जरुर गुण देण्यात येतील. प्रश्नपत्रिकेच्या कागदाची क्वालिटी तपासून पाहिली जाईल.

श्री. रामनाथ मोते : एसएससी बोर्डाच्या कामकाजाच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. इंग्रजी प्रश्नपत्रिकेमध्ये झालेल्या चुकीबद्दल विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून गुण देण्याचा निर्णय घेतला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सभापती महोदय, परवा देखील अशाच विषयाच्या संदर्भात मी विचारलेल्या लक्षवेधी सूचनेसंबंधी सभागृहामध्ये चर्चा झाली होती. 10वी आणि 12वीच्या प्रश्नपत्रिकेमध्ये सातत्याने काही ना काही गडबड होत असते. 12वीच्या इलेक्ट्रॉनिक्स सायन्सच्या प्रश्नपत्रिकेमध्ये 4 आणि 3 मार्कांच्या प्रश्नामध्ये चुका झालेल्या होत्या आणि ते दोन्ही प्रश्न विद्यार्थ्यांनी सोडविले असतील तर त्यांना ते गुण द्यावयाचे आहेत. प्रश्न असा आहे की, आता पेपर तपासून संपलेले आहेत. पेपर मॉडरेटरकडे आलेले आहेत. त्यामुळे परीक्षकांना काही करता येणार नाही.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...नंतर श्री. गिते...

श्री. रामनाथ मोते...

आपण या संदर्भामध्ये नियामकाकडे जे पेपर्स येतील, त्यांनी ते पेपर तपासून, ज्या विद्यार्थ्यांनी हा प्रश्न सोडविला असेल त्यांना ते गुण देण्याचा निर्देश शासन देणार आहे काय ? एस.एस.सी.बोर्डाच्या कामकाजाच्या संदर्भात वृत्तपत्रात सातत्याने बातम्या येत आहेत. मी या ठिकाणी इयत्ता 10 आणि इयत्ता 12 वी चे उदाहरण सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी भुगोल विषयाच्या पेपरचे उदाहरण या ठिकाणी सांगितले. ही लक्षवेधी सूचना इंग्रजी पेपरसंबंधीची आहे. मुंबईतील अनुदत्त विद्यालयात दीड तास विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकाच दिल्या गेल्या नाहीत. दीड तास विद्यार्थी वर्गामध्ये बसून होते. अशा प्रकारचा बोर्डाचा कारभार चालला आहे. या संबंधात काही अडचणी आहेत त्या सोडविण्यासाठी, विद्यार्थ्यांचा ताणतणाव कमी करण्यासाठी, विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासन या संदर्भात काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, इयत्ता 10 आणि इयत्ता 12 वी च्या काही विषयांच्या प्रश्नपत्रिकामध्ये चूका आहेत अशी सन्माननीय सदस्य श्री. मोते यांनी दिलेली माहिती खरी आहे. अशा प्रकारच्या चुका होऊ नयेत म्हणून ही सगळी प्रक्रिया स्ट्रीमलाईन करण्याची गरज आहे. ती प्रक्रिया स्ट्रीमलाईन करण्यासाठी तसेच या संपूर्ण सिस्टीममध्ये अधिक इम्प्रूव्हमेंट करण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : अनुदत्त विद्यालयातील विद्यार्थ्यांना दीड तास उत्तरपत्रिका न मिळाल्यामुळे विद्यार्थी परीक्षा वर्गात बसून होते. माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी याबाबतची माहिती दिली नाही. या बाबतची माहिती घेऊन, ती माहिती सभागृहाला नंतर देण्यात येईल अशी तरी त्यांनी माहिती सभागृहाला द्यावी. या ठिकाणी शिक्षण राज्यमंत्र्यांकडून ठरलेले उत्तर दिले जात असल्यामुळे शासनाविषयी जनतेमध्ये वाईट मत होत आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, या बाबतची माहिती घेऊन, ती माहिती सभागृहाला अवगत करुन देण्यात येईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी या ठिकाणी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारला होता. माननीय शिक्षण मंत्री नुकतेच सभागृहात आलेले आहेत. इयत्ता 10 आणि इयत्ता 12 वी च्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा कागद अतिशय निकृष्ट दर्जाचा वापरला जातो आहे. येणाऱ्या मार्च, 2011 च्या परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांना प्रसन्न वाटावे म्हणून अतिशय शुभ्र, अतिशच पांढरा अशा पध्दतीचा प्रश्नपत्रिकेचा कागद देण्यात येईल काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी चांगला मुद्दा उपस्थित केला आहे. विद्यार्थी सकाळी पेपर्स द्यावयास जातात, त्यावेळी प्रश्नपत्रिकेचा पेपर हा शुभ्र असला पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेची मी दखल घेतलेली आहे. प्रश्नपत्रिकेचा कागद अतिशय निकृष्ट वापरला जात आहे ही बाब माझ्या देखील लक्षात आलेली आहे. पुढील वर्षाच्या परीक्षेपासून प्रश्नपत्रिकेचा कागद शुभ्र राहील अशी काळजी घेण्यात येईल.

**उप सभापती** : तो कागद सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांच्याकडून ॲप्रूव्हल करुन घ्यावा.

श्री. राजेंद्र दर्डा : ठीक आहे.

-------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ऊर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पासाठी लागणारी जमीन बाजारभावाप्रमाणे संपादित करणे.

**मु. शी.** : ऊर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पासाठी लागणारी जमीन बाजारभावाप्रमाणे संपादित करणे यासंबंधी ॲड.उषा दराडे, सर्वश्री विक्रम काळे, रमेश शेंडगे, हेमंत टकले, सतीश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" वडवणी तालुक्यातील (जिल्हा बीड ) सोन्नाखोटा उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पासाठी सोन्नाखोटा, पिंपळटक्का, रुईपिंपळा, पिंपळारुई इत्यादी गावातील जमीन शासनाने स्वातंत्र्यपूर्वीचे नियम लावून स्वत: जमीन खरेदी करण्यात येणे, मात्र मावेजाची रक्कम अतिअल्प देणे, त्यामुळे स्थानिक नागरिकांना माहे मार्च, 2011 च्या पहिल्या सप्ताहात प्रकल्पाचे काम बंद पाडणे, तसेच प्रकल्पासाठी बाजारभावाप्रमाणे मावेजा देण्याची रक्कम देणेबाबतची व आधी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मगच प्रकल्प अशी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.प्रकाश सोळंके ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...



ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यामध्ये सोन्नाखोटा ऊर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पासाठी सोन्नाखोटा, पिंपळटक्का, रुईपिंपळा, पिंपळारुई, इत्यादी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गावांची जमीन शासनाने संपादित केलेली आहे तसेच घरे देखील संपादित केलेली आहेत. काही गावाचे ॲवार्डही पूर्ण झालेले आहेत. लोकांना अत्यल्प प्रमाणात म्हणजे 500 रुपये पर आर किंवा त्याच्या आसपास अशा पध्दतीने मावेजा वाटप केलेला आहे. काही गावातील नागरिकांनी सेक्शन 18 खाली कोर्टात केसेस दाखल केलेल्या आहेत. काही गावांचे ॲवार्ड जाहीर करण्याची प्रक्रिया चालू आहे. ॲवार्ड जाहीर करण्याचे काम तातडीने होत आहे. तेथील गावकऱ्यांनी मावेजा बाजारभावाप्रमाणे मिळावा म्हणून अनेक वेळा अंदोलने केलेली आहेत. शासनाने जैतापूरच्या धर्तीवर या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांशी तडजोड करुन बाजारभावाप्रमाणे मावेजा देण्याच्या दृष्टीने माननीय मंत्री महोदय जलसंपदा विभागाच्या मंत्र्यांसमवेत बैठक घेतील काय ? माननीय मंत्री महोदयांनी या विषयाच्या अनुषंगाने बैठक घेतली तर ज्यांना मावेजा वाटप झालेला आहे, परंतु ते प्रकल्पग्रस्त न्यायालयात गेलेले आहेत, त्यांच्या मागणी बाबतचा विषय बैठकीतील विषय सूचीमध्ये घेण्यात येईल काय, पुनर्वसन केल्यानंतरच त्यांच्या जमिनी संपादित केल्या जातील याबाबतची दक्षता घेण्यात येईल काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या प्रकल्पाच्या संदर्भामध्ये बरीच माहिती सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दिली आहे. पहिल्या टप्प्यामध्ये या प्रकल्पासाठी शासनाने 179 हेक्टर जमीन संपादित केली आहे. त्याचे ॲवार्ड देखील झाले आहेत. परंतु दुसऱ्या टप्प्यासाठी अजूनही 163.99 हेक्टर जमिनीचे संपादनाचे काम प्रगतीपथावर आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी माहिती दिली ती खरी आहे की, शेतकऱ्यांनी वेळोवेळी अंदोलने करुन त्या ठिकाणच्या धरणाचे चालू असलेले काम बंद करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या शेतकऱ्यांची मागणी आहे की, आमच्या जमिनीचे संपादन बाजारभावाप्रमाणे करण्यात यावे. या संदर्भात जलसंपदा मंत्र्यासोबत एक बैठक आयोजित करुन, तडजोडीच्या माध्यमातून या प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमिनीचे संपादन करता येईल काय याचा विचार करण्यात येऊन त्या बाबतीत पुढील कार्यवाही निश्चितपणे करण्यात येईल.

--------------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कांदा निर्यात बंदीमुळे मागणी व पुरवठ्यात तफावत निर्माण होऊन कांद्याचे दर उतरणे.

**मु.शी.**: कांदा निर्यात बंदीमुळे मागणी व पुरवठ्यात तफावत निर्माण होऊन कांद्याचे दर उतरणे यासंबंधी सर्वश्री सय्यद पाशा, धनंजय मुंडे, संजय केळकर यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सय्यद पाशा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कांदा दरात अचानक घसरण झाल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी दि.९.२.२०११ रोजी वा त्या सुमारास पिंपळगाव बसवंत आणि लासलगाव येथे केलेला रास्ता रोको, बाजारात मोठ्या प्रमाणात कांदा आलेला नसताना तसेच शासनाने लादलेल्या निर्यात बंदीमुळे मागणी व पुरवठ्यात तफावत असल्यामुळे कांद्याचे दर उतरुन शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, कांद्याच्या उत्पादनासाठी क्विंटलला १ हजार रुपये खर्च येत असल्यामुळे किमान १५०० रुपये भाव मिळावा यासाठी शेतकऱ्यांनी लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांद्याचे लिलाव बंद पाडणे, किमान २ हजार रुपये भाव देण्याच्या मागणीसाठी शांततेत आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर पोलिसांनी केलेला लाठीहल्ला, अचानक केलेल्या लाठीहल्ल्यामुळे शेतकऱ्यांची पळापळ होऊन अनेक शेतकरी चिरडले जाणे, पोलिसांनी हिंसक पद्धतीने आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व त्यांच्यात निर्माण झालेली संतापाची भावना, शासनाने निर्यातबंदी त्वरीत न उठवल्यास आंदोलन तीव्र करण्याचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी दिलेला इशारा, या प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची भूमिका."

श्री.प्रकाश सोळंके (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, कांद्याने मध्यंतरी संपूर्ण देशाला रडावयास लावले होते. कांदा पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून आपण याठिकाणी बसलो आहोत. शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा हा प्रश्न आहे. मध्यंतरी कांद्याचा विषय संपूर्ण देशात गाजला होता. या कांद्याबाबत कोणकोणते षडयंत्र रचले जात आहे? कांद्याची भाववाढ झाली म्हणून निर्यात बंदी केली केली. निर्यात बंदी केल्याबद्दल कोणी आंदोलन केले नव्हते वा कोणी निर्यात बंदीची मागणी केली नव्हती. सरकार एवढे कार्यक्षम आहे की, भाववाढ झाल्याबरोबर कांद्याची निर्यात बंदी केली. निर्यात बंदी केल्यामुळे कांद्याचे भाव गडगडले. 945 रुपये प्रती क्विंटल एवढे भाव झाल्यामुळे देशभरातील शेतकऱ्यांनी आंदोलने केली. त्यांचे म्हणणे होते की, प्रती क्विंटल 945 रुपये भाव आहे तो वाढवून मिळावा. निर्यात बंदी उठल्यानंतरच भाव वाढतील असे सरकारचे मत झाले. सरकारने ताबडतोब निर्यात बंदी उठविली. परिणाम असा झाला की, कांद्याचे भाव 945 रुपयांवरुन 200 रुपये प्रती क्विंटल एवढे खाली आले. शेतकऱ्यांनी पुन्हा आंदोलने केली. निर्यात बंदी उठवा म्हणजे भाव वाढतील असे शेतकऱ्यांचे म्हणणे होते. परंतु काय चमत्कार केला? निर्यात बंदी उठविली आणि कांद्याचे भाव प्रती क्विंटल 200 रुपयांवर आले. हे आम्ही केले नाही, सरकारने केले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येला प्रोत्साहन देण्यासाठी केलेला हा डाव आहे का? शासनाचे हे धोरण चुकीचे आहे. भाव वाढवून मिळावेत म्हणून शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय सदस्य कोणत्या धोरणाबद्दल बोलत आहेत? कोणते धोरण चुकीचे आहे?

श्री.सय्यद पाशा पटेल : 945 रुपये प्रती क्विंटल भाव झाल्यामुळे ते वाढवून मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलने केली होती. 945 रुपये दर कमी असल्यामुळे शेतकरी रस्त्यावर उतरले होते. त्यांनी रास्ता रोको केल्यानंतर शासनाने निर्यात बंदी उठविली आणि कांद्याचे भाव गडगडले. सरकारचे हे धोरण चुकीचे आहे.

श्री.प्रकाश सोळंके : नेमका प्रश्न काय आहे? निर्यात बंदी उठवावी की उठवू नये?

श्री.सय्यद पाशा पटेल : आदरणीय मंत्री महोदय, 945 रुपये प्रती क्विंटल भाव कमी असल्यामुळे शेतकऱ्यांनी रास्ता रोको केला होता. रास्ता रोको केल्यानंतर सरकारने निर्यात बंदी उठविली. निर्यात बंदी उठविल्यानंतर भाव कमी झाले पाहिजेत की वाढले पाहिजेत? निर्यात बंदी

..3...

उठल्यानंतर भाव कोसळले. हा कोणता चमत्कार आहे, अशी कोणती कल्पकता आहे, कोणते षडयंत्र आहे की, ज्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आत्महत्या करावी? तुम्ही शेतकऱ्यांना वाचवावयास निघाले असताना निर्यात बंदी करताना अनेक खुंटया घातल्या.

..नंतर जी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल .........

या निर्यात बंदीमुळे अशी खुंटी घातली की पहिल्यांदा 600 अमेरिकन डॉलर प्रति मेट्रिक टन एवढा भाव ठरविण्यात आला. त्यानंतर शासनालाच वाटले की, आपले काही तरी चुकले म्हणून हा भाव 300 रुपये प्रति मेट्रिक टन आणि नंतर पुन्हा तो भाव 225 रुपयावर आला. अशा प्रकारे तिन्ही प्रयोग केले. लक्षवेधी सूचनेला दिलेल्या निवेदनात मात्र शासनाने चालाखी केली की, निर्यात सुरु केल्यानंतर 62 हजार मेट्रिक टन एवढ्या कांद्याची निर्यात झाली पण भाव मात्र सांगितला नाही. इतका सर्व खटाटोप शेतकऱ्यांना मारण्यासाठी शासनाने केलेला आहे काय ? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, निर्यात बंदी असताना 945 रुपये क्विंटल एवढा भाव होता पण निर्यात सुरु होताच हे भाव न वाढण्याचे कारण काय आहे, यामध्ये शासनाचे कट कारस्थान वगैरे आहे काय, आणि अशा प्रकारची वागणूक शेतकऱ्यांना देण्याचे कारण काय ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, सन्माननीय सदस्यांनी शंका व्यक्त केली त्याप्रमाणे शासनाचे यामध्ये कोणत्याही प्रकारचे कट कारस्थान नाही तर बाजारात कांद्याची आवक ज्या प्रमाणात असते त्यानुसार भाव ठरत असतात, ही वस्तुस्थिती आहे. सुरुवातीला कांद्याचे भाव 60-70 रुपये किलोपर्यंत गेले त्याचे कारण म्हणजे कांदा पिकणाऱ्या प्रदेशात अवकाळी पावसामुळे कांद्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले त्यामुळे मागणीच्या तुलनेत मालाची आवक कमी झाली म्हणून भाव वाढले होते. सन्माननीय सदस्यांनी कांद्याच्या बाबतीत संसदेत झालेली चर्चा नजरेखालून घातली तर त्यांना कळेल की, कोणकोणत्या नेत्यांनी कांद्याची निर्यात बंदी करण्याची मागणी केली होती.

श्री. सय्यद पाशा पटेल : महोदय, मंत्री महोदयांनी संसदेचे उदाहरण दिले म्हणून मी त्यांना विचारु इच्छितो की, शासन जर आमचे सगळेच ऐकणार असेल तर साखरेची निर्यात देखील सुरु करावी. मंत्री महोदयांनी मागणी व पुरवठ्याचा सिध्दांत सांगितला, तो आम्हाला समजत नाही, पण मी या सभागृहाचा सदस्य म्हणून विचारु इच्छितो की, कांद्याचे दर 945 पर्यंत गेले म्हणून निर्यात बंदी उठविण्याची मागणी केली होती. पण निर्यातबंदी उठविल्यानंतर मात्र कांद्याचे भाव वाढण्याऐवजी कमी झाले. यामागे शासनाचे काही षडयंत्र वगैरे आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, निर्यात बंदी उठविणे हा एक उपाय आहे. आपल्या देशातील कांदा बाहेर गेल्यानंतर कांद्याचे भाव साधारणत: वाढतात. निर्यात सुरु झाल्यानंतर 62

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ........

हजार मेट्रिक टन कांदा निर्यात झाला. पण हाच कांदा जर बाजारातच राहिला असता तर सध्याचा जो भाव आहे त्यापेक्षाही कमी भाव कांद्याला मिळाला असता, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून यात कोणत्याही प्रकारचे षडयंत्र वगैरे नाही तर आवक ज्या प्रमाणात असते त्या प्रमाणातच भाव ठरत असतात.

श्री. सय्यद पाशा पटेल : कांदा पिकविणारा राज्यातील शेतकरी आज शासनाकडे आशेने बघत आहे. म्हणून माझा प्रश्न आहे की, कांद्याचे भाव 945 रुपये झाल्यानंतर शासनाने कांदा का खरेदी केला नाही ? तसेच निर्यात बंदी उठविल्यानंतर सुरुवातीला ठरविलेल्या 600 डॉलर प्रति मेट्रिक टनाप्रमाणे कांद्याची खरेदी का केली नाही ? तेव्हा शासनाने या किंमतीत दोन वेळा बदल केला, याचे कारण काय आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, खरीपाचा कांदा बाजारात आल्यानंतर तो जास्तीत जास्त 15 दिवसच राहू शकतो, साठविण्यासारखी परिस्थिती नसते म्हणून 15 दिवसात त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक असते. पण रब्बीचा कांदा हा 15 मार्च नंतर बाजारात येतो आणि त्याची साठवणूक क्षमता जवळपास 6 ते 7 महिन्याइतकी असते.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ...

ज्यावेळेस मार्केटमध्ये कांदा मोठया प्रमाणात येत असतो त्यावेळेस कांद्याचे भाव खाली येत असतात व त्याप्रमाणे या वेळीही कांद्याची जास्त आवक झाल्यामुळे कांद्याचे भाव खाली आलेले आहेत.

श्री. जयवंतराव जाधव : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी कांदा पिकविणा-या शेतक-यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा विषय उपस्थित केलेला आहे. या विषयाच्या संदर्भात मी सुध्दा लक्षवेधी सूचना दिली होती परंतु माझी लक्षवेधी सूचना सभागृहापुढे येऊ शकली नाही. संपूर्ण नाशिक जिल्हयामध्ये कांद्याचे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते. यासंदर्भात मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, देशातील एकूण कांदा उत्पादनातील 60 टक्के कांद्यांचे उत्पादन महाराष्ट्रातून होत असते. संपूर्ण महाराष्ट्रातील कांदा उत्पादनापैकी 60 टक्के कांद्याचे उत्पादन नाशिक जिल्हयामधून होत असते. माननीय मुख्यमंत्री महोदय, सुध्दा या चर्चेच्या निमित्ताने सभागृहात उपस्थित असल्यामुळे ते तरी कांदा उत्पादक शेतक-यांना न्याय देतील असा मला विश्वास आहे. कांदा पिकविणा-या शेतक-यांच्या दृष्टीने हा विषय जीवन मरणाचा आहे. नगदी पिकापैकी कांदा हे प्रमुख पीक आहे. कांदा पिकाच्या संदर्भात घाणेरडे राजकारण नेहमी केले जात असते. कांदा पिकविणा-या शेतक-याला मदत झाली पाहिजे कांदा पिकासाठी हमी भाव दिला पाहिजे असे आपण म्हणतो परंतु कांदा पिकविणा-या शेतक-याचा प्रत्यक्षात काहीही फायदा होत नाही. ज्यावेळेस कांदा पिकविणारा शेतकरी चांगल्या पध्दतीने कांदा पिकवतो, मुबलक माल काढतो त्यावेळेस शासन त्यामध्ये हस्तक्षेप करीत असते व त्यासाठी आपल्या सारखी राजकारणी मंडळी शासनाला हस्तक्षेप करण्यास भाग पाडत असतात. ज्यावेळेस कांद्याचे भाव खाली येतात त्यावेळेस शासनाने हस्तक्षेप करावयास पाहिजे असतो परंतु तसे होतांना दिसत नाही. परंतु ज्यावेळेस कांद्याचे दर 1000,1500 रुपये क्विंटल होतात तेव्हा खरे म्हणजे कांदा पिकविणा-या शेतक-याला फायदा होत असतो, अशा वेळेस शासन मात्र आवर्जून हस्तक्षेप करीत असते. आज कांदा उत्पादन करण्यासाठी एकरी जेवढा खर्च येतो तेवढा खर्चही कांदा विकून निघत नाही. कांद्याच्या भावाच्या संदर्भात सर्वात मोठा विषय हा एमईपीचा आहे. एमईपीचे धोरण केंद्रशासनाचे वाणिज्य खाते ठरवित असते. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो की, आपण केंद्रामध्ये काम केलेले आहे, आपल्याला केंद्राचा अनुभव असल्यामुळे आपण एमईपीच्या धोरणाच्या संदर्भात केंद्रीय वाणिज्य खात्याकडे असलेले अधिकार नाफेडकडे देण्याची मागणी केंद्राकडे करणार का?

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. एम.ई.पी. म्हणजे मिनिमम एक्सपोर्ट प्राईस ही सध्या डायरेक्टर जनरल, फॉरिन ट्रेड , वाणिज्य विभाग यांच्या मार्फत ठरविण्यात येत असते. ही एम.ई.पी. ठरविण्याचे अधिकार नाफेडला देण्यात यावे अशी प्रामुख्याने सन्माननीय सदस्यांची तसेच कादा उत्पादकांची मागणी आहे. या संदर्भात केन्द्र सरकारचे कॉमर्स ॲन्ड इन्डस्ट्रीज मिनिस्टर श्री. आनंदजी शर्मा, यांच्याकडे दिनांक 17 मार्च 2011 रोजी राज्य शासनाने एमईपी ठरविण्याचा अधिकार वाणिज्य खात्याकडून नाफेडला देण्यात यावा अशी विनंती केली आहे. या मागणीसाठी राज्य सरकार पाठपुरावा करीत आहे. त्याचबरोबर ही मागणी मान्य करुन घेण्यासाठी केन्द्र सरकारकडे राज्य सरकार निश्चितपणे येथून पुढे पाठपुरावा करील.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, कांदा, आंबा व इतर काही फळे ही नाशवंत आहेत. या उत्पादनाचे सेल्फ लाईफ वाढविण्यासाठी संशोधन करतात त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी योजना आखण्यात येणार आहे काय ? माननीय मंत्र्यांनी उत्तर देतांना सांगितले की, कांद्याला सेल्फ लाईफ नसल्यामुळे तो लवकरात लवकर विकावा लागतो तेव्हा कांद्याचे सेल्फ लाईफ वाढविण्यासाठी या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये शासन काही तरतूद करणार आहे काय, कांद्याचे भाव दलालांमुळे पडतात असा उल्लेख काही वेळा करण्यात येत असतो . मार्केट कमिटयांमध्ये दलाल वेगळया पध्दतीने काम करीत असतात म्हणून इलेक्ट्रॉनिक पध्दतीने कांद्याची विक्री करावी असे केन्द्र शासनाने जाहीर केलेले आहे त्याची प्रभावीपणे महाराष्ट्रात अंमलबजावणी करण्यासाठी ठोस पावले उचलण्यात येणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके :सभापती महोदय, कांद्याच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना मांडण्यात आलेली असली तरी सन्माननीय सदस्यांनी नाशवंत कृषी उत्पादनाच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे . मी त्यांना सांगू इच्छितो की, पणन खात्याच्या माध्यमातून कांद्याची साठवणूक करण्यासाठी कांदा चाळ योजना महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. आतापर्यत या योजनेअंतर्गत सुमारे 70 कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे. त्यामुळे कांदा साठवणुकीची क्षमता 6 लाख मे.टन इतकी झाली आहे. नाशिक, सोलापूर,पुर्णे,अहमदनगर हे कांदा उत्पादन करणारे जिल्हे आहेत . या जिल्हयात प्राधान्याने कांदा चाळी बांधून ज्यावेळी मार्केटमध्ये भाव कमी असतात त्यावेळी शेतक-यांना या कांदा चाळीमध्ये कांद्याची साठवणूक करता यावी आणि ज्यावेळी भाव

2..

श्री.प्रकाश सोळंके.........

वाढतात त्यावेळी या चाळीतील कांदा मार्केटमध्ये आणता यावा या दृष्टीकोनातून कांदा चाळ योजना राज्यामध्ये राबविण्यात येत आहे.

श्री संजय.केळकर : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात बरीच चर्चा झालेली आहे. एमईपी ठरविण्याचा अधिकार वाणिज्य विभागाकडून नाफेडला द्यावा यासाठी राज्य सरकारने केन्द्र सरकारला विनंती केली असल्याचे माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे. नाशिक जिल्हयामध्ये 60 टक्के कांद्याचे उत्पादन होत असते. सध्या हा शेतकरी अडचणीमध्ये आहे त्याला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे, कांद्यासाठी शासन हमी भाव ठरविणार आहे काय हा सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांचा महत्वाचा प्रश्न होता.सध्या कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत असल्यामुळे त्या अडचणीतून त्याला बाहेर काढण्यासाठी शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे रब्बीचा कांदा आता मार्केटमध्ये मोठया प्रमाणावर यावयास लागला ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रातील सरासरी किंवा या चार जिल्हयाची सरासरी विचारात घेतली तरी 350 ते 500 रुपये क्विंटल एवढा मार्केटमध्ये कांद्याला भाव आहे. हा भाव कमी आहे याची शासनाला जाणीव आहे.कांद्याची निर्यात करण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे 600 यु.एस डॉलर्सची एमईपी 250 यु.एस. डॉलर्स पर्यत केन्द्र सरकारने खाली आणली आहे.एका बाजूला कांद्याचे जादा उत्पादन झालेले आहे त्याची निर्यात केल्याशिवाय बाजारभाव वाढणार नाहीत म्हणून निर्यात करण्यावरच राज्य सरकारचा जास्तीत जास्त भर राहील.

श्री.सय्यद पाशा पटेल : या विषयावर सरकारचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी घोषणा देत सभात्याग केला )

--------

नंतर श्री.सरफरे

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचना क्र. 10 बाबत

**उप सभापती** : माननीय गृह मंत्र्यांना विधानसभेमध्ये प्रश्नोत्तराच्या तासाकरिता उपस्थित राहण्यासाठी जावयाचे असल्यामुळे त्यांनी विनंती केल्यानुसार दहाव्या क्रमांकावरील लक्षवेधी सूचना अगोदर घेण्यात येत आहे.

-----

J 2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : न्यू बबली हॉट नाईट शो या नृत्याच्या कार्यक्रमाला पोलिसांनी दिलेली परवानगी

**मु. शी.** : न्यू बबली हॉट नाईट शो या नृत्याच्या कार्यक्रमाला पोलिसांनी दिलेली परवानगी यासंबंधी श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. रणजित पाटील,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"चंद्रपूर जिल्हयातील सावली ता.निफंद्रा येथे न्यू. नागपूर हॉट बबली डान्स हंगामाचा कार्यक्रम १० फेब्रुवारी, २०११ ला आयोजित करण्यात येणे, सदर कार्यक्रमांत तरुण तरुणींनीं अश्लील प्रदर्शन करुन ग्रामीण भागातील तरुण, तरुणींच्या संस्कारांचा प्रश्न निर्माण होणे, सदर कार्यक्रमावर बंदी असताना संबंधित पोलीस विभागाकडून परवानगी दिली जाणे, सदर अश्लील कार्यक्रमाबाबत पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांचेकडे मर्दानी आस्था मंच चंद्रपूर यांनी दि.१९.२.२०११ ला तक्रार दाखल करणे, तसेच गडचिरोली जिल्हयातही छत्तीसगडी कलेच्या नावाखाली व न्यू.नागपूर हॉट बबली हॉट हंगामाच्या नावाखाली वय वर्षे १४ ते २० वर्षीय तरुणीचा अश्लील नाच, त्यामुळे ग्रामीण भागात अश्लीलतेने गाठलेला कळस, तरुणांवर होत असलेला विपरीत परिणाम पोलीस खात्यातर्फे दिली जाणारी परवानगी, त्यात त्यांचा असलेला सहभाग, ह्यावर तातडीने बंदी घालण्याची आवश्यकता, शासनाने यावर तातडीने करावयाची कारवाई व उपाय योजना"

श्री. आर. आर. पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेतील विषय अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. शासनाने हे अश्लील नृत्य असल्याचे कबूल केले असून त्यावर बंदी घालण्यात आली असल्याचे सांगितले आहे. माझा प्रश्न असा आहे की, दिनांक 10 फेब्रुवारी 2011 रोजी या डान्सच्या कार्यक्रमाला परवानगी दिल्यानंतर तो रात्री सुरु झाला. सदरचा कार्यक्रम दिनांक 11 फेब्रुवारी 2011 च्या पहाटे 4 वाजेपर्यंत सुरु होता. ज्या ठिकाणी शालेय सांस्कृतिक कार्यक्रम होतात त्यांना रात्री दहा वाजेपर्यंत पोलिसांची परवानगी असते, त्यानंतर ते तात्काळ बंद केले जातात. त्यामुळे हा कार्यक्रम पहाटे 4 वाजेपर्यन्त पोलिसांच्या उपस्थितीत कसा सुरु होता? या कार्यक्रमाची सी.डी. माझ्याजवळ असून मी ती आज आणलेली नाही, ती सी.डी. मंगळवारी आपणास देईन. सदरची सी.डी. आपण आपल्या मित्रांसह किंवा पत्नीसह पाहू शकणार नाही इतकी घाणेरडी आहे. हा अश्लील नृत्याचा कार्यक्रम पहाण्याकरिता ग्रामीण भागातून दोन ते चार हजार लोक आले होते. असे असतांना अशा घाणेरडया बीभत्स प्रकारच्या डान्स कार्यक्रमाला पोलिसांनी परवानगी कशी दिली, पहाटे 4 वाजेपर्यन्त हा कार्यक्रम कसा सुरु ठेवला, त्या कार्यक्रमाच्या आयोजकांवर ताबडतोब कारवाई कां केली नाही? या कार्यक्रमाबाबत चंद्रपूरच्या मर्दानी आस्था महिला मंचाने पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली आहे. या निवेदनामध्ये गडचिरोली जिल्हयामध्ये असे कार्यक्रम होत नसल्याचे म्हटले आहे. परंतु ज्या कलाकारांना पकडण्यात आले आहे ते गडचिरोली जिल्ह्यातील चुरमुरा गावामध्ये कार्यक्रम करीत होते त्यावेळी त्यांना पकडण्यात आले आहे. हा कार्यक्रम पहाण्याकरिता मूल, चंद्रपूरच्या आजूबाजूच्या गावातील लोक जातात. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावाखाली गडचिरोली जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणावर हे कार्यक्रम होत असतात. तेव्हा या बाबत आपण पुन्हा एकदा चौकशी करणार काय? ज्यांच्या अधिपत्याखाली पहाटे 4 वाजेपर्यंत हा कार्यक्रम सुरु होता त्या पोलीस यंत्रणेवर आपण कारवाई करणार काय? तिसरा प्रश्न असा की, या कार्यक्रमात भाग घेणाऱ्या लोकांना तीन दिवसानंतर अटक करण्याची कारवाई कां करण्यात आली?

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, या घटनेबाबतची बातमी वर्तमानपत्रामध्ये छापून आली होती आणि पोलिसांकडे त्या बाबत उशिरा तक्रार आल्यानंतर पोलिसांनी या कार्यक्रमाच्या आयोजकांवर आणि कलाकारांवर गुन्हे नोंदविले आहेत. सभापती महोदय, अनेक वेळा आपण या जिल्ह्याच्या इंटेरिअर भागामध्ये, नक्षलग्रस्त भागामध्ये एकटया पोलिसाला पाठवीत नाही. त्या बाबत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुरक्षिततेच्या दृष्टीने आपल्याला योग्य ती काळजी घ्यावी लागते. या कार्यक्रमाला सावलीच्या तहसीलदारांनी पोलीस विभागाने घालून दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून आणि कोणत्याही प्रकारचे अश्लील नृत्य करु नये अशा प्रकारची अट घालून परवानगी दिली होती. सदर कार्यक्रमाच्या वेळी पोलीस बंदोबस्त नव्हता. परंतु याबाबत पोलिसांना पुरावे मिळाले, साक्षीदार मिळाले आणि पोलिसांनी ती सी.डी. बघितल्यानंतर कारवाई केली आहे. अशा प्रकारचे अश्लील नृत्याचे कार्यक्रम या पुढील काळात करण्यात येऊ नयेत यासाठी योग्य ती दक्षता घेण्यात येईल. या मध्ये संयोजकांना जबाबदार धरण्यात येईल व अशा प्रकारच्या गोष्टींना अटकाव करण्याची सरकारने पूर्णपणे तयारी ठेवली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी अतिशय दुर्लक्षित व महत्वाचा प्रश्न विचारला आहे.शासनाने दिलेल्या उत्तरामध्ये 7 आरोपींना अटक केल्याचे म्हटले आहे. "न्यू बबली हॉट नाईट शो" च्या नावाखाली सुरु असलेल्या अश्लील नृत्याच्या कार्यक्रमाला महात्मा गांधी तंटा मुक्त समितीने प्रमाणपत्र देऊन तंटयातून मार्ग काढला आहे. तेव्हा ही तंटा मुक्त समिती शासन बरखास्त करणार आहे काय?

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, एखाद्या कार्यक्रमाला परवानगी देत असतांना त्या कार्यक्रमा मध्ये कशा प्रकारचे नृत्य होणार आहे याची तंटा मुक्त समितीला आणि तहसीलदार यांना कल्पना असणे शक्य नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

त्यांनी त्यामध्ये अटी घातलेल्या आहेत. संबंधितांनी शिफारस केली होती की, हा कार्यक्रम ठेवण्या-साठी परवानगी द्यावी. त्याबाबत तहसीलदारांनी अटी घालून परवानगी दिली. पण पुन्हा त्यांनी कपडे कमी केले.....

**उप सभापती** : त्यासाठी परीक्षण समिती ठेवावी व त्यांनी अगोदर डान्स पाहून मग परवानगी द्यावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पुन्हा असे प्रकार घडणार नाहीत यादृष्टीने शासना मार्फत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, डान्सला परवानगी देण्यापूर्वी हा डान्स कशा पध्दतीचा आहे हे आपल्याला कळत नाही असे माननीय गृह मंत्री यांनी येथे सांगितले. माझा माननीय गृह मंत्र्यांना प्रश्न आहे की, अशा प्रकारच्या कार्यक्रमाला परवानगी मागत असताना, त्या कार्यक्रमाचे जे संयोजक आहेत, त्यांच्याकडून या कार्यक्रमामध्ये अश्लीलता किंवा अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत अशा प्रकारचे आपण हमी पत्र घेणार आहात काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या पुढील काळामध्ये जे कोणी परवानगी मागतील, त्यांच्याकडून आम्ही असे लिहून घेऊ की, या कार्यक्रमामध्ये अशा प्रकारचा डान्स केला जाणार नाही, अश्लील हावभाव केले जाणार नाहीत, नग्न डान्स असणार नाहीत. त्यामुळे कार्यक्रमांना परवानगी देत असताना सुध्दा अशा प्रकारच्या अटी घालण्यात येतील.

**उप सभापती** : आता मला सभागृहातील एकंदरीत मूड असा दिसतो की, आतापर्यंत याठिकाणी जे सार्वजनिक प्रश्न उपस्थित करण्यात आले, त्यांच्या बाबतीत फारसे कोणी प्रश्न विचारण्यासाठी हात वर केले नाहीत. परंतु या प्रश्नाच्या बाबतीत मात्र प्रश्न विचारण्यासाठी सर्वाधिक हात वर उचलले जात आहेत. त्यामुळे मी आता दुसरी लक्षवेधी सूचना पुकारतो. आता सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी अनु.6 वरील लक्षवेधी सूचना उपस्थित करावी.

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, माझा एक प्रश्न आहे. हा विषय समाजाचे स्वास्थ्य बिघडविणारा आहे.

**उप सभापती** : मी पुढील लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे.

-----

.

. . . .के-2

**पृ. शी.** : पुणे शहरातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये जीवनदायी योजनेंतर्गत आर्थिक दुर्बल गटातील रुग्णांवर मोफत उपचार न करणे

**मु. शी.** : पुणे शहरातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये जीवनदायी योजनेंतर्गत आर्थिक दुर्बल गटातील रुग्णांवर मोफत उपचार न करणे यासंबंधी सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी, सन्माननीय सदस्य अनिल भोसले वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिप्ती चवधरी (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुणे शहरात ५० पेक्षा अधिक रुग्णालयांनी सरकारी जागा किंवा अन्य स्वरुपामध्ये मदत घेतलेली असून धर्मादाय न्यास,स्वयंसेवी संस्था अशा या संस्थांना भोगवटाधिकार किंवा भाडेपट्याने जागा देताना सरकारने दारिद्रय रेषेखालील रुग्णांना मोफत उपचार करुन देण्याचे, तसेच त्यांच्या साठी खाटा राखून ठेवण्याचे आदेश देण्यात आले असूनही या नियमांची अंमलबजावणी होत नसणे, जीवनदायी योजनेंतर्गत आर्थिक दुर्बल गटातील रुग्णांवर मोफत उपचार न केल्याप्रकरणी धर्मादाय आयुक्त कार्यालयाने रुबी हॉल क्लिनीक विरुध्द न्यायालयात तक्रार दाखल करणे,जीवनदायी योजनेंतर्गत गरीब रुग्णांची मोफत तपासणी आणि उपचार करणे आवश्यक असून या संदर्भातील नोंद रुग्णालयाने ठेवणे बंधनकारक आहे,तथापि मे २०१० मध्ये राज्याच्या धर्मादाय आयुक्तांनी रुग्णालयाला भेट दिली असता गरीब रुग्णांना मोफत उपचार दिले जात नसल्याचे आढळून येणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केले असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील दुरुस्ती करु इच्छितो.

"निवेदनातील पहिल्या ओळीमध्ये असे म्हटलेले आहे की "पुणे जिल्ह्यात 44 खाजगी ........



APR/ KTG/ D/ 11:20

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

रुग्णालय व न्यासांना सवलतीच्या दराने सरकारी जमिनी देण्यात आल्या आहेत." याऐवजी "पुणे जिल्ह्यात 12 खाजगी रुग्णालये व न्यासांना सवलतीच्या दराने सरकारी जमिनी देण्यात आल्या आहेत."असे वाचावे.

तसेच निवेदनातील 9 व्या ओळीमध्ये "दि.18-5-2011" असा उल्लेख करण्यात आलेला आहे, त्याऐवजी "दि.18-5-2010" असे वाचावे."

**उप सभापती** : दुरुस्त निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .के-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणे शहरात अनेक ठिकाणी 1 रुपया किंवा त्यापेक्षा अतिशय नाममात्र भाड्यामध्ये अनेक हॉस्पिटल्स्नां जागा दिलेली आहे. आपण जेव्हा अशा प्रकारे शासनाच्या जागा देतो, तेव्हा आपली अशी अपेक्षा असते की, त्याठिकाणी गरीब रुग्णावर मोफत किंवा सवलतीच्या दरामध्ये उपचार व्हावयास पाहिजेत.परंतु याठिकाणी मात्र सर्व नियम धाब्यावर बसवून म्हणजे उदाहरण द्यावयाचे तर पुणे महानगरपालिकेने दीड एफएसआय ची परवानगी दिलेली असताना, सुध्दा 2 एफएसआय नुसार काम करुन गेल्या 6 वर्षापासून हे हॉस्पिटल सुरु आहे. मात्र .5 एफएसआय बाबत शासनाकडून अद्यापही परवानगी मिळालेली नाही. माझे असे स्पष्ट मत आहे की, ही लुटारुंची टोळी आहे.याठिकाणी माझे स्पेसिफीक प्रश्न असे आहेत. अशा प्रकारची जी हॉस्पिटल्स् आहेत जे शासनाचे नियम पाळत नाहीत, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. याबाबतीत संबंधितांना कडक शिक्षा होईल यादृष्टीने सरकार कायद्यामध्ये बदल करणार आहे काय? त्याचप्रमाणे आपण गरीब लोकांना हॉस्पिटलमध्ये पाठवितो तेव्हा असे उत्तर दिले जाते की, तेथे आधीच खूप पेशंट असल्याने खाटा रिकाम्या नाहीत. याबाबतीत माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, प्रत्येक हॉस्पिटलमध्ये किती बेड रिकामे आहेत, किती बेड गरीब लोकांसाठी राखून ठेवण्यात आलेले आहेत, यासंबंधीची माहिती ऑन लाईन कळू शकेल काय, याबाबतीत भविष्यामध्ये यंत्रणा निर्माण करणार आहात काय? तसेच इतर हॉस्पिटलमध्ये उपचार न झाल्यामुळे अनेक ठिकाणी रुग्णांच्या संख्येचा ताण ससून हॉस्पिटलवर पडत आहे.कारण ज्या हॉस्पिटलमध्ये गरीब लोकांसाठी जागा ठेवलेल्या आहेत, तेथे जागेअभावी त्यांच्यावर उपचार न झाल्यामुळे ते सगळे रुग्ण ससून हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी जातात आणि त्यामुळे ससून हॉस्पिटलवर ताण येतो. त्यामुळे ज्या हॉस्पिटलमध्ये गरीब लोकांवर उपचार केले जात नाहीत, त्यांना जुमानत नाही यासाठी शासन संबंधितांवर काय कारवाई करणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्तीताई चवधरी यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जो प्रश्न उपस्थित केला, तो पुण्याच्या हॉस्पिटलबाबत आहे. खास करुन रुबी हॉस्पिटलबाबत आहे. मी रुबी हॉस्पिटलबाबत सांगू इच्छितो की, चॅरिटी कमिशनर यांनी अगोदरच त्यांच्या विरुध्द क्रिमिनल तक्रार पुणे येथील कोर्टामध्ये दाखल केलेली आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही.

श्री. सुरेश शेट्टी ......

सभापती महोदय,

एक केस ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेटसमोर प्रलंबित आहे. या केसचा निकाल आल्या नंतर कोर्ट जी शिक्षा ठरवील त्याप्रमाणे शिक्षा दिली जाईल. पण संपूर्ण महाराष्ट्रात जी धर्मादाय रुग्णालये आहेत त्या रुग्णालयात 10 टक्के बेड्स गरीब रुग्णांसाठी राखीव ठेवावयास पाहिजेत, याबाबत आपण प्रत्येक अधिवेशनामध्ये दोन्ही सभागृहामध्ये चर्चा करतो. गेल्या अधिवेशनामध्ये एका रुग्णालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटरला सभागृसमोर बोलावले होते. या संबंधात हायकोर्टाच्या एक्झिस्टिंग डायरेक्शन्स ऑलरेडी आहेत. हायकोर्टाच्या डायरेक्शन्स प्रमाणे मुंबई व इतर ठिकाणी समितीची स्थापना केलेली आहे. मुंबईसाठी जॉईंट चॅरिटी कमिशनर, जॉईट डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हिसेस, हॉस्पिटल असोसिएशनचे सेक्रेटरी आणि महानगरपालिकेचे प्रतिनिधी अशा चार लोकांची समिती केली आहे. जिल्हा स्तरावर हायकोर्टाच्या आदेशा प्रमाणे हे मॉनिटर करण्यासाठी समिती नेमण्यात आली. सन्माननीय मंत्री श्री. मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली या सभागृहात एक समिती नेमली होती. त्यांनी सर्व रुग्णालयांना भेटी देऊन आपला अहवाल शासनाला सादर केलेला आहे. काही रुग्णालये कोर्टाच्या डायरेक्शन्सचे उल्लंघन करतात. जॉईंट कमिशनरनी रुबी हॉल क्लिनिक संबंधी ऑलरेडी कारवाई केली आहे. त्यांना नोटीस देऊन त्यांच्यावर क्रिमिनल ऑफेन्स रजिस्टर केला आहे. संपूर्ण राज्याचा हा प्रश्न आहे. महाराष्ट्रात जवळ जवळ 408 नोंदणीकृत धर्मादाय रुग्णालये आहेत. मी आजच सन्माननीय मुख्यमंत्र्या बरोबर या बाबत चर्चा केलेली आहे आणि आजच आमच्या विभागाने विधी व न्याय विभागाकडे एक नोट पाठविलेली आहे. याच आठवडयात त्या बाबत एक बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. नवीन राजीव गांधी जीवनदायी योजना आपल्या राज्यात राबविण्यात येणार आहे.

सभापती महोदय, सन्मानीय मुख्यमंत्र्यांनी गेल्या आठवडयात विधानसभेमध्ये याबाबत घोषणा केली होती. गेल्या वर्षी सहा जिल्हे जाहीर केले होते. त्यानंतर मुंबई आणि मुंबई उपनगर हे दोन धरुन एकूण या आठ जिल्हयात ही योजना राबविण्यात येणार आहे आणि टप्प्या टप्प्याने संपूर्ण राज्यात ही योजना राबविण्यात येणार आहे. या राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या संदर्भात एक सेंट्रल कॉल सेंटर राहणार असून ऑनलाईन कनेक्टिव्हिटी असेल. प्रत्येक रुग्णालय या राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये इम्पॅनल होणार आहे. आमच्या खात्याची सूचना अशी होती की, 208

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .......

धर्मादाय रुग्णालयातून 10 टक्के बेड्स गरीब रुग्णांसाठी राखीव ठेवावयाचे आहेत, त्या सर्वांना या जीवनदायी योजनेमध्ये समाविष्ट करुन प्रत्येक रुग्णालयात ऑनलाईन सेवा उपलब्ध केली जाणार आहे. या रुग्णालयांनी एकूण रक्कमेच्या दोन टक्के रक्कम या गरीब रुग्णांवर खर्च करावयाची आहे ती दोन टक्के रक्कम जीवनदायी योजना ट्रस्टमध्ये जमा करावी लागेल. ज्यांचे उत्पन्न एक लाख रुपयापेक्षा कमी आहे, अशा सर्व रुग्णांना या जीवनदायी योजनेचा लाभ घेता येईल. या 408 धर्मादाय रुग्णालयांना कम्पलसरी राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये इम्पॅनल करावे लागेल आणि प्रत्येक वर्षी दोन टक्के रक्कम जीवनदायी योजनोसाठी कॉंट्रीब्युट करावी लागेल, अशा प्रकारचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे असून त्याबाबत दहा ते पंधरा दिवसात निर्णय घेऊन तो प्रस्ताव कॅबिनेटपुढे ठेवण्यात येईल. मला असे वाटते की, शासनाने चर्चा करुन जे उपाय शोधलेले आहेत ते सर्व रुग्णालयांना कंट्रोल करण्याच्या दृष्टीने चांगले उपाय आहेत.

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .....

कारण एकदा बेडचे ऑनलाईन मॉनेटरींग झाल्यानंतर कोणत्या हॉस्पिटलमध्ये किती बेड्स ऑक्युपाईड आहेत, 10 टक्के बेड्स ऑक्युपाईड आहेत की नाही, याची संपूर्ण माहिती रोज आपल्याला या ठिकाणी मिळू शकेल.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, रुबी हॉलच्या ठिकाणी पुणे महानगरपालिकेची जागा होती. डीपी स्किमच्या अंतर्गत वॉर्ड डिस्पेन्सरी म्हणून ती जागा ताब्यात आली होती. आम्ही त्या ठिकाणी रुबी हॉलला बांधकाम करण्याची परवानगी देत असताना नर्सिंग कॉलेज आणि नर्सिंग होस्टेल म्हणून परवानगी दिली. प्रत्यक्षात हे दोन्ही त्या ठिकाणी नाही. त्यांना त्या ठिकाणी नर्सिंग कॉलेज आणि नर्सिंग होस्टेलकरिता परवानगी दिलेली असताना ते त्या ठिकाणी नाही तसेच वॉर्ड डिस्पेन्सरी म्हणून जी 20 टक्के जागा पुणे महानगरपालिकेकडे द्यावयास पाहिजे होती, ती का दिली नाही ? त्या ठिकाणी 2 एफएसआयच्या परवानगीकरिता राज्य शासनाकडे प्रस्ताव दाखल केला आहे. त्या प्रस्तावावर आयुक्तांची सही का नाही ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेने त्यांना जी काही एफएसआयची सवलत दिली असेल त्याची माहिती आता माझ्याकडे नाही. परंतु रुबी हॉस्पिटलच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, या हॉस्पिटलच्या संदर्भात ऑर्गन ट्रान्सप्लांटेशनच्या गैरव्यवहाराच्या प्रकरणाबाबत विधानसभेत चर्चा झाली आणि त्या ठिकाणी आपण त्या संबंधीचा अहवाल देण्यासाठी एक उच्च स्तरीय समिती नेमलेली होती. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, त्या हॉस्पिटलला नर्सिंग कॉलेजसाठी ॲडिशनल एफएसआय दिला होता. माननीय मुख्यमंत्री महोदय स्वत: या ठिकाणी उपस्थित आहेत. नगरविकास खाते सुध्दा त्यांच्याकडे आहे. मी त्यांना विनंती करतो की, पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून एक उच्च स्तरीय चौकशी नेमून महानगरपालिकेने त्यांना ज्या काही अटी घालून दिलेल्या होत्या त्याचे पालन केले नसेल तर त्यांच्यावर काय कारवाई करावयाची याचा एक अहवाल पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून मागवून लगेच राज्य शासनातर्फे त्यांच्यावर कारवाई करु.

...2...

RDB/ KTG/ D/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना हा प्रश्न चांगल्याच प्रकारे माहीत आहे. आपण अनेक वेळा यावर सभागृहात चर्चा केलेली आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, याची ऑनलाईन माहिती मिळेल. परंतु स्थानिक पातळीवर यावर देखरेख करणारी यंत्रणा नाही. यामध्ये दोन मुद्दे आहेत. ज्यांच्या करारनाम्यामध्ये अट घातलेली आहे अशा लता मंगेशकर मेडिकल फाऊंडेशन आणि ताराचंद आयुर्वेदिक हॉस्पिटल या दोन हॉस्पिटल्सचा उल्लेख आहे. दुसरा जो प्रश्न आहे त्यामध्ये जीवनदायी योजना आणि अन्य गरीब रुग्णांच्या संदर्भातील योजनांबाबत ज्या सूचना आहेत त्याचे पालन होत नाही. आपण ऑनलाईन व्यवस्था करीत असताना पुण्यातील असो किंवा महाराष्ट्रातील असो, सर्व ठिकाणच्या लोकप्रतिनिधींचा, आमदारांचा हाच अनुभव आहे की, ज्या वेळेला एखाद्या माणसाला रुग्णसेवेची गरज असते त्या वेळी ही हॉस्पिटल्स सांगतात की, आमच्याकडे बेड उपलब्ध नाही. बेड कधी आणि कशा पध्दतीने उपलब्ध असणार आहेत याचा साधारणपणे एक अंदाज असतो. त्याची सुध्दा माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींनी विचारली तर त्यांनी सहकार्य केले पाहिजे. तसे ते करत नाही.

दुसरी विनंती अशी आहे की, त्यांनी कोणाकोणाला मोफत सेवेचा फायदा दिला याची माहिती विधानसभेच्या आणि विधान परिषदेच्या स्थानिक आमदारांना दर दोन महिन्यांनी लेखी स्वरुपात दिली तर त्यामध्ये खाजगी डॉक्टर्समार्फत गेलेले रुग्ण कोणते आहेत आणि पुणे महानगरपालिकेने किंवा आम्ही शिफारस केलेले रुग्ण कोणते आहेत हे आम्हाला कळेल. पुण्यामध्ये त्याचा फायदा मिळत नाही. धर्मादाय आयुक्तांच्या ज्या कमिट्या आहेत त्या कमिट्या आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा अजिबात समन्वय नाही. माझी आपल्याला विनंती राहील की, ऑनलाईन देखरेख सेवेसाठी सुध्दा त्या त्या शहरातील लोकप्रतिनिधी आणि तेथील महानगरपालिका यांची आरोग्य विभागाची संयुक्त समिती करुन दर दोन महिन्यांनी आम्ही काय शिफारशी दिल्या आणि त्यामध्ये ते रुग्ण का ॲडजस्ट झाले नाहीत याचा आढावा घेतला जावा तरच या रुग्णालयांच्या वर्तनामध्ये कोठे तरी चाप बसेल. सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसले यांनी रुबी हॉलच्या संदर्भात सांगितले त्या बाबत मंत्री महोदयांनी चौकशी करु असे सांगितले. पण आता सुध्दा रुबी हॉलचे बाकीचे जे वर्तन आहे ते त्या प्रमाणेच चालू आहे. त्या संदर्भात स्टे ऑर्डर देण्याच्या बाबतीत शासन काय पावले उचलणार ?

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

ज्या वेळी गरीब रुग्ण रुबी हॉलमध्ये जातो त्यावेळी आज सुध्दा त्याला रुबी हॉलकडून हीच वागणूक मिळते. रुबी हॉलची गरीब रुग्णांसाठी कायमची ऑर्डर आहे की, त्या ठिकाणी आम्ही कोणालाही ॲडजस्ट करणार नाही. म्हणून त्यांनी अगदी आजच्या तारखेपासून कोणत्या गरीब रुग्णांना ते कशा पध्दतीने दाखल करीत आहेत या संदर्भात माहिती द्यावी.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

नाही तर तेथे नवीन ॲडमिशन देण्यासाठी प्रतिबंध करावा, शासनाने काही तरी कठोर पावले उचलल्याशिवाय ते ऐकणारच नाहीत.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जीवनदायी योजनेंतर्गत रुबी रुग्णालयात गेल्या 3 वर्षात 173 कार्डियाक रुग्णांच्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, जिल्हानिहाय रुग्णालये असतील त्यांचे मॉनेटरिंग केले पाहिजे. प्रत्येक डीपीडीसीची बैठक पालक मंत्र्यांच्या अध्यक्षेखाली होत असते. त्यामुळे पालक मंत्र्यांना या बाबतची माहिती दिली जाईल. तसेच त्या त्या जिल्ह्यात जीवनदायी योजनेंतर्गत आणि चॅरिटेबल हॉस्पिटल मधून गरीब रुग्णांवर झ ाालेल्या शस्त्रक्रियांची माहिती दर तिमाहीमध्ये त्या त्या जिल्ह्यातील पालक मंत्र्यांना देण्याची व्यवस्था केली जाईल. त्या डीपीडीसीच्या बैठकीत पालक मंत्री याबाबतची माहिती सन्माननीय सदस्यांना देतील.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, या निवेदनात "मेहरबान उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी मॉनेटरिंगसाठी एक बैठक घेते. त्या समितीच्या माध्यमातून या रुग्णालयांवर लक्ष ठेवले जाते." असे नमूद केलेले आहे. याच विषयासाठी मंत्री महोदय श्री.हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांची संयुक्त समिती गठित झाली होती. त्या समितीच्या शिफारशीनुसार त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली आहे. त्या समितीमध्ये विधानसभेचे एक सदस्य व विधानपरिषदेचे एक सदस्य आहेत. धर्मादाय आयुक्त सुध्दा त्या समितीचे सदस्य आहेत. आता अडचण अशी झाली आहे की, या दोन्ही समित्या अस्तित्वात आहेत. त्यामुळे या दोन्ही समित्यांशी समन्वय साधण्यासाठी शासनाने अध्यादेश काढावा किंवा नव्याने निर्देश देऊन या दोन्ही समित्या एकत्र कराव्यात. त्यामुळे खऱ्या अर्थाने या रुग्णालयांवर देखरेख ठेवता येईल किंवा त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. अशा त-हेचे निर्देश शासन निर्गमित करणार काय ?

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी प्रश्न विचारला होता त्यासंबंधी मी माहिती देतो. हायकोर्टाने जे निकष ठरविले आहेत त्या निकषा प्रमाणे या चॅरिटेबल ट्रस्टच्या हॉस्पिटल्समध्ये डेली किती फ्री बेडस् ऑक्यूपाईड आहेत आणि एकूण बेडस् किती आहेत याची माहिती बोर्डवर लावणे बंधनकारक केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांच्या प्रश्नाला मी यापूर्वीच उत्तर दिलेले आहे की, 10 टक्के बेडस् गरीब रुग्णांसाठी राखीव ठेवण्यासंबंधी यापूर्वी बरीच चर्चा झालेली आहे. त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. 408 हॉस्पिटल्समधील सर्व फ्री बेडस्चा श्री. राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये समावेश करण्याचा प्रस्ताव विभागाकडून मंत्रिमंडळासमोर आणला जाणार आहे. त्यामुळे त्यानंतरची कार्यवाही लवकरच होईल. तोपर्यंत ही सिस्टिम चालू राहणार आहे. ही सर्व हॉस्पिटल्स प्रस्तावित योजनेमध्ये समाविष्ट झाल्यानंतर या रुग्णालयांचे ऑन लाईन मॉनेटरिंग होणार आहे. शासनाला डेली बेसिसवर रिपोर्ट मिळणार आहे. यासाठी आपल्याला फार काळ वाट पहावी लागणार नाही.

-----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ. शी.** : पुणे जिल्ह्यातील भीमा नदीच्या पात्रात दूषित पाणी मिसळणे

**मु. शी.**: पुणे जिल्ह्यातील भीमा नदीच्या पात्रात दूषित पाणी मिसळणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.परशुराम उपकर, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री राजन तेली, सुभाष चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुणे जिल्ह्यातील भीमा नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणावर दूषित पाणी मिसळत असल्याने उजनी धरणाच्या खालील सुमारे 300 गावांमधील लोकांना दूषित पाणी प्यावे लागत असणे, याबाबत अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या अहवालानुसार सांडपाणी प्रक्रिया केल्यानंतरही पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका, भोसरी औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी मोठ्या प्रमाणावर भीमा नदीच्या पात्रात मिसळत असणे, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेतर्फे योग्य प्रक्रिया न करता सांडपाणी थेट भीमा नदीत सोडण्यात येत असल्याने वारंवार सूचना देऊनदेखील त्यांच्याकडून काळजी घेण्यात येत नसल्याने दोन्ही महापालिका बरखास्त करण्याची राज्य शासनातर्फे माहे फेब्रुवारी, 2011 रोजीच्या सुमारास देण्यात आलेली नोटीस, यांस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची तेथील नागरिकांची होत असलेली मागणी, नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता,शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गेल्या 3 वर्षापासून भीमा नदीत होत असलेले प्रदूषण व भीमा नदीच्या उपनद्यांमध्ये होत असलेल्या प्रदूषणासंबंधी सातत्याने येथे चर्चा होते. भीमा नदीच्या पाणलोट क्षेत्रापासून ते उजनी धरणापर्यंत 2 महानगरपालिका, 10 नगरपालिका, 3 कॅण्टोन्मेंट, नदीकाठच्या 196 गावासह 10 औद्योगिक क्षेत्रे आहेत. सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत.

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

संपूर्ण महाराष्ट्रातील नद्या प्रदूषणाचा हा जो प्रश्न नगरविकास विभागाशी संबंधित आहे त्या संदर्भात एक कृती आराखडा तयार करुन तो कॅबिनेट पुढे ठेवण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर वारंवार या ठिकाणी दिलेले आहे. या नदी प्रदूषणाच्या संदर्भातील कृती आराखड्याचे काय झाले ? दुसरा प्रश्न असा आहे की, सोलापूर जिल्ह्यामध्ये झालेल्या बैठकीत त्या जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांनी असे म्हटले होते की, 300 गावातील लोकांना उजनी धरणातील दूषित पाणी प्यावे लागते. पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने हे प्रदूषण रोखण्यासाठी पुरेशी पावले उचललेली नाहीत. उजनी धरणाच्या पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्षेत्रातील दूषित पाणी सोडले जाते. पाण्यात होणा-या या औद्योगिक प्रदूषणाच्या संदर्भात शासनाने काय कारवाई केलेली आहे यासंबंधीचा उल्लेख निवेदनामध्ये कुठे आढळून आलेला नाही. फक्त पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिकेच्या संदर्भात सांगितलेले आहे. माझ्या लक्षवेधी सूचनेतील दुसरे वाक्य असे आहे की, "उजनी धरणाच्या खालील सुमारे 300 गावांमधील लोकांना दूषित पाणी प्यावे लागते." त्यामुळे या दोन महानगरपालिकांच्या बरोबरीनेच संपूर्ण राज्याचा हा प्रश्न आहे. त्यामुळे लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात वितरित करण्यात आलेले निवेदन अपूर्ण स्वरुपाचे असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, आपणालाही कल्पना आहे की, राज्याचे मंत्रिमंडळ हे प्रदूषण रोखण्यासाठी कृती आराखडा तयार करील असे सरकार वारंवार सांगत असताना त्यासंबंधीचे उत्तर आम्हाला मिळत नाही. महानगरपालिकांसाठी पैसे कोठून येणार हा प्रश्न आहे. पण नगरपालिकांच्या बाबतीत काय करणार ?

श्री. भास्कर जाधव : आपण बारकाईने लक्षवेधी सूचना वाचलीत तर त्यामध्ये "पुणे जिल्ह्यातील भीमा नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणावर दूषित पाणी मिसळत असल्याने उजनी धरणाच्या खालील सुमारे 300 गावांमधील लोकांना दूषित पाणी प्यावे लागत असणे," असे म्हटलेले आहे. त्यामुळे ही लक्षवूधी सूचना भीमा नदीच्या संदर्भातील आणि तेथील महानगरपालिका आणि नगरपालिकेच्या आणि आजूबाजूच्या गावाच्या संदर्भातील असून संपूर्ण महाराष्ट्राशी ती निगडित नाही, त्यामुळे ती राखून ठेवण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : भीमा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी शासन काय पावले उचलणार आहे, असा प्रश्न मी विचारला आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड ही शहरे सोडली तर औद्योगिक वसाहतीमधून कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होत नाही असे सरकारला म्हणावयाचे आहे काय ? महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या अहवालामध्ये ठिकठिकाणी पाण्यामध्ये कसे प्रदूषण होते हे सांगितलेले आहे. त्यासंदर्भात सरकारने कोणती दखल घेतलेली आहे ?

श्री. भास्कर जाधव : लक्षवेधी सूचना अत्यंत स्पेसिफिक आहे. ही लक्षवेधी सूचना भीमा नदीच्या तसेच पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरातून होणा-या प्रदूषणाच्या संदर्भातील आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी त्यासंदर्भात प्रश्न विचारले तर त्याचे उत्तर देता येईल. संपूर्ण महाराष्ट्राच्या संदर्भात या ठिकाणी आता उत्तर देणे शक्य नाही.

**सभापती** : या दूषित पाण्याच्या प्रश्नासंबंधी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे जर राज्यमंत्री महोदयांना नंतर भेटल्या तर राज्यमंत्री महोदयांनी त्यांच्या प्रश्नात लक्ष घालावे...

श्री. भास्कर जाधव :...जरुर, मी त्यांना जेवायला बोलावतो आणि उत्तरही देतो....

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या संदर्भात नगरविकास मंत्री, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नगरविकास विभाग यांची एक बैठक आपल्या दालनात घ्यावी अशी माझी विनंती आहे. पुणे शहराच्या आणि नदी प्रदूषणाच्या विषयाच्या बाबतीत सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत जेव्हा बैठक झाली त्यावेळी केन्द्राकडून आम्ही पैसे मागू असे आयुक्तांनी सांगितले होते. हे पैसे कधी मिळणार ? या संबंधी गेल्या तीन-चार वर्षापासून चर्चा सुरु आहे. परंतु प्रत्यक्षात कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही. तेव्हा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि नगरविकास विभाग यांची एक बैठक आपण आपल्या दालनात बोलवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा मी जरुर विचार करीन.

श्री. सुभाष चव्हाण : या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने मी एक वेगळ्या स्वरुपाचा प्रश्न विचारीत आहे. महाराष्ट्रातील नद्यातील, तलावातील गाळ यांत्रिकी पध्दतीने काढला जाणार आहे. तेव्हा हा गाळ काढण्याच्या संदर्भात नगरविकास विभागाने काही धोरण ठरविलेले आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : केवळ या भीमा नदीच्या बाबतीत सांगायचे झाले तर नॅशनल रिव्हर ॲक्शन प्लॅन अशा प्रकारची केन्द्र शासनाची एक योजना आहे. मोठ्या शहरातून ज्या नद्या वाहतात

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 11:40

श्री. भास्कर जाधव...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या नद्यामध्ये होणारे प्रदूषण रोखण्यासाठी केन्द्र शासनाने एक स्कीम तयार केलेली असून ती स्कीम पायलट प्रोजेक्ट म्हणून या भीमानदीवर राबवावी अशा प्रकारचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारच्या वतीने केन्द्र शासनाकडे गेलेला आहे. अशा प्रकारचा पालयट प्रोजेक्ट घेण्याचा महाराष्ट्र सरकारचा आग्रह असल्यामुळे त्याला निश्चित लवकर मान्यता मिळेल असे मला वाटते्.

--

...नंतर श्री. गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कार्यक्रमपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक 8,9 व 20 संबंधी**

**सभापती** : कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्रमांक 8 संबंधी माननीय उप मुख्यमंत्री यांनी लेखी विनंती केल्यानुसार ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे. अनुक्रमांक 9 वरील लक्षवेधी सूचना देणारे माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे सभागृहात अनुपस्थित असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याचा मी निर्णय घेत आहे. तसेच अनुक्रमांक 10 या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा यापूर्वीच झाली असल्यामुळे आता मी पुढील लक्षवेधी सूचना पुकारीत आहे.

------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे शहरातील मुठा कालव्यास भगदाडे पडत असल्याने कालव्याचे अस्तित्व धोक्यात येणे.

**मु. शी.** : पुणे शहरातील मुठा कालव्यास भगदाडे पडत असल्याने कालव्याचे अस्तित्व धोक्यात येणे यासंबंधी डॉ.नीलम गो-हे, श्री. परशुराम उपरकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ ) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" पुणे शहर व परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुठा कालव्याचे भराव कोसळून ठिकठिकाणी भगदाडे पडत असल्याने कालव्याचे अस्तित्व धोक्यात येणे, खडकवासला धरणापासून पुण्यापर्यंत 30 कि.मी.अंतराच्या व तेथून पुढे 202 कि.मी.अंतराच्या कालव्याला अनेक ठिकाणी पडलेली भगदाडे, खडकवासला, वडगांव, नांदेड, गावातून वाहणाऱ्या या कालव्याच्या दुतर्फा पडलेल्या भगदाडांमुळे तेथे पुराचा वाढलेला धोका, या कालव्यामध्ये अनेक ठिकाणी कपडे धुण्यासाठी व अंघोळीसाठी वापर केला जात असल्याने कालव्यामधील निखळलेल्या दगडी भरावावरुन तोल जाऊन कालव्यात पडून महिला, मुले व तरुण बुडून मृत्युमुखी पडण्याच्या अनेक घटना घडणे, या कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिकांनी वारंवार तक्रार करुन त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने कालवा दुरुस्त करण्याची नितांत आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर ( जलसंपदा (कृष्णा खोरे-पाटब्धारे महामंडळ) मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरात झोपडपट्टयांच्या अतिक्रमणाचा उल्लेख केला आहे. परंतु या कालव्यास भगदाडे पडल्यामुळे पुणे शहरातील जनजीवन धोक्यात येत आहे. या कालव्याची दुरुस्ती कधीपर्यंत होणार आहे ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, पुणे शहरातून मुठा कालवा वाहतो आहे. पुण्यातील अनेक ज्वलंत प्रश्नापैकी हा देखील एक ज्वलंत प्रश्न आहे याची मला माहिती आहे, ही गोष्ट मला मान्य करावी लागेल. या कालव्यास भगदाडे पडत आहेत, त्यामुळे जीवित हानी होण्याची शक्यता आहे. या कालव्याची दुरुस्ती कायम स्वरुपी करणार आहात काय व ती केंव्हा पर्यंत करण्यात येईल असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. मला त्यांना नम्रतापूर्वक सांगावेसे वाटते की, कालवा आणि धरणे यांची कायमची दुरुस्ती करणे शक्य नाही. धरणे आणि कालवे यांची दुरुस्ती नेहमीच करण्यात येत असते. 2004 या वर्षी या कालव्याची दुरुस्ती केली आहे. पुणे शहरास पाणी सतत चालू ठेवावा लागत असल्याने दुरुस्तीसाठी पुरेसा अवधी मिळणे मुश्किल होते ही एक मोठी अडचण आहे. तरी देखील या कालव्याची बऱ्यापैकी दुरुस्ती करुन घेतलेली आहे. त्याच पध्दतीने यांत्रिकी विभागाकडून जेथे आवश्यकता आहे, तेथे कायम स्वरुपी दुरुस्त्या केल्या जातील.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, हा पुणे शहराच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, याबाबतीत कायम स्वरुपी सोल्यूशन निघू शकत नाही. कालव्यातून व्यवस्थितपणे पाणी जावे तसेच पाण्याच्या अपव्यय होऊ नये यासाठी कालव्याच्या दोन्ही बाजूला सिमेंटचे कॉक्रीटीकरण करणे किंवा फरशी बसविणे अशा दोन पध्दतीचा आपण अवलंब करतो. या कालव्याच्या बाबतीत दोन्ही पैकी एखादी पध्दत वापरुन, कायम नव्हे तर काही अंशी पाण्याचा अपव्यय होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना शासनाच्या मार्फत राबविण्यात येणार आहे ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, कायम हा शब्द मी वापरलेला नाही. मी एवढेच म्हणतो की, दुरुस्ती दर दोन वर्षांनी, दर तीन वर्षांनी करीत असतो. या कालव्यात सुरुवातीला भिंती बांधण्यात आल्या होत्या. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, या कालव्याला भगदाडे पडत आहेत. ही वस्तुस्थिती आहे. परंतु या कालव्याच्या

4...



श्री. रामराजे नाईक-निंबाळकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आजूबाजूला अतिक्रमणे होत आहे. त्या कालव्याच्या आजूबाजूला ज्या झोपडया आहेत तेथील नागरीक तलावात उतरतात. तलावात उतरण्यासाठी ते पायऱ्या बांधतात. त्या कालव्याच्या पाण्यात झ ोपडपट्टीधारक घरातील भांडी धुतात. त्यामुळे या कालव्यातील पाणी प्रदुषित होते. त्या कालव्याच्या आजूबाजूची अतिक्रमणे काढणे हाच त्यामागचा खरा उपाय आहे. आम्ही पुणे महानगरपालिकेला दुसरा पर्याय सुचविला होता. या कालव्याची 30 कि.मी.पाईप लाईन पुणे शहराच्या बाहेरुन न्यावी. परंतु आमच्या या पर्यायाला पुणे महानगरपालिकेकडून अजूनही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. परंतु कृष्णा खोरे विकास महामंडळाने हा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेला सादर केलेला आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या बाबतीत महानगरपालिका आणि शासन यांच्यात समन्वये असणे आवश्यक आहे. या कालव्याच्या पाण्यात उतरुन अंघोळ करणे, त्या पाण्याने भांडी धुणे याची तेथील नागरिकांना काही हौस नाही. मी हडपसर परिसरातील सिंहगड रोडला अनेक वर्षे काम केले आहे. पाण्याची व्यवस्था चांगली राहिली तर नागरिक मुद्दाम कालव्यात उतरुन पाणी घेणार नाहीत. परंतु या कालव्यात मनुष्यहानी सुध्दा होते. या कालव्याच्या पाण्याच्या प्रवाहाने व्यक्ती वाहून जाण्याच्या घटना अनेक वेळा घडलेल्या आहेत. या कालव्याच्या बाजुला मध्ये मध्ये जाळया बसविल्या होत्या. या कालव्याला जाळया बसविण्यात आल्या होत्या या संबंधी माननीय मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी. या कालव्यात जास्त पाणी असते, अशा वेळी व्यक्ती वाहून जाण्याच्या प्रकार घडतात, वाहनू जाणाऱ्या व्यक्ती जाळयात अडकून रहाव्यात, त्याचा जीव वाचावा म्हणून जाळया लावलेल्या होत्या. त्या जाळया अनेक ठिकाणी मोडलेल्या आहेत. मध्यंतरीच्या काळात या कालव्यात दोन महिला वाहून जाऊन त्या मृत झाल्याची घटना घडली आहे. त्यात या शासनाचा दोष नाही. तेथील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत शासन काय पावले उचलणार आहे ? आता आपण म्हणालात की, या कालव्याची दुरुस्ती 2005 मध्ये करण्यात आली होती. आता 2011 हे वर्ष चालू आहे. या कालव्याची दुरुस्ती होऊन जवळपास सहा वर्षे होऊन गेलेली आहेत. निदान दोन, तीन वर्षांनी कालव्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. माझे तीन स्वतंत्र प्रश्न आहे...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..... ल.वे.सूचना क्रमांक-11...

सुरक्षितेच्या दृष्टीने शासनाने पावले उचलावीत आणि पावसाळ्यापूर्वी जी दुरुस्ती करणे आवश्यक आहे ती दुरुस्ती तातडीने करावी. जेणेकरुन भगदाडे पडून जीवितहानी होणार नाही.

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, सुरक्षिततेच्या दृष्टीने जाळ्या टाकणे आणि आमच्या विभागासंबंधी जे विषय आहेत ते निश्चितपणे केले जातील. मी मघाशी सांगितले की, यांत्रिकी विभागाला कृष्णा खोरे विकास महामंडळातर्फे निधी उपलब्ध करुन दिला आहे. पावसाळयापूर्वी नियमितपणे दुरुस्ती करावी. यावेळी जास्त काळजीपूर्वक दुरुस्ती करु.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बांबू उत्पादनासाठी विदर्भातील शेतकऱ्यांना अनुदान व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मु.शी.**: बांबू उत्पादनासाठी विदर्भातील शेतकऱ्यांना अनुदान व सुविधा उपलब्ध करुन देणे यासंबंधी सर्वश्री एस.क्यू.ज़मा, जयप्रकाश छाजेड यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.एस. क्यु. जमा. (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विदर्भात रामटेक येथे बांबूपासून लाकूड तयार करण्याचा मोठा प्रकल्प प्रस्तावित करण्यात येणे, सदरचा प्रकल्प पूर्णत: तैवान तंत्रज्ञानावर आधारीत असून, त्यामुळे हजारो लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराची संधी उपलब्ध होणे, बांबूपासून लाकूड उत्पादन प्रकल्प असल्यामुळे शेतकऱ्यांसाठी बांबू लाकडाची उत्पादन करण्याची संधी उपलब्ध होऊन शेती उत्पन्न वाढीस लागेल, परंतु विदर्भातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती व जमिनीतील पाण्याची खालावलेली पातळी लक्षात घेऊन बांबू उत्पादनासाठी विदर्भातील शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून अनुदान व योग्य ती सुविधा उपलब्ध करुन देण्याची नितांत गरज असणे, राज्य शासनाने मदत केल्यास स्थानिक शेतकरी बांबू लागवडीस सक्रीय होऊन इतर लागवडीपेक्षा जास्त उत्पादन वाढू शकतील, त्यामुळे शेतकरी आत्महत्या प्रकार रोखण्यास अप्रत्यक्षपणे मदत होणे, हा उद्योग त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया "

डॉ.नितीन राऊत (जलसंधारण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-12........

श्री एस. क्यु. जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने बहुत ही विस्तृत जवाब दिया है. मैं कहना चाहूंगा कि नेशनल बांबू मिशन पर भारत सरकार बहुत ध्यान दे रही है और बांबू फार्मिंग को निजी जमीन पर तथा फॉरेस्ट एरिया में बढ़ाने से किसानों को निश्चित रुप से लाभ होगा. इसलिए 2007-08 में नेशनल बांबू मिशन कार्यक्रम भारत सरकार ने अपने हाथ में लिया और उसको सभी राज्यों में लागू किया जा रहा है. माननीय मंत्री महोदय ने उत्तर में बताया है कि बांबू फार्मिंग को प्रमोट करने के लिए उन्होंने यहां पर कुछ कदम उठाए हैं. उस संबंध में भारत सरकार से सहायता मिलती है और महाराष्ट्र सरकार भी उस संबंध में सहायता देती है. मैं बताना चाहूंगा कि प्राइवेट लेंड पर यदि बांबू की फार्मिंग करनी है तो उस बारे में कोई रुकावट नहीं है. किसान उसकी फार्मिंग कर सकते हैं. हमारे यहां पर शुगर तथा सोयाबीन की फार्मिंग में ज्यादा पैसों की जरुरत पड़ती है, लेकिन बांबू की फार्मिंग थोड़े पैसों में की जा सकती है तथा 3-4 साल की उपज के बाद किसानों को उसका ज्यादा फायदा मिल सकता है.

मेरा कहना है कि किसान यदि बांबू की उपज करता है तो रिवेन्यु एक्ट के मुताबिक उसको फॉरेस्ट प्रोडयुस समझा जाता है और सरकार की परमीशन लेने के बाद ही उसको वहां से काट सकते हैं, उसको बेच सकते हैं और उस पर प्रोसेसिंग कर सकते हैं. इसलिए मेरा कहना है कि बांबू की फार्मिंग को फॉरेस्ट प्रोडयुस न समझा जाए बल्कि इसको फार्म प्रोडयुस समझा जाए. ऐसा करने से यह प्रोडयुस रिवेन्यु एक्ट से बाहर निकल जाएगा. मुझे पूछना है कि इस संबंध में महाराष्ट्र शासन कोई उचित निर्णय लेगा या नहीं ?

दूसरी बात मैं बताना चाहूंगा कि फारेस्ट राइट एक्ट के अंतर्गत ट्राइबल एरिया में जो फॉरेस्ट है उस फॉरेस्ट को वहां की ग्राम पंचायत को या जो आदिवासी लोग उस लेंड को यूज करते थे, उसका पट्टा उन्हीं को दे दिया है. गडचिरोली जिले में बहुत सारी फॉरेस्ट लेंड ग्राम पंचायत को दी गयी है. लेकिन वहां पर जो बांबू पैदा होता है उसको अभी भी फॉरेस्ट प्रोडयुस ही माना जाता है. इसलिए अभी भी फॉरेस्ट डिपार्टमेंट ही उस उपज का ऑक्शन करता है.

...4

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

लेकिन मैं बताना चाहूंगा कि गडचिरोली जिला में धानोरा तालुका में एक गांव के सरपंच ने वहां पर पैदा हुए पूरे बांबू पर कब्जा कर लिया, उसका पब्लिक ऑक्शन किया और उसका जो दाम आया, उसको ग्राम पंचायत ने रिसीव किया. ग्राम पंचायत का मानना है कि उस उपज को फॉरेस्ट प्रोडयुस न माना जाए ताकि उस उपज से मिलने वाले पैसे का उपयोग आम किसान तथा गांव के लाभ के लिए किया जा सके. मुझे पूछना है कि क्या इस बारे में सरकार कोई निर्णय लेगी ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, राज्यात वन क्षेत्र आणि वनेतर खाजगी क्षेत्र अशा दोन विभागात बांबूचे उत्पादन होते. राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र 3,07,713 चौ.कि.मी.असून त्या क्षेत्रापैकी 61,939 चौ.कि.मी. वनक्षेत्र आणि 8414 चौ.कि.मी. वनेतर क्षेत्र अशा एकूण 13.58 टक्के क्षेत्रात नैसर्गिक बांबूचे उत्पादन होते. यापैकी जास्तीत जास्त बांबू क्षेत्र विदर्भात असून प्रामुख्याने चंद्रपूर व गडचिरोली वन वृत्तातून बांबू उत्पादन केले जाते. काही प्रमाणात नागपूर, अमरावती वन वृत्तातून देखील बांबू उत्पादन होत असते.

नंतर आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत ........

महोदय, केंद्र शासनाने बांबू मिशनचा कार्यक्रम शासनाला दिला आहे व या कार्यक्रमाच्या अंतर्गत वनेत्तर क्षेत्रातील बांबू लागवडीची योजना राज्यात लागू केली. त्यामुळे रोजगार हमी योजनेशी निगडीत राष्ट्रीय बांबू अभियान योजना जी खाजगी पडिक जमिनीवर सुध्दा वृक्ष लागवड आणि वन विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत करता येते. फलोत्पादन विभागामार्फत सुध्दा फळ झाडे लागवड या कार्यक्रमाच्या अंतर्गत बांबूची लागवड करता येते. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, बांबूची लागवड मोठ्या प्रमाणात होत असून या निमित्ताने अनेक उद्योगधंदे आणि योजना आलेल्या आहेत. त्यात फर्निचरचे उत्पादन तसेच इमारतीच्या बांधकामासाठी उपयोगात येणारा बांबू या बाबींचा समावेश होतो. अशा बांबूची लागवड करीत असताना बांबू हे वनौपज आहे म्हणून वन कायद्यात येते. त्याची ज्यावेळी खाजगी जमिनीवर लागवड करतो तो विषय कृषी विभागाशी निगडीत असतो पण राज्याच्या लँड रेव्हेन्यू कोड, 1966 च्या सेक्शन 25 अंतर्गत बांबूसाठी महसूल विभागाची परवानगी घ्यावी लागते. पण ज्यावेळेस हा बांबू आपण वाहून नेतो त्यावेळेस त्याचा संबंध वन कायदा, 1942 शी येतो. या अनुषंगाने बांबूचे उत्पादन जरी चांगल्या प्रकारे केले तरी बांबूची वाहतूक करीत असताना अडचण निर्माण होते. या निमित्ताने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, नुकतेच केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री. जयराम रमेश यांनी सर्व राज्यांना आवाहन करुन सांगितले की, बांबू हे गवत या प्रकारात मोडते, त्यामुळे राज्यांनी जास्तीत जास्त बांबूचे उत्पादन करावे. आज बांबूची डेफिनिशन ही एक तणाचा प्रकार म्हणून दिलेली आहे परंतु त्याची फॉरेस्टची व्याख्या गवतामध्ये आहे. कृषी विभागाची व्याख्या खूप मोठी आहे. हे करीत असताना मी सभागृहाला सांगू इच्छितो की, केंद्र शासनाच्या सन 1996 च्या जमीन महसूल संहिता या कायद्यानुसार शासन यासंबंधी एक धोरण तयार करीत आहे. हे धोरण आल्यानंतर या सर्व अटी व शर्ती ग्राम पंचायतीकडे येतील व आपोआपच ते अधिकार ग्राम पंचायतीकडे जाणार आहेत. हे धोरण राबवित असताना या बांबू मिशनच्या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात मान्यता देण्यात येईल. तसेच या विभागाचा मंत्री म्हणून मी असेही सांगू इच्छितो की, मी या विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर सामाजिक वनीकरणाचे एक नवीन धोरण आखण्यात येईल असे सुतोवाच केले व त्यानुसार विभागाला सूचनाही दिलेल्या आहेत. महाराष्ट्र प्रामुख्याने नक्षलग्रस्त आणि आदिवासी

...2....

डॉ. नितीन राऊत .......

भागात पीक म्हणून बांबूचे मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जाते, म्हणून बांबू संबंधीचे धोरण करण्याचाही शासनाचा विचार आहे. आवश्यकता भासल्यास महाराष्ट्र बांबू डेव्हलपमेंट एजन्सी आणि त्यासाठी एक रिसर्च इन्स्टिटट्यूट सुध्दा निर्माण करता येईल की कसे याचाही विचार करावा अशा सूचना विभागाला दिलेल्या आहेत.

सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा ग्राम पंचायतीच्या संदर्भात विचारलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, यासंसबंधीचा कायदा आणि धोरण जे येऊ घातलेले आहे ते आल्यानंतर या कायद्यानुसार ग्रामपंचायतींना हे अधिकार आपोआपच जातील.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, मंत्री महोदयांनी बांबूचे धोरण आखण्याबाबत सांगितले. पण आपल्याकडे मोठ्या प्रमाणात फॉरेस्टची पडिक जमीन आहे आणि बांबू हे नैसर्गिक उपज असल्याने फॉरेस्टच्या संपूर्ण पडिक जमिनीवर टीसीएस पध्दतीने नॅचरल बांबूची लागवड केली तर त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो. असा प्रयोग यापूर्वी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्यात करण्यात आला व तो यशस्वी देखील झाला आहे. तो प्रयोग शासन करणार काय ? तसेच दुसरा प्रश्न असा की, खाजगी जमिनीवर किंवा वैयक्तिक शेत जमिनीवर बांबूची लागवड करुन देखील तो बांबू पाहिजे तितक्या प्रमाणात उपयोगात येत नाही. कारण त्यापासून केवळ टोपल्या आणि तट्टेच तयार होऊ शकतात. खऱ्या अर्थाने ही लागवड करुन इमारतीसाठी आणि फर्निचरसारख्या गोष्टींसाठी आसामचा बांबू महत्वाचा ठरतो. म्हणून या आसामच्या बांबूची लागवड करण्यासाठी शासन प्रोत्साहन देणार काय ? त्याचबरोबर दुसरा एक प्रकार "प्रतान" या जातीचा बांबू आंध्र प्रदेशात जास्त पिकतो. त्याची लागवड आपल्याकडे केली तर या दोन्ही बांबूचा फायदा आपल्याला होईलच पण जे 8 हजार बांबू कामगार आहेत त्यांनाही कायम रोजगार मिळेल. आसाम आणि आंध्र प्रदेशातील बांबूच्या जातीचा फर्निचर तयार करण्यासाठी तसेच इमारत बांधकामासाठी चांगला उपयोग होतो. म्हणून या दोन्ही बांबूची राज्यात मोठ्या प्रमाणात लागवड करणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुध्द प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

बांबूची लागवड केल्यानंतर बांबूच्या वाढीसाठी 5 वर्षाचा कालावधी लागत असतो. त्यामुळे बांबूची लागवड केलेल्या शेतक-याचा पाच वर्षाचा आर्थिक बाबीचा विचार केला, उत्पन्नाच्या बाजूचा विचार केला तर अशा प्रकारे बांबू पिकविणा-या शेतक-याला शासन अनुदान देणार आहे काय ?

डॉ. नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी महत्वपूर्ण विषयाला हात घातलेला आहे. बांबूची शेती करतांना शेतक-याला बांबूपासून किती आर्थिक उत्पन्न मिळू शकेल व त्या माध्यमातून रोजगार कसा उपलब्ध होईल यासंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. आपल्या राज्यात मानवेल बांबूची (डेन्डरो कॅलॅमस स्ट्रिक्टस) लागवड केली जात असते. या बांबूचा उपयोग बांधकाम, फर्निचर व कागदासाठी होत असतो. विदर्भामध्ये कोळशाच्या तसेच सिमेंट्सच्या अनेक माईन्स आहेत. माईन्स मध्ये काम करतांना टोपल्या, डाले, तट्टे मोठया प्रमाणात लागत असतात. त्यामुळे या कामासाठी बांबूचा चांगल्या प्रकारे वापर केला तर मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकते. त्यामुळे बांबू पासून रोजगार निर्मितीसाठी WCL शी संपर्क साधण्यात येईल तसेच माईनिंग कार्पोरेशनशी संपर्क साधून निश्चितपणे चर्चा करण्यात येईल. कटांग बांबूचा उपयोग फर्निचर, कागद व हस्तकलेसाठी केला जातो. मानगा बांबू चा उपयोग कलाकुसर, औजारे, घरबांधणी तसेच फर्निचरसाठी होत असतो. बांबूची किंमत सरासरी 50 ते 100 रुपये असते. आज बांबूची लागवड केल्यानंतर पाच वर्षाने आपल्या उपयोगात येऊ शकतो. ज्या बांबूचे फाऊंडेशन चांगले असते अशाच बांबूचा उपयोग फर्निचरसाठी केला जातो व अशाच बांबूला चांगली किंमत मिळत असते. त्यामुळे बांबू रिसर्च इन्स्टिटयूट निर्माण करणे योग्य होईल काय याबाबतीत अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल. बांबूची लागवड करीत असतांना शेतक-यांवर जो आर्थिक ताण पडणार आहे त्याबाबत रोजगार हमी योजनेमधून किंवा इतर योजनेमधून काही मदत करता येऊ शकते काय याबाबत सुध्दा निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, बांबू हा फक्त बांबू म्हणून विकला तर कमी पैसे मिळतात परंतु बांबू लाकूड म्हणून विकले तर साधारणत: चौपट,पाचपट किंमत मिळते. बांबू पासून लाकूड



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

तयार करण्याचा मोठा प्रकल्प विदर्भातील रामटेक येथे तैवानच्या तंत्रज्ञानावर आधारित उभा राहणार आहे. त्यामुळे तैवानच्या तंत्रज्ञानावरील आधारित प्रकल्प केव्हा सुरु होणार आहे ? या प्रकल्पामुळे रोजगार किती वाढेल ? चंद्रपूर व गडचिरोली येथे बांबू हे कॅश क्रॉप आहे. जसे कापूस व ऊस कॅश क्रॉप आहे तसेच बांबू सुध्दा कॅश क्रॉप आहे. त्यामुळे यासंदर्भात शासन कोणते धोरण आखणार आहे ? गडचिरोली, चंद्रपूर तसेच संपूर्ण महाराष्ट्रात बांबूची लागवड करण्यासाठी चांगल्या प्रकारचे बियाणे उपलब्ध करुन दिले जाणार आहे काय ?

डॉ. नितीन राऊत : सभापती महोदय, बांबूच्या संदर्भात अतिशय चांगला प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी उपस्थित केलेला आहे. नागपूरच्या परिसरात म्हणजे मौजा चिंचाळा, ता.रामटेक येथे डीएलएस इंडस्ट्रीज, प्रा. लि. यांनी तैवानशी करार करुन बांबू बिम, बांबू प्लाय, बांबू फर्निचर, बांबू फ्लोरींग व बांबू आर्टीकल्स बनविण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. यासंदर्भात सदर कंपनीने शासनाकडे अर्ज केला होता.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत ..

वन जमिनीवर बांबूचे उत्पादन करण्यास परवानगी देण्यात यावी अशी त्यांनी वन संरक्षक अधिका-याकडे मागणी केलेली आहे.हे क्षेत्र आदिवासी उप योजनेमध्ये येते असेही त्यांनी सांगितले होते परंतु आता विभागाने असे कळविले की," तथापि रामटेक तालुक्यातील चिंचाळे हे गाव आदिवासी क्षेत्रात मोडत नाही. " त्यामुळे या संदर्भात काही तांत्रिक बाबी निर्माण झाल्या आहेत. सदर कंपनी ही लघू उद्योग या संज्ञेत वा आदिवासी संज्ञेत सुध्दा येत नाही. त्यामुळे ही बाब निश्चितपणे तपासून घेण्यात येईल आणि ही कंपनी जर उभी राहत असेल आणि या कंपनीच्या माध्यमातून त्या ठिकाणी रोजगार उपलब्ध होईल हे मान्य केले पाहिजे त्यामुळे रोजगार मिळण्याची संधी घालवू नये व या संधीचा फायदा त्या भागातील लोकांना व्हावा या दृष्टीने निश्चितपणे उपाययोजना करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांनी चांगले उत्तर दिलेले आहे. बांबू हे पीक फक्त विदर्भातीलच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पडीत आणि कोरडवाहू जमिनीमध्ये हे पीक घेतले जाते आणि त्या शेतक-यांना फायदा देणारे हे पीक आहे. बांबूचा उपयोग फर्निचर बनविण्यासाठी होतो त्याचबरोबर विदर्भ सोडून इतर भागामध्ये मंडपासाठी देखील होतो. बांबू उत्पादनाला अधिक चालना देण्यासाठी सामाजिक वनीकरण आणि फलोत्पादन विभागाच्या माध्यमातून काही कार्यक्रम राबविण्यात येतात व त्यासाठी शेतक-यांना जे अनुदान दिले जाते ते अत्यल्प आहे. या अनुदानात वाढ करण्यात येणार आहे काय, त्याचबरोबर बांबूचे रोप तयार करण्यासाठी देखील 65 पैसे इतके कमी अनुदान दिले जाते त्यामध्ये वाढ करण्यात येणार आहे काय ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, राज्यात 20 हजार हेक्टर याप्रमाणे पुढील पाच वर्षात 1 लाख हेक्टरवर बांबूची लागवड करण्याचा राज्याच्या धोरणामध्ये संकल्प आहे. राज्यातील एकूण् दोन लाख मे.टन बांबूच्या उत्पादनापैकी 40 हजार मे.टन बांबू कुटिरोद्योगांना देण्याचे सुतोवाच करण्यात आले आहे.बांबूवर आधारित व्यवसायाकरिता अनेक प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबविण्याच्या सूचना विभागाला देण्यात आल्या आहेत. बांबूवर आधारित वस्तू तयार करण्याचे काम बुरुड कुटुंबे करीत असतात. त्यांना दरवर्षी देण्यात येणा-या प्रती कुटुंब 1500 बांबूचा निस्तार पुरवठा (स्वामित्व शुल्क न भरता) बांबूचा पुरवठा करण्याचे देखील विभागाने मान्य केलेले

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत ..

आहे.सन्माननीय सदस्यांना मी हे सांगू इच्छितो की,अनुसूचित जन जाती व इतर पारंपारिक वन निवासी वन हक्क मान्य करणे अधिनियम 2006 च्या कलम दोन (1) प्रमाणे बांबू हा गौण वनउपज या संज्ञेमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात बांबू गौण उपज घोषित करण्याचे प्रस्तावित आहे. बांबू गौण उपज म्हणून जाहीर केले तर प्रोव्हीजन ऑफ पंचायत एक्सटेन्शन टू द शेडयुल एरिया ॲक्ट 1996 नुसार बांबूवर ग्रामसभेचा हक्क राहील व या उद्योगास निश्चितपणे अधिक चालना मिळेल. सभापती महोदय , सन्माननीय सदस्य श्री विक्रम काळे यांनी सांगितले की, बांबूच्या रोप वाटिकांना राज्य सरकारकडून विशेष सवलती दिल्या जात नाहीत परंतु राष्ट्रीय बांबू अभियानांतर्गत 100 टक्के केन्द्रीय पुरस्कृत योजना आहे . या योजनेअंतर्गत रोप वन क्षेत्र, रोप निर्मिती सहभाग,प्रशिक्षणे, कार्यशाळा, तंत्रज्ञान प्रसार, बाजारपेठ विकसित करणे इत्यादी सर्व कार्यक्रम हाती घेण्यात आले असून. बांबूचे धोरण ज्यावेळी संपूर्णपणे कार्यान्वित होईल त्यावेळी निश्चितपणे त्याचा फायदा राज्याला मिळाल्याशिवाय राहणार नाही.

----

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 2 व अर्धा तास चर्चा क्रमांक 1 बाबत</u>**

**सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या सर्व लक्षवेधी सूचना वरील चर्चा संपली आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेली दुसरी लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांची असून सन्माननीय सदस्या श्रीमती दीप्ती चवधरी यांची अर्धा तास चर्चा हे दोन्ही विषय जवळजवळ सारखेच आहेत.

एक सन्माननीय सदस्य (बसून) : दोन्हीचा विषय एकच आहे.

**सभापती** : दोन्ही सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना आणि अर्धा तास चर्चा स्वतंत्रपणे दिलेली असल्यामुळे दोन्ही विषय जवळजवळ सारखेच आहे असेच म्हटले पाहिजे. अन्यथा कळत न कळत एखादा सन्माननीय सदस्य नाराज होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नंतर श्री.सरफरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ...

दोन्ही विषयांमध्ये साम्य असेल तर ती बाब संबंधित माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊन त्या मधील एक विषय रद्द करण्या बाबत मला कारवाई करावी लागेल किंवा तो विषय दुसऱ्या विषयामध्ये समाविष्ट करावा लागेल. त्या दृष्टीने मी धोरणात्मक निर्णय घेत आहे, याची सर्व माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी. कामकाजाच्या पत्रिकेमध्ये यापुढे अशा प्रकारचे विषय आल्यास मी संबंधित माननीय सदस्यांना बोलावून घेऊन त्या संबधीचा योग्य तो निर्णय घेईन.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे, सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12 वाजून 45 मिनिटांनी पुन: भरेल.

(दुपारी 12.10 ते 12.45 पर्यंत बैठक स्थगित झाली.)

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:45

**(स्थगितीनंतर)**

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**भारतीय क्रिकेट टीमचे विजयाबाबत अभिनंदन**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल मोहाली येथे भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये झालेल्या क्रिकेट मॅचमध्ये भारताचा विजय झालेला आहे. त्याबद्दल आपण सर्वांनी येथे त्यांचे अभिनंदन करावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : तो आपला राष्ट्रीय खेळ आहे काय ?

**सभापती** : हा जरी राष्ट्रीय खेळ नसला तरी देखील अत्यंत प्रतिष्ठेच्या लढतीमध्ये आपल्या भारताच्या क्रिकेट संघाने फार मोठे यश संपादन केलेले आहे त्याबद्दल आपल्या सर्वांच्या माध्यमातून मी याठिकाणी त्यांचे अभिनंदन करतो.

-----

. . . .व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचा मुद्दा**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी माझ्याकडे औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. तो मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे असे त्यांचे म्हणणे आहे आणि मला देखील असेच वाटते की, हा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. आपली सर्वसाधारण पध्दत अशी आहे की, आपण प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर औचित्याचे मुद्दे मांडण्यासाठी परवानगी देतो. मात्र सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी मला माझ्या दालनामध्ये येऊन विनंती केलेली आहे की, आपण प्रश्नोत्तराच्या तासापूर्वी हा औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी द्यावी. मला असे वाटते की, एक अपवाद म्हणून मी त्यांना परवानगी देत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्याला धन्यवाद देतो. कृष्णा खोरे लवादाचा निर्णय लागला आणि जेव्हा अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याच्या बाबतीत भूमिका जाहीर झाली, तेव्हा पश्चिम महाराष्ट्रामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. त्यावेळी खास करुन सांगलीमध्ये मी स्वत: मोर्चाचे नेतृत्व केले आणि त्यामध्ये उत्स्फूर्तपणे हजारो लोक सामील झाले. कारण अलमट्टी धरणाची उंची वाढविल्यामुळे सांगली आणि कोल्हापूर मध्ये प्रश्न निर्माण होणार आहे.मला या संदर्भात हे नमूद करण्यास आनंद होत आहे की, ज्यावेळेला अलमट्टी धरणाच्या बाबतीत निर्णय जाहीर झाला, त्यावेळी आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी त्वरित प्रतिक्रिया व्यक्त केली होती की, हा महाराष्ट्रावर अन्याय करणारा निर्णय आहे आणि आम्ही या निकालाच्या बाबतीत अपीलामध्ये जाऊ. आजचा माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, 31 मार्च 2011 म्हणजे आज आपल्याला याबाबत अपील करण्याची शेवटची तारीख आहे आणि आज जर आपण अपिल दाखल केले नाही तर पुढील 50 वर्षामध्ये महाराष्ट्र राज्याला आपली बाजू मांडण्याकरता संधी उपलब्ध होणार नाही ही सत्य परिस्थिती आहे.जेव्हा याबाबत निर्णय झाला,त्यावेळेला मी सदनामध्येही सांगितले होते की, आपल्या राज्याला कमी पाणी मिळाले.कसे मिळाले. याबाबतही सदनामध्ये चर्चा केली होती आणि त्यावेळेला मी आपल्यामार्फत या निर्णयाच्या विरोधात अपीलामध्ये जाण्यासाठी महाराष्ट्र सरकारला विनंती केली होती. या नवीन लवादामध्ये महाराष्ट्र राज्याला देण्यात आलेल्या पाण्याची टक्केवारी पूर्वीचे न्यायमूर्ती श्री.बच्छावत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या लवादाच्या म्हणजे 1976 च्या पाण्याच्या टक्केवारी पेक्षा कमी मिळाली.महाराष्ट्र राज्याला कृष्णा खोऱ्यातील लागवडी योग्य क्षेत्राचा विचार करता हक्क आणि गरजेपेक्षाही पाणी कमी देण्यात आले.कोयना आणि भीमा आदी जल विद्युत प्रकल्पासाठी परवानगी दिलेल्या पाण्याखेरीज सिंचन आणि इतर कारणासाठी खोऱ्याबाहेर ..



APR/ MMP/ 12:45

श्री.दिवाकर रावते . . . .

पाणी न वापरण्याचे बंधन हे कायम ठेवण्यात आले आहे, जे बंधन आंध्र प्रदेशसाठी लावलेले नाही. आंध्र प्रदेशला मात्र ते पाणी त्या खोऱ्या व्यतिरिक्त इतर ठिकाणी वापरण्याच्या बाबतीत जेव्हा त्यांच्या वकिलांनी त्यासंदर्भात मांडणी केली, तेव्हा तसे ते वापरण्याची त्यांना मुभा दिली. पण आपल्याला तशी मुभा दिलेली नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते......

सभापती महोदय, कर्नाटकातील अलमट्टी धरणाची उंची 524.25 मीटर पर्यंत वाढविण्याची परवानगी देताना महाराष्ट्रावर होणाऱ्या संभाव्य अनिष्ट परिणामाचा योग्य पध्दतीने पुरेसा अभ्यास झाला नाही. हे चार मुद्दे घेऊन 31 तारखे पर्यंत महाराष्ट्र शासनाने आपले म्हणणे मांडणे आवश्यक होते.

सभापती महोदय त्यावेळी, महाराष्ट्रचे लागवडीखालील क्षेत्र 27.4 होते आणि आंध्र प्रदेशचे 38.1 इतके होते. नवीन लवादा प्रमाणे महाराष्ट्राचे लागवडीखालील क्षेत्र 25.8 आहे आणि आंध्र प्रदशचे 38.9 आहे. तरी सुध्दा महाष्ट्राचे सिंचन क्षेत्र कमी असल्यामुळे आपल्याला कमी पाणी मिळाले आणि आंध्र प्रदेशला जास्त पाणी मिळाले आहे. अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यात येऊ नये, असे त्यावेळी सांगण्यात आले होते. सभापती महोदय, हाच मुद्दा तीन वेळा मांडण्यात आलेला आहे. हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. अलमट्टी धरणाची उंची 518 मीटर एवढीच आहे. महाराष्ट्राची जमीन या धरणाच्या पाण्याखाली येऊ नये, तसेच गाळामुळे नदी-नाल्यांची पात्रे बंद होऊ नयेत, यासाठी अलमट्टी धरणाची उंची 518 मीटर पेक्षा अधिक ठेवू नये, कारण कर्नाटक अलमट्टी धरणाची उंची 519.6 मीटर पर्यंत वाढविल्यामुळे सन 2003 साली महाराष्ट्रातील जमीन पाण्याखाली गेली होती त्यामुळे महाराष्ट्र शासनाने या धरणाची उंची वाढवू नये असा आग्रह धरला होता.

सभापती महोदय, अहवालातील पान क्रमांक 610 वर असे म्हटले आहे की, " सेंट्रल वॉटर कमिशनने अलमट्टी धरणाची उंची 512.2 मीटर पेक्षा जास्त ठेवण्यास मान्यता देऊ नये, असे महाराष्ट्र शासनाने म्हटले होते. काल परवा ज्यावेळी महाराष्ट्र शासन लवादापुढे गेले त्यावेळी आंध्रप्रदेशने अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याची मागणी केली. परंतु त्यावेळी महाराष्ट्र शासनाने त्याबाबतीत कुठलाही प्रतिवाद केला नाही. अलमट्टी धरणाची उंची 524.25 इतकी वाढविण्याच्या संदर्भात मान्यता देत असताना शासनाने कुठलाही वाद निर्माण केला नाही, कुठलेही आर्ग्युमेन्ट केले नाही, किंवा काहीही सांगितले नाही. आज याबाबतची शेवटची तारीख आहे. या संदर्भात शासनाने अपील केले असेल तर आनंद आहे आणि केले नसेल तर ते कां केले नाही? याबाबतचे निवेदन आज होणे अत्यंत महत्वाचे आहे म्हणून मी हा अत्यंत महत्वाचा मुद्दा सभागृहापुढे मांडलेला आहे. सभापती महोदय, आपण आपल्या माध्यमातून शासनाला याबाबत निवेदन करण्याच्या बाबतीत योग्य ती सूचना द्यावी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्मानीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अलमट्टी धरणाच्या उंचीच्या वाढीच्या प्रश्ना संबंधी अपील करण्याचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला असून याबाबतची आजची शेवटची तारीख आहे असे म्हटले आहे. यासंबंधी करावयाच्या कारवाई संबंधीचे निवेदन आज संध्याकाळ पर्यत सभागृहात करण्यात येईल, असे मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

----

**सभापती** :औचित्याच्या मुद्याकरिता प्रश्नोत्तराच्या तासातील 8 मिनिटे गेलेली असल्यामुळे प्रश्नोत्तराचा तासासाठी 8 मिनिटे वेळ वाढवून देण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**वडवणी (जि.बीड) तालुक्यातील तहसीलदार यांनी माजगावाचे विद्यमान नगरसेवक असलेल्या व्यक्तीला बोगस गॅस एजन्सीसाठी मदत केल्याबाबत**

**(१) * १३०६३ प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवणी (जि.बीड) तालुक्यातील तहसीलदार यांनी माजगावाचे विद्यमान नगरसेवक असलेल्या व्यक्तीला वडवणीचे बोगस रहिवासी प्रमाणपत्र देऊन बोगस गॅस एजन्सीसाठी मदत करुन शासन व जनतेची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित तहसीलदार व तलाठी यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्या करिता :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, या नगरसेवकाची गॅस एजन्सी भारत गॅस कंपनीने रद्द केलली आहे. माननीय राज्य मंत्री महसूल आणि बीड जिल्ह्याचे पालक मंत्री या दोघांनाही या संबंधीचे निवदन देण्यात आलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, यासंबंधात जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासन काय प्रयत्न करणार आहे? माझा दुसरा प्रश्न असा आहे की,माजलगाव आणि वडवणी या दोन्ही मतदारसंघाच्या यादीमध्ये सदर नगरसेवकाचे नाव आहे, ही वस्तुस्थिती आहे. असे असेल तर ही बाब अतिशय गंभीर आहे, या गंभीर गुन्ह्या बद्दल शासन काय कारवाई करणार आहे?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13063 .....

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, त्या ठिकाणी रहिवासी प्रमाणपत्र मिळण्याबाबत श्री. अशोक भगवान आळणे यांनी तहसीलदार, वडवणी यांच्याकडे अर्ज केला होता आणि त्यांच्याकडे असलेले कागदपत्रांचे पुरावे आणि केलेली चौकशी त्याचप्रमाणे तहसीलदार, माजलगाव आणि मुख्याधिकारी, नगरपरिषद माजलगाव यांनी जो काही अहवाल पाठविला ते सर्व विचारात घेता श्री. अशोक भगवान आळणे हे वडवणीचे रहिवासी आहेत अशा प्रकारचे प्रमाणपत्र त्यांनी दिले. त्यांच्यासमोर जी काही कागदपत्रे आली आणि जी चौकशी केली त्याच्या आधारे त्यांनी हे प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यामुळे यामध्ये कोणीही दोषी नाही. माजलगाव आणि वडवणी या दोन्ही गावच्या मतदारयादीमध्ये त्यांचे नाव आहे याबाबत सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न उपस्थित केला. निश्चितपणे अशी वस्तुस्थिती आहे. त्या बाबतीत योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतील.

---

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या २७१ वसतिगृहांमध्ये संगणकप्रणाली बसविण्यासाठी निविदा न मागविल्याबाबत**

**(२) * १२८८९ श्री.सुभाष चव्हाण, श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.रामनाथ मोते , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो गाणार , श्री.संजय केळकर , डॉ.दिपक सावंत , श्री.रामदास कदम , श्री.दिवाकर रावते , श्री.हुसेन दलवाई , प्रा.सुरेश नवले , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या २७१ वसतिगृहांमध्ये संगणकप्रणाली बसविण्यासाठी व त्याची देखभाल करण्यासाठी सुमारे ३१ कोटी रुपयांचे कंत्राट कोणत्याही निविदा न मागविता मे.हिन्दुस्थान कंप्युटर्स या कंपनीला देण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संगणकप्रणालीच्या ३१ कोटी रुपयांच्या कामासाठी अन्य कंपन्यांकडूनही प्रस्ताव सादर केले गेले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाची कोट्यवधी रुपयांची कामे देतांना जाहीर निविदा मागविण्याचे शासनाचे स्थायी आदेश असताना निविदा न मागविता कोट्यवधी रुपयांची कामे देण्याबाबत जबाबदार असलेल्या समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांची राज्य शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचा निष्कर्ष काय आहे व त्या अनुषंगाने संबंधित दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे :** (१) व (२) संचालक, समाजकल्याण, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या ५ प्रस्तावांपैकी कमी दर असलेल्या हिंदुस्थान कॉम्प्युटर्स या संस्थेस प्रशिक्षणासंदर्भात कंत्राट देण्यात आले होते. सदर आदेशास मा.उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मा.उच्च न्यायालयाने सदर आदेश रद्द करून प्रशिक्षण देण्यासंदर्भात निविदा मागवण्याचे आदेश दिले आहेत.

(३), (४) व (५) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पुरविण्यात येणारे संगणक घेण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या निविदा न देता जवळजवळ 31.86 कोटी रुपयांचे काम देण्यात आले आहे. निविदा न मागविता हे काम कोणी दिले, यामागचे शासनाचे काय धोरण होते आणि ज्यांनी हे दिले त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार ? उच्च न्यायालयाने हे आदेश रद्द केले, या निविदा रद्द केल्या. ज्या निविदा दिलेल्या आहेत त्या बाबत उच्च न्यायालयाने एक कार्यक्रम दिला आणि योग्य तो आधार घेऊन परत निविदा बोलविण्यात याव्यात असे सांगितले. राज्यातील जेवढे मागासवर्गीय विद्यार्थी आहेत ते या संगणकाविना राहिलेले आहेत. त्यांना ते संगणक कधी प्राप्त होणार ?

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/

ता.प्र.क्र. 12889.....

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ही जनरल योजना नसून वैशिष्ट्यपूर्ण योजना आहे. त्यासाठी वेगवेगळ्या पाच संस्थांचे अर्ज आले होते. आपल्याकडे सहा-सात वर्षापूर्वी संगणक पुरविले गेले होते. परंतु त्यांचे मेन्टेनन्स नसल्याने आणि प्रशिक्षणाची व्यवस्था नसल्यामुळे त्या संगणकांची उपयोगिता काहीही नव्हती. म्हणून बीओटी तत्वावर पाच संस्थांचे प्रस्ताव आले होते. बीओटी तत्वावर म्हणजे त्यांनी संगणक पुरवावयाचे, तीन वर्षे प्रशिक्षण द्यावयाचे आणि प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांना पैसे द्यावयाचे होते. असे पाच संस्थांचे प्रस्ताव आले होते. त्या पाच संस्थांच्या तुलनेमध्ये हिंदुस्थान कॉम्प्युटर्स या संस्थेचे दर कमी असल्यामुळे त्यांना कंत्राट दिले. परंतु या बाबत माननीय उच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले होते. माननीय उच्च न्यायालयाने एवढेच म्हटले आहे की, ही योजना अतिशय चांगली आहे परंतु आपण हे जे संगणक पुरविले त्या बाबत ओपन टेंडर काढलेले नाहीत. त्यामुळे उच्च न्यायालयाने 25.10.2010 रोजी अंतरिम स्थगिती दिलेली आहे. या पूर्वी जेवढे संगणक पुरविले असतील ते क्वालिटीचे आहेत का किंवा त्यांचा दर आरसीपेक्षा कमी आहे की जास्त आहे हे पाहून आपण त्यांना ऑफर द्यावी आणि शासनाने दिलेली ऑफर त्यांना मान्य नसेल तर त्यांना त्यांचे संगणक परत द्या असे न्यायालयाने सांगितले. आरसीचे जे दर आहेत ते तपासावे लागतील. माझ्या माहितीप्रमाणे या कंपनीने जे संगणक पुरविले त्याचे दर आरसीच्या दरापेक्षा अतिशय कमी आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, निविदा मागविल्या होत्या का याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले नाही. मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, प्रस्ताव आले होते. ते प्रस्ताव कोणत्या पध्दतीने मागविले होते, यामध्ये 31 कोटी रुपयांचा प्रस्ताव असताना निविदा का मागविण्यात आल्या नाहीत, उच्च न्यायालयाने हे रद्द करण्याबाबत कोणते नकारात्मक मत नोंदविले आहे ? या पूर्वी जे संगणक पुरविले असतील ते तपासून घेण्याच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. त्यांनी 31 कोटी रुपयांमध्ये एकूण किती संगणक पुरवावयाचे होते, आतापर्यंत किती पुरविले आणि कधीपासून पुरविले ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12889......

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, उच्च न्यायालयाने 5 विभागाच्या सचिवांची समिती नेमली आहे. उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती देण्यापूर्वी त्यांनी जेवढे संगणक पुरविले असतील त्या संगणकाबद्दल 4-5 मुद्यांसंबंधी त्यांनी माहिती मागविली आहे. आरसी रेटपेक्षा रेट कमी आहेत की, जास्त आहेत अशी विचारणा केलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उच्च न्यायालयाने 5 सचिवांची समिती नेमली आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु उच्च न्यायालयाकडून थेट समिती नेमली जात नाही. या समितीमध्ये कोणत्या विभागाचे सचिव असावेत हे त्यांनी कसे ठरविले यासंबंधी मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, हायकोर्टाने 5 सचिवांची समिती नेमली आहे. यामध्ये सामाजिक न्याय, विधी व न्याय, वित्त, माहिती व तंत्रज्ञान या विभागांचे सचिव व संचालक, असे या समितीचे सदस्य आहेत. जो माल पुरविण्यात आला त्याचा रेट आरसीपेक्षा कमी आहे की जास्त आहे, संगणकाची गुणवत्ता काय आहे हे पाहून त्या समितीने निर्णय घ्यावयाचा आहे. आरसीपेक्षा रेट जास्त असतील तर या या रेटमध्ये संगणक दिले जातील काय अशा प्रकारची त्यांना ऑफर दिली जाईल. तो दर त्यांना मान्य नसेल तर हे संगणक परत करावयाचे आहेत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर या सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. शासनाने आदेश काढून हिंदुस्थान कॉम्प्युटर्स या संस्थेच्या 31 कोटीच्या कंत्राटाला मान्यता दिली. परंतु हे कंत्राट मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केले. उच्च न्यायालयाने कंत्राट रद्द करण्याचे वेगळे कारण दाखविले आहे. हिंदुस्थान कॉम्प्युटर्स या संस्थेने संचालकांना स्वतःहून प्रस्ताव दिला होता. मंत्रालयातील विभागाने या खरेदीसंबंधी संचालकांकडून माहिती मागविली असता संबंधित संचालकांनी निविदा काढल्याशिवाय संगणक खरेदीची प्रक्रिया पूर्ण करता येणार नाही असे कळविले होते. अशा परिस्थितीत मंत्रालयातून हे प्रस्ताव मागविण्यात आले. हिंदुस्थान कॉम्प्युटर्स या संस्थेपेक्षाही अन्य संस्थेचा प्रस्ताव चांगला होता. पण तो मान्य झाला नाही. परंतु हिंदुस्थान कॉम्प्युटर्सचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. त्यामुळे हे प्रकरण उच्च

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12889...... श्री.रामनाथ मोते....

न्यायालयात गेले. न्यायालयाने हिंदुस्थान कॉम्प्युटर्स या संस्थेला फेवर करुन दिलेले कंत्राट रद्द केलेले आहे. संचालकांनी शासनाला कळविले होते की, यासाठी निविदा काढाव्या लागतील. त्या निविदा का काढण्यात आल्या नाहीत, केवळ माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांकडे 17 ऑगस्टकडे बैठक झाली, त्या बैठकीत निविदा न मागविता हिंदुस्थान कॉम्प्युटर्सच्या कंत्राटाला मान्यता देण्याचा निर्णय का घेण्यात आला, हिंदुस्थान कॉम्प्युटर्सने स्वत:हून प्रस्ताव दिला होता, त्यांनाच हे कंत्राट का देण्यात आले ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, हिंदुस्थान कॉम्प्युटर्स, ॲपेक्स कॉम्प्युटर एज्युकेशन, मुंबई, बेस्ट टेक्नोलॉजी सोल्यूशन, मुंबई, महावीर महिला बहुउद्देशीय संस्था, नागपूर व एनआयआयटी, मुंबई अशा 5 संस्थांकडून अर्ज आले होते. प्रति विद्यार्थी, प्रति वर्ष प्रशिक्षणावरील खर्चाचा दर हिंदुस्थान कॉम्प्युटर्स या संस्थेने 4682 रुपये नमूद केला होता. एका संस्थेने 7 हजार रुपयांपेक्षा जास्त, दुस-या संस्थेने 8 हजार रुपयांपेक्षा जास्त नमूद केला होता. एनआयआयटी या संस्थेने 20 हजार रुपये खर्च नमूद केला होता. हिंदुस्थान कॉम्प्युटर्स या संस्थेचे असे वैशिष्ट्य असे आहे की, ती संस्था त्यांच्या संस्थेत प्रशिक्षण देणार आहे. काही संस्थेने आम्ही आमच्याकडे प्रशिक्षण देऊ, ते शासनाने मान्य केलेले नाही. एका संस्थेने हॉस्टेलवर प्रशिक्षण देऊ असे सांगितले. पण हिंदुस्थान कॉम्प्युटर्सने हे संगणक 3 वर्षानंतर शासनाच्या मालकीचे होतील असा चांगला प्रस्ताव दिला होता. दुस-या संस्थेने असे सांगितले होते की, कॉम्प्युटर लॅब आम्ही घेऊन जाऊ. म्हणून हिंदुस्थान कॉम्प्युटर्सचा प्रस्ताव शासनाने मान्य केला.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, हे कंत्राट 31 कोटींचे आहे. एवढया मोठ्या रकमेचे कंत्राट निविदेशिवाय प्रस्तावाद्वारे देता येते काय ? अनेक विभागांमध्ये आरसी प्रमाणे खरेदी केली जाते. परंतु आरसीचे रेट बोगस असतात. उदा.ज्या भावाने बाजारात संगणक मिळतो त्यापेक्षा दुप्पट भाव आरसीचा असतो. त्यामुळे आरसीच्या दरांचे सर्वेक्षण होणे आवश्यक आहे, यामध्ये खूप गोंधळ आहे. त्यासंबंधी मूल्यमापन करणे आवश्यक आहे, या बाबत शासन कार्यवाही करणार आहे का, आरसीच्या नावाखाली 31 मार्च अखेर मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात येते, त्याच्यावर बंधन आणले जाणार आहे का ?

3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12889.....

श्री.शिवाजीराव मोघे : या खरेदीत अधिक खर्च झालेला नाही. आरसीपेक्षा खूप कमी दराने खरेदी झालेली आहे. या बाबत हायकोर्टाने कमिटी नेमलेली आहे. ती कमिटी या संदर्भात निर्णय घेणार आहे. त्या कमिटीच्या निर्णयानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:05

ता.प्र.क्र.12889

श्री.जयंत प्र. पाटील : जे पाच प्रस्ताव प्राप्त झाले ते प्रस्ताव देणा-या कंपन्यांची नावे काय आहेत, निविदा न काढता हे प्रस्ताव आलेले आहेत काय, हे प्रस्ताव हार्डवेअरसाठी होते की सॉफ्टवेअरसाठी होते की दोन्हीसाठी होते, ज्यांनी बेकायदेशीर खरेदी केलेली आहे किंवा प्रस्ताव मागविलेले आहेत त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : ही प्रशिक्षणासाठीची योजना आहे. अपेक्स कॉम्प्युटर एज्युकेशन, मुंबई, बेस्ट टेक्नॉलॉजी सोल्यूशन, मुंबई, महावीर महिला बहुउद्देशिय संस्था, नागपूर, एनआयआयटी, मुंबई अशी कंपन्यांची नावे आहेत. प्रत्येक कंपनीचे प्रस्ताव वेगवेगळे आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यामागे 20 हजार रु. दिल्यानंतर एक कंपनी प्रशिक्षण देऊन कॉम्प्युटर तीन वर्षांनी घेऊन जाणार होती.तसेच त्या कंपनीने असे सांगितले होते की, आमच्या येथे ट्रेनिंग घ्यावे लागेल. हिंदुस्थान कॉम्प्युटर्स कंपनी तीन वर्षे ट्रेनिंग देणार असून कॉम्प्युटर्स शासनाच्या मालकीचे होणार आहेत. अतिशय महत्वपूर्ण ट्रेनिंग दिले जाणार आहे. त्यामध्ये एमएससीआयटी, टॅली, वेब डिझायनिंग, इंग्लिश स्पिकिंग आणि डीओईएसीसी या कोर्सेसचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. ही वैशिष्ट्यपूर्ण योजना असल्यामुळे आपण ती मान्य केली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : संबंधित अधिका-यांवर काय कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : यामध्ये काही चुकीचे झालेले नाही. ही अतिशय चांगली योजना आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : आता माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, यामध्ये काहीही चुकीचे झालेले नाही. मग कंत्राट देण्यासाठी बेकायदा पध्दत अवलंबिली असल्याचे निरीक्षण नोंदवून उच्च न्यालयाच्या खंडपीठाने सरकारी जी.आर. व कार्यादेश रद्द करण्याचा निर्णय घेतला. असे असताना मंत्री महोदय असे सांगतात की, यामध्ये काही चुकीचे झालेले नाही. मग उच्च न्यायालयाने सांगितलेले खरे आहे की, मंत्री महोदयांनी सांगितलेले खरे आहे ? माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, यामध्ये मंत्री महोदयांनी सांगितलेले खरे नसेल तर या सभागृहामध्ये चुकीचे उत्तर दिल्याबद्दल आम्ही मंत्री महोदयांवर हक्कभंग आणावा काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12889

श्री. शिवाजीराव मोघे : हा कारवाईचा विषय नाही. सभापती महोदय, हे वैशिष्ट्यपूर्ण काम असल्यामुळे विना टेंडर ही प्रक्रिया केलेली आहे. माननीय हायकोर्टाने सांगितले की, या बाबतीत टेंडर काढायला पाहिजे होते. हायकोर्टाने हेही सांगितले की, जे कॉम्प्युटर पुरविण्यात आलेले आहेत ते आरसी पेक्षा जास्त किंमतीचे आहेत का, त्यांची उपयुक्तता आहे का, कंपनी त्या दराने कॉम्प्युटर पुरवून ते परत घेणार की शासनाला देणार, हे सर्व तपासून निर्णय घेऊन मग कंपनीला ऑफर द्या.

**सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या प्रकरणी हायकोर्टाने स्पष्ट आदेश दिलेले आहेत. ज्या कंपनीला शासनाच्या माध्यमातून टेंडर न काढता कंत्राट देण्याचा विचार झाला त्यानुषंगाने उच्च न्यायालयात कोणती तरी एक पार्टी गेली त्यावेळी उच्च न्यायालयाने असे सांगितले की, या पध्दतीने कंत्राट देणे हे चुकीचे आहे. सबब उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याकरिता सरकारने काय केले यासंदर्भात मंत्री महोदयांनी उत्तर देणे आवश्यक आहे.

श्री. शिवाजीराव मोघे : शंभर टक्के अंमलबजावणी करण्यात येईल. त्यांनी जी कमिटी नेमलेली आहे. त्या कमिटीच्या रिपोर्ट प्रमाणे कारवाई होईल.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ प्रथम श्री. शिगम 13:10

ता.प्र.क्र.12889...

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मुद्दा असा आहे की, यासंबंधात टेंडर काढले आणि त्यातून एकाला काम देण्यात आले.......

( गोंधळ )

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या बाबतीत टेंडरच काढण्यात आलेले नाही.

श्री. नारायण राणे : याबाबतचे टेंडर काढलेले नसल्यामुळे संगणक प्रणाली बसविण्याचे काम एका पार्टीला देण्यात आले त्यामुळे दुसरी पार्टी कोर्टात गेली. माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे असे आहे की, सरकारने याबाबतीत टेंडर काढलेले नाही. याबाबतीत माझे एवढेच म्हणणे आहे की, हे सरकारी काम असल्यामुळे टेंडरने द्यावयास पाहिजे होते. त्यांनी टेंडर न काढता एका पार्टीला ते काम दिले. ही बाब माननीय हायकोर्टाने शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. माननीय हायकोर्टाने सांगितले आहे की, हे कॉन्ट्रक्ट रद्द करा आणि या बाबतीत टेंडर काढावे. टेंडर काढण्यासंदर्भात माननीय हायकोर्टाने काही गाईड लाईन्स घालून दिलेल्या आहेत. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे आहे की, माननीय हायकोर्टाने ज्या गाईड लाईन्स घालून दिलेल्या आहेत, त्यांचे शासन 100 टक्के पालन करणार आहे. या कामामध्ये एकही रुपया खर्च झालेला नाही. या संदर्भातील प्रक्रियेमध्ये चूक झालेली आहे, ती चूक माननीय हायकोर्टाने शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. माननीय हायकोर्टाने सांगितले की, ते कॉन्ट्रक्ट रद्द करा व आमच्या गाईड लाईन्सप्रमाणे शासनाने काम करावे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी जो निर्णय घेतला, त्या निर्णयावर या ठिकाणी आक्षेप घेतले जात आहेत. शासनाच्या हिताचा निर्णय व्हावा म्हणून या अनुषंगाने जे पाच प्रस्ताव आले होते, त्यापैकी चार प्रस्तावामध्ये प्रशिक्षणासाठी नमूद केलेली रक्कम जास्त होती. हिंदुस्थान कॉम्प्युटर्स कंपनीची रक्कम कमी होती, म्हणून त्यांना ते काम दिले आहे. कमी खर्चात काम व्हावे, शासनाच्या आर्थिक फायद्याची गोष्ट होती, हिताची गोष्ट होती, म्हणून या कंपनीस काम देण्यात आले आहे. माननीय हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे काम देणे एवढाच प्रश्न आहे. शासन माननीय हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे काम देण्यास तयार आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या प्रश्नाला जे लेखी उत्तर दिले आहे, त्यात असे म्हटले आहे की, संचालक, समाजकल्याण, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या पाच प्रस्तावापैकी कमी दर असलेल्या हिंदुस्थान कॉम्प्युटर या संस्थेस प्रशिक्षणासंदर्भात कंत्राट देण्यात आले होते. निविदा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12889....... श्री.रामदास कदम.....

मागविल्या नसताना या कार्यालयाकडे पाच प्रस्ताव कसे प्राप्त झाले? संचालकांनी त्यांच्या हितसंबंधातील लोकांना मॅनेज करुन सदर प्रस्ताव मागविले आहेत. या संदर्भात 31 कोटी रुपयांची खरेदी होणार आहे. पाच सचिवांची समिती नेमली आहे, त्या समितीपुढे विषय आणून या बाबतीत निविदा मागवू असे मंत्री महोदयांनी सांगितले तर हा प्रश्न सुटू शकतो. हा 31 कोटी रुपयांचा विषय आहे. म्हणून भविष्यामध्ये निविदा काढून ज्या कंपनीची निविदा कमी दराची असेल त्यांची निविदा मंजूर करु असे सांगण्यात येईल काय? माझा महत्वाचा प्रश्न असा आहे की, निविदा न मागविता सदर कामाच्या बाबतीत पाच प्रस्ताव संचालक, समाजकल्याण यांच्या कार्यालयाकडे कसे प्राप्त झाले याची चौकशी करण्यात येईल काय?

श्री. शिवाजीराव मोघे : ही नावीन्यपूर्ण योजना आहे. माननीय हायकोर्टाने या बाबतीत दोन ऑर्डर दिलेल्या आहेत. जे कॉम्प्युटर ठरवून दिलेल्या तारखेच्या आत पुरविले गेले आहेत, ते योग्य आहेत काय?

श्री. रामदास कदम : या योजनेवर खर्च झाला आहे...

श्री. शिवाजीराव मोघे : या योजनेवर एकही पैसा खर्च झालेला नाही. माननीय हायकोर्टाने या बाबतीत दोन भागात निर्णय दिलेला आहे की, ठरवून दिलेल्या तारखेच्या आत कॉम्प्युटर पुरविले आहेत, ते योग्य होते काय व ते आर.सी.च्या रेटप्रमाणे होते काय? जर कॉम्प्युटर योग्य आहे असे समितीला वाटले तर...(अडथळा ).. माननीय हायकोर्टाने या बाबतीत जो निर्णय दिलेला आहे, त्याची शंभर टक्के अंमलबजावणी करु.

**सभापती** : मी आता पुढील प्रश्न चर्चेसाठी घेत आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आपला प्रश्न उपस्थित करावा.

( गोंधळ )

श्री. रामदास कदम : माननीय मंत्री महोदय या सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. 31 कोटी रुपयांचा हा प्रश्न आहे. शासनावर 2 लाख 31 हजार कोटी रुपयांचे कर्ज झालेले आहे. 31 कोटी रुपयांचा अपव्यय होत आहे. या बाबतीत शासनाने निविदा काढावी...

**सभापती** : मी पुढील प्रश्न चर्चेसाठी घंत आहे असे सांगितले आहे. तो प्रश्न आपल्याच नावाचा असल्यामुळे आपण तो प्रश्न उपस्थित करावा.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12889..........

श्री. पांडुरंग फुंडकर : समाजकल्याण संचालकांवर काय कारवाई केली या बाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांकडून मिळालेली नाही. सदरची माहिती माननीय मंत्री महोदयांकडून सभागृहासमोर येत नसल्यामुळे आम्ही निषेध व्यक्त करुन सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षाचे सदस्य बर्हिगमन करतात. )

---------

यानंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**योगिता दंत महाविद्यालयातील (ता.खेड, जि.रत्नागिरी)**
**मागासवर्गीयांचे शुल्क मिळण्याबाबत**

**(३) * १३७३५ श्री.रामदास कदम :** सन्माननीय **लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) योगिता दंत महाविद्यालयातील (ता.खेड, जि.रत्नागिरी) मागासवर्गीयांसाठी ७५ लाख रुपये तसेच छत्रपती संभाजी राजे सैनिक शाळा येथील भटक्या विमुक्त जमातीतील विद्यार्थ्यांना ४.५ लाख परिक्षा शुल्क त्वरित देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २७ जानेवारी, २०११ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे :**(१) होय.

(२) सन २०१०-११ मध्ये योगिता दंत महाविद्यालय (ता.खेड,जि.रत्नागिरी) या महाविद्यालयास तदर्थ अनुदान म्हणून रु.१४.०० लाख शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला देण्यात आले आहे. दिनांक १७/३/२०११ अखेर सदर महाविद्यालयास शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्का करीता एकूण रु.७०.९२ लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कम रु.७२.५८ लाख सदर महाविद्यालयास अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच छत्रपती संभाजी राजे सैनिक शाळा, जामगे, ता.खेड, जि.रत्नागिरी येथील विद्यार्थ्यांची निर्वाहभत्त्याची रु.७५००० इतकी रक्कम दिनांक १८/३/२०११ अखेर सदर शाळेस वितरित करण्यात आलेली आहे उर्वरित रक्कम रु.३.७५ लाख सदर शाळेस अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर निर्वाहभत्ता रक्कमेमध्ये शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, लॉजिंग बोर्डींग शुल्क, वैद्यकीय शुल्क इत्यादीचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, एका बाजूला शासनाच्या निधीचा अपव्यय कसा होतो हे आपल्या नजरेसमोर येत असताना दुसऱ्या बाजूला मागासवर्गीय, आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम शासनाकडून वेळेवर दिली जात नाही. या सदनामध्ये अनेकदा हा प्रश्न चर्चेला आलेला आहे. शासनाकडून उत्तर दिले जाते की, आदिवासी आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विशेष कार्यक्रम राबविला जात आहे. या विद्यार्थ्यांवर अन्याय करण्याचे काम शासनाकडून केले जात आहे. भविष्यात आदिवासी आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम देण्यासाठी बजेटमध्ये भरीव तरतूद करुन शैक्षणिक संस्थांना शिष्यवृत्तीच्या रक्कमेची प्रतिपूर्ती वेळेवर करण्यात येईल काय?

श्री.शिवाजीराव मोघे : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13735.....

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, शिष्यवृत्तीची रक्कम त्या त्या वर्षात शैक्षणिक संस्थांना दिली जात नाही. मी स्वत: एका शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आहे. आमच्या संस्थेला मागील वर्षाचा निधी अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे संस्थेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे पगार देण्यास विलंब होत आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी घेता येत नाही. शैक्षणिक संस्थांची ही अडचण लक्षात घेऊन मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याबरोबर त्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित शैक्षणिक संस्थांना अदा करण्याची योजना राबविली जाईल काय?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, हा खाजगी इंजिनिअरिंग व मेडिकल कॉलेजमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फी संबंधीचा प्रश्न आहे. ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम वेळेवर मिळाली नाही म्हणून हा प्रश्न विचारण्यात आला होता. बजेटमधील तरतूद वितरीत होण्यास विलंब लागला होता. परंतु आता शैक्षणिक शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालयास अदा करण्याचे आदेश दिले आहेत.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, ही शैक्षणिक संस्था कोकणातील खेड तालुक्यामध्ये आहे. शैक्षणिक शुल्काचे 75 लाख रुपये या संस्थेला अदा करावयाचे आहेत. कोकणात शैक्षणिक संस्था चालविण्यामध्ये खूप अडचणी येत आहेत. विशेषत: कोकणातील शैक्षणिक संस्थांना मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क वर्षाच्या सुरुवातीलाच देण्यासंबंधी विचार केला जाईल काय?

श्री.शिवाजीराव मोघे : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती शासन डायरेक्ट संस्थेला देत असते. 72 लाख रुपये देणे शिल्लक होते, या रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यात येत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा संपूर्ण महाराष्ट्राचा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची रक्कम अद्याप शैक्षणिक संस्थांना प्राप्त झालेली नाही. दोन वर्षापासूनची रक्कम मिळणे बाकी आहे. मागील बजेटमध्ये यासाठी तरतूद केली नव्हती का, तरतूद केली असेल तर अद्याप रक्कम का वितरीत झाली नाही? या वर्षीच्या अर्थसंकल्पात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी किती तरतूद करण्यात आली आहे? मागासवर्गीय व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थी ज्यावेळी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतात त्याच वेळी त्यांच्या शैक्षणिक शुल्काची रक्कम संबंधित संस्थांना अदा केली जाईल काय?

..3..



SGB/ MMP/ 13:15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13735.....

श्री.शिवाजीराव मोघे : हा खाजगी इंजिनिअरिंग व मेडिकल कॉलेजमधील शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासंबंधीचा प्रश्न आहे. ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी पुरवणी मागणीद्वारे तरतूद करण्यात आली आहे. यापुढे शैक्षणिक संस्थांना वेळेवर शिष्यवृत्तीची रक्कम दिली जाईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, शासकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कामध्ये सवलत दिली असेल तर त्यांच्याकडून सवलतीच्या दराने शुल्क वसूल करण्यात येते. परंतु मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी विनाअनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेतला असेल तर संपूर्ण शुल्क वसूल केले जाते. अशा विद्यार्थ्यांना शासनाकडून वर्षानुवर्षे शैक्षणिक शुल्काची रक्कम अदा केली जात नाही.

नंतर 2सी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ पूर्वी श्री. भोगले....... 13:20

ता. प्र. क्र. 13735....... श्री. वसंतराव खोटरे.....

मुले पास होऊन कॉलेज सोडून जातात तरी देखील वर्षानुवर्षे त्या मुलांना आपल्या फीचा परतावा मिळत नाही. म्हणून माझा प्रश्न आहे की, शासकीय महाविद्यालयांमध्ये जशी सवलत आहे त्याप्रमाणे खाजगी व अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांकडून पूर्ण फी न घेता सवलतीच्या दराने फी घेण्याबाबत संबंधितांना आदेश देणार काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्यानुसार शासनाला करता येणार नाही. कारण खाजगी व अनुदानित महाविद्यालयांमध्ये मुलांनी फी भरल्यानंतर त्याची प्रतिपूर्ती शासनाकडून होत असते. पण त्या मुलांकडून अगोदरच फी घेतलीच नाही तर ती फी कोण भरणार असा प्रश्न निर्माण होतो, म्हणून तसे करता येणार नाही. तसेच ही अडचण फक्त इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्याच बाबतीत घडली होती.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मी यामध्ये मंत्री महोदयांना दोष देणार नाही, कारण या प्रश्नाचा संबंध वित्त विभागाशी येतो. पण मागील दोन वर्षात किती रकमेचे देणे बाकी आहे, त्यासंबंधीची तरतूद मागील अर्थसंकल्पात केली होती काय आणि नसेल तर किमान या अर्थसंकल्पात तरी केलेली आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : मागील पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून 240 कोटीची तरतूद केली होती पण ती रक्कम रिलीज होण्यास वेळ लागला म्हणून या रकमेचे प्रदान उशिरा झाले. यापुढे अशी अडचण येणार नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, मागासवर्गीय आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाने फी माफीची सवलत योजना लागू करण्याचे मूळ कारण म्हणजे त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसते. पण यातही शासन दोन दोन वर्षे त्यांचे पैसे देणार नसेल तर त्या मुलांचे भविष्य काय राहणार आहे. तसेच या मुलांना परीक्षेला बसू न देण्याची कारवाई महाविद्यालयांकडून होत आहे, हे खरे काय, तसेच संपूर्ण राज्यात असे किती विद्यार्थी आहेत, ज्यांच्या फीचा परतावा शासनाकडून अद्याप व्हावयाचा आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, यासाठीच मागील पुरवणी मागणीच्या माध्यमातून 240 कोटीची रक्कम आपण मंजूर करुन घेतली होती पण ती रक्कम रिलीज होण्यास वेळ लागला. आता ही रक्कम रिलीज झालेली असल्याने यापुढे अशी परिस्थिती निर्माण होणार नाही.

---------

......2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आऊटबोर्ड नौकांनी मच्छीमार करणाऱ्या मच्छीमारांना सवलतीच्या दराने केरोसिनचा पुरवठा होण्यासंदर्भात

**(4) *14027 श्री.राजन तेली, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आऊटबोर्ड नौकांनी मच्छीमार करणाऱ्या मच्छीमारांना सवलतीच्या दराने केरोसिनचा पुरवठा होण्यासंदर्भात स्थानिक प्रतिनिधींनी मंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, केरळ, कनार्टक राज्यात अशा प्रकारे सवलतीच्या दराने केरोसिनचा पुरवठा होत असताना महाराष्ट्र राज्यात मच्छीमारांना सवलतीच्या दराने केरोसिन देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, महाराष्ट्र राज्यात मच्छीमारांना सवलतीच्या दराने केरोसिन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता** : (1) होय.

(2) होय.

(3) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मच्छीमारांच्या समस्यांबाबत मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे झालेल्या बैठकीत सागरी मच्छीमारांना सवलतीच्या दराने केरोसिन देण्यासाठी केरोसिनचा स्वतंत्र कोटा मिळविण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यचे निर्देश देण्यात आले. त्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. राजन तेली : महोदय, लहान मच्छीमारांना रेशनमधून रॉकेल पुरवठा व्हावा म्हणून सभागृहात सातत्याने मागणी केली जाते. या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, केरळ तसेच कर्नाटक सारख्या राज्यांमध्ये अशा छोट्या मच्छीमारांना रेशन दुकानातून प्रत्येकी 25 लिटर रॉकेलचा पुरवठा केला जातो. त्याप्रमाणे कोकणात सुध्दा असा पुरवठा व्हावा. यासंदर्भात माननीय मंत्री महोदय, श्री. नारायण राणे यांनी त्यांच्या दालनात बैठक घेतली होती. माझी या निमित्ताने

....3....



PFK/ MMP/ पूर्वी श्री. भोगले....... 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .......

शासनाला विनंती आहे की, सागरी मच्छीमारांना सवलतीच्या दराने रॉकेल पुरवठा करता यावा म्हणून आपल्या राज्यात स्वतंत्र कोटा मिळविण्यासंबंधीचा प्रस्ताव कधीपर्यंत केंद्र शासनाकडे पाठविला जाणार आहे, तसेच मच्छीमारांना असा रॉकेल पुरवठा प्रत्यक्षात कधीपर्यंत सुरु होणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यापुरता मर्यादित प्रश्न विचारलेला असला तरी कोकणातील चारही जिल्ह्यांमध्ये अशी मच्छीमारी चालते. या छोट्या बोटींना स्वस्त दराने रॉकेल पुरवठा करता यावा यासंबंधी चारही जिल्ह्यांचा एकंदरित आढावा घेण्याचे काम येत्या महिन्यात पूर्ण करुन केंद्र शासनाकडे हा प्रस्ताव पाठविण्यात येईल व त्या प्रस्तावाचा पाठपुरावा शासनाच्या वतीने करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 14027....**

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय,छोटया मच्छिमारांच्या बाबतीत सभागृहात सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात असतात. मागील अधिवेशनात म्हणजे 9/06/2009 रोजी या विषयाच्या संदर्भात एक लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती व त्यासंदर्भात तत्कालीन मंत्री महोदयांनी छोटया मच्छीमारांच्या बोटींना रॉकेल पुरवठा करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला आहे अशा प्रकारचे उत्तर दिले होते. या प्रस्तावावर आजपर्यंत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे ? या मच्छीमारांना रॉकेल पुरवठा करण्याच्या संदर्भात शासन खरोखर विचार करणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, गुजरात, कर्नाटक, केरळ या राज्यांना केंद्रसरकार कडून मच्छीमारांच्या बोटीसाठी रॉकेलचा पुरवठा केला जात असतो ही वस्तुस्थिती आहे. परंतु महाराष्ट्रातील मच्छीमारांना केंद्रसरकारच्या योजनेचा फायदा मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. केंद्र सरकारचा रॉकेलचा कोटा मिळवण्यात महाराष्ट्र शासनाला यश आलेले नाही ही बाब आम्ही मान्य केलेली आहे. चारही जिल्हयांची रॉकेलची किती मागणी आहे याबाबतचा अहवाल एक महिन्याच्या आत केंद्र सरकारकडे पाठविला जाईल. यामध्ये काही उणिवा राहिल्या असल्या तरी केंद्र शासनाकडून हा कोटा मिळवण्यात महाराष्ट्र शासन यशस्वी होईल असा मला विश्वास आहे.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू व गुजरात राज्यातील मच्छीमारांना केंद्रशासनाकडून रॉकेलची सवलत दिली जात असते. आपल्या मच्छीमारांना ही सवलत का मिळत नाही हाच खरा मुद्दा आहे. यासंदर्भातील प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला जाणार आहे अशी माहिती मंत्री महोदयांनी या ठिकाणी दिलेली आहे. या विषयाच्या संदर्भात अनेक वेळा बैठका झालेल्या आहेत, माननीय मंत्री श्री. राणे साहेबांच्या दालनात देखील बैठक झालेली होती तरी सुध्दा हा प्रस्ताव अजून पर्यंत केंद्र शासनाकडे का पाठविण्यात आलेला नाही ? त्यामुळे 1 एप्रिल,2011 पासून सवलतीच्या दरात रॉकेल पुरवठा आपल्या मच्छीमारांना केला जाणार आहे काय ? यामध्ये जर केंद्र सरकारची रक्कम उशिरा आली तर ती रक्कम दिली जाणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी रकमेच्या फरकाचा विषय नसून केंद्र शासनाकडून मच्छीमारांसाठी रॉकेलचा कोटा वाढवून मिळाला पाहिजे. या ठिकाणी कोटा मिळवणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

हा विषय असल्यामुळे रॉकेलचा कोटा मिळवण्यासाठी राज्य शासन केंद्र शासनाकडे प्रयत्न करेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, सौर ऊर्जा व बॅटरीच्या संयुक्त संयोगातून नौका चालविण्याचा प्रयत्न प्रायोगिक तत्वावर केला जाणार आहे काय ? लेखी उत्तरात पहिल्या प्रश्नाला "होय" असे उत्तर देण्यात आलेले आहे. स्थानिक प्रतिनिधींनी मंत्री महोदयांना निवेदन दिले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये लोकप्रतिनिधींची संख्या मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे क्रियाशील, जागरुक व सक्रीय स्थानिक प्रतिनिधी कोण आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सौर ऊर्जा व बॅटरीवर मच्छिमारांच्या बोटीचे इंजिन चालू करता येईल काय असा प्रश्न सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी उपस्थित केलेली आहे. सन 2009-10 पासून महाराष्ट्र शासनाने डीपीडीसीच्या माध्यमातून एक नाविन्यपूर्ण योजना सुरु केली असून डीपीडीसी व राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत अशा प्रकारची योजना राबविणे शक्य होईल काय याचा अभ्यास केला जात आहे.

सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कोकणातील सर्वच लोक प्रतिनिधी जागरुक आहेत एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यात उभारण्यात येत असलेले अनधिकृत मोबाईल टॉवर्स**

**(५) * १३६१३ श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आक्षी-रायवाडी (ता.अलिबाग,जि.रायगड) परिसरात सी.आर.झेड क्षेत्रात तसेच इतरत्रही बिगर शेती न केलेल्या क्षेत्रावर अनधिकृत टॉवर्स उभारले जात असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०११ मध्ये शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी अहवालानुसार अनधिकृत टॉवर्स उभारणीस परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात व ते बांधणाऱ्या ठेकेदारांबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्या करिता :** (१) व (२) होय.

(३) अनधिकृत टॉवर बांधकाम प्रकरणी जमीन मालक श्री.सदफ अली अबोली यांचे विरुध्द अलिबाग पोलीस ठाणे येथे कॉ.गु.र.नं.६/२०११ पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ प्रमाणे दि.१४.३.२०११ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मोबाईलचा बेकायदशीर टॉवर उभारल्यामुळे एका व्यक्तीला अटक करण्यात आली होती. आता मोठया प्रमाणात बेकायदेशीर मोबाईल टॉवर उभारणीचे काम सुरु आहे. शळा, रुग्णालये तसेच ऊंच इमारतींवर अशा प्रकारे मोबाईलचे टॉवर उभारले जात आहेत. अशा प्रकारे मोबाईल टॉवर उभारु नयेत यासंदर्भात न्यायालयाने आदेश दिलेले आहेत काय ? यासंदर्भात न्यायालयाने आदेश दिले असतील तर बेकायदेशीर मोबाईल टॉवर उभारणा-यांविरुध्द शासन काय कारवाई करणार आहे ? अनेक शाळांमध्ये अशा प्रकारे बेकायदेशीर टॉवर उभारण्यात आलेले आहेत. टॉवर ज्या जागेवर उभारले जातात त्या जागा मालकाला टॉवर कंपनी महिन्याला पैसे देत असल्यामुळे अशा प्रकारचे टॉवर उभारणीच्या कामाचे पेव फुटले आहे. त्यामुळे ज्या शाळेमध्ये अशा प्रकारचे टॉवर उभारण्यात आलेले आहे अशांवर आपण कोणती कारवाई करणार आहात? शहरी भागात जवळपास ९८ टक्के टॉवर्स हे बेकायदेशीर रित्या उभारले जात आहेत.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 13.30

ता.प्र.क्र.13613....

श्री.दिवाकर रावते : टॉवर याचा अर्थ आम्ही काय घ्यावयाचा ?

श्री.संजय केळकर : मोबाईलचे टॉवर असे मला म्हणावयाचे आहे.

श्री.प्रकाश सोळंके : मौजे आक्षी - रायवाडी, ता.अलिबाग, जिल्हा रायगडच्या संदर्भात मूळ प्रश्न विचारण्यात आला होता. मुंबई आणि इतर शहरामधील इमारतीवर आणि ग्रामीण भागातसुध्दा इमारतीवर तसेच शाळा कॉलेजच्या इमारतीवर अनधिकृत मोबाईल टॉवर उभे करण्यात आलेले आहेत असा सन्माननीय सदस्यांनी जनरल स्वरुपाचा उप प्रश्न विचारला आहे. नगरविकास खात्याच्या माध्यमातून डी.सी. रुल्समध्ये बदल करुन मोबाईल टॉवर उभारण्याच्या बाबतीत कोणते निर्बध आणता येतील यासंबंधी धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.दिवाकर रावते : याबाबतीत न्यायालयाने कोणता आदेश दिला होता ?

श्री.प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्यांचा मूळ प्रश्न अत्यंत मर्यादित होता. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना मी सांगू इच्छितो की, या प्रश्नाच्या बाबतीत न्यायालयाकडून कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर जनरल प्रश्न विचारत असून ती बाब तपासून त्याबाबत कारवाई केली जाईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांना मी सांगू इच्छितो की, अलिबाग जिल्हा रायगड तालुक्यात उभारण्यात येत असलेले अनधिकृत मोबाईल टॉवर असे आपल्या प्रश्नाचे शीर्षक असून आपला पहिला मूळ प्रश्न असा होता की, "मौजे आक्षी - रायवाडी ( ता.अलिबाग जि.रायगड) परिसरात सी.आर.झेड. क्षेत्रात तसेच इतरही बिगर शेती न केलेल्या क्षेत्रावर अनधिकृत टॉवर्स उभारले जात असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी 2011 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे हे खरे आहे काय ? " एका विशिष्ट भागातील, विशिष्ट गावाच्या संबंधीचा हा प्रश्न आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांना मर्यादित स्वरुपाचा उपप्रश्न विचारावयाचा असेल तर तसा विचारावा जर व्यापक स्वरुपाचा उप प्रश्न विचारावयाचा असेल तर माननीय मंत्री ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

श्री.संजय केळकर : न्यायालयाने जे आदेश दिले होते ते खरे आहेत काय असा प्रश्न मी विचारला होता

श्री.प्रकाश सोळंके : या बाबतीत मी मघाशी उत्तर दिलेले आहे.

31-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) EE 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13613....

डॉ.दीपक सावंत : अलिबाग तालुका.जिल्हा रायगड मधील हा प्रश्न आहे याचे भान ठेवून मी सन्माननीय मंत्र्यांना असे विचारु इच्छितो की, या भागात एकंदर किती अनधिकृत टॉवर्स आहेत याची गणना करण्यात आली होती काय , त्याचबरोबर एकाच व्यक्तीविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : अलिबाग तालुक्याच्या संदर्भात मला सांगता येणार नाही परंतु रायगड जिल्हयाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, रायगड जिल्हयामध्ये 70 अनधिकृत टॉवर्स असल्याचे आढळून आले असून 33 प्रकरणात संबंधिताविरुध्द 13 लाख 47 हजार 199 रुपये वसूल करण्यात आलेले आहेत बाकीची रक्कम वसूल करण्याची कारवाई सुरु आहे.

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक 13927

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मला अगोदरच्या प्रश्नावर उप प्रश्न विचारावयाचा आहे.

**सभापती** : दररोज किमान 10 प्रश्न उत्तरित झाले पाहिजेत अशी माझी इच्छा आहे. त्याप्रमाणे दहा प्रश्नापर्यत आपण गेलो पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी खाली बसावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी खाली बसतो परंतु मला एवढेच सांगावयाचे आहे की, ज्या भागाशी संबंधित प्रश्न असेल त्या भागातील सन्माननीय सदस्यांना आपण प्राधान्याने प्रश्न विचारण्याची संधी देता.त्यामुळे हा प्रश्न विचारण्यासाठी मी परवानगी मागितली होती.

**सभापती** : मी आपल्याला प्रश्न विचारण्यासाठी 80 टक्के प्राधान्य देत असतो.

श्री.जयंत प्र.पाटील : मोबाईल टॉवर उभारण्यासाठी परवानगी देण्यात यावी अन्यथा कारवाई करण्यात येईल अशा प्रकारे ग्राम विकास विभागाने वेगळे आणि चुकीचे परिपत्रक काढलेले आहे.

**सभापती** : ते माननीय मंत्र्यांकडे देण्यात यावे .

----

नंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बुलढाणा जिल्ह्यात लिपिक-टंकलेखकांच्या भरती प्रक्रियेत झालेले गैरप्रकार**

**(६) * १३९२७ श्री.जगदीश गुप्ता , श्री.पांडुरंग फुंडकर , डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यांत लिपिक-टंकलेखक पदांची भरती प्रक्रिया २००९ अंतर्गत घेतलेल्या परिक्षेस असलेल्या व अनुक्रमे १६४, १७२ व १७४ अशा गुण मिळालेल्या सर्वश्री विशाल मदनकर, शिवदास शेळके, सिध्देश्वर बोरे व कुमारी निर्मला घोडके यांनी मागासप्रवर्गात अर्ज केले असतानाही त्यांना खुल्या प्रवर्गात दाखविल्यामुळे त्यांना मागासप्रवर्गातील सवलतींचा लाभ न मिळाल्यामुळे त्यांना निवड होण्यापासून वंचित रहावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ह्या भरती प्रक्रियेतील अनियमिततेस जबाबदार असणारे बुलढाणा जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी श्री.किशोर कामुने यांच्यावर कारवाई करण्याबाबतचा अहवाल अमरावतीच्या विभागीय आयुक्तांनी सामान्य प्रशासन विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांकडे पाठवूनही त्यांचेवर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अप्पर जिल्हाधिकारी श्री.किशोर कामुने यांच्यावर सत्वर कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता :** (१) या उमेदवारांपैकी ३ उमेदवारांनी मागासवर्गीय प्रवार्गाचे लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर न केल्याने, तर एका उमेदवाराने सादर केलेले प्रमाणपत्र मुदतबाह्य असल्याने त्यांना मागासप्रवर्गात अंतर्भूत न करता त्यांचा सर्वसाधारण प्रवर्गात विचार करण्यात आला, हे खरे आहे.

(२), (३) व (४) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी प्रस्तुत प्रकरणी सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी सुरु आहे.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, आयुक्तांनी १० महिन्यापूर्वी या अधिकाऱ्याविरुध्द अहवाल दिला असताना त्याच्या विरुध्द कारवाई न करता त्या अहवालाची छाननी सुरु असल्याचे उत्तरामध्ये म्हटले आहे. सदरची छाननी कोणत्या अधिकाऱ्यामार्फत करण्यात येत आहे? या छापील उत्तरामध्ये भ्रष्ट अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा सरकारचा उद्देश दिसत आहे. ज्या अधिकाऱ्यांनी प्रचंड भ्रष्टाचार केला आहे, त्यांना क्लिन चिट देण्याचे काम शासनाने केले आहे. त्यामुळे या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १३९२७....

श्री. जगदीश गुप्ता...

अधिकाऱ्याला तातडीने निलंबित करुन विभागीय आयुक्तांनी दिलेल्या अहवालावर हे शासन तातडीने कारवाई करील काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, लिपिक आणि टंकलेखक यांची परीक्षा बुलढाणा जिल्ह्यात घेण्यात आली त्या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने अमरावती विभागाच्या आयुक्तांनी चौकशी करुन शासनाकडे अहवाल पाठविला आहे. त्या अहवालाची छाननी करण्यासाठी वेळ लागत असल्यामुळे आयुक्तांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे दोषारोप पत्र ठेवावे लागेल की नाही अशा प्रकारचा संभ्रम निर्माण झालेला आहे. आयुक्तांनी फक्त एकाच अधिकाऱ्याविरुध्द अहवाल पाठविला आहे, बाकीच्या ज्या तक्रारी आहेत त्यामध्ये मूळ तक्रारीमधील महत्वाचा मुद्दा असा आहे की, दिनांक १९.१०.२००७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार स्थानिक बाबीची माहिती प्रश्न पत्रिकेमध्ये विचारणे बंधनकारक असतांना सदरच्या प्रश्न पत्रिकेमध्ये तसा उल्लेख करण्यात आलेला नाही. सदरच्या तक्रारीनंतर स्थानिक बाबीशी संबंधित प्रश्न विचारण्यात आलेले नाहीत, दि.१९.१०.२००० च्या शासन निर्णयानुसार प्रश्न पत्रिका तयार करतांना सदर बाब विचारात घेण्यात आली नाही असा आयुक्तांनी निष्कर्ष काढला. शासनाच्या निर्णयामध्ये कंपल्शनचा मुद्दा नसून त्यांनी स्थानिक प्रश्न विचारावेत असा उल्लेख केला आहे. त्या प्रमाणे ही प्रश्न पत्रिका तीन अधिकारी मिळून तयार करीत असतात. त्या तीन प्रश्न पत्रिकांची सरमिसळ करुन अंतिम प्रश्न पत्रिका तयार केली जाते. त्यामध्ये दोन अधिकाऱ्यांनी स्थानिक प्रश्न विचारले होते आणि एका अधिकाऱ्याने स्थानिक बाबीशी संबंधित चार-पाच प्रश्न विचारले होते. परंतु फायनल प्रश्न पत्रिका तयार करतांना स्थानिक बाबीचा उल्लेख करण्यात आलेला नाही, ही गुंतागुंत असल्यामुळे एका अधिकाऱ्यावर दोषारोप पत्र ठेवण्यामध्ये विभागाला अडचण येत आहे. म्हणून या अहवालाची छाननी करुन संबंधितावर कारवाई केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा विषय केवळ प्रश्न पत्रिकेशी संबंधित नाही. बुलढाणा जिल्ह्यामध्ये टंकलेखक आणि लिपिकाच्या पदांची भरती अनेक भागामध्ये सुरु होती. त्या भरती प्रक्रियेमध्ये अनेक अनियमितता झालेली आहे. त्यापैकी एक अनियमितता माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील टंकलेखक-लिपिक भरती प्रक्रिया २००९-१० करिता १०० मार्कांची एक प्रश्न पत्रिका तयार करण्यात आली व त्यामध्ये १ ते २५ प्रश्न हे सामान्य





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १३९२७....

श्री. पांडुरंग फुंडकर ...

ज्ञानाशी संबंधित होते . शासन निर्णयाप्रमाणे सदर प्रश्न पत्रिकेमध्ये बुलढाणा जिल्ह्याचा भूगोल, सामाजिक इतिहास, सामाजिक ज्ञान व सामाजिक बाबीशी संबधित प्रश्न नव्हते हे स्पष्ट झाले आहे. शासन निर्णय दिनांक १९.१०.२००७ च्या परिच्छेद क्र. ६/३ नुसार प्रश्न पत्रिका तयार करण्याची कार्यवाही झालेली नाही. त्यामध्ये शासन निर्णयाचे पालन झालेले नाही ही बाब विभागीय आयुक्तांनी दिलेल्या अहवालामध्ये नमूद करण्यात आली आहे. दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, मघाशी ओबीसीच्या विद्यार्थ्यांच्या २४० कोटींच्या शिष्यवृत्तीचा प्रलंबित राहिलेला प्रश्न विचारण्यात आला होता. त्या करिता आपल्याला पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करावी लागली असे शासनाने सांगितले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:40

ता.प्र.क्र.13927 . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

यामध्ये विशाल मदनकर, शिवदास शेळके, सिध्देश्वर बोरे व कु.निर्मला धोडके या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी मागासवर्गीय प्रवर्गामध्ये अर्ज केले होते.जातीचे दाखले जोडलेले होते, बाकी इतर सर्व दाखले जोडलेले होते. फक्त नॉन क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र जोडलेले नव्हते, असे असताना त्यांचे अर्ज ओबीसी मधून काढून ओपन कॅटॅगरीमध्ये टाकण्यात आले आणि ओपनमध्ये सुध्दा या तीनही विद्यार्थ्यांचे मार्क जास्त आहेत. माझ्याजवळ कलेक्टर कार्यालयामध्ये जी अंतिम सूची लावण्यात आली होती, त्याची प्रत आहे. परंतु या तीनही विद्यार्थ्यांना जास्त मार्क असतानाही त्यांची नावे अंतिम सूचीमध्ये घेण्यात आलेली नाही आणि त्यांच्यापेक्षा ज्या विद्यार्थ्यांना कमी मार्क मिळालेले आहेत त्यांची निवड झालेली आहे.

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द झालेले आहे. या तीनही विद्यार्थ्यांनी आयुक्तांकडे अर्ज केला आहे.जर तुम्ही या तीन विद्यार्थ्यांना न्याय देणार नसाल तर ते कोर्टामध्ये जाणार आहेत. मात्र याबाबत आयुक्तांनी संबंधित विभागाच्या सचिवांकडे अहवाल पाठविला. परंतु सदरहू अहवाल गेल्या नऊ महिन्यापासून सचिवांकडे धूळ खात पडलेला आहे. अशा प्रकारे गरीब विद्यार्थ्यांवर अन्याय करुन लाखो रुपये कमावणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत त्यांना कसले प्रेम उफाळून आलेले आहे की, आयुक्तांनी संबंधितांविरुध्द अहवाल दिल्यानंतर त्यांच्यावर कारवाई होत नाही ? माझा प्रश्न असा आहे की, सदरहू अहवाल खोटा असेल तर मग आयुक्तांवर कारवाई करणार आहात काय? पण ओबीसीच्या विद्यार्थ्यांच्या संबंधातील हे प्रकरण 10-10 महिने प्रलंबित आहे आणि कोट्यावधी रुपये खाणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालणारे हे प्रकरण आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्यामुळे यामध्ये जो कोणी अधिकारी जबाबदार असेल त्याच्यावर आपण कारवाई करणार आहात काय, ती किती दिवसाच्या आत करणार आहात?

श्री.बाळासाहेब थोरात :सभापती महोदय, यामध्ये दोन प्रश्न आहेत. ओ.बी.सी.चे विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते, त्यांना ओपन कॅटॅगरीमध्ये घालण्यात आले. परंतु त्यांनी नॉन क्रिमिलेअर सर्टीफीकेट देणे अत्यावश्यक असते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13927 . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर (खाली बसून) : या विद्यार्थ्यांनी जातीचे सर्टीफीकेट दिलेले आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, त्यांनी जातीचे सर्टीफीकेट दिले तरी नॉन क्रिमिलेअरचे सर्टीफीकेट दिल्याशिवाय त्यांना आरक्षण मिळत नाही. म्हणून त्यांना खुल्या प्रवर्गामध्ये संधी देण्यात आली ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये एक विद्यार्थी कोर्टामध्ये गेला होता. परंतु कोर्टाने देखील त्याचा दावा फेटाळला आहे आणि दोन विद्यार्थ्यांची बाब मॅटमध्ये न्यायप्रविष्ट असून त्याबाबत तेथे हिअरींग होणार आहे. जर त्यामध्ये त्यांनी नॉन क्रिमिलेअर असे लिहीले असते तर त्यांना ते आरक्षण मिळाले असते ही वस्तुस्थिती आहे. आता तसा अहवाल आलेला आहे आणि त्यापध्दतीने त्यावर कारवाई केली जाईल . दुसरे म्हणजे . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जर या विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गामध्ये टाकण्यात आले तर माझ्याकडे कलेक्टर कार्यालयातील यादी आहे आणि त्यावरुन असे दिसते की, खुल्या प्रवगामध्ये सुध्दा त्यांना मिळालेले मार्क जास्त आहेत. पण त्यांच्यापेक्षा कमी मार्क मिळालेल्या विद्यार्थ्यांची निवड झाली परंतु या विद्यार्थ्यांची निवड झाली नाही असा मुद्दा आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जर असे झाले असेल तर याबाबत अवश्य कडक कारवाई केली जाईल.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी ही बाब तपासून घ्यावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ही बाब तपासून कारवाई केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, जर असे झाले असेल तर कारवाई केली जाईल. परंतु प्रत्यक्षात असे झाले आहे आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर याचा प्रश्न असा आहे की, जर तुम्हाला आयुक्तांचा अहवाल चुकीचा वाटत असेल तर आयुक्तांवर कारवाई करावी आणि जर योग्य वाटत असेल तर ठीक आहे. परंतु या सदनाच्या माध्यमातून आपण अधिकाऱ्यांना काही संदेश देणार आहात की नाही ? तुम्ही सरकार चालवित आहात. त्यामुळे मंत्री म्हणून तुमचा काहीतरी धाक असावयास पाहिजे की नाही ? याबाबतीत कोणावर तरी एकावर कारवाई झाली पाहिजे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आयुक्तांच्या अहवालामध्ये त्यांची खुल्या प्रवर्गा मध्ये निवड व्हावयास पाहिजे असे काही नाही ही यातील वस्तुस्थिती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आयुक्तांच्या अहवालामध्ये काय आहे ते सांगावे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याठिकाणी सभागृहाच्या पटलावर चुकीचे उत्तर येत आहे. आयुक्तांनी त्या विद्यार्थ्यांच्या विरुध्द अहवाल दिलेला आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.बाळासाहेब थोरात: सभापती महोदय, आम्ही वरिष्ठ पातळीवरुन, सचिवांच्या पातळीवरुन या सगळया बाबींची छाननी एक महिन्यामध्ये करतो आणि त्यामध्ये कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

----

. . . .2 जी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**गोंदिया जिल्ह्यात 37 पैकी 18 नायब तहसीलदारांची**

**पदे रिक्त असल्याबाबत**

**(7) *13493 श्री.केशवराव मानकर, श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.विनोद तावडे, श्री.संजय केळकर , श्रीमती शोभाताई फडणवीस** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गोंदिया जिल्ह्यात 37 पैकी 18 नायब तहसीलदारांची पदे रिक्त असताना केवळ गडचिरोली जिल्ह्यातील 6 नायब तहसीलदारांचे स्थानांतरण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सद्य:स्थितीत गोंदिया जिल्ह्यात नायब तहसीलदारांच्या एकूण 24 जागा रिक्त असून तेथील अधिकाऱ्यांच्या अतिरिक्त कामकाजामुळे परिसरातील नागरिकांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, नक्षल जिल्ह्यातून पुन्हा नक्षल जिल्ह्यात बदली करण्यापेक्षा गडचिरोली जिल्ह्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी नवीन नियुक्त्या का करण्यात आल्या नाहीत तसेच गोंदिया जिल्ह्यातील रिक्त पदे शासनाने किती कालावधीत भरण्याचे अपेक्षित आहे,

(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

गोंदिया जिल्ह्यातील 6 नायब तहसिलदार यांची बदली गडचिरोली जिल्ह्यात शासन आदेश दिनांक 03.02.2010 अन्वये करण्यात आली आहे.

(2) हे खरे नाही.

गोंदिया जिल्ह्यातील 37 जागांपैकी 36 नायब तहसीलदारांची पदे भरण्यात आली आहेत.

(3) नागपूर विभागातील नायब तहसिलदारांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यासंदर्भात निवडसूचीच्या प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. तथापि, शासनाच्या धोरणानुसार गडचिरोली जिल्ह्यातील रिक्त पदे तातडीने भरावयाची असल्याने शासनाच्या दिनांक 03.02.2010 च्या आदेशान्वये रिक्त पदे बदलीने भरण्यात आली. नायब तहसीलदारांच्या पदोन्नतीने देण्यासाठीच्या निवडसूचीच्या शासनाने दिनांक 05.01.2011 च्या आदेशान्वये मान्यता दिलेली असून 119 कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिलेली आहे. त्यानुसार गोंदिया जिल्ह्यातील 37 जागांपैकी 36 नायब तहसीलदारांची पदे भरण्यात आली आहेत.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ 13:45

ता.प्र.क्र.13493

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, गोंदिया जिल्हयातील नायब तहसीदारांचा हा प्रश्न आहे. पहिल्या व दुसऱ्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये "हे खरे नाही" असे म्हटले आहे. असे असताना उत्तर क्रमांक 1 मध्ये असेही म्हटले आहे की,"गोंदिया जिल्ह्यातील 6 नायब तहसीलदार यांची बदली गडचिरोली जिल्ह्यात शासन आदेश दिनांक 03-02-2010 अन्वये करण्यात आली आहे?. सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुन्हा नक्षलग्रस्त भागात न पाठविण्याचे शासनाचे आदेश आहेत. जर शासनाचे असे आदेश असतील तर या सहा नायब तहसीलदारांची पुन्हा गडचिरोली जिल्ह्यात बदली का करण्यात आली? सभापती महोदय, 6 पैकी 3 नायब तहसीलदारांना पुन्हा गोंदिया तालुक्यात पाठविण्यात आलेले आहे. उर्वरित 3 नायब तहसीलदारांना पुन्हा गोंदिया जिल्ह्यात पाठविण्यात येणार आहे काय? सभापती महोदय, उत्तरामध्ये "खरे नाही" असे जे उत्तर दिलेले आहे ते या प्रश्नाची दिशाभूल करणारे उत्तर आहे. 36 नायब तहसीदारांच्या जागा भरलेल्या आहेत, असे उत्तरात म्हटले आहे पण हे "खरे नाही" असे माझे म्हणणे आहे. गोदिया जिल्हयातील देवरी, गोंदिया, सडक अर्जुनी आणि सालेकसा तालुका जिल्हाधिकारी कार्यालयातील एक नायब तहसीलदाराचे पद रिक्त आहे. सभापती महोदय, मी हा प्रश्न 21 तारखेला विचारलेला आहे. त्यांनतर माननीय मंत्र्यांनी या प्रश्नाला न्याय दिलेला आहे आणि बाकीची पदे भरली गेली आहेत. परंतु ही उर्वरित 5 पदे भरणार काय आणि 3 नायब तहसीलदांराना परत पाठविणार काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, "गोंदिया जिल्ह्यात 37 पैकी 18 नायब तहसीदारांची पदे रिक्त असताना" या प्रश्नाच्या बाबतीत "खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. 6 नायब तहसीलदारांची गडचिरोली जिल्ह्यामध्ये शासन आदेशान्वये बदली करण्यात आलेली आहे असे उत्तर दिलेले आहे. ज्या वेळी प्रश्न विचारण्यात आला त्यावेळी गोंदिया जिल्ह्यातील 37 जागा पैकी 36 नायब तहसीलदारांची पदे भरण्यात आली होती आणि एक पद रिक्त होते. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती खरी आहे, असे गृहीत धरुन त्याबाबत चौकशी करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल.

-----

**मुंबईतील जमिनींच्या सुमारे 100 प्रकरणांना दिलेली स्थगिती**

**(8) * 13418 श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.धनंजय मुंडे** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) आदर्श घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या काळातील मुंबईतील जमिनींच्या सुमारे 100 प्रकरणांना माहे जानेवारी, 2011 च्या पहिल्या आठवड्यात स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या जमिनींच्या 100 प्रकरणांची कागदपत्रे तपासण्यात आली काय व त्याची चौकशी झाली काय,
(3) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले,
(4) नसल्यास, कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्या करिता** : (1) नाही.
(2) प्रश्न उद्‌भवत नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय,दिनांक 4 जानेवारी,2001 रोजी 'पुढारी' य वर्तमानपत्रात अशी बातमी आली होती की, माननीय मुख्यमंत्र्यांनी आदर्श घोटाळयाच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहरातील 100 जमिनीच्या प्रकरणास स्थगिती देण्यात आली आहे. अशी स्थगिती दिली आहे काय? असा प्रश्न मी विचारला होता. त्याला 'नाही' असे उत्तर देण्यात आलेले आहे. सभापती महोदय, जर अशी स्थगिती दिली नसेल आणि वर्तमानपत्रात त्या संबंधीची बातमी असेल तर....

**सभापती** :वर्तमानपत्रात छापून आलेल्या बातमीच्या संदर्भात प्रश्न विचारता येणार नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अशा प्रकारची वर्तमानपत्रातील बातमी त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी फेटाळली आहे काय, असा माझा प्रश्न आहे.

( उत्तर देण्यात आले नाही )

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा, अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासींचे वन जमिनींचे दावे फेटाळल्याबाबत**

**(९) * १३१५३ श्री.जयंत पाटील , श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ९२१० ला दिनांक ७ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोदा व अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुक्यातील किती आदिवासींचे जमिनींचे दावे फेटाळण्यात आले,

(२) जिल्हाधिकारी तथा जिल्हा सदस्य समिती, नंदुरबार यांनी अपात्र दाव्यांमध्ये अपील अर्ज स्वीकारण्याचा निर्णय केव्हा दिला,

(३) जिल्हाधिकारी तथा जिल्हा सदस्य समिती, नंदुरबार यांनी दिलेल्या निर्णयानुसार आतापर्यंत किती अर्ज स्वीकारण्यात आले,

(४) स्वीकारण्यात आलेल्या किती अपिलांवर निर्णय देणेत आला आहे ?

**श्री.बबनराव पाचपुते :** (१) नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा व अक्कलकुवा तालुक्यातील अनुक्रमे ३६१६ व १२०३८ असे एकूण १५६५४ दावे उपविभागस्तरीय समितीने अपात्र ठरविलेले आहेत.

(२) अनुसूचित जमातीत व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व त्याखालील नियम, २००८ मधील नियम १५(१) नुसार उपविभागस्तरीय समितीच्या निर्णयामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती उपविभागस्तरीय समितीच्या निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत जिल्हास्तरीय समितीकडे विनंती अर्ज/अपील अर्ज दाखल करील.

(३) आतापर्यंन्त उपविभागस्तरीय समितीने अपात्र ठरविलेल्या एकूण ३०९३१ दाव्यांपैकी २५४३४ दाव्यांमध्ये अपील दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) जिल्हास्तरीय समितीने स्वीकारलेल्या अपिलांपैकी अक्राणी तालुक्यातील १६० अपिलांवर निर्णय दिलेला आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, जिल्हास्तरीय समितीकडे एकूण 25434 दावे दाखल झाले होते त्यातील तळोदा आणि अक्कलकुवा तालुक्यातील किती दावे दाखल झाले आणि त्यापैकी किती दाव्यांच्या बाबतीत जिल्हा समितीने निर्णय घेतलेला आहे?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भात दोन वेळा चर्चा झालेली आहे. तसेच या संदर्भात विधानसभेत व विधानपरिषदेतही लक्षवेधी सूचनेवर चर्चा झालेली आहे. संपूर्ण राज्याच्या वन हक्काच्या कायद्याच्या अंमलबजावणी विषयीचा हा प्रश्न आहे. तळोदा, अक्कलकुवा आणि नंदूरबार या तीन तालुक्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न विचारलेला आहे. तळोदा येथे 4095 दावे प्राप्त झालेले आहेत. अक्कलकुवा येथे 12685 आणि नंदूरबार येथे

...4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13153.....

श्री. बबनराव पाचपुते.....

39615 दावे प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी तळोदा येथील 3616 दावे, अक्कलकुवा येथील 12038 दावे आणि नंदूरबार येथील 30931 दावे मान्य करण्यात आलेले आहेत. प्रत्यक्षात तळोदा येथे 479 अक्कलकुवा येथे 747 आणि नंदूरबार येथे 8684 दाव्यांमध्ये प्रत्यक्ष वाटप झालेले आहे. तसेच दाखल केलेले अपील नाकारल्यानंतर ग्रामसभा, कलेक्टर आणि एस.डी.ओ. यांच्याकडे पुन्हा अपील करण्याची मुभा दिलेली आहे

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13153 ..... श्री. बबनराव पाचपुते...

आणि आता अपिले दाखल झालेली आहेत. या शिवाय 15 ऑक्टोबरला माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमत्री आणि मंत्री यांच्या बरोबर बैठक झाली. ज्यांचे दावे फेटाळलेले आहेत त्यांना सुमोटो राज्य शासनामार्फत पुढाकार घेऊन तलाठ्यामार्फत परत सेतूमध्ये दावे दाखल करुन घेण्यात येतील आणि त्या बाबतीत कार्यवाही सुरु करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांचे जरी उत्तराने समाधान झाले असले तरी या ठिकाणी दिलेल्या उत्तरामध्ये "नियम 15(1) नुसार उपविभागस्तरीय समितीच्या निर्णयामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती" असे म्हटले आहे. निर्णयाने व्यथित होणे म्हणजे काय, हे कोणत्या प्रकारचे व्यथित होणे आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, त्या ठिकाणी 'बाधित झालेली कोणतीही व्यक्ती' असे पाहिजे. त्यामध्ये अपील करण्यासाठी परवानगी आहे.

**सभापती** : आपण त्याप्रमाणे दुरुस्ती करावी.

श्री. बबनराव पाचपुते : ठीक आहे.

श्री. एस. क्यु. जमा : सभापति महोदय, यह प्रश्न एक तालुके के बारे में है. लेकिन विदर्भ में भी फॉरेस्ट राईट एक्ट के अन्तर्गत बहुत सारे दावे लंबित पड़े हैं. मैं मंत्री जी से पूछना चाहता हूं कि इन मामलों को निपटाने के लिए समयबद्ध कार्यक्रम करने के लिए क्या कोई आदेश दिया है, अगर नहीं दिया है तो क्या इस प्रकार का आदेश दिया जाएगा ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, अशा प्रकारचा आदेश दिलेला आहे. सहा महिन्यांच्या आत सगळ्या दाव्यांची छाननी करुन निकाल देण्याच्या संदर्भात निर्णय घेतलेला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## भिलाली (ता.अमळनेर,जि.जळगाव) येथील ग्रामसेवकांने रेती लिलावाचा केलेला बनावट ठराव

**(१०) * १२६९४ श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे, श्री.मनीष जैन :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिलाली (ता.अमळनेर,जि.जळगाव) येथील ग्रामसेवकाने ग्रामपंचायतीमध्ये रेती लिलावाचा बनावट ठराव करून प्रशासनाची दिशाभूल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठरावाच्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांनी ठेकेदारास परवानगी दिली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता :** (१) होय.
(२) होय.
(३) संबंधित ग्रामसेवक यांना गटविकास अधिकारी यांनी निलंबित केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, त्या ठिकाणी संबंधित ग्रामसेवकाला निलंबित केलेले आहे. त्या ठिकाणी ग्रामसेवकाने तीन वर्षापासून शासनाची जी फसवणूक केलेली आहे त्या फसवणुकीमध्ये वरच्या अधिकाऱ्यांचा सुध्दा हात आहे. या ठिकाणी असा प्रश्न विचारलेला आहे की, ठरावाच्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांनी ठेकेदारास परवानगी दिली हेही खरे आहे काय ? या प्रश्नाला 'होय' असे उत्तर दिलेले आहे. यामध्ये ग्रामसेवक एकटा नाही. या प्रश्नावरुन असे दिसून येते की, यामध्ये फार मोठी फसवणूक झालेली आहे, भ्रष्टाचार झालेला आहे. म्हणून आपण ज्याप्रमाणे ग्रामसेवकाला निलंबित केले त्याप्रमाणे जे गट विकास अधिकारी असतील, तहसीलदार असतील त्यांच्यावर शासन कारवाई करणार का ? कारण ग्रामसेवक जेवढा दोषी आहे तेवढेच ते सुध्दा दोषी आहेत. त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, त्या ठिकाणी जो काही ठराव ग्रामपंचायतींच्या आणि ग्रामसभेच्या माध्यमातून दिला गेला त्या ठरावाची चौकशी केली असता इतिवृत्तामध्ये तो ठराव नव्हता. इतिवृत्त ठेवण्याची जबाबदारी ग्रामसेवकाची आहे. मला निश्चितपणे वाटते की, इतर काही अधिकाऱ्यांचा यामध्ये संबंध असण्याचे कारण नाही. कारण ग्रामसभेचे इतिवृत्त ठेवणे हे ग्रामसेवकाचे काम आहे. ग्रामसेवक दोषी सापडल्यामुळे त्याला निलंबित करण्यात आले आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12694 .....

श्री. मनिष जैन : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, त्यांनी तीन वर्षापर्यंत हा चुकीचा लिलाव केलेला आहे. त्यामध्ये शासनाच्या कराचे किती नुकसान झाले आहे, त्याच्या वसुलीच्या बाबतीत शासन काय प्रावधान करणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 10-11 च्या संदर्भात हा प्रश्न आहे. त्यामध्ये ग्रामसभेने मान्यता द्यावयाची असते आणि त्यानंतर तो लिलाव होतो. त्या प्रमाणे त्या ठिकाणी लिलाव झालेला आहे. 24 लाख 78 हजार रुपये एवढ्या किंमतीस सदर लिलाव श्री. सुखदेव चौरे, जिल्हा नाशिक यांनी घेतलेला आहे. बोली बोलून लिलाव घेतलेला आहे त्यामुळे यामध्ये शासनाचे नुकसान झालेले नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, ग्रामसेवकाने केलेल्या बनावट ठरावाच्या संदर्भात हा प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, असे झालेले आहे. ठराव झालेला नव्हता, इतिवृत्तामध्ये त्याची नोंद नव्हती परंतु तशा प्रकारचा ठराव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला आणि त्या अनुषंगाने कार्यवाही झाली. या ठिकाण्ी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, संबंधित ग्रामसेवकाला तातडीने निलंबित केले आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12694.... श्री.रामनाथ मोते....

जर अशा प्रकारे बनावट कागदपत्रे तयार करुन त्यांनी प्रशासनाची फसवणूक केलेली आहे, दिशाभूल केलेली आहे. त्यामुळे त्यांना निलंबित न करता त्यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा का नोंदविण्यात आला नाही, शासन त्यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नोंदविणार आहे का ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या ग्रामसेवकांना निलंबित केले असून त्यांची चौकशी चालू आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या प्रमाणे त्यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्याची निश्चितपणे कारवाई केली जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. मी सदनाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, महत्प्रयासाने आज आपण 10 प्रश्नापर्यंत पोहोचलो आहोत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

**सभापती** : आपण सर्वांनी मला जे सहकार्य केले त्यामुळे आज आपण 10 प्रश्नांपर्यंत पोहोचलो. या प्रश्नांपैकी 2-3 प्रश्न आत्यंतिक महत्वाचे होते, ते सोडविण्याचा आपण सर्वांनी प्रयत्न केला आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. परळी औष्णिक विद्युत केंद्रातील प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना प्रशिक्षण देऊन नोकरीत सामावून घेण्याचा विषय मी या निमित्ताने मांडतो.

सभापती महोदय, परळी औष्णिक विद्युत केंद्रातील जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांच्या वारसदारांची आयटीआयच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. या संबंधित लोकांना केज येथील आयटीआयमध्ये पाठविण्यात आले आहे. ज्या ट्रेडसाठी या लोकांची निवड झाली आहे तो ट्रेड त्या आयटीआयमध्ये उपलब्ध नाही. बीड किंवा आष्टी येथील आयटीआयमध्ये तो ट्रेड उपलब्ध असल्यामुळे या लोकांना तेथे पाठविण्यात यावे, अन्यथा त्यांना नोकरीपासून वंचित रहावे लागेल. यामध्ये त्यांचा दोष नाही. या विसंगतीमुळे त्या लोकांनी 2-3 दिवसांपासून उपोषण सुरु केलेले आहे. या ट्रेडच्या प्रवेशाची आज शेवटची तारीख आहे. प्रकल्पग्रस्तांच्या वारसदारांचा हा महत्वाचा प्रश्न आहे. केज येथे शक्य नसेल तर ज्या आयटीआयमध्ये हा ट्रेड असेल तेथे त्यांची सोय व्हावी किंवा केज येथील आयटीआयमध्ये तो ट्रेड सुरु करुन प्रकल्पग्रस्तांच्या वारसदारांचा प्रशिक्षणाचा प्रश्न सोडवावा आणि त्यांचे उपोषण थांबवावे अशी मी विनंती करतो.

**सभापती** : माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी प्रकल्पग्रस्तांचे जे पाल्य आहेत त्यांना आयटीआयमध्ये प्रवेश मिळण्यासंबंधी जी अडचण निर्माण झाली आहे त्या संबंधी औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे. त्यांनी सांगितल्या प्रमाणे निवड झालेल्या ट्रेडची आजची शेवटची तारीख आहे. सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांकडे माहिती द्यावी. आपण माननीय तंत्र शिक्षण मंत्र्यांना यामध्ये लक्ष घालण्यास सांगावे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशा प्रमाणे माननीय तंत्र शिक्षण मंत्र्यांना या विषयात लक्ष घालण्यास सांगतो.

-----

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.गुलाबराव देवकर ( रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2007-08 व 2008-2009 चा अनुक्रमे दहावा व अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती महोदय, सदर अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास झालेल्या विलंबाची कारणे पुढील प्रमाणे आहेत. सन 2007-08 व 2008-2009 या वर्षाच्या संवैधानिक लेखापरीक्षणासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी दिनांक 30.4.2010 रोजी नियुक्ती केली. संवैधानिक लेखापरीक्षणाचा अहवाल महामंडळास दिनांक 30.9.2010 रोजी प्राप्त झाला. सन 2007-08 व 2008-2009 या वर्षाची लेखा स्वीकृतीचे अंतिम आदेश दिनांक 27.1.2011 रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाल्यानंतर दिनांक 10.3.2011 रोजी सदर लेख्यांना महामंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मान्यता घेण्यात आली.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री. चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 1 एप्रिल, 2011 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 31 मार्च, 2011 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. अशासकीय ठरावांना खालील प्रमाणे वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

1. श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 7 — 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. प्रा. सुरेश नवले,वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 62 — 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3. श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 87 — 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा, अशीही शिफारस समितीने केली आहे.

**सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. चंद्रकांत पाटील (समिती सदस्य ) सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही ज्या दिवशी सभागृहामध्ये नव्हतो त्या दिवशी कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेले अशासकीय ठराव व्यपगत न करता पुन्हा घ्यावेत अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : त्या दिवशीचे अशासकीय ठराव मी प्रलंबित ठेवलेले आहेत. या अधिवेशनाच्या दरम्यान मी ते ठराव मांडण्याची परवानगी देईन.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी "मौजे जाखोरी ता.जि. नाशिक येथील शेतक-यांची जमीन शेतक-यांना कोणतीही पूर्व सूचना न देता इंडिया बुल्स कंपनीसाठी संपादित करणे, त्यामुळे अनेक शेतकरी भूमिहीन व अल्पभूधारक होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे व चंद्रकांत पाटील यांनी "राज्यातील 37 हजार शिक्षकांनी 10वी, 12वीच्या फेर तपासणीवर बहिष्कार घालण्याचा घेतलेला निर्णय, शासनाने कायम विनाअनुदानित शाळांच्या परवानगी आदेशातील "कायम" शब्द काढून टाकण्याचा शासन निर्णय सन 2009मध्ये निर्गमित होऊनही त्या शाळांचे मूल्यांकन होण्याबाबतचे आदेश न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांनी "दिनांक 28.3.2011 रोजी मुंबईतील कुलाबा येथे आर्ट गॅलरीमध्ये भरलेल्या चित्र प्रदर्शनामध्ये तथागत भगवान बुध्दांच्या शरीरावर व गालावर बॉलिवूड नटनट्यांचे चित्र बिंबित केल्याची निदर्शनास आलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किसनचंद तनवाणी व परशुराम उपरकर यांनी "गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, सावंतवाडी यांनी 10 प्राथमिक शिक्षकांच्या आपल्या स्तरावरुन प्रतिनियुक्तीचे नियमबाह्य काढलेले आदेश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...3...



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 14:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "शेतक-यांच्या भूसंपादन केलेल्या मोबदला रकमेतून 10 टक्के टीडीएस न कापण्या संदर्भाचा ठराव डिसेंबर 2010च्या नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये मान्य करणे, शेतकरी हे आयकर मुक्त असल्याने प्रकल्पग्रस्त शेतक-यांना 100 टक्के मोबदला देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, मनिष जैन व जयंत प्र. पाटील यांनी "मुंबईतील माध्यमिक शिक्षकांचा पगार महिना उलटून गेला तरी न होणे, पगार न होण्याचे सातत्याने घडणारे प्रकार, शिक्षकांना ECS द्वारे पगार देण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाला सादर करुनही त्यावर अद्याप निर्णय न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यांनी "कवडगांव-वेळखेड, ता. खामगांव, जि. बुलढाणा येथील गट ग्रामपंचायतीचे सचिव श्री. पी.यु.चव्हाण यांचेकडून गावाच्या विकास कामात येत असलेले अडथळे, सदरहू गावातील नागरिकांना पंचायत समितीच्या गट विकास अधिका-यांकडे तक्रार करुनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील कॅथलॅब विभाग, खाजगी संस्थेस चालविण्यास देण्याबाबतचा ठराव संमत करण्यात येणे, महानगरपालिकेच्या अधिका-यांनी ठेकेदारांबरोबर संगनमत करुन करोडो रुपयांचे नुकसान केल्यामुळे मंजूर केलेला ठराव विखंडित करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर व चंद्रकांत पाटील यांनी "बांद्रा व खार या परिसरातील मुंबई महानगरपालिकेच्या 7 शाळांच्या मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी करताना त्या शाळांना अद्यापपर्यंत पर्यायी जागा न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नियम 93 अन्वये आलेल्या अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारली आहे.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, नियम 93 ची निवेदने सभागृहाच्या पटलावर त्या त्या आठवडयात आली तर बरे हाईल. ही सर्व निवेदने अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात, त्यामुळे त्या निवेदनांवर चर्चा करता येत नाही.

**सभापती** : नियम 93 ची निवेदने विभागाकडून तीन, चार दिवसातच सभागृहात यावीत अशी माझी अपेक्षा आहे. त्यादृष्टीने काही निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी आली होती. परंतु मधल्या काळात दोन,तीन दिवस विरोधी पक्षाचे सदस्य सभागृहात उपस्थित नव्हते. त्यामुळे निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात काही अर्थ नव्हता. मी या ठिकाणी वस्तुस्थिती सांगू इच्छितो की,...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामधील आमचा अनुभव असा आहे की, हे सरकार नियम 93 ची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्याबाबत पळपुटेपणा करते. सरकारकडून कोणत्याही विभागाची निवेदने वेळेवर सभागृहाच्या पटलावर ठेवले जात नाहीत. शेवटच्या दिवशी नियम 93 च्या निवेदनांचा एकत्रित गठ्ठा सभागृहाच्या पटलावर ठेवला जातो. याचा अर्थ सरकारला या निवेदनांवर चर्चाच करावयाची नसते. ज्या आठवडयात 93 ची सूचना मान्य केली जाते, त्याबाबतची निवेदने त्या आठवडयात किंवा त्याच्या पुढच्या आठवडयातील दुसऱ्या अथवा तिसऱ्या दिवशी सभागृहाच्या पटलावर ठेवली गेली पाहिजेत. अशा प्रकारे निवेदने सभागृहाच्या पटालावर ठेवली गेली तर त्या निवेदनांना न्याय मिळेल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आणि श्री.दिवाकर रावते यांनी केलेली सूचना ही वस्तुस्थितीला धरुन आहे. विधिमंडळाचा देखील असा प्रयत्न आहे की, या सदनामध्ये सन्माननीय सदस्याकडून एखादी बाब गांभीर्याने मांडली जाते, तेवढयाच गांभीर्याने सरकारने सुध्दा घेतली पाहिजे. या अधिवेशनात गेल्या 13-14 दिवसामध्ये नियम 93 ची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. सदरहू बाब मी माझ्या विभागाकडून शासनाच्या सर्व विभागांना कळविण्याची व्यवस्था करेन आणि उद्या जास्तीत जास्त निवेदने सभागृहासमोर कसे येतील हे आपण पाहू. आपण या ठिकाणी सांगितले की, पहिल्या आठवडयातील नियम 93 ची निवेदने दुसऱ्या आठवडयातील सोमवार किंवा मंगळवारी सभागृहाच्या पटलावर ठेवली गेली पाहिजेत असा दंडक सरकारला घालून दिला जाईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा.सभापती....

आज सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या आवर्त ठेवीमध्ये लाखो रुपयांचा अपहार होणेबाबतचे नियम 93 चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी आलेले आहे. परंतु एकच निवेदन असल्यामुळे ते निवेदन उद्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल व त्यावर चर्चा घेण्यात येईल.

-------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>विशेष उल्लेख</u>**

पृ.शी. : इतर मागासवर्ग प्रवर्गात समाविष्ट असलेल्या 41 जाती व उपजातींना शासनाच्या योजनांचा व सवलतींचा लाभ न मिळणे.

मु.शी : इतर मागासवर्ग प्रवर्गात समाविष्ट असलेल्या 41 जाती व उपजातींना शासनाच्या योजनांचा व सवलतींचा लाभ न मिळणे याबाबत श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

सभापती महोदय, सन 1994 मध्ये इतर मागासवर्ग प्रवर्गात समाविष्ट असलेल्या जातीपैकी स्वकुळ साळी, साळी, पदशाळी, देवांक कोष्टी, वगैरे इतर समाजासह 41 जाती व उपजातींच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी विशेष मागासवर्ग प्रवर्गाची निर्मिती करण्यात आली व त्यांना शासकीय सेवेमध्ये तसेच इतरत्र 2 टक्के स्वतंत्र आरक्षण लागू करण्यात आले व इतर 12 आर्थिक व सामाजिक व शैक्षणिक सवलती जाहीर करण्यात आल्या, परंतु 16 वर्षे उलटून जावूनही या योजना व सवलतींची अंमलबजावणी झालेली नाही. सन 2000 पासून सदर समाजाच्या जनतेने अनेक वेळा उपोषण व धरणे आंदोलने केली, शासनातर्फे दरवर्षी आश्वासने दिली जातात, परंतु मागण्यांची अंमलबजावणी होत नाही, सबब शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी विशेष प्रवर्गामध्ये समाविष्ट असलेल्या जनतेसाठी करावी या मागणीसाठी विशेष मागास प्रवर्ग अन्याय निवारण कृति समिती, महाराष्ट्रने दिनांक 21.3.2011 पासून पुणे येथे आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला असून शासनास तसा इशारा दिला आहे. सदर विशेष प्रवर्गाच्या जनतेच्या प्रलंबित मागण्या तात्काळ मान्य करण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

-----

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: मौ.दहिवडी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथील प्रतिष्ठित द्राक्ष बागायतदारांना बेकायदेशीर नुकसान भरपाई दिली जाणे.

**मु.शी.**: मौ.दहिवडी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथील प्रतिष्ठित द्राक्ष बागायतदारांना बेकायदेशीर नुकसान भरपाई दिली जाणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यामध्ये मोठमोठया घोटाळयांची मालिका सुरु असताना गरीब शेतकऱ्यांच्या दृष्टीने ग्राम पातळीवर देखील अधिकाऱ्यांकडून संगनमताने घोटाळे निर्माण होत आहेत. मौजे दहिवडी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथील द्राक्ष बागायतदारांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. बागायतदारांना नुकसान भरपाईची रक्कम देताना काही प्रतिष्ठित लोकांना नुकसान झालेल्या क्षेत्रापेक्षा जादा रक्कम अदा केली असून काहींना त्यांच्याजवळ नुकसान भरपाई देण्याइतपत क्षेत्र नसताना म्हणजे 10 एकर क्षेत्र असताना 40 एकर क्षेत्राची नुकसान भरपाईची रक्कम अदा केली आहे. मात्र ज्यांचे प्रत्यक्षात नुकसान झाले असे बागायतदार नुकसान भरपाईपासून वंचित राहिले आहेत. सबब या नुकसान भरपाई वाटपात झालेल्या घोटाळयाची चौकशी करुन दोषींवर योग्य ती कारवाई करावी व ज्यांचे प्रत्यक्षात नुकसान झाले आहे त्यांना भरपाई मिळावी. ज्यांनी नुकसान भरपाई लुटण्याचे काम केले आहे, बेकायदेशीर नुकसान भरपाई घेतली आहे त्यांच्याकडून रक्कम वसूल करावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: पुणे शहरातील गल्ल्या व सोसायट्यांमधील वीज तारांचे जाळे कमी व्हावे याकरिता भूमिगत वीज वाहिन्या टाकणे

**मु.शी.**: पुणे शहरातील गल्ल्या व सोसायट्यांमधील वीज तारांचे जाळे कमी व्हावे याकरिता भूमिगत वीज वाहिन्या टाकणे याबाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

पुणे शहरात गल्ल्या आणि सोसायट्यांमध्ये असणारे वीज तारांचे जाळे कमी व्हावे तसेच त्यामुळे होणारे अपघात टळावेत, यासाठी भूमिगत वीज वाहिन्या टाकाव्यात आणि त्याचा खर्च महापालिकेने वॉर्डनिहाय निधीतून करावा, असा प्रस्ताव राज्य शासनाने महापालिकांपुढे ठेवला होता. या प्रस्तावाला राज्यातील सर्व महापालिकांच्या प्रतिनिधींनी मान्यताही दिली होती. पहिल्या टप्प्यात जोमाने सुरु झालेली योजना नंतर वीज कंपनी आणि महापालिका यांच्या समन्वयाअभावी पूर्णपणे बंद झाली आहे. पुणे शहरात कोथरुड, शिवाजीनगर वगळता संपूर्ण शहरात ही योजना ठप्प आहे. ही योजना पुनर्जीवीत करण्यासाठी शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: बीड जिल्हयातील 5000 रुपयाच्या आत मानधन असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून व्यवसाय कराची रक्कम कपात केली जाणे

**मु.शी.**: बीड जिल्हयातील 5000 रुपयाच्या आत मानधन असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून व्यवसाय कराची रक्कम कपात केली जाणे याबाबत ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

राज्यातील विक्रीकर खात्यामार्फत दिनांक 29 नोव्हेंबर, 2009 रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार व्यवसाय कराची मर्यादा रुपये 3000 वरुन 5000 पर्यंत वाढविण्यात येऊन बीड जिल्हयात मात्र माध्यमिक शिक्षण सेवक, कंत्राटी ग्रामसेवक, आरोग्य सेवक व शिपाई यांचे वेतन 5000 रुपयाच्या आत असताना व्यवसाय कराची रक्कम कापण्यात येणे, राज्यातील काही जिल्हा परिषदांमध्ये विक्रीकर खात्याच्या दिनांक 29 नोव्हेंबर, 2009 च्या निर्णयाची अंमलबजावणी झाली. बीड जिल्हयामध्ये अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. दै.सकाळ या वृत्तपत्राने दिनांक 1 मार्च, 2011 रोजी यासंबंधी वृत्त प्रकाशित केले होते. बीड जिल्हा परिषदेने या वृत्ताची दखल घेऊन 3 मार्च, 2011 रोजी आदेश पारित केले. त्यात म्हटले आहे की, रुपये 5000 मानधन असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारातून व्यवसाय कराची रक्कम कपात करता येणार नाही. तरी सुध्दा मागील 16 महिन्यांपासून माध्यमिक शिक्षण सेवक, कंत्राटी ग्रामसेवक, आरोग्य सेवक व शिपाई यांच्या वेतनातून व्यवसाय कराची रक्कम कपात केली जात आहे. ही रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांना अद्याप परत मिळालेली नाही. परिणामी सदर कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने कार्यवाही करावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: पुणे जिल्हयातील भोसरी येथील उड्डाणपुलाच्या कामात झालेली दिरंगाई व अनियमितता.

**मु.शी.**: पुणे जिल्हयातील भोसरी येथील उड्डाणपुलाच्या कामात झालेली दिरंगाई व अनियमितता याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

पुणे-नाशिक महामार्ग आणि भोसरी-आळंदी चौकातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी महापालिकेकडून गेल्या अडीच वर्षापासून भोसरी उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. मात्र पुलाचा वाढीव खर्च आणि त्याची रुंदी वाढविण्याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून वेळेवर निर्णय होऊ न शकल्याने पुलाच्या कामाची मुदत संपूनही त्याचे काम रेंगाळलेले आहे. या पुलाची मूळ खर्चाची रक्कम 18 कोटी रुपये असताना ती 99 कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली आहे. या उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूला सेवा मार्ग व ड्रेनेजलाईनचे काम करण्यात येणार आहे. या उड्डाणपुलाच्या कामात कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचे निदर्शनास येत आहे. तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी या कामाची चौकशी करु असे विधानपरिषदेत सांगितले होते. तरी देखील पिंपरी-चिंचवड महापालिकेचा मनमानी व बेशिस्त कारभार सुरु असून एका बाजूला वाहतुकीवर ताण पडत आहे, त्याच वेळेला उड्डाणपुलाचा खर्च 18 कोटी रुपयांवरुन 99 कोटी रुपयांवर पोहोचला आहे. याचा तपशील मागवून ज्यांनी या कामात दिरंगाई केली आणि पैशाची उधळपट्टी केली त्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केली जावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

--------

नंतर 2एन.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही आठवीच्या अभ्यासक्रमात पर्यावरण विषयाचा समावेश न करणे

**मु. शी.** :सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही आठवीच्या अभ्यासक्रमात पर्यावरण विषयाचा समावेश न करणे याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : "महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने वाढते जल, हवा व ध्वनी प्रदूषण तसेच जागतिक तापमान वाढ व जैव विविधतेचा ऱ्हास याबाबत जनजागृती होऊन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर शालेय अभ्यासक्रमात पर्यावरण या विषयाचा समावेश करण्यात आलेला असणे, परंतु नवीन अभ्यासक्रमानुसार 8 वीच्या अभ्यासक्रमातून यावर्षी हा विषय नसणे, 11 वी व 12 वी साठी पर्यावरण हा विषय सक्तीचा केल्यानंतर अंमलबजावणी सुरु होणे, परंतु वरिष्ठ महाविद्यालयातही हा विषय 100 गुणांचा अनिवार्य असणे व या पर्यावरण विषयासाठी शिक्षक नसणे, एकही तास न होणे तसेच प्रात्यक्षिक न घेता वर्षाअखेरीस गुण पत्रिकेवर ठराविक गुण श्रेणी देण्याचे ठरलेले असणे, शाळा व महाविद्यालय यांनी या पर्यावरण विषयाकडे गांभीर्याने पाहण्यासाठी राज्य शासनाने प्रयत्न व आदेश देण्याची आवश्यकता" हा गंभीर व अत्यंत महत्वाचा विषय मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

---------

....2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : दाऊदी बोहरा समाजाच्या धर्मगुरुंना शतक महोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा देणे

**मु. शी**. : दाऊदी बोहरा समाजाच्या धर्मगुरुंना शतक महोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा देणे याबाबत श्री. प्रकाश बिनसाळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"दाऊदी बोहरा समाजाचे महा धर्मगुरु डॉ. सयदना मोहम्मद दुरानुदीन यांचा 100 वा शतक महोत्सवी वाढदिवस साजरा होत आहे. दाऊदी बोहरा समाज अतिशय सामंजस्याने व गुण्या-गोविंदाने आपल्या संस्कृतीत समाविष्ट झाला आहे. हा समाज अतिशय शांतता प्रिय सचोटीने व्यापार उद्योग करुन आर्थिक प्रगतीमध्ये मोलाचा वाटा उचलतात. धर्मगुरुंच्या वाढदिवसा निमित्त या समाजातील सदस्यांनी हजारो लोकहिताचे उपक्रम हाती घेतले आहेत. धार्मिक माध्यमातून फार मोठ्या समाज कारणाचा वारसा धर्मगुरुंनी चालविला आहे. आपल्या देशात तसेच राज्यात व विशेष करुन मुंबईत सलोखा आणि शांतता निर्माण करण्यात दाऊदी बोहरा समाज अग्रेसर आहे. अशा या महान धर्मगुरुंना शंभरी निमित्त हार्दिक शुभेच्छा व दीर्घ आयुष्य लाभो, हीच प्रार्थना.

------

**सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2 वाजून 50 मिनिटांनी पुन: भरेल.

( दुपारी 2.17 ते 2.50 वाजेपर्यंत मध्यंतर )

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मध्यंतरानंतर )

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री. जयंत प्र.पाटील : आता अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरुवात होणार आहे. परंतु सभागृहात एकही कॅबिनेट किंवा राज्यमंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात यावी अशी विनंती आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक 3.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.51 ते 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगिती नंतर )

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री नसल्यामुळे सभागृहाची बैठक 15 मिनिटे स्थगित करण्यात यावी.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चा अपूर्ण असून अजून अनेक माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. तेव्हा त्यांची भाषणे सुरु करण्यास हरकत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सरकारने आपली चूक मान्य करुन विरोधी पक्ष नेत्यांना विनंती करावी आणि माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विनंती मान्य केल्यानंतर आपण सभागृहाचे कामकाज सुरु करावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ही पध्दती योग्य नाही, यामुळे चुकीचा पायंडा पडेल.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, अजून बऱ्याच माननीय सदस्यांची भाषणे व्हावयाची आहेत. तेव्हा आपण माझी विनंती मान्य करावी. सर्व माननीय सदस्यांची भाषणे संपल्यानंतर उत्तराचे भाषण मीच देणार आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसतांना आपल्याला चर्चा कशी सुरु करता येईल?

डॉ. राजेंद्र मुळक : तोपर्यंत कॅबिनेट मंत्री येतील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे आपण सभागृहाची बैठक स्थगित करावी अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : ठीक आहे, मी सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करतो.

(दुपारी 3.06 ते 3.16 पर्यंत बैठक स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:15

**(स्थगितीनंतर)**

**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदनामध्ये संसदीय कार्यमंत्र्यांना बोलवून समज द्यावी. विधान परिषद सभागृहामध्ये उपस्थित रहाण्यासाठी ज्या सन्माननीय मंत्री महोदयांचे रोस्टर टाकण्यात आलेले आहे, त्यांनी तरी येथे यावयास पाहिजे. प्रत्येक वेळेला दर अधिवेशनामध्ये असे होते. याठिकाणी बोलावयास वाईट वाटते, पण असे चालत नाही. मग एखाद्या दिवशी आम्ही असे ठरवू की, तुम्हीच सभागृह चालवावे, माननीय मंत्री महोदयांना येथे बसू द्या आणि आम्ही बाहेर जातो. कारण याबाबतीत काय करावयाचे ? प्रत्येक वेळेला असे होत आहे. याठिकाणी जे माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत, त्यांना दोष देणार नाही. परंतु विधान परिषद सभागृहामध्ये उपस्थित रहाण्यासाठी ज्या माननीय मंत्री महोदयांचे रोस्टरवर नाव आहे, त्यांनी येथे यावयास पाहिजे की नाही. परंतु सरकारचा धाकच राहिलेला नाही असे वाटते. आपण सभागृहामध्ये गेलो किंवा गेलो नाही त्याचे काही नाही. मग कोणाला तरी बोलवा, यांना बोलवा, त्यांना बोलवा, निरोप पाठवा असे सुरु होते. आज सभागृहामध्ये उपस्थित रहाण्यासाठी रोस्टरवर ज्या सन्माननीय मंत्री महोदयांचे नाव नसेल ते येऊन बसले आहेत का, तेव्हा कॉंग्रेस पक्षाचे प्रतोद कोण आहेत ?

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण हे प्रतोद आहेत.

श्री.दिवाकर रावते : अरेरे, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण, आपण कशासाठी प्रतोद झाला आहात? कारण जे सन्माननीय सदस्य प्रतोद होतात,त्यांची आमदारकी जाते असे सन्माननीय सदस्य श्री.रघुवंशी यांनी सांगितले होते.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : आता आपल्याला अर्थसंकल्पाच्या संदर्भात जी चर्चा अपूर्ण राहिलेली आहे, ती सुरु करावयाची आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी आपले भाषण सुरु करावे.

. . . .2 आर-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.**: सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे चालू)

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला भाषण करण्यासाठी संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सर्वसामान्यांवर कराचा अतिरिक्त बोजा नसलेला, मानवी चेहेरा असणारा सर्वसामान्य गरीब समाजातील दुर्बल घटक विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागास वर्गीय, अल्पसंख्याक इत्यादींना आधार देणारा अर्थसंकल्प या राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री, अर्थमंत्री सन्माननीय श्री.अजितदादा पवार यांनी विधानसभेमध्ये आणि सन्माननीय अर्थ राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांनी विधान परिषदेमध्ये अर्थसंकल्प सादर केला. त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, 1 मे रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली आणि आज त्याला 50 वर्षे पूर्ण झाली असून, आपण आता सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये पदार्पण करीत आहोत. अर्थसंकल्प हा राज्य शासनाचे धोरण ठरविणारा हा प्रमुख दस्तऐवज आहे. महात्मा गांधी यांचे स्वप्न होते की, समाजातील दुर्बल घटक, शेवटचा भागातील माणसाला याची फळे चाखता आली पाहिजेत. या अर्थसंकल्पामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती, अल्पसंख्याक, निराधार व्यक्ती, बालमजूर, उपेक्षित घटक यांच्यासाठी सुमारे 9 हजार कोटी रुपयांची तरतूद माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पामध्ये केलेली आहे.

यानतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ...

अनुसूचित जाती आणि दबलेल्या समाजासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देणारे एकमेव राज्य म्हणजे महाराष्ट्र राज्य आहे.सभापती महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी सन 2003-2004 ला सामाजिक न्यायाचा अर्थसंकल्प मांडला होता. सर्व जातींचा आणि पोटजातींचा समावेशक त्या अर्थसंकल्पात केला होता. पिढयानपिढया ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे अशा समाजाचा त्यांनी त्या अर्थसंकल्पामध्ये उल्लेख केला होता. तो सन 2003-2004 चा अर्थसंकल्प माझ्या हातामध्ये आहे. सभापती महोदय, त्या अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये एक महत्वाचे वाक्य आहे ते असे की, "त्यांना शासनाच्या कोणत्याही सवलतीचा फायदा झाला नाही व त्यांच्या घरातील कोणीही शाळेचा उंबरठा पाहिला नाही."

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे केंद्रीय मंत्री आहेत ते या सभागृहाचे सदस्य नाहीत, त्यामुळे त्यांचे नाव या ठिकाणी घेता येईल काय?

श्री. भाई जगताप : माजी मुख्यमंत्र्यांचे नाव या सभागृहात घेता येते.

श्री. सुभाष चव्हाण : मी तत्कालीन मुख्यमंत्री असा शब्दप्रयोग केला आहे.

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्मानीय केंद्रीय मंत्र्यांचे नाव या सभागृहात घेता येत नाही अशा भ्रमात मी होतो. सभापती महोदय, आदरणीय श्री. सुशीलकुमार शिंदे साहेबांनी सोलापूरमध्ये जाहीर भाषण केले आणि या सदनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी जे नाकारले ते त्यांनी जाहीर सभेत कबूल केले. ते असे म्हणाले की, "होय, मी मुख्यमंत्री असताना 71 सदस्य असलेल्या 'आदर्श' या सोसायटीला मान्यता देण्याची मी सही केलेली आहे. सभापती महोदय, अशा प्रकारे जे या सभागृहाचे सदस्य नाहीत त्यांचे या ठिकाणी नाव घेता येते काय? असा प्रश्न मी विचारला तेव्हा त्यांचे नाव घेता येते असे म्हटले म्हणून मी ते नाव घेतले आहे.

श्री. सुभाष चव्हाण : याचा अर्थसंकल्पाशी काय संबंध आहे? सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते जे बोलले आहेत ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी श्री. सुशीलकुमार शिंदे यांचे नाव घेतले होते म्हणून मी या ठिकाणी त्यांचे नाव घेतले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सावकारीच्या प्रकरणाच्या संदर्भात एक शिष्टमंडळ माननीय राष्ट्रपतींना भेटण्यासाठी गेले होते, त्या प्रकरणामध्ये मी या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांचे नाव घेतले होते त्यावेळी हरकत घेण्यात आली होती आणि सभागृहात अशा प्रकारे नाव घेता येणार नाही, असे सांगण्यात आले आणि ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात आले. त्याला अनुसरुन सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. या ठिकाणी केंद्रीय मंत्र्यांचे नाव घेता येईल काय? या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो गंभीर आहे. एक माजी मुख्यमंत्री असे म्हणतात की, "मी त्या आदर्श सोसायटीच्या फाइलवर सही केली." असे असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी असे सांगितले होते की, असे काही घडलेले नाही. सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. या ठिकणी श्री. सुशीलकुमार शिंदे यांचे नाव घेण्यात आले, तो धागा पकडून सन्मानीय सदस्य श्री. रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, तो अत्यंत गंभीर आहे. त्याचा खुलासा झाला पाहिजे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा मुद्दा बरोबर होता. त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री म्हणणे योग्य आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : मी सुध्दा तत्कालीन मुख्यमंत्री असे म्हटले होते असे असताना ते सभागृहाच्या रेकॉर्डवरुन काढण्यात आले. ते सभागृहाच्या रेकॉर्डवरुन काढण्याचे काही कारण नव्हते.

श्री. भाई जगताप : श्री. दिवाकर रावते मी आपलाच मुद्दा सांगत आहे. ....

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हरकतीच्या मुद्याच्या माध्यमातून तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत या ठिकाणी जे वक्तव्य केले आहे ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे. जसे त्यांचे नाव काढण्यात यावे तसेच सन्माननीय सदस्यांनी जे काही सांगितले ते कामकाजातून काढण्यात यावे, कारण तो आजचा विषय नाही. ते दुसऱ्या विषयावर बोलत होते. त्यांनी हरकत ज्या नावाच्या बाबतीत घेतली होती तेवढ्या पुरता हा मर्यादित विषय होता. ते कामकाजातून काढले जावे अशी माझी विनंती आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, सन 2003-2004 मधील अर्थसंकल्पीय भाषणाच्या पुस्तकात असे वाक्य आहे की, शासनाच्या कोणत्याही सवलतीचा फायदा झाला नाही. तेच वाक्य परत सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पामध्ये आहे. या अर्थसंकल्पीय भाषणात 'इतर कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ न झालेल्या' असे म्हटले आहे. 2003-2004 नंतर आता 8 वर्षे झालेली आहेत. आपण सामाजिक न्यायाच्या प्रश्नाची सोडवणूक करीत आहोत का ? अनुशेष भरला जात आहे का ? आदिवासी भूमिहिनांना जमिनीचे वाटप नोंदणीप्रमाणे सगळयांना मिळते का, याबाबतची कारणमीमांसा समजून घेण्यासाठी, त्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी आपण एका अभ्यासगटाची स्थापना करावी, अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो. या अभ्यासगटामध्ये विधिमंडळातील म्हणजे विधानसभा आणि विधान परिषदेतील सर्वपक्षीय सदस्यांचा समावेश असावा. त्यांची एक समिती तयार करुन या संदर्भातील कारणमीमांसा समजावून घ्यावी. विधिमंडळाच्या सर्वपक्षीय आमदारांची दुसरी एक समिती आहे. साधारणत: त्या समितीमध्ये 39 आमदार आहेत. मी त्या समितीचा अध्यक्ष आहे. निधीचे जे वाटप होते त्या वाटपाला संरक्षण मिळते का ? सकाळी माझा एक प्रश्न होता. मागासवर्गीय वसतिगृहांसाठी 31.86 लक्ष रुपयांचा निधी हा निविदा न काढता देण्यात आला. आम्ही त्याला संरक्षण देत आहोत. हा निधी कोठे वळविला जातो का, शासनाची योग्य परवानगी घेतली जाते का, विधिमंडळाच्या सदस्यांच्या नजरेस ते आणून दिले जाते का हे पाहण्यासाठी सर्वपक्षीय 39 आमदारांचा एक फोरम तयार झालेला आहे. त्यासाठी या ठिकाणी कार्यालय द्यावे म्हणून आम्ही जागेची मागणी सुध्दा केलेली आहे. शासनाच्या वतीने आम्हाला त्याचे वितरणही करण्यात आले तसेच बोर्डही लावण्यात आला पण तो बोर्ड नंतर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. सुभाष चव्हाण ...

काढण्यात आला. आपण माननीय अध्यक्षांना विनंती करावी की, त्यांना संरक्षण देण्यासाठी या फोरमची व्यवस्था असावी. हा महत्वाचा मुद्दा मी या चर्चेच्या निमित्ताने उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान 41 हजार 500 कोटी रुपयांचे आहे. नियमाप्रमाणे त्यातील 10.02 टक्के एवढा निधी अनुसूचित जातीसाठी मिळावयास पाहिजे. यासाठी 4233 कोटी रुपये दिलेले आहेत. तो निधी बरोबर दिलेला आहे. तो निधी दुसरीकडे कोठे वळविला गेलेला नाही. याबद्दल मी शासनाचा शतश: आभारी आहे. दीड-दोन वर्षापूर्वी थोडी गडबड झाली होती. जी घरकुल योजना आहे त्यासाठी 800 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्या 800 कोटी रुपयांच्या योजनेमध्ये अनुसूचित जाती तसेच बौध्द समाजाचा समावेश केलेला आहे. यासाठी आपण अनुसूचित जाती आणि बौध्द समाज निवडला तर त्यासाठी द्यावयाची रक्कम जवळजवळ 15 टक्के होते. म्हणजे 15 टक्के प्रमाणे 6300 कोटी रुपये एवढा निधी मिळावयास पाहिजे. म्हणजे आपल्याला अनुसूचित जातीसाठी 2500 कोटी रुपये कमी मिळालेले आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये या निधीची तरतूद करण्याबाबत घोषणा करावी, अशी मी विनंती करतो. आदिवासींच्या योजनेसाठी एकूण योजनेच्या आकारमानाच्या 8 टक्के रक्कम मिळते. त्यासाठी 3693 कोटी रुपये बरोबर दिलेले आहेत. पण त्या योजनेसाठी 9 टक्के रक्कम देण्यात यावी असा सुखथनकर समितीचा अहवाल आहे. तो अहवाल राज्य शासनाने मान्य केलेला आहे. 9 टक्के प्रमाणे ती रक्कम 3775 कोटी रुपये होते. म्हणजे त्या योजनेसाठी 42 कोटी रुपये कमी मिळालेले आहेत. ती तरतूद सुध्दा वाढवून मिळावी अशी मी विनंती करतो. अनुसूचित जाती, नवबौध्द यांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा म्हणून महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाची 1 जुलै, 1978 ला स्थापना झाली. त्यानुसार आपण लोकांना जास्तीत जास्त लाभ देतो. परंतु त्यांची जी उत्पन्नाची मर्यादा आहे ती 2 लाख रुपयांपर्यंत न्यावी. ती उत्पन्नाची मर्यादा जर 2 लाख रुपयांपर्यंत वाढविली तर अनुसूचित जाती, नवबौध्द समाजातील लोकांना त्याचा लाभ घेता येईल.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ 15:30

श्री. सुभाष चव्हाण ...

मागील वर्षी मागासवर्गीय महामंडळांचे 1100 कोटीचे कर्ज माफ माफ करण्यात आले होते. त्या कर्ज माफीसाठी अजून 700 कोटीची तरतूद करण्याचे शिल्लक राहिलेले आहे. तेव्हा या मागासवर्गीय महामंडळांचे कर्ज माफ होण्यासाठी 700 कोटीची तरतूद करावी अशी मी अर्थमंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये धनगर समाज फार मोठ्या प्रमाणावर आहे. संपूर्ण राज्यामध्ये या समाजाची लोकसंख्या 1 कोटी 20 लाखाच्या वर आहे. मराठा समाजानंतर दुस-या क्रमांकावर हा धनगर समाज आहे. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे हे धनगर समाजाचे प्रश्न सातत्याने येथे मांडत असतात. त्यांच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाला एकही पैसा मिळत नाही. या महामंडळाला देखील जास्तीत जास्त निधी मिळावा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, राज्याच्या दरडोई उत्पान्नामध्ये वाढ झालेली आहे. कोकणातील दरडोई उत्पन्नामध्ये देखील मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे हे मला येथे अभिमानाने नमूद केले पाहिजे. मागच्या वेळी वित्त खाते हे कोकणाला दिल्यामुळे रायगड जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न 88 हजार रुपये झालेले आहे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याचे 65हजार रुपये झालेले आहे. हे उत्पन्न कधीकाळी 3500 रुपये इतके होते. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी हे दरडोई उत्पन्न वर्षभरामध्ये 1लाखाच्या पुढे नेण्याचा संकल्प केलेला आहे.

सभापती महोदय, आमदार निधीच्या संदर्भात बोलत असताना मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, केन्द्रीय अर्थमंत्री श्री. प्रणव मुखर्जी यांनी खासदारांचा स्थानिक विकास निधी 2 कोटीवरुन एकदम 5 कोटी केला. आपली विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहातील सन्माननीय सदस्यांना संपूर्ण राज्यासाठी निधी द्यावा लागतो. ज्या मतदारसंघामध्ये आमच्या पक्षाचा आमदार नाही त्या ठिकाणी आमचा पक्ष आम्हाला डेप्यूट करणार आहे. आमचे मोठे नेते आम्हाला जसे सांगतात त्याप्रमाणे आम्ही आमचा विकास निधी वाटत असतो. या वरिष्ठ सभागृहातील सन्माननीय सदस्यांना दिला जाणारा दीड कोटीचा स्थानिक विकास निधी अडीच ते तीन कोटी पर्यन्त दिला जावा अशी माझी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ...

ऊर्जाच्या बाबतीत राज्याने फार चांगली कामगिरी केलेली आहे. केन्दीय ऊर्जामंत्री हे आपल्या राज्यातील असल्यामुळे आपल्याकडे ऊर्जाच ऊर्जा येत आहे. एनटीपीसी, सोलापूर असो, होडगी असो, परळी असो येथून मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती होणार आहे. राज्याच्या उप मुख्यमंत्री महोदयांनी 12.12.2012 ला राज्य भारनियमन मुक्त करण्याचा पण केलेला आहे. केन्द्रामध्ये पीएमओमध्ये असलेले मंत्री आपल्या राज्याला मुख्यमंत्री म्हणून लाभलेले आहेत. हे राज्य भारनियमन मुक्त करण्याचे आणि दुस-या राज्यांना देखील आपले राज्य वीज पुरवू शकेल अशी स्थिती निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये पाटबंधा-यासाठी 6300 कोटीची तरतूद केलेली आहे. जलसंपदा विभागाच्या पुरवणी मागण्यामध्ये धामापूर तलावासाठी जास्तीत जास्त निधी मिळालेला आहे. 1.50 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याबद्दल मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांचे शतशः आभार मानतो. त्यावेळी ते जलसंपदा मंत्री होते. 15 दिवसापूर्वी घेतलेल्या बैठकीमुळे तो निधी उपलब्ध झालेला आहे. शिवकालीन तलाव पुन्हा सुरु होणार आहेत.छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या तलावांची स्थापना केली त्यामध्ये पाणीच पाणी साठणार आहे. आजूबाजूच्या गावांना पाणीच पाणी मिळणार आहे. या अर्थसंकल्पात शिवकालीन तलावासाठी जास्तीत जास्त तरतूद केल्या बद्दल मी माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे मनापासून आभार मानतो आणि वेळे अभावी मी माझे भाषण संपवितो.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विनियोजन विधेयकाबाबत

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विनियोजन विधेयक विधानसभेमध्ये संमत होऊन ते विधानपरिषदेकडे आलेले आहे. हे विनियोजन विधेयक येथे संमत करुन पुन्हा ते विधानसभेमध्ये पाठवावयाचे आहे. अथसंकल्पावरील चर्चेमधील सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकल्यानंतर हे विनियोजन विधेयक संमत होण्यास किमान सायंकाळचे 7.00 वाजतील. तेव्हा माझी विनंती आहे की, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना त्यांचे अधिकार न गमावता चर्चेत भाग घेण्याची संधी मिळाली पाहिजे. हे विनियोजन विधेयक मंजूर होण्यासाठी सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सहकार्य केले पाहिजे. अर्थसंकल्पावरील चर्चेला माननीय अर्थमंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतर हे विधेयक मंजूर होऊन विधानसभेमध्ये जाते. विधानसभेमध्ये माननीय उप मुख्यमंत्र्यांचे भाषण देखील संपलेले आहे. हे विधेयक विधानसभेमध्ये जाण्याच्या दृष्टीने वेळेचे कसे नियोजन करायचे हे आपण पहावे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**मु.शी.**: अथसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे सुरु.... )

श्री. विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी या सभागृहात अर्थसंकल्प मांडला आहे. या अर्थसंकल्पावर चर्चा करीत असताना मला शासनाला एक गोष्ट आवर्जून निदर्शनास आणून द्यावयाची आहे. राज्याचे उत्पन्नाचे क्षेत्रवार विभाग आहेत, आपला देश कृषीप्रधान देश आहे. या कृषीप्रधान देशाच्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला. या राज्यामध्ये कृषी आणि संलग्न क्षेत्राच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर 1960-1961 मध्ये राज्याचे क्षेत्रवार उत्पन्न 31 टक्के होते पण ते 2011-12 या वर्षात 11 टक्के एवढे खाली आले आहे. उद्योगचा वाटा 23 टक्के होता तो 28 टक्क्यांपर्यंत वाढलेला आहे. सेवा 46 टक्के होते ते 51 टक्क्यांपर्यंत वाढले. यामुळे या राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था काय झाली असेल याची कल्पना करणे कठीण आहे. महाराष्ट्रात 55 टक्के कृषीवर उपजीविका असणारी लोकसंख्या असताना राज्य सरकारचा उत्पन्नाचा हिस्सा फक्त 11 टक्के येतो. आपण फक्त 11 टक्के उत्पन्न 55 टक्के शेतीवर आधारित लोकांच्या कामातून मिळवितो. त्या लोकांना किती सुविधा उपलब्ध करुन देतो व त्यांची कार्यप्रवणता किती टक्क्यांनी वाढली आहे आणि राज्याचे महसुली उत्पन्न वाढले आहे हे अर्थसंकल्पात दिलेल्या आकडेवारीवरुन स्पष्टपणे दिसून येते.

सभापती महोदय, जसे कृषी धन आहे, तसे पशुधन आहे. मी पशुधनाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, पशुधनामध्ये 11 लाखांनी घट झालेली आहे. ग्रामीण भागातून निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या सहाय्याने आपण सत्तेत बसलेला आहात. पशुधनामध्ये 11 लाखाची घट झाली आहे, ही गंभीर गोष्ट आहे, त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कृषी उत्पन्नाचा दर खाली आलेला आहे. या राज्यात विशेष आर्थिक क्षेत्रे निर्माण होतील की नाही याची मला माहिती नाही पण 143 विशेष आर्थिक क्षेत्राच्या माध्यमातून संपूर्ण राज्याचा विकास व्हावा म्हणून

2..



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

1 लाख 987 कोटीच्या गुंतवणुकीची प्रकरणे मान्य केली. विशेषत: नागपूर, अमरावती अशा मागास क्षेत्रात विशेष आर्थिक क्षेत्रे निर्माण करुन त्यांचा विकास व्हावा अशी शासनाची मूळ कल्पना होती. महाराष्ट्राच्या शेजारी असलेले गुजरात आणि इतर राज्यांनी विशेष आर्थिक क्षेत्रे निर्माण करण्याबाबत आघाडी घेतलेली आहे. ज्या भागात विकास नाही, ज्या भागांची प्रगती झालेली नाही, त्या ठिकाणी या राज्यांनी विशेष आर्थिक क्षेत्रे निर्माण करुन विकासात आघाडी घेतली आहे. अशा प्रकारे आपल्या राज्यात सुध्दा विशेष आर्थिक क्षेत्रे निर्माण करण्यासाठी जवळ जवळ 1 लाख 987 कोटी पैकी केवळ 11 हजार 194 कोटी रुपयांची प्रकरणे विदर्भासाठी आलेली आहेत. वास्तविक त्या ठिकाणी विशेष आर्थिक क्षेत्रे निर्माण होतील की नाही हा पुढचा प्रश्न आहे. परंतु यातला मूळ गाभा मात्र कोणालाही दिसून येत नाही. सभापती महोदय, शिक्षण विकासाच्या निर्देशांकाबाबत देखील तशीच परिस्थती आहे. शिक्षणाच्या बाबतीत राज्यात महात्मा फुले यांचे नाव घेतले जाते, सावित्रीबाई फुले यांचे नाव घेतले जाते. शिक्षणाच्या बाबतीत देखील महाराष्ट्राच्या क्रमांक दिवसेंदिवस खाली येत आहे. देशात शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचा 13 वा क्रमांक आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:40

श्री.विनोद तावडे......

महाराष्ट्राने शेतीमध्ये, उद्योगामध्ये प्रगती केली नाही, शिक्षणामध्ये आपले राज्य 13 व्या क्रमांकावर असताना माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांना कौतुक करणारे भाषण करावेसे वाटते याचे मला आश्चर्य वाटते. या राज्यातील 30 टक्के शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालय नसल्यामुळे मुलींचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण वाढत आहे, हे आपल्याला भूषणावह वाटते आणि आपण सरकारचे अभिनंदन करीत आहात याचे मला आश्चर्य वाटते. किमान नैसर्गिक सुविधांची सोय होत नाही म्हणून मुली शालेय शिक्षण सोडतात. सरकारने आकडेवारी जाहीर केली आहे. याबाबत माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांच्यासारख्या चळवळीतील महिलांनी बोलू नये याचे देखील मला आश्चर्य वाटते. सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी सरकारची बाजू जरुर घ्यावी, आम्हीही सत्तेत असताना घेत होतो. परंतु जे सत्य आहे ते बोललेच पाहिजे. या गोष्टीची बोच असेल तर माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी बोलले पाहिजे. माननीय महिला सदस्या गप्प बसतात म्हणून सरकारचे फावते. मला अपेक्षा आहे, माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई या अभ्यासू आहेत. माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी महापालिकेत नगरसेवक म्हणून काम केले आहे. त्यांच्याकडून या गोष्टीवर प्रकाश टाकला जाईल अशी अपेक्षा आहे. माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई बोलतील याची मला खात्री आहे. कारण त्या कोकण प्रांतातील असल्यामुळे जे आहे ते तोंडावर बोलणार अशी त्यांची वृत्ती आहे. त्या बाबत घाबरण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदय, ऊर्जा क्षेत्राबाबत बोलत असताना माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी बांधीलकी कायम ठेवली आहे. सर्व काही केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे करीत आहेत असे त्यांचे म्हणणे असेल तर या राज्याचे ऊर्जा मंत्री काहीही करीत नाहीत असा त्याचा अर्थ होतो. अतिरिक्त वीज केंद्राकडून पुरविली जाते असे त्यांनी सांगितले. आज राज्यात विजेबाबत 5496 मे.वॅट इतकी तूट आहे. त्यामुळे भारनियमन करावे लागत आहे. डे नाईट मॅच खेळविल्या जात असल्यामुळे माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण शासनाचे कौतुक करीत आहेत. परंतु विजेबाबत महाभयानक घोटाळा झालेला आहे. राज्याला पूरक अशी वीज निर्मिती होऊ शकते. माननीय वित्त मंत्र्यांनी 58 कोटी रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प मांडला आहे. अपेक्षा आहे की, पुरवणी मागण्यांमध्ये 2200 कोटी रुपये पेन्शनसाठी घेण्याची वेळ येणार नाही. परंतु जुलै महिन्यात होणाऱ्या अधिवेशनात पुरवणी मागण्या नक्की मांडल्या जातील. हे प्रकार थांबविता येऊ शकतील.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

राज्यातील माफिया राज थांबविले तर हजारो कोटी रुपये राज्याला उत्पन्न मिळू शकते. एक उदाहरण मी देऊ इच्छितो. महागुज नावाची एक कंपनी स्थापन करण्यात आली असून महाराष्ट्राचा वाटा 65 टक्के आणि गुजराथ राज्याचा वाटा 35 टक्के आहे. या महागुज कंपनीसाठी 1 लाख मे.टन कोळसा खाण घेतली. या खाणीतून कोळसा काढायचा म्हणून महाजेनको आणि गुजराथ स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डाने टेंडर मागविले. तीन जणांनी निविदा भरली. टेंडरमध्ये ठरल्याप्रमाणे 1040 रुपये प्रती मे.टन अदानी कंपनीला दिले.

नंतर 2झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .......

अशा प्रकारे ही कंपनी या खाणीतील कोळसा 1040 रुपयाने काढून देणार व त्यातील 65 टक्के कोळसा आपण आणि 35 टक्के कोळसा ती कंपनी वापरणार आहे. तसेच तिथल्याच दुसऱ्या एका खाणीत आपले सरकार आणि तामिळनाडू शासन यांच्यात "महातामिळ" नावाने एक नव्याने ॲग्रीमेंट झालेले आहे. त्या ॲग्रीमेंटप्रमाणे 768 मिलियन मे.टन इतका कोळसा काढण्यासाठी टेंडर काढले गेले. अगोदरचे टेंडर तीन लोकांनी भरले होते पण हे टेंडर मात्र 32 लोकांनी भरले. त्यात एल ॲंड टी कंपनीच्याच एका लॅनको कंपनीचे टेंडर फायनल झाले. त्यानुसार या लॅनको कंपनीने प्रति मे.टन 112 रुपये आपल्या शासनाला द्यायचे आहेत. कारण तो कोळसा काढल्यानंतर त्यातला 80 टक्के कोळसा द्यायचा व 20 टक्के स्वत: घ्यायचा आहे. अशी ही उलटी प्रोसिजर आहे. म्हणजे एकाच खाणीत आपण 1040 रुपये प्रति मे.टन देणार आणि त्याच खाणीतून 112 रुपये प्रति मे.टन आपल्याला मिळणार आहेत. अशा प्रकारे 30 वर्षाचे काम "महागुज" कंपनी 40 एनटीपीए व महाजनकोकडून 24 एनटीपीए आले असते. तसेच 30 वर्षात 75 हजार कोटी रुपये आपण अदाणी कंपनीला देणार आहोत. लॅनको कंपनी मात्र शासनाला प्रति मे.टन 112 रुपये देणार व त्याचा हिशेब केला तर शासनाचे पुढील 30 वर्षात एकूण 89920 कोटीचे नुकसान झालेले आहे, यासंदर्भात माननीय उर्जा मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. या 30 वर्षात अशा प्रकारचे नुकसान होणार असेल आणि ते शासनाच्या लक्षात आले की आपल्याला यातून पैसा मिळू शकतो, मग हे अगोदरचे टेंडर शासन रद्द करणार आहे काय ? की आपल्या अधिकाऱ्यांनी वरपर्यंत पोहचविला म्हणून हे टेंडर मान्य केले, याचेही उत्तर मिळाले पाहिजे. कारण शेवटी जो कोळसा यातून मिळणार आहे तो वापरावयाचा असेल तर 30 हजार कोटीचा ऊर्जा प्रकल्प उभा करुन 7500 कोटीची इक्विटी शासनाला भरावी लागणार आहे. पण इतका पैसा शासनाकडे आहे काय ? कारण यासाठी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केलेली नाही. तशी शक्यता नसताना हा विचार का केला जात आहे याचेही उत्तर देणे आवश्यक आहे. अन्यथा 90 हजार कोटीचा नवीन कोळसा माफिया कोण आहे याचा शोध सभागृहालाच घ्यावा लागेल.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........

महोदय, सिंचन क्षमता वाढविण्यासाठी अर्थसंकल्पात 2011-12 साठी 6300 कोटीची तरतूद केली आहे. या तरतुदीतून 150 प्रकल्प पूर्ण करुन 2 लाख हेक्टरपेक्षा अधिक सिंचन क्षमता आपल्याला निर्माण करावयाची आहे व 60 अब्ज घन फूट एवढा पाणी साठा निर्माण करण्याचे नियोजन शासनाने केले आहे. सन 2008-09 मध्ये 1.50 लाख हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी 6419 कोटीची गुंतवणूक केली होती. म्हणजे त्यावेळेसचा हिशेब केला तर प्रति हेक्टरी 4 लाख 28 हजार 662 रुपये एवढा खर्च आला. मागील वर्षी मात्र याच कामासाठी 7 लाख 2 हजार इतका खर्च आला. हा अनुभव पाहिला आणि यावर्षीची जी तरतूद आहे ती पाहता केवळ 3 लाख 15 हजार रुपये इतकाच प्रति हेक्टरी खर्च अपेक्षित आहे. याचेही स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, पोलिसांना घरे मिळावीत यासाठी आपण सर्वजण आग्रही असतो. या अर्थसंकल्पात पोलिसांच्या घरांसाठी 115.34 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून यामधून पोलिसांसाठी 6000 घरे बांधली जाणार आहेत अशा प्रकारची घोषणा करण्यात आलेली आहे. परंतु सभापती महोदय, पोलिसांच्या घराच्या संदर्भात जी घोषणा केलेली आहे ती अतिशय फसवी आहे. शासनाच्या माहिती नुसार प्रती चौरस मीटरला 17000 रुपये बांधकामास खर्च येत असतो व या दरानुसार 6000 घरे बांधावयाची झाली तर प्रत्येक पोलीस अधिका-याला केवळ 121 चौरस फुटाचेच घर उपलब्ध होणार आहे. आपण पोलिसांना काय बाथरुम एवढे घर देणार आहात ? आपण कशाला जनतेला फसवता ? आपल्यात दानत नाही तर नाही सांगा. आम्हाला बिल्डर लोकांना घराचे काम द्यावयाचे आहे व त्यातून पैसे कमवावयाचे आहे, आम्हाला पोलिसांची काही काळजी नाही असे एकदा सांगून टाका. आपण 6000 घरासाठी लागणारी रक्कम देणार आहात काय ?

सभापती महोदय, या ठिकाणी उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले की, 2011 पर्यंत वर्सोवा, अंधेरी, घाटकोपर पर्यंत मेट्रो रेल्वेचे काम पूर्ण होणार आहे. त्यावेळी सत्ताधारी पक्षाने जोरजोरात बाके वाजवली होती. परंतु दुस-या दिवशी एमएमआरडीएचे चेअरमनन श्री. राहूल अस्थांना यांनी असे सांगितले की, वित्त मंत्र्यांनी जी काही माहिती दिलेली आहे त्यापेक्षा या कामासाठी 8-10 महिने उशिरच होणार आहे. सन 2012 च्या आधी काम होणार नाही. सभापती महोदय, या मेट्रो रेल्वेचे काम 2011 अखेर पूर्ण होऊच शकणार नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, एक आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, कामे होण्यासाठी जी काही तरतूद असते ती वर्षाच्या 9-10 महिन्यापर्यंत काहीच खर्च होत नाही. परंतु वर्षाच्या शेवटच्या दोन तीन महिन्यात त्यापेक्षाही मार्चच्या शेवटी, मार्च महिना संपण्याच्या दोन दिवस अगोदर व काही बॅक डेटेडने खर्च केला जातो. तीन महिन्यात शासनाचा खर्च 47 टक्क्यावरुन 107 टक्क्यावर कसा काय जातो ? निधी कसा कसा खर्च केला जातो यांसदर्भात मी माहितीच्या अधिकाराखाली माहिती

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही.

श्री. विनोद तावडे....

मागवली होती व त्या आधारे मी हे बोलत आहे. सन 2010-11 मध्ये शासनाने दिलेल्या अंदाजपत्रकानुसार 29 विभागांतर्गत मार्च 2011 अखेर 1 लक्ष 45 हजार 212 एवढा खर्च झालेला आहे. खर्चाचे प्रमाण मूळ अंदाजाच्या 160 टक्के आहे. शासनाने केवळ तीन महिन्यात 81,433 कोटी रुपये खर्च करण्याची किमया केलेली आहे. मला माहिती आहे की, बजेट मांडल्यानंतर पावसाळा येतो, ऑगस्ट व सप्टेंबर पर्यंत कामे होत नाही असे होऊ शकते. परंतु जानेवारी नंतरच्या तीन महिन्यात सर्व रक्कमा कशा काय खर्च होतात ? वित्त विभागामध्ये उर्वरित 3 महिन्यात 95 टक्के रक्कम कशी काय खर्च होऊ शकते ? शेवटच्या तीन महिन्यात जी काही रक्कम खर्च होते तिची वास्तविकता सभागृहासमोर येण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी आर्थिक दुर्बलांच्या संदर्भात उल्लेख केला होता. आर्थिक दुर्बलांसाठी सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाकडून योजना राबवल्या जात असतात. परंतु डिसेंबर 2010 अखेर सामाजिक न्याय विभाग 21 टक्के व आदिवासी विभागाचा 23 टक्के खर्च झाला होता अशी माहिती माहितीच्या अधिकाराखाली मला मिळालेली आहे. परंतु नंतरच्या तीन महिन्यात सामाजिक न्याय विभाग114 टक्के व आदिवासी विभागाचा 98 टक्के खर्च झालेला आहे. पेमेंट नंतर झाले, सेटींग नंतर झाले, फिक्सींग नंतर झाले का याची मला माहिती नाही परंतु अशा अनेक योजना आहेत की, या योजनेनुसार त्या योजनेतील घटकांना त्या त्या महिन्यात पैसे मिळणे आवश्यक असते. परंतु` पैसे दिले जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे .....

तरीही तुम्ही शासनाचे नेहमी कौतुक करीत असता.अर्थात तुम्हाला नेहमी शासनाचे कौतुकच केले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री राम पंडागळे यांचे मला खरोखर कौतुक वाटते जे काही खरे असेल तेवढेच ते बोलतात.

सभापती महोदय, या अर्थ संकल्पावरील भाषणाच्या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे. जादुची कांडी फिरवल्याप्रमाणे शेवटच्या तीन महिन्यात प्रत्येक विभागात मोठया प्रमाणावर खर्च केला जातो. 21 टक्क्यावरुन 103 टक्के शेवटच्या तीन महिन्यात पैसे खर्च होत असतात काही वेळा तर शेवटच्या दोन दिवसात तर त्याही पेक्षा जास्त पैसे खर्च होत असतात तेव्हा खरोखर काय घडत आहे हे जनतेला समजले पाहिजे. मार्च महिन्याच्या शेवटच्या 48 तासामध्ये 40 टक्के पैसे खर्च करण्याची एफिशिअन्सी आहे. परंतु अगोदरच्या नऊ दहा महिन्यामध्ये हे पैसे का खर्च होऊ शकत नाही ? अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने या संबंधीची माहिती जर जनतेसमोर आली तर बरे होईल. हे अर्थसंकल्पावरील भाषण आहे की माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची पुनरावृत्ती आहे हेच कळत नाही.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही योजनेसाठी ठोस तरतुदीचा उल्लेख करण्यात आलेला नाही. फक्त काही तरी तरतूद आहे, काही तरी मनामध्ये आहे, काही तरी विचार आहे , काही तरी करणार आहोत एवढाच उल्लेख त्यामध्ये करण्यात आला आहे निश्चित कोणती योजना राबविण्यात येणार आहे, त्यासाठी किती तरतूद करण्यात आली आहे ,ती योजना कशी राबविण्यात येणार आहे यासंबंधी मात्र काहीही सांगण्यात आलेले नाही. फक्त योजना प्रस्तावित करतो एवढाच उल्लेख भाषणात करण्यात आला आहे. मी हा प्रस्ताव कॅबिनेटकडे पाठवतो असे मध्यंतरी माननीय मंत्र्यांनीच सांगितले होते.. वास्तविक माननीय मंत्र्यांनी तसे म्हणावयाचे नसते त्याला विरोध केल्यानंतर ते वाक्य त्यांनी मागे घेतले होते. या अर्थसंकल्पामध्ये अमुक योजना प्रस्तावित करतो असे म्हटलेले आहे त्या ऐवजी ठोस काय देण्यात येणार आहे याचा उल्लेख करावयास पाहिजे होता.

सभापती महोदय, महागुज कंपनीमधील कोळसा माफियासबंधी मी मघाशी उल्लेख केला होता. तो भ्रष्टाचार थांबविला आणि राज्यातील सर्व माफिया राज आटोक्यात आणले तर

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ....

राज्यावरील सर्व कर्ज फिटले जावू शकेल. म्हणून शासन त्याला आळा घालणार आहे काय याचे उत्तर माननीय वित्त मंत्र्यांनी द्यावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

**उप सभापती** : सभागृहाच्या परवानगीने आता विनियोजन विधेयक घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : विनियोजन (लेखानुदान) विधेयक

L.A. BILL NO. XII OF 2011.

(A BILL TO PROVIDE FOR THE WITHDRAWAL OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF A PART OF THE FINANCIAL YEAR 2011-2012.)

श्री.राजेंद्र मुळक ( वित्त राज्य मंत्री ) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 12 - राज्याच्या एकत्रित निधीतून 2011-2012 या वित्तीय वर्षाच्या काही भागातील कामांकरिता विवक्षित रक्कमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

( खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही )

**उप सभापती** : ज्या अर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्या अर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधान सभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी. : सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा
"चर्चा पुढे चालू"

Shri Manish Jain (Local Self Government, Jalgaon) : Hon'ble Deputy Chairman Sir, I would like to congratulate Hon'ble Deputy Chief Minister of Maharashtra State, Shri Ajit Pawar and also my friend, Shri Rajendra Mulak, Minister of State for Finance for presenting this maiden Budget in this House. This is the first Budget of Hon'ble Shri Ajit Pawar and my friend Shri Rajendra Mulak. This is the first time, I am speaking on general Budget in this august House. I would like to point out that..........

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, नव निर्वाचित माननीय सदस्य इंग्रजी भाषेमध्ये बोलत आहेत, तो त्यांचा अधिकार आहे मी त्यांचे भाषण थांबवू शकत नाही. परंतु मला समोरच्या बाजूकडील माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, आपल्या आईचा आपल्याला अभिमान वाटत नाही, या विधीमंडळामध्ये आलेल्या प्रत्येक सदस्यांना मराठीमध्ये बोलावेसे वाटत नाही, या बद्दल आपल्याला शरम वाटली पाहिजे. मी मराठीचा ठेका घेतलेला आहे, मी तसे जाहीर केले आहे. परंतु आपल्याला त्या बद्दल अभिमान कां वाटत नाही ? आपल्या माना शरमेने खाली गेल्या पाहिजेत.

श्री. मनीष जैन : सभापती महोदय, मी मराठीमध्ये बोलण्याचा प्रयत्न करतो. माननीय अर्थ मंत्र्यांनी या सभागृहामध्ये शिलकीचा अर्थसंकल्प मांडल्याबद्दल मी प्रथम त्यांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्र ही संत महात्म्यांची, महापुरुषांची आणि थोर योध्दयांची भूमी आहे. या राज्यामध्ये मोठे मोठे व्यापारी, प्रगतिशील उद्योजक आणि मेहनत करणारे शेतकरी सुध्दा रहात आहेत. भारतातील 70 टक्के लोकांचा शेती हा व्यवसाय आहे. या शेती प्रधान देशातील शेतीला उद्योगाचा दर्जा दिला पाहिजे. या राज्य शासनाने शेती व्यवसायामध्ये नवीन तंत्रज्ञान, नवीन यंत्र सामग्री, वैज्ञानिक पध्दतीने शेती करण्यासाठी विशेष प्राध्यान्य दिले पाहिजे. शेतीसाठी सर्व प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर देऊन शेती हा उद्योग आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

......2....



श्री. मनीष जैन...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये कापूस उत्पादनावर तसेच कापसाच्या प्रक्रियेवर विशेष लक्ष देऊन नियोजन केले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आपल्या भाषणामध्ये कापूस उत्पादन होणाऱ्या क्षेत्राकरिता चांगल्या प्रकारची तरतूद केली आहे. मी त्या जळगाव जिल्ह्याचे आणि खानदेशाचे प्रतिनिधीत्व करतो त्या जिल्ह्यामध्ये महाराष्ट्रातील एकूण कापसाच्या 28 टक्के उत्पादन होते. जळगाव, धुळे आणि नंदूरबार या जिल्ह्यांमध्ये कापसाचे भरपूर उत्पादन होते. परंतु या उद्योगामध्ये सबसिडी, बेनिफिट किंवा इन्सेन्टिव्ह यापैकी काहीही देण्यात आलेले नाही. याचा आपण विचार केला तर आज मध्ये प्रदेश, गुजरात आणि आंध्र प्रदेशामधील व्यापारी लोक या भागामध्ये येतात, 15 ते 35 हजार रुपये ट्रकचे भाडे भरतात आणि येथील कापूस 25 रुपयांनी विकत घेऊन आपल्या राज्यात जाऊन तो 250 रुपयांना विकून आपली कमाई करतात त्यामुळे त्या भागामध्ये हजारो लोकांना नोकऱ्या मिळतात, परंतु आपल्या राज्यात किंवा कॉटन ग्रोव्हिंग एरीयामध्ये लोकांना रोजगार मिळू शकत नाही. त्यामुळे या व्यवसायामध्ये लोकांना जास्तीत जास्त रोजगार कसा मिळेल याकडे आपण लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, माझ्या जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्यामध्ये केळी निर्यात केंद्र उभे करण्याचे आपण नियोजन केले आहे. व त्यासाठी चांगल्या प्रकारे निधीची तरतूद आपण करणार असल्याचे मला समजले त्याबद्दल मी आपले अभार मानतो. मला वाटते की, जळगाव जिल्हा हा केळीसाठी जगप्रसिध्द आहे. भारताच्या एकूण उत्पादनापैकी 22 टक्के केळी जळगाव जिल्ह्यामध्ये उत्पादित होतात. आज गुरुवार असून अनेक लोकांचा उपवासाचा दिवस आहे. उपवासाच्या दिवशी अनेक लोक केळी खातात. परंतु आपण केळीला फळाचा नाही तर भाजीचा दर्जा दिला आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री मनीष जैन . . . .

माननीय सदस्य पाशा जी आप सुबह यहां पर कांदे के बारे में बोल रहे थे. लेकिन पूरे भारत में जितना केला पैदा होता है उसका 22 प्रतिशत उत्पादन सिर्फ जलगांव जिले में ही होता है.

सभापति महोदय, आज गुरुवार का दिन है. माननीय सदस्य श्री जमा साहब को मैं कहना चाहूंगा कि आज के दिन बहुत से लोग उपवास रखते हैं उपवास के दिन हम केले का फलहार करते हैं. उपवास के दिन हम फल के रुप में केला खाते हैं. केले को हम सब्जी नहीं, बल्कि फल मानते हैं. छोटे बच्चों को के.जी. की क्लास में सिखाया जाता है कि बनाना इज ए फ्रुट. वहां पर सिखाया जाता है कि ए फॉर एप्पल एण्ड बी फॉर बनाना, पण सभापती महोदय, या शासनाने केळ्याला अजून फळांचा दर्जा दिलेला नाही. माझी या शासनाला विनंती आहे की, आपण निर्यातीबाबत विचार करीत असताना केळ्याच्या बाबतीत देखील विचार केला पाहिजे. केळी हे एक फळच आहे. आपण बालवाडीमध्ये, ज्युनिअर के.जी.मध्ये शिकतो की, हे फळ आहे. परंतु अजून त्याला फळांचा दर्जा दिलेला नाही.

श्री.सय्यद पाशा पटेल (खाली बसून) : बालवाडीतील मुलांना कळते, पण शासनाला कळत नाही.

श्री मनीष जैन : सन्माननीय सदस्य श्री.पाशाभाई पटेल, आप मेरा साथ दीजिए. हम सब धार्मिक हैं, उपवास करते हैं. केले को उपवास का फल मानते हैं. लेकिन फल का दर्जा हम केले को नहीं देते हैं. सभापति महोदय, मैं आपसे निवेदन करुंगा कि आप मंत्री महोदय को कहें कि वह केले को फल का दर्जा दें.

माननीय मंत्री महोदयांनी पेयजल म्हणजे ज्याला आपण सॉफ्ट ड्रिंक म्हणतो त्याच्यावरील टॅक्स वाढविलेला आहे. कारण त्यांना टॅक्सची गरज आहे आणि तो टॅक्स लोक भरतात. कारण लोकांना सॉफ्ट ड्रिंक पिण्याची सवय आहे. त्यामुळे शासनाने टॅक्स वाढविलेला आहे आणि लोक टॅक्स भरु शकतात. मला माननीय मंत्री महोदयांना टॅक्स वाढविण्याच्या बाबतीत एक सूचना करावयाची आहे. आपण पोल्युशनबाबत बोलतो, ग्लोबल वॉर्मिंगबद्दल बोलतो. त्यामध्ये प्लास्टीक हा एक मोठा घटक आहे.पण सॉफ्ट ड्रिंकवरील टॅक्स वाढविला आहे पण माझी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती आहे की,आज बहुतेक प्रत्येक माणूस 12 किंवा 15 रुपयांना मिनरल वॉटर खरेदी करतो. आपण त्याच्यावर दोन-तीन किंवा पाच किंवा अठरा-वीस रुपये टॅक्स लावला तरी लोक खरेदी करु शकतात. यातून सरकारचाही फायदा होईल आणि ग्लोबल वॉर्मिंगचे प्रमाण कमी झाले तर त्याचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री मनीष जैन....

उपयोग होईल.

सभापति महोदय, महाराष्ट्र का पुलिस डिपार्टमेंट बहुत ही अग्रणीय है और हर आदमी इस विभाग की प्रशंसा करता है आणि आपल्याला त्याचा अभिमान पण आहे. Maharashtra Police, Mumbai Police is like New York Police and everyone appreciates it. लेकिन मैं बताना चाहता हूं कि पुलिस को पगार देने के मामले में हमारा राज्य छठे नंबर पर है. उस बारे में इस बजट में कहीं पर ध्यान नहीं दिया गया है. हम अपने महाराष्ट्र राज्य को महा-राष्ट्र कहते हैं लेकिन जहां तक पुलिस को पगार देने की बात आती है, उस बारे में हमारा राज्य छठे नंबर पर आता है. इसका मतलब यह हुआ कि दूसरे 5 राज्य पुलिस को पगार देने के बारे में हमसे आगे हैं. इसलिए हम अपने आपको अग्रणीय कैसे कह सकते हैं? मेरी विनती है कि आप इस बारे में ध्यान दें. A provision of Rs. 55 Crores 70 lakhs has been made for Arms & ammunition and for development of instruments for the police department. माननीय सदस्य श्री विनोद तावडे जी ने भी कहा और भाऊ साहब ने भी पुलिस को घर देने की बात कही. आपने यहां पर 6 हजार घर बनाने की तरतूद भी की है लेकिन उनके बच्चों के स्कूल और कालेजों के बारे में यहां पर कोई प्रावधान नहीं किया गया है. उनके होस्टल के लिए भी कोई व्यवस्था नहीं है. क्या पुलिस कर्मचारियों के बच्चों को इंजीनियरिंग या मेडिकल की पढ़ाई करने की जरुरत नहीं है? इस बारे में भी सरकार को ध्यान देना चाहिए.

एक विशेष बात मैं यहां पर यह कहना चाहूंगा कि एक विषय ऐसा है जो कि सत्ताधारी पक्ष, विपक्ष और हम जैसे इंडिपेंडेंट आमदारों से भी संबंधित है. यह बात सही है कि यह विषय बहुत गंभीर नहीं है. लेकिन सभी माननीय सदस्यों के इंटरेस्ट का यह विषय है. मैं बताना चाहूंगा कि हमारा जो आमदार फंड है, वह केवल डेढ़ करोड़ रुपए का है. यह रकम भी अभी बढ़ायी गयी है. आमदार फंड के रुप में आमदारों को विकास कार्य के लिए दी जाने वाली यह रकम बहुत ही कम है.

....3

अग्रशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री मनीष जैन....

हम सभी जानते है कि केंद्रीय वित्त मंत्री श्री प्रणव मुखर्जी साहब ने माननीय सांसदों का यह फंड 2 करोड़ रुपए से बढ़ाकर सीधा 5 करोड़ रुपए कर दिया है. सरकार से मेरी गुजारिश है कि हमारा आमदार फंड भी 5 करोड़ रुपए से कम नहीं होना चाहिए. माननीय सदस्य श्री रावते जी से मेरी गुजारिश रहेगी कि यह मुद्दा उनके द्वारा हाऊस में जोरदार तरीके से उठाया जाना चाहिए ताकि हमारे राज्य का विकास हो सके. मैं कहना चाहूंगा कि आमदार फंड का 20 परसेंट पैसा तो कलेक्टर, जिला परिषद तथा दूसरे कामों पर ही खर्च हो जाता है. इसलिए आमदार फंड 5 करोड़ किया तो आमदार को विकास कामों पर अपनी मर्जी से खर्च करने के लिए तो सिर्फ 4 करोड़ रुपए ही मिल पाएंगे.जबकि स्थिति यह है कि विधान परिषद के माननीय आमदारों को तो पूरा जिला ही नहीं बल्कि पूरा महाराष्ट्र संभालना पड़ता है. मुंबई महानगरपालिकेतील जे नगरसेवक आहेत, त्यांना काही हजार लोकांच्याकरिता वापरण्यासाठी दोन कोटी रुपयांचे बजेट आहे. आम्हाला आमच्या भागातील लाखो लोकांना सांभाळावे लागते परंतु त्यासाठी असलेले जे बजेट आहे ते कमी असून आपण त्याबाबत लक्ष दिले पाहिजे आणि आमदार फंडाची दोन कोटीची रक्कम 5 कोटी करावयास पाहिजे, अशी माझी माननीय वित्त मंत्र्यांना कळकळीची विनंती आहे.....

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री मनीष जैन .

हमारे जो कारपोरेटर मुंबई म्युनिसिपल कारपोरेशन में हैं त्यांना काही हजार लोकांसाठी वापरायला दो कोटी रुपयांचा बजट आहे आणि आम्हाला इथे लाखो लोकांना सांभाळावा लागते त्यासाठी पण आम्हाला फक्त दो कोटी रुपए आमदार फंड आहे. दोन कोटीचा हा आमदार फंड 5 कोटी रुपए करावयास पाहिजे अशी माझी विनंती आहे. माननीय वित्त मंत्री महोदय आमदार फंड यदि 5 करोड़ रुपए कर देंगे तो माननीय अजितदादा पवार और वित्त राज्य मंत्री श्री मुळक को कोई भी आमदार जिंदगी भर नहीं भूलेगा. उनका नाम राज्य के इतिहास में सुनहरे अक्षरों में लिखा जाएगा.

मैं यहां पर बताना चाहूंगा कि मेरा संबंध सोना और चांदी व्यापार से है. हमारे बजट में व्यापारियों के बारे में कुछ खास प्रावधान नहीं किया गया है. लेकिन उद्योग के बारे में हमारे एक माननीय सदस्य ने यहां पर कहा कि 4 सौ करोड़ रुपए का प्रावधान किया गया है. हमारी सारी इंडस्ट्री गुजरात में जा रही है और यदि हम सिर्फ 4 सौ करोड़ रुपए ही देंगे तो फिर हमारे यहां पर उद्योग कैसे आयेंगे ? यदि हम चाहते हैं कि यहां का विकास हो और हमारा महाराष्ट्र राज्य और उन्नति करे तो हमारा कहना है कि यह बजट और बढ़ाया जाना चाहिए.

मैं कहना चाहूंगा कि मुंबई में सोने-चांदी का व्यापार बड़े पैमाने पर होता है. डायमंड गोल्ड और सिल्वर का जितना व्यापार पूरे देश में होता है उसका लगभग 50-60 परसेंट व्यापार सिर्फ महाराष्ट्र में होता है और महाराष्ट्र का पूरा व्यापार मुंबई से कंट्रोल किया जाता है. यहां पर मेन्युफॅक्चरिंग हब भी अच्छा है. यहां पर ट्रेडिंग फॅसिलिटी अच्छी है. इस उद्योग से सरकार को कर के रुप में बहुत ज्यादा पैसा मिलता है. मेरा कहना है कि आप इस व्यवसाय पर ध्यान दें तो सरकार को बहुत फायदा होगा. ज्वेलरी हमारी शान है. पूरे विश्व में यदि आप 10 डायमंड देखें तो उन 10 डायमंड़ में से 9 डायमंड इंडिया के पाये जाते हैं और मुंबई में 9 डायमंड में से 8 डायमंड एक्सपोर्ट हो जाते हैं. इस व्यवसाय में मुंबई का नाम बहुत बड़ा है. गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रिकार्ड में मुंबई का नाम दर्ज किया गया है. मेरा कहना है कि इस व्यवसाय को इंडस्ट्री के रुप में ट्रीट किया जाये और इस पर ध्यान देकर इस बात की कोशिश

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री मनीष जैन...

की जाये कि पूरे देश का सोने चांदी का जो 60 परसेंट व्यापार आज हमारे राज्य में होता है वह बढ़कर 70 परसेंट तक हो जाये.

सभापति महोदय, एक और विषय पर बोलकर मैं अपना भाषण समाप्त करना चाहूंगा. मैं कहना चाहूंगा कि इस सरप्लस बजट के लिए मैंने यहां पर माननीय उप मुख्यमंत्री महोदय का अभिनन्दन किया है. मैं कहना चाहूंगा कि सरकार ने बहुत सारे बोर्ड यहां पर बनाए हैं. सरकार ने कोंकण विकास महामंडल बनाया, मराठवाडा विकास महामंडल बनाया, विदर्भ विकास महामंडल बनाया,पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडल बनाया, इसके अलावा हमारे यहां पर एमएमआरडीए है. इस पर भी हम सबको गर्व है. लेकिन खानदेश क्षेत्र की ओर सरकार का ध्यान बिल्कुल नहीं है. मेरी मांग है कि खानदेश के विकास के लिए एक नार्थ महाराष्ट्र विकास महामंडल बनाया जाना चाहिए और इस महामंडल की घोषणा यह बजट अधिवेशन समाप्त होने से पहले सदन में की जानी चाहिए. उस महामंडल के लिए एक अच्छे फंड का प्रावधान इस बजट में किया जाना चाहिए. यहां पर हमारे माननीय सदस्य श्री गावित साहब बैठे हैं जो नंदुरबार से आते हैं, वरिष्ठ माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी जी भी यहां पर बैठे हुए हैं. मैं भी यहां पर जलगांव जिले का प्रतिनिधित्व करता हूं. मैं यहां पर सभी माननीय सदस्यों से विनती करुंगा कि वे इस बोर्ड की डिमांड जोरदार तरीके से सदन में करें. मैं पूछना चाहता हूं कि हमारे साथ सौतेला व्यवहार क्यों किया जाता है, हमारे खानदेश क्षेत्र में विकास के काम क्यों नहीं किए जाते हैं, हमारे यहां पर ब्रिज क्यों नहीं बनाए जाते ? जिस क्षेत्र में सिर्फ 2-3 लाख लोग ही रहते हैं वहां पर ओवर ब्रिज बन जाता है, वहां पर ऑडिटोरियम बन जाता है लेकिन हमारे जलगांव में बहुत बड़ी आबादी होने के बाद भी विकास के कार्य क्यों नहीं किए जाते हैं ? हमारे यहां पर ब्रिज नहीं बनाए जाते हैं, जबकि हम सरकार को ज्यादा टैक्स देते हैं फिर भी आपका ध्यान हमारी तरफ क्यों नहीं जाता है, यह बात मेरी समझ में नहीं आती है. हमारे यहां पर इरीगेशन तथा इन्फ्रास्ट्रक्चर के अनेक प्रोजेक्ट काफी दिनों से अधूरे पड़े हुए हैं, मेरी मांग है कि उनको

...3

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री मनीष जैन.....

जल्द से जल्द पूरा किया जाना चाहिए. उदाहरण के तौर पर हमारे यहां पर आइ.टी. प्रोजेक्ट हैं, तापीखोरा का जो प्रोजेक्ट नाथा भाऊ ने उनकी सरकार के समय शुरु किया था वह प्रोजेक्ट भी अभी तक अधूरा पड़ा हुआ है. इसलिए मेरा कहना है कि सरकार द्वारा इन कामों के लिए ज्यादा बजट दिया जाना चाहिए ताकि अधूरे पड़े हुए ये प्रोजेक्ट जल्द से जल्द पूरे किए जा सकें.

मैं यहां पर एक बात कहना चाहूंगा कि शेर की पार्टी ने मुझे बहुत सपोर्ट किया है. इसीलिए मैं यहां पर चुनकर आया हूं. कल माननीय सदस्य श्री टकले साहब ने यहां पर एक शेर सुनाया था. मैं भी यहां पर एक शेर सुनाकर अपना भाषण समाप्त करना चाहूंगा.

दूध में चावल मिलाओ तो उसे खीर कहते हैं
और इस बजट में उत्तर महाराष्ट्र को यदि
न्याय मिले जाए तो उसे तकदीर कहते हैं.

सभापति महोदय, आपने मुझे बोलने का मौका दिया, इसके लिए आपके प्रति आभार प्रकट करते हुए मैं अपना भाषण यहीं पर समाप्त करता हूं. धन्यवाद.

-0-

...3 डी - 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर बोलत असताना राज्याचे माननीय वित्त मंत्री श्री. अजितदादा पवार तसेच माननीय वित्त राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी जो शिलकीचा अर्थसंकल्प सादर केला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. हे अभिनंदन करीत असताना काही गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी करणे क्रमप्राप्त आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, मुंबई शहराच्या बाबतीत ज्या गोष्टी यामध्ये हायलाईट केलेल्या आहेत त्याकडे मी जनरल गोष्टी म्हणून पाहीन. कारण सी.सी.कॅमेरे असतील, पोलिसांसाठी घरे बांधण्याची बाब असेल हे करणे क्रमप्राप्त आणि गरजेचे आहे असे मी मानते. तंत्रज्ञान विकासासाठी 40 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तंत्रज्ञान विकास कोठे करणार, काय करणार याचे डिटेल्स दिलेले नाहीत. मुंबई शहर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर आहे. या शहरामध्ये पंधरा वर्षापासून म्हणजे 1991-92 पासून बांधकामाचे सत्र सुरु झाले आहे. बांधकामे झाली पाहिजेत याबद्दल विरोध नाही. परंतु हे करीत असताना त्या ठिकाणी पायाभूत सुविधा देण्यासाठी मुंबई महानगरपालिका असेल, नगरविकास विभाग असेल किंवा शासन असेल त्यांनी कोणतीही तरतूद केल्याचे दिसत नाही. यासाठी शासन तरतूद करणार आहे की नाही, हा एक चिंतेचा विषय आहे. दोन महिन्यांपूर्वी वांद्रे येथे एका मोठ्या इमारतीला आग लागली. ती आग विझविण्यासाठी आमच्याकडे त्या ताकदीची सोय नाही. मुंबईमध्ये सगळीकडे अनेक मजल्यांचे स्काय स्क्रॅपर्स उभे राहात आहेत. परंतु त्यासाठी पुढचे जे दायित्व आहे ते पूर्ण करण्यासाठी या अर्थसंकल्पात काहीही दिग्दर्शन झालेले नाही. जशी फायर ब्रिगेडची व्यवस्था पाहिजे त्याप्रमाणेच पाण्याची काय व्यवस्था करणार याचे दिग्दर्शन मुंबई शहराच्या दृष्टीने झालेले नाही. या संदर्भात शासनाने रोडमॅप तयार करावा अशी मी मुंबई शहराच्या वतीने विनंती करते.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने काही वस्तू करमुक्त केल्या त्या बद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. स्वयंपाकाचा गॅस आणि महिला यांचे अतूट नाते आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी कितीही विनोदाने म्हटले तरी कोणत्याही स्त्रीला कधी तरी स्वयंपाक घरामध्ये जरुर जावे लागते. शासनाने स्वयंपाकाचा गॅस, गहू,तांदूळ, डाळी, काजू या वस्तू

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती अलका देसाई ....

करमुक्त केलेल्या आहेत त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. बेदाणा, अगरबत्ती, सोलापुरी चादर याचा त्यामध्ये समावेश आहे. शासनाने दारुवर जास्त कर लावला आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. कारण दारुबंदी व्हावी, दारुचे कारखाने निघू नयेत यासाठी आंदोलने करणाऱ्यांपैकी मी एक आहे. हा एक अतिशय चांगला निर्णय आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या संदर्भात आणखी एक गोष्ट शासनाच्या निदर्शनास आणून मी माझे भाषण संपविणार आहे. कोकणाला जे बजेट दिलेले आहे त्यामध्ये 4 जिल्ह्यांसाठी साधारणत: 60 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे चार जिल्हे कोकणामध्ये मोडतात. म्हणजे प्रत्येक जिल्ह्याला फक्त 15-15 कोटी रुपये मिळालेले आहेत. हे बजेट आपल्याला पुरणार आहे का ? देशातील एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्हा घोषित करण्यात आलेला आहे, असे आपण आवर्जून सांगतो.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ 16:20

श्रीमती अलका देसाई...

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी करण्यात आलेल्या 15 कोटीच्या तरतुदीकडे मी शासनाचे लक्ष वेधित असताना सांगू इच्छिते की, आमच्या कालावली खाडीपासून पुढे रस्ता होण्यासाठी माझ्या सारखी कटकटी बाई गेल्या तीन वर्षापासून सातत्त्याने प्रयत्न करीत आहे. परंतु अद्यापर्यंत तो रस्ता झालेला नाही. समुद्रावर पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी जाणा-या पर्यटकांच्या सोयीसाठी हा रस्ता होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून या रस्त्यासाठी तरतूद करण्यात यावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये स्त्रियांच्या प्रश्नाबाबत माझ्या सहकारी भगिनी सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी काही महत्वाचे मुद्दे मांडलेले आहेत. या निमित्ताने मी सांगू इच्छिते की, भारत हा पुरुषप्रधान संस्कृतीचा देश आहे. त्यामुळे स्त्रियांच्या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टीकोन काहीसा वेगळा आहे...

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. महाराष्ट्र राज्य हे पुरुषप्रधान संस्कृतीचे नाही. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षण असावे असा आग्रह धरलेला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी आपले शब्द मागे घ्यावेत असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : पुरुषप्रधान संस्कृती आणि महिलांसाठी द्यावयाचे 50 टक्के आरक्षण या दोन भिन्न गोष्टी आहेत. देशात आणि राज्यात पुरुषप्रधान संस्कृती आहे म्हणून पुरुषांचे घरामध्ये वर्चस्व चालते आणि महिलांना दुय्यम स्थान मिळते.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी उपस्थित केलेला मुद्दा आपण गांभीर्याने घेऊ नये.

श्रीमती अलका देसाई : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी या ठिकाणी विचार मांडत असताना असे सांगितले की, शाळेतील 30 टक्के मुली ह्या त्यांच्यासाठी स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे शाळा सोडून जातात. ही परिस्थिती आपल्या शासनाला आणि शिक्षण महर्षी म्हणवून घेणा-यांना नक्कीच भूषणावह नाही. मुलींनी शिकावे यासाठी त्यांना सर्व त-हेच्या सोयीसुविधा दिल्या पाहिजेत. आपण नेहमी सावित्रीबाई फुलेंचे नाव घेतो. स्त्री शिक्षणासाठी त्यानी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

केलेले कार्य आपल्याला सतत प्रेरणादायी ठरले पाहिजे. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितल्या प्रमाणे शाळांमध्ये मुलींसाठी वेगळया प्रसाधनगृहांची सोय नसेल तर ती सोय ताबडतोबीने करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावी आणि शिक्षण घेणा-या मुलींना, महिलांना न्याय मिळावा अशी मागणी करते. सभापती महोदय, महाराष्ट्राच्या सत्तेवर आमच्या समोरच्या विरोधी पक्षाला देखील बसण्याची संधी प्राप्त झाली होती. जेव्हा शिवसेना-भाजप युती सत्तेवर होती त्यावेळी त्यांनी मुलींसाठी काय केले ? मला त्यांना हे सांगावयाचे आहे की, आपण जेव्हा एक बोट दुसरीकडे दाखवून काही सांगत असतो त्यावेळी तीन बोटे आपल्यालाही काही तरी सांगत असतात. म्हणून पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून विरोधासाठी विरोध न करता चांगल्या कार्यासाठी आपण पुढे येऊया एवढेच मी या निमित्ताने सांगते आणि माझे भाषण संपविते.

----

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या राज्यात अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. काल मोहाली येथे भारत-पाकिस्तानची क्रिकेट मॅच होती. देशात ज्यांना ज्यांना क्रिकेट कळते ते सगळे लोक मॅंच बघण्यासाठी टी.व्ही.समोर बसले होते. राज्यातील बजेटवरील चर्चा सभागृहात सुरु असते, त्यावेळी राज्यातील सगळया शेतकऱ्यांनी टी.व्ही.समोर बसून आपल्याला काय मिळणार आहे आणि माझ्या व्यवसायास काय मिळणार आहे याची माहिती घेतली पाहिजे.

सभापती महोदय, कृषी विभागाच्या बाबतीत कर्नाटक सरकारने स्वतंत्र बजेट तयार केलेले आहे. त्याची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. त्या बजेटमध्ये शेतकऱ्यांनी काय केले पाहिजे, शेतकऱ्यांना कोणकोणत्या सोयी-सुविधा देण्यात आल्या आहेत, या बाबतचा उल्लेख करण्यात आलेला आहे. काय केले तर आपण जगणार आहोत, या सर्व गोष्टींचा कर्नाटकातील शेतकऱ्यांना आरसा दिसला. देशातील शेतीचे नेतृत्व महाराष्ट्राकडे आहे. राज्य शासनाने पुढच्या वेळी कर्नाटक राज्यासारखे कृषी विषयाच्या बाबतीत स्वतंत्र बजेट करावे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, शासनाच्या अर्थसंकल्पीय भाषणातील पहिल्याच वाक्यात असा उल्लेख करण्यात आला आहे की, राज्यात कृषी आणि उद्योगाची उन्नती व्हावी. कृषी आणि उद्योगाची उन्नती झाल्याशिवाय महाराष्ट्राची उन्नती होणार नाही. मी सहज "महाराष्ट्राची आर्थिक पाहणी"चे पुस्तक पाहिले. कृषी आणि उद्योगाला सरकारने अतिशय गांभीर्याने घेतले आहे, तर त्यासाठी किती तरतूद ठेवली आहे याची देखील मी माहिती घेतली. शासनाने उद्योगासाठी 0.06 एवढी तरतूद ठेवली आहे. आपण कशाला मोठ मोठे शब्द भाषणात वापरता हे मला कळत नाही. राज्यातील लोकांची निव्वळ धूळफेक करण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होत आहे. या शासनाने कृषीसाठी 6.04 आणि उद्योगाला 0.06 तरतूद केली आहे. याचा अर्थ या शासनाला कृषी आणि उद्योग या विभागास सोडून इतर विभागाचा विकास करावयाचा आहे. ही अतिशय खेदाची गोष्ट आहे असे मला आवर्जून नमूद करावेसे वाटते. सभापती महोदय, या ठिकाणी मी गंभीर गोष्ट सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पीय भाषणाच्या पहिली ओळ वाचल्यानंतर शासनाचा निषेध करावासा वाटतो. महाराष्ट्र हे खेडयांचे राज्य आहे. राज्यातील खेडे जगवावयाचे असतील तर

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा...

त्यासाठी मोठया प्रमाणात तरतुद शासनाने केली पाहिजे होती. खेडे जगल्याशिवाय तुम्ही आम्ही जगू शकत नाही. खेडयांची उपेक्षा करणार असाल तर या बजेटला काय अर्थ आहे, अर्थसंकल्पीय भाषणात तुम्ही खोटे खोटे शब्द का वापरता आहात ?

सभापती महोदय, शेती क्षेत्राचे महत्व अनन्य साधारण आहे असे शासनाकडून वारंवार सांगितले जात आहे. शेतीच्या बाबतीत तुम्ही काय काय केले ? या वर्षी शेतीसाठी एक चांगली गोष्ट दूरदर्शनवर दिसली. दूरदर्शनच्या चित्राखाली एक पट्टी येवू लागली आहे की, मालदांडी ज्वारीचा भाव 3 हजार रुपये क्विंटल असा आहे. महाराष्ट्रात सगळयांत आनंदी कोण असेल तर ज्वारी पेरणारा शेतकरी. त्याच्या ज्वारीला 3 हजार रुपये क्विंटल असा भाव मिळतो आहे म्हणून तो खुश आहे. ते काही तुमच्या पुण्याईने नाही. शेतकऱ्यांनी ज्वारी पेरली आहे म्हणून ते आनंदी आहे. जास्त शेतकऱ्यांनी ज्वारीची पेरणी केली असती तर तुम्ही त्या शेतकऱ्यांची जिरवली असती. शेतक-यांच्या समस्या सोडविण्याचे काम सरकारचे आहे. सरकार समस्या क्या सुलझाऐगी, सरकार ही हमारी समस्या हैं. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या काय आहेत ? शासनच एक मोठी शेतकऱ्यांची समस्या झालेली आहे. शासनाने बजेट मांडला आहे, त्या बजेटच्या बाबतीत मी अतिशय गंभीर विचार केला. राज्यातील लोकांकडून गोळा करावयाचे आणि आपल्या मनाला पटेल त्याला पैसे वाटावयाचे. ज्या टग्यांना सांभाळावयाचे आहे, त्यांनाच पैसे उपलब्ध करुन द्यावयाचे आणि गोरगरिबांस वाऱ्यावर सोडायचे. शासनास राज्यातील शेतकऱ्यांना न्याय द्यावयाचा असेल तर त्यांच्यासाठी भरीव तरतूद करावयास पाहिजे होती. महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलन केले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी लातूर येथे आंदोलन केले ही बाब मी समजू शकतो. सांगली येथे आंदोलन केले ही बाब देखील मी समजू शकतो. मला एका गोष्टीचे वाईट वाटते की, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन बारामती येथे झाले. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांच्या घरासमोर 500 शेतकऱ्यांनी आंदोलन केले. या आंदोलनाच्या बाबतीत सगळयांना चिंता वाटू लागली की, ऊस उत्पादक शेतकरी खूप टोचून बोलू लागले आहेत म्हणून त्यांना काही तरी न्याय दिला गेला

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा...

पाहिजे. पुणे येथे महाराष्ट्र शासन, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या संघटना, माननीय खासदार गोपीनाथराव मुंडे, माननीय श्री. हर्षवर्धन पाटील, तसेच माननीय श्री. विजयसिंह मोहिते पाटील हे सर्व एकत्र बसले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे याबाबतीत त्यांनी विचार विनिमय केला.

( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड.उषा दराडे )

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 16:30

श्री.सय्यद पाशा.........

चर्चा अशी झाली की, सांगली आणि कोल्हापूर जिल्हयात ऊसाला पहिला हप्ता म्हणून 2000 रुपये द्यायचे आणि नगर, पुणे व सोलापूर जिल्हयात 1750 रुपये व उर्वरित महाराष्ट्रात 1700 रुपये द्यायचे. या बजेट सत्रामध्ये या प्रश्नाबाबत विचार झाला पाहिजे. सहकार विभागाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आश्वासित केले पाहिजे की, कमीत कमी एवढी रक्कम तुम्हाला मिळणार आहे. प्रत्यक्षात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रती मे.टनाला 1400 ते 1500 रुपये मिळाले आहेत. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम साखर कारखाना चालवित आहेत. त्यांनी काय भाव जाहीर केला मला माहिती नाही. परंतु जो भाव जाहीर केला असेल तर तो त्यांनी शेतकऱ्यांना दिला असावा. परंतु इतर ठिकाणी बँका कर्ज देत नाहीत, कारखाने शेतकऱ्यांना पैसे देत नाहीत, कारखान्याचे सभासद चेअरमनना शिव्या देत आहेत. तुम्ही मात्र गप्पगार ए.सी.मध्ये बसलेले आहात. या संदर्भात तुम्हाला काही देणेघेणे नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी शेर वाचून दाखविला, त्याला प्रत्युत्तर देण्यापेक्षा माननीय वित्त राज्यमंत्री वस्तुस्थितीबाबत काय उत्तर देणार आहेत हे महत्वाचे आहे. आता सगळा महाराष्ट्र बोंबलला आहे. देश बोंबलला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वाचवायचे असेल तर 20 लाख टन साखर निर्यात केली पाहिजे. सरकारने डिसेंबर महिन्यात साखर निर्यातीचा निर्णय घेतला आणि त्या निर्णयाला स्थगिती दिली. 5 लाख टन साखर निर्यात करण्याचा हा निर्णय होता. परंतु या निर्णयाला स्थगिती दिल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेचे भाव प्रती मे.टन 150 डॉलरनी कमी झाले. यामुळे किती नुकसान झाले? 5 लाख टन साखर निर्यात न केल्यामुळे 225 कोटी रुपयांचे नुकसान झाले. बजेट सेशन चालू असताना वित्त राज्यमंत्र्यांनी ही आकडेवारी लक्षात घेणे आवश्यक होते. 5 लाख टन साखर निर्यात न केल्यामुळे 225 कोटी रुपये नुकसान झाले. म्हणजे 20 लाख टन साखर निर्यात केली असती तर 900 कोटी रुपये फायदा झाला असता. या मुद्याला माननीय मंत्र्यांनी जरुर उत्तर द्यावे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय भाषणामध्ये कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व आहे असे म्हटले आहे. असे असताना अनन्यसाधारण महत्वाच्या विषयाबाबत ही भूमिका घेणार असाल तर काय होईल? तेलबिया क्षेत्रासाठी जी रक्कम दाखविली आहे या आकडेवारीवर माझा विश्वास नाही. माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारने परदेशातून खाद्य तेल आयातीवर 45

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा.........

टक्के शुल्क लागू केले होते. त्यामुळे तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांना प्रचंड आर्थिक फायदा झाला होता. आता खाद्य तेलावरील आयात शुल्क शून्य टक्के केल्यामुळे ज्या भागात कापूस चांगला पिकतो, सोयाबीनचे चांगले उत्पादन होते त्यांच्या प्रतिनिधींच्या शिष्टमंडळामार्फत वित्त राज्यमंत्र्यांनी केंद्रीय कृषी मंत्र्यांना भेटावे व खाद्य तेलावर आयात शुल्क वाढविल्याशिवाय महाराष्ट्रातील शेतकरी जगू शकत नाही हे त्यांच्या निदर्शनास आणावे. शेतकरी जगला पाहिजे. त्याला जगविण्याची तुमची इच्छाशक्ती दिसत नाही. खाद्य तेलावर आयात शुल्क शून्य टक्के केल्यामुळे तेलबिया उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांचे आजोबा शेतकरी होते, वडील शेतकरी होते, काका शेतकरी होते. मी या ठिकाणी शेतकरी म्हणून बोलत आहे. सय्यद पाशा हा शेतकऱ्याचा मुलगा आहे. शेतीविषयी बोलल्यामुळे मला या सभागृहात येण्याची संधी मिळाली आहे. उगाच माझे बोट धरुन मला या सभागृहात आणलेले नाही. माझ्या शरीरात श्वास आहे तोपर्यंत मी शेती विषयाशिवाय बोलणार नाही. उद्या माझ्या पक्षाचे सरकार जर सत्तेवर आले आणि त्या सरकारने शेतीविरोधात भूमिका घेतली तरी मी आमच्या सरकारच्या विरोधात बोलल्याशिवाय राहणार नाही.

नंतर 3 एच.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल .......

.....अडथळा.......सरकार आल्यानंतर सुध्दा मी इकडे आलो याचा अर्थ काय तो तुम्ही समजावा........अडथळा........महिलांना 50 टक्के आरक्षण लागू केले तरी आमची अशी परिस्थिती हे योग्य नाही. जेव्हा मी शेतकऱ्याविषयी बोलतो तेव्हा अशाच प्रकारे बेल वाजते.....

**तालिका सभापती (ॲड. उषा दराडे)** : मी सन्माननीय सदस्यांचे भाषण आटोपते घेण्यासाठी बेल वाजविली नाही. पण मघाशी आपण आपल्या भाषणात "मी काय वेडा आहे काय" असे म्हणालात. मी त्यासंदर्भात असे लक्षात आणून देते की, ज्याप्रमाणे प्रत्येक गोष्टीला अपवाद असतो त्याप्रमाणे आपण वेडा नसला तरी एक्सेप्शनल वेडा असू शकतो.

श्री. सय्यद पाशा पटेल : महोदय, अर्थसंकल्पात कृषी पीक विमा योजनेसंबंधी सांगितले आहे. यासंबंधीचे तीन तीन मसुदे आमच्या डोक्यावर आणून ठेवले आहे. पण त्यातून एक गोष्ट अशी झाली की, 105 कोटी रुपये विमा कंपनी घेऊन गेली आणि त्याबदल्यात आम्हाला फक्त 22 कोटी एवढीच रक्कम दिली, असा हा शासनाचा पीक विमा आहे. माझ्या माहितीप्रमाणे शेतकऱ्याचे नुकसान झाले तर पीक विम्याची रक्कम मिळत नाही तर सरकारमध्ये जे खंबीर आहेत, ज्यांची चालते तेच लोक ही रक्कम पळवू शकतात. ज्यांची काहीच चालत नाही त्यांना मात्र नुकसान होऊनही भरपाई मिळत नाही. माननीय मंत्री महोदय, श्री. पतंगराव कदम हे जरी सांगली जिल्ह्याचे असले तरी त्यांचा भाग हा डोंगराळ आहे. अशा डोंगराळ भागातून ते शिकले, सवरले म्हणून पुढे गेले आणि एवढे खंबीर झाले की वर बसणाऱ्यांनाही हलवू शकतील.

महोदय, शासनाने कांद्याची साठवण करण्याच्या संदर्भात अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. पण मुळात कांदाच मेला तर साठविणार काय हा प्रश्न निर्माण होतो. पण तरी शासनाने काळजी करु नये कारण चायनाचा कांदा खाण्याची आपल्याला सवय झाली आहे. त्यानंतर पाकिस्तानचा कांदा घेऊ. जसे यशवंत सोनवणेला पेटविल्यानंतर राज्यातील सगळ्या घासलेटवाल्यांना शासनाने पकडायला सुरुवात केली. तशीच परिस्थिती कांद्याची आहे. ज्यावेळेस आपल्या राज्यातील कांदा वाळेल, नुकसान होईल तेव्हा पाकिस्तान व चीनचा कांदा आपण आणणार. अन्य लोकांकडून हे घडले असते तर मी समजू शकलो असतो, त्याला शेतीचे काय ज्ञान आहे ? असे म्हणता येईल. पण सगळे शेतकऱ्याच्याच आडनावाचे, मंत्र्यांची आडनावे

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल.....

शेतकऱ्याचीच, असे सर्व सारखे असताना कांद्याला न्याय देण्याऐवजी आपण कांद्यावाल्यांची जिरवायचा मार्ग पत्करला हेच या राज्याचे व शेतकऱ्याचे दुर्दैव आहे. दुर्दैव यासाठी की त्या शेतकऱ्याला कळत नाही आणि सवय लागली दारु आणि पैसा घेऊन मतदान करायची. त्यावर तुम्ही निवडून येत राहिला आणि राज्य करीत आहात. पण माझा विश्वास आहे की, एक दिवस तरी या लोकांना या गोष्टीचा राग येणारच. आजच सकाळी आपण पाहिले की, कांद्याच्या प्रश्नावर संपूर्ण सभागृह एक झाले, कारण कांद्याला न्याय मिळाला पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ....

सभापती महोदय, सकाळच्या वेळी सभागृहात एवढे मंत्री बसले होते परंतु त्यातील एकाही मंत्र्याने कांद्याच्या भावाच्या संदर्भात "ब्र" शब्द सुध्दा काढला नाही. असे जर चालले तर शेतक-याचे कसे होईल ? एका बाजूला कांदा पिकविणा-या शेतक-याच्या कांद्याला भाव मिळत नाही तर दुस-या बाजूने कांद्याच्या चाळी बांधण्यासाठी हे शासन पैसे देत सुटले आहे. जर कांदा पिकविणारा शेतकरीच जिवंत राहिला नाही तर त्या कांद्याच्या चाळीवर काय घासलेट टाकावयाचे ? कांद्याच्या चाळीला जास्त खर्च येत नाही असे असल्यामुळेच सरकार कांद्याच्या चाळीला पैसे देत सुटले आहे. अशा प्रकारे हे शासन किरकोळ गोष्टीचा उल्लेख बजेटमध्ये करीत आहे त्यामुळे या सरकारचे देवच भले करो असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये राष्ट्रीय सहकार विकास मंडळाच्या माध्यमातून 105 ठिकाणी कुक्कुट पालन व्यवसाय सुरु होता परंतु 105 पैकी 35 ठिकाणीच कुक्कुट पालन व्यवसाय सुरु आहे बाकीच्या ठिकाणी सर्व काम बंद पडलेले आहे. राष्ट्रीय सहकार विकास मंडळाच्या माध्यमातून 150 कोटी रुपये कुक्कुटपालनासाठी देण्यात आलेले आहे परंतु या राज्य शासनाने कुक्कुटपालनासाठी केवळ 20 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. आपण मला सांगा जर 150 कोटी रुपये देऊन सुध्दा कुकुट पालन व्यवसाय बंद पडत असेल तर 20 कोटी रुपयामध्ये या सरकारकचे कुक्कुटपालनाचे धोरण कसे काय चालू राहील याचा विचारच केलेला बरा. गरम तव्यावर पाण्याचे थेंब टाकल्यानंतर जसा थेंब भुर्रकन उडून जातो तसाच प्रकार या 20 कोटी रुपयांच्या बाबतीत होईल. हे 20 कोटी रुपये कधी भुर्रकन उडून जातील ते सांगता येणार नाही. हे 20 कोटी रुपये 31 मार्चच्या शेवटी गपकन उडून जातील याची मी आपल्याला खात्री देतो. मी महाराष्ट्र राज्य कुक्कुट महासंघाचा सदस्य असून 20 वर्षापासून एका पोल्ट्रीचा चेअरमन आहे. माझ ी पोल्ट्री चांगल्या प्रकारे सुरु आहे कारण मी माझा बोजा पोल्ट्रीवर टाकलेला नसल्यामुळे माझी पोल्ट्री सुरु आहे.

सभापती महोदय, शेती मालाच्या उत्पादन खर्चावर रास्त भाव शेतक-याला मिळाला पाहिजे तरच शेतकरी जिवंत राहू शकेल तसाच प्रकार पोल्ट्रीच्या संदर्भात आहे. पोल्ट्री फॉर्मच्या खर्चावर

श्री. पाशा पटेल ....

रास्त भाव अंडयाला मिळाला तरच पोल्ट्री सुरु राहू शकेल एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. व्यंकटेश हेचरीचे विमान सर्व वापरतात त्यामुळे त्याला कोणी हात लावण्याची हिंमत दाखवत नाही.

सभापती महोदय, अंडयाचा दर रोज वर्तमानपत्रात येत असतो व त्यावरुन अंडे विकले व घेतले जाते. जोपर्यंत अंडी तयार करण्यासाठी लागणारा खर्च पोल्ट्रीवाल्याला मिळणार नाही तोपर्यंत हा व्यवसाय जिवंत राहणार नाही.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..

म्हणून अशा गोष्टीमध्ये लक्ष घालण्याचे काही कारण नाही एवढेच मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर आपल्या सर्वांच्या आवडीच्या एका विषयावर बोलून मी माझे भाषण संपविणार आहे. माझ्याकडे ॲग्रो वनची पुरवणी आहे. आपण सर्व जण ही पुरवणी नेहमीच वाचत असतो. एका शेतक-याचे दोन लाख रुपयांचे शेतीचे नुकसान झाले असून त्याला फक्त 700 रुपयांची मदत देण्यात आली अशा प्रकारची बातमी त्यात छापण्यात आली आहे. त्याचबरोबर या शेतक-याचा फोटोसुध्दा छापण्यात आला आहे. लाखो रुपयांचे नुकसान झाल्यानंतर जर त्या शेतक-याला तुटपुंजी मदत दिली जाणार असेल तर तो शेतकरी कसा काय जगेल ? या चर्चेच्या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की , शेतीचे नुकसान झाल्यानंतर शेतक-यांना मदत देण्यासबंधीचे जे काही निकष आहेत ते बदलण्यात आले पाहिजेत. माननीय वित्त राज्य मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात यासबंधीचा खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. अशा प्रकारे जर त्यांनी उत्तर दिले तर आम्ही त्याना सलाम करु, त्यांचे फोटो गोंदवून घेऊ.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांना मी एक गोष्ट सांगू इच्छितो.उत्तर प्रदेश मध्ये मायावतीचे सरकार असून त्यांनी प्री मॅट्रीक शिष्यवृत्तीकरिता 294 कोटी रुपयांची तरतूद केली आहे परंतु आपल्या सरकारने फक्त 48 कोटी रुपयांची तरतूद केली आहे.माननीय वित्त राज्य मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की , ज्यांच्या जीवावर तुम्ही राज्य करता त्यांना अशाप्रकारची वागणूक देणे बरोबर होणार नाही. ज्यांच्या जीवावर तुम्ही जगत आहात त्या लोकांना तरी तुम्ही सांभाळले पाहिजे.

सभापती महोदय, माननीय वित्त राज्य मंत्र्यांना मला असे सांगावयाचे आहे की,मुस्लिम अलीगड युनिर्व्हसिटीची उप शाखा आपल्या राज्यामध्ये देण्याची विद्यापीठाची तयारी आहे. या उप शाखेसाठी राज्य शासनाने फक्त जमीन द्यावयाची आहे. बिहारमध्ये भारतीय जनता पक्षाच्या पार्टनरशीपमध्ये सरकार सुरु आहे. त्यांनी यासाठी जमीन दिली आहे. दोन दिवसापासून मी अर्थसंकल्पावरील भाषणे ऐकत असल्यामुळे मी महाराष्ट्राच्या विधान परिषदेमध्ये बसलेलो आहे की गुजराथच्या विधान परिषदेमध्ये बसलेलो आहे हेच कळत नाही. गुजराथ राज्याने शेतक-यांसाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल...

1300 कोटी रुपये दिले आणि आपल्या सरकारने 649 कोटी रुपये दिले असे अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले. कर्नाटक राज्याने 17 हजार 448 कोटी रुपये शेतक-यांसाठी दिलेले आहेत. आपले राज्य प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहे असे नेहमीच सांगितले जाते परंतु आपल्या राज्यापेक्षा इतर राज्य सरकारांनी शेतक-यांसाठी भरीव तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, बिहारच्या किशनगंजमध्ये मुस्लिम अलीगड विद्यापीठाची उप शाखा काढण्यासाठी जागा देण्यात आली त्याचबरोबर पश्चिम आणि केरळ राज्याने जागा दिली, परंतु महाराष्ट्र सरकारला यासाठी जागा देण्यामध्ये कोणती अडचण आहे हे मला समजत नाही. शासनाला भीक लागली असेल तर तुमच्या जीवावर आम्ही जगत आलो आहे परंतु तुमच्यासाठी आम्ही जमीन देऊ शकत नाही तेव्हा ही जमीन सुध्दा तुम्हीच मिळवावी असे राज्य शासनाने सांगावे महाराष्ट्र शासनाने भीक लागल्याचे जाहीर केले तर मी स्वत: निधी गोळा करुन 250 एकर जमीन त्यांच्यासाठी देईन.

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**तालिका सभापती (ॲड. उषाताई दराडे)** : माननीय सदस्यांनी आपले भाषण पूर्ण करावे.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदया, मी दोन मिनिटामध्ये माझे भाषण संपवितो. तुमची जर तयारी असेल तर मी उद्या सकाळपर्यंत भाषण करु शकतो. नाही बोललो तर मी पाशा पटेल नाही. त्यामुळे माझा अंत आपण पाहू नका, विधानसभेतील माननीय सदस्यांना सुध्दा माहीत आहे की, मी ज्याच्या मतदारसंघात जातो त्याचा बाजा वाजवितो. या ठिकाणी तुम्हाला मतदारसंघच नसल्यामुळे तुम्ही तरी काय करणार?

सभापती महोदय, उर्दू ॲकॅडमीबद्दल मला आपल्याला विचारावयाचे आहे की, आंध्र प्रदेशमध्ये उर्दू ॲकॅडमीसाठी 28 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे आणि तुम्ही फक्त 20 लाखाची तरतूद केली आहे. तुम्ही किती भिकारी आहात. आता लाखाची किंमत राहिली आहे काय? आपल्यापैकी कुणाचीही एक कोटीपेक्षा कमी किंमतीची गाडी फिरत नाही. एका गाडीची किंमत एक कोटी रुपयांची असतांना या संपूर्ण समाजासाठी फक्त 20 लाख रुपये ठेवणार असाल तर देव तुमचे भले करो. त्या समाजाला जर ही गोष्ट समजली तर तो तुम्हाला सोडणार नाही.

सभापती महोदय, मी आणखी एक सूचना करणार आहे. तुम्ही उशिरा कां होईना शहाणे झालेले आहात. तुमचा राजकीय आधार घसरत चालल्यामुळे आता मायनॉरिटीमधील मुलांनी शिकले पाहिजे असे तुम्हाला वाटू लागले आहे. तुम्हाला चटके बसल्यामुळे तुम्ही शहाणे झालेले आहात. मघाशी या सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रत्येक विभागातील प्रत्येक कॉलेजची फी वेगळी ठेवली पाहिजे असे म्हणत असतांना या ठिकाणी तुम्ही 25 हजार रुपयांची शिष्यवृत्ती कशासाठी देत आहात? ज्या मुलाला जेवढी फी लागेल तेवढी फी देण्याचे मोठेपण आपण दाखवा. या वर्षी तुम्ही 10 हजार मुलांना शिष्यवृत्ती देण्यास तयार झालेले आहात. शिष्यवृत्तीकरिता 14 हजार अर्ज आले असतांना त्यांना पैसे वाटायचे की नाहीत याचा विचार तुम्ही करीत आहात. या बाबत मी सर्वत्र जाऊन सांगितले की, ही मुले कधी नव्हे ती शिकायला निघाली असतांना तुम्हाला भीक लागली की काय, त्यांना तुम्ही 14 हजार रुपयांची शिष्यवृत्ती द्या असे भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या वतीने आम्ही तुम्हाला सांगावे काय? तुमची अब्रू कुठे गेली, तुमच्याकडे काहीच शिल्लक नाही असे सांगण्याची आमच्यावर वेळ येऊ देऊ नका, तुम्ही पण जरा बोलायला शिका. तुम्ही जर बोललात तर फरक पडणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांची वेळ संपलेली आहे, अनेक माननीय सदस्यांना भाषण करावयाचे असल्यामुळे आपण कृपया खाली बसावे.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदया, मी दोन मुद्दे सांगून माझे भाषण आटोपते घेतो. मघाशी मी मायनॉरिटीच्या संदर्भात, शेतीच्या संदर्भात सूचना केल्या आहेत. माझा असा अनुभव आहे की, या सभागृहात मी ज्या दिवशी आलो त्या दिवसापासून बोलत आहे, परंतु माझ्याकडे कुणी लक्ष देत नाही.

सभापती महोदया, या ठिकाणी शेतीच्या संदर्भात अनेक माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. तरीसुध्दा मी संपूर्ण सभागृहाला सांगणार आहे की, शेतीचा या वर्षीचा उत्पादन खर्च काढीत असतांना झालेला एक चमत्कार बघितला आहे. त्यामध्ये कोणकोणत्या गोष्टीची किंमत कशी काढली हे पहातांना माझ्या डोळयात पाणी आले. त्यामध्ये 17 पिकांचा काढलेला उत्पादन खर्च पाहिला असता, बैलाची मजूरी वेगवेगळी धरली गेली आहे. प्रामुख्याने त्यामध्ये ज्वारीची 260 मजूरी धरली आहे, मूगाची 304 मजूरी धरली आहे, उडीदाची 306 मजूरी धरली आहे, तूरीची 308 मजूरी धरली आहे आणि ऊसाची 380 मजूरी धरली आहे. अरे, बैल कुठे पीक पाहून मजूरी मागते की काय, कमाल आहे? किती अपरिपक्व लोक आहेत याची मला कमाल वाटते. या महाराष्ट्राचे कसे होईल? या महाराष्ट्रातील शेती वाचवायची असेल तर कुठे कुठे कीड लागली आहे हे आपल्याला खणून पहावे लागेल. तुम्ही जर सगळे अधिकार त्यांना देणार असाल तर हे लोक तुम्हाला शेंडीसकट बुडविल्याशिवाय राहणार नाहीत हे आपण लक्षात ठेवा. मी पुन्हा एकदा सर्व पदाधिकाऱ्यांना व अधिकाऱ्यांना विनंती करतो की, गावातील सर्व लोकांनी तुमच्यावर प्रेम करुन या ठिकाणी तुम्हाला पाठविले आहे. मला या गोष्टीचे वाईट वाटते आणि कधी कधी मी या साठी भावनिक होतो की, माझ्याकडे 25 एकर जमीन असून सुध्दा मी जी गरिबी भोगली आहे ती या देशातील व या राज्यातील कुणाच्याही नशिबामध्ये येऊ नये असे मला वाटते. मी या सभागृहामध्ये पुढारी किंवा अन्य कुणी बनण्यासाठी आलेलो नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल . . . .

मी फक्त एक गोष्ट सांगतो की, 25 एकर जमिनीचा धनी असलेल्या माझ्या वडिलांच्या भावाचे निधन झाल्यानंतर, मला त्यांच्या निधनाबद्दल चिंता वाटली नाही. परंतु माझ्या वडिलांच्या सख्या भावाची मौता करण्यासाठी जे कापड लागते त्यासाठी कोणत्या सावकाराकडून पैसे आणावेत याची चिंता वाटली आणि त्यासाठी रडू आले. 25 एकर जमीन असून सुध्दा जर अशा प्रकारे आयुष्य जगावे लागत असेल तर यामध्ये नेमके काय आहे ? हे कशामुळे झालेले आहे ? हे शोधण्यासाठी मी येथे आलो आहे. माझी सगळयांना विनंती आहे की, आपल्याला जो काही वर्ष-दोन वर्षाचा कालावधी मिळाला आहे, त्यामध्ये किमान एवढे करा की, तुम्हाला ज्या लोकांनी येथे पाठविलेले आहे, तुमचे ज्या लोकांशी रक्ताचे नाते आहे ते लक्षात घेऊन जर याठिकाणी बजेट मांडले तर मग हा महाराष्ट्र सुजलाम् सुफलाम होणार आहे. माझी माननीय अर्थ राज्यमंत्र्यांना विनंती आहे की, तुम्ही सुध्दा एक शेतकरी आहात. या सगळया गोष्टींचा जर अर्थसंकल्पामध्ये अंतर्भाव असता तर मला खूप आनंद झ ााला असता. पण अर्थसंकल्पामध्ये यातील कोणत्याही गोष्टी नाहीत तर वर्ष-वर्ष हेच सुरु आहे, पण तसे करुन चालणार नाही. त्यामुळे मी येथेच थांबतो आणि या सगळया गोष्टींबाबत मी दु:ख व्यक्त करतो आणि भाषण संपवितो.

----

. . . .3 एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे.

**तालिका सभापती (ॲड.उषाताई दराडे)** : मी सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांना भाषण करण्यासाठी संधी देणार आहे. याठिकाणी पक्षाच्या प्रतोदांकडून ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत, त्याप्रमाणे भाषणे झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण भाषण करतील. आता सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, मघाशी माननीय सभापती यांनी असे सांगितले होते की, सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई यांचे भाषण झाल्यानंतर मला संधी देण्यात येईल.

**तालिका सभापती** : ठीक आहे. ही गोष्ट मला माहिती नव्हती. आता सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांचे भाषण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांनी भाषण करावे.

. . . .3 एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, याठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री आदरणीय श्री.अजितदादा पवार यांनी व माननीय राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक साहेबांनी विकासाभिमूख अर्थसंकल्प मांडलेला आहे, त्याचे स्वागत करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये श्रीमंत वर्गाला लागणाऱ्या वस्तूंवर कर लावलेला नाही तर कर सुचविलेला आहे. पण सामान्य जनतेवर कोणत्याही कराचा बोजा नाही याबद्दल मी माननीय वित्तमंत्र्यांचे अभिनंदन करतो. ज्या कार्यालयामध्ये जास्तीतजास्त करांची वसुली होते अशा सर्व कार्यालयांचे आधुनिकीकरण करावयास पाहिजे अशा मताचा मी आहे. या सर्व कार्यालयांना भौतिक सुविधा पुरविल्या पाहिजेत अशी मी मागणी करतो. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी एक मुद्दा मांडला की, आर.टी.ओ.कार्यालयामध्ये आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. उदाहरण द्यावयाचे तर विक्रीकर खात्याचे संगणकीकरण केल्यानंतर गेल्या वर्षी 26 टक्क्यांनी महसूल वाढला आहे.अशा सर्व खात्यांमध्ये आधुनिकीकरण आणि भौतिक सुविधा करण्यासाठी तरतूद करावी अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये काही ऐतिहासिक किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी 20 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, त्याचे मी स्वागत करतो. तसेच पर्यटनासाठी जवळपास 300 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु महाराष्ट्र राज्याला भेट देणाऱ्या पर्यटकां पैकी बहुसंख्य पर्यटक हे औरंगाबादला भेट देतात. पण औरंगाबादमध्ये पर्यटनाच्या दृष्टीने काहीही तरतूद केलेली नाही. औरंगाबाद शहरामध्ये काही औद्योगिक संघटनांच्यातर्फे पर्यटन परिषद घेण्यात आली. त्यावेळी तत्कालीन पर्यटन मंत्री डॉ.विजयकुमार गावीत साहेबांनी औरंगाबाद शहर ही राज्याची पर्यटन राजधानी म्हणून घोषित केली. परंतु त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये कुठेही तरतूद केलेली दिसत नाही. माझी अशी विनंती आहे की,औरंगाबाद शहरातील रस्ते, पर्यटकांसाठी सुविधा त्याचप्रमाणे औरंगाबाद शहर हे स्वच्छ व सुंदर दिसले पाहिजे यासाठी शासनाने भरीव तरतूद करावी. त्यासाठी एम.एम.आर.डी.ए.च्या धर्तीवर एक प्राधिकरण स्थापन करुन निधी देण्यात यावा अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, संपूर्ण राज्यातील निरनिराळया वर्गांसाठी योजना घेण्यासाठी नियोजन केलेले आहे. तसेच रोजगार हमी योजनेसाठी तरतूद केलेली आहे. शेतकऱ्यांच्या विविध योजनां-साठी तरतूद केलेली आहे.अल्पसंख्याकांच्या विकासासाठी तरतूद केलेली आहे त्याबद्दल मी येथे शासनाचे अभिनंदन करतो.



श्री.सतीश चव्हाण . . . .

सभापती महोदय, पर्यावरण संतुलन हा केंद्र बिंदू डोळ्यासमोर ठेऊन ग्रामविकासाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे याबद्दल मी ग्रामविकास मंत्र्यांचे अभिनंदन करतो. परंतु शेत रस्त्यांकरता कोणतीही तरतूद या योजनेमध्ये करण्यात आलेली नाही. भविष्यामध्ये याबाबत धोरण आखण्यात यावे अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण....

सभापती महोदया, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचे मी अभिनंदन करतो. पायाभूत सुविधा, मूलभूत सुविधा जसे रस्ते, पाणी आणि वीज यासाठी या अर्थसंकल्पात भरीव तरतूद केलेली आहे.जेवढा जास्त निधी या सुविधांसाठी देण्यात येईल तेवढी महाराष्ट्राच्या प्रगतीची चाके अधिक वेगाने फिरतील त्यामुळे यासाठी अधिकचा निधी देण्यात यावा. कालच वर्तमानपत्रात गोवा सरकारने बेरोजगारांसाठी 1200 रुपये बेरोजगार भत्ता दिलेला आहे अशी बातमी आली होती. महाराष्ट्राने सुध्दा बेरोजगारांचा भत्ता वाढविण्याच्या बाबतीत पुढाकार घ्यावा. मी बेरोजगांराची माहिती घेतलेली आहे. 20 लाख बेरोजगारांची नोंदणी सेवायोजन कार्यालयात झालेली आहे. त्यापैकी 8700 लोकांना कॉल गेलेले आहेत आणि त्यापैकी फक्त 4500 लोकांना नोकऱ्या मिळालेल्या आहेत ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. सेवायोजन कार्यालयाचे आधुनिकीकरण करण्यात यावे आणि बेरोजगारांना 1500 रुपये बेरोजगार भत्ता देण्यात यावा, अशा प्रकारची मी विनंती करतो.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पात तीर्थक्षेत्र विकासासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे, त्याबद्दल मी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो. परंतु त्याचवेळी या अर्थसंकल्पामध्ये तुळजापूर, पैठणसाठी किती तरतूद करण्यात आली आहे हे समजत नाही. औरंगाबादच्या घाटी रुग्णालयासाठी भरीव तरतूद केल्या बद्दल मी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे तसेच माननीय राज्य मंत्र्यांचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने मी या ठिकाणी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्याबाबत शासनाने विचार करावा, अशी विनंती करुन, मी माझे भाषण संपवितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे ( नामनियुक्त ) : सभापती महोदया, अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेण्याची आपण मला संधी दिल्या बद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदया, मी माननीय उप मुख्यमंत्री, मुख्यमंत्री व राज्य मंत्र्यांचे अभिनंदन करतो. अतिशय चांगला, संपूर्ण राज्याचा समतोल ठेवणारा असा अर्थसंकल्प या ठिकाणी मांडण्यात आला आहे. सर्व मागास भागांना विशेषत: मराठवाडा आणि विदर्भाला न्याय देणारा हा अर्थसंकल्प आहे असे मी समजतो. उपेक्षित भागाला न्याय देण्यासाठी या अर्थसंकल्पात अतिशय भरीव अशी तरतूद कलेली आहे. सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्षातील सदस्याची अर्थसंकल्पावरील भाषणे मी या ठिकाणी ऐकलेली आहेत. या अर्थसंकल्पामधील त्रुटी दाखविण्याच्या दृष्टिकोनातून त्यांच्याकडे काही मुद्देच शिल्लक नव्हते म्हणून या ठिकाणी मुद्दे सोडून भाषणे झालेली आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांचे भाषण झाले. त्यांचे भाषण चांगले झाले. परंतु कर्नाटक राज्य किती चांगल्या प्रकारे चाललेले आहे, याबाबत त्यांनी या ठिकाणी कर्नाटक राज्याचे उदाहरण दिले. कर्नाटक राज्याबाबत बोलण्यासाठी आपण आम्हाला भाग पाडू नका. कर्नाटक राज्य कशा प्रकारे चालले आहे आणि कर्नाटक राज्यामध्ये काय चालले आहे हे आपणही बघत आहात. तेव्हा कर्नाटक राज्याचा मुद्दा महाराष्ट्र राज्यात मांडण्यात येऊ नये, महाराष्ट्रात अतिशय स्वच्छ अशा प्रकारचे शासन चालले आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार अतिशय चांगल्या प्रकारचे निर्णय घेत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी या ठिकाणी असे सांगितले की, "मी जर मंत्री झालो असतो तर राजीनामा दिला असता." श्री. पाशा पटेल, हा अर्थसंकल्प इतका चांगल्या प्रकारे मांडला आहे की, मंत्री पदाचा राजीनामा दिल्याची किमान 25 वर्षे तुम्हाला स्वप्ने पडतील. तुम्हाला अशा प्रकारचा मोकाच येणार नाही. सभापती महोदया, मला या ठिकाणी काही खंत व्यक्त करावयाची आहे.

श्री. पाशा पटेल (बसून) : सन्माननीय सदस्यंनी मी केलेल्या भाषणा बद्दल न बोलता अर्थसंकल्पावर बोलावे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, अनेक ऐतिहासिक वास्तूना निधी देण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे ...

अनेक तीर्थक्षेत्रांना भरीव मदत देण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु मी माननीय वित्त मंत्र्यांना सांगू इच्छितो की, हे सगळे करीत असताना महाराष्ट्रातील दलित समाज चैत्यभूमीसाठी इंदू मिलची 12 एकर जागा देण्याची मागणी करीत असताना आणि या सभागृहामध्ये अनेक वेळा आश्वासन देऊनही इंदू मिलची जागा देण्याचा प्रश्न सुटलेला नाही. शासनाने जागा देताना फक्त 4 एकर जागा दिली. दलित समाज 12 एकर जागा मागत असताना शासन त्याकडे का दुर्लक्ष करीत आहे ? आपण अनेक तीर्थक्षेत्रांना भरीव मदत केली. तीर्थक्षेत्रांना मदत करताना चैत्यभूमी, दीक्षाभूमी शासनाला दिसली नाही का ? सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपले रंगमंचावरील भाषण आम्ही ऐकलेले आहे. आपणही माझे भाषण शांतपणे ऐकून घ्यावे. आपण कर्नाटक राज्याबाबत सांगितले. कर्नाटकचे मुख्यमंत्री काय दिवे लावत आहेत ते बघा. कर्नाटकमध्ये काय होत आहे ते बघा. कर्नाटकची संपूर्ण वाट लागलेली आहे. सभापती महोदय, तीर्थक्षेत्रांसाठी भरीव मदत करीत असताना शासनाला चैत्यभूमी, दीक्षाभूमी दिसली नाही का ? संपूर्ण महाराष्ट्रातील दलित समाज इंदू मिलच्या जागेची मागणी करीत आहे. संपूर्ण दलित समाजाचे लक्ष शासनाकडे लागलेले आहे. चैत्यभूमीसाठी इंदू मिलची 12 एकर जागा देण्याची मागणी असताना, सभागृहामध्ये अनेक वेळा शासनाने मागणी मान्य केलेली असताना आणि तसे निवेदन केले असताना सुध्दा इंदू मिलच्या जागेचा उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये आलेला नाही.

सभापती महोदया, सध्याचे सरकार येण्याच्या आधी म्हणजे पाच वर्षापूर्वी आपण घरकुल योजना तयार केली. या घरकुल योजनेसाठी शासनाने 800 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही योजना शासनाच्या वतीने राबविण्यात येईल असे जाहीर केले होते. त्यासाठी जिल्हा पातळीवर अर्ज मागविण्यात आले होते. एका एका जिल्ह्यामध्ये 7-7 हजार, 8-8 हजार अर्ज दलितांनी, गरीब जनतेने दिले. परंतु प्रत्यक्षात ज्या वेळी ही योजना राबविण्याचा प्रयत्न झाला त्या वेळी ही योजना आपण जिल्हा परिषदेकडे दिली. ही योजना जिल्हा परिषदेकडे दिली त्याबद्दल माझा विरोध नाही. परंतु जिल्हा पातळीवर जे 7-7 हजार अर्ज आले त्या अर्जांचे काय करणार ? आपण त्या लोकांना

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राम पंडागळे ....

कशा पध्दतीने न्याय देणार याबद्दल या अर्थसंकल्पामध्ये उल्लेख केलेला नाही. ही योजना जिल्हा परिषदेकडे देत असताना मला एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी शासनाच्या वतीने योजना राबविण्याचे जाहीर झाले. ज्या वेळी दारिद्र्य रेषेखालील लोकांची आपण जी नोंदणी केली ती जिल्हा परिषदेकडे दिली. ती नोंदणी करताना ज्याच्या घरामध्ये संध्याकाळची चूल पेटत नाही, ज्याच्या घरामध्ये दिवाबत्तीची सोय नाही अशा लोकांची नावे दारिद्र्य रेखेखालील लोकांमध्ये नोंदण्यात आली नाहीत. परंतु ज्यांच्या दरवाजासमोर मोटारसायकल उभी राहते, ज्याच्या घरासमोर गाड्या उभ्या राहतात अशा व्यक्तीची नावे दारिद्र्य रेषेखालील लोकांमध्ये नोंदण्यात आली. जो उपाशी होता तो आज उपाशीच आहे. उपाशी असलेला माणूस पाहतो की , ज्याचे पोट भरलेले आहे त्याचे नाव दारिद्र्य रेषेखाली नोंदविले आहे आणि तो पोटभर खात आहे आणि मी मात्र उपाशी आहे. म्हणून ही योजना शासनाच्या वतीने राबवावयास पाहिजे होती. हे दलितांचे, गरिबांचे काम आहे म्हणून यातून अंग झटकण्याचे काम शासनाने केलेले आहे. अजूनही वेळ गेलेली नाही. ही योजना शासनाच्या वतीने राबवावी अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे....

माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी विधेयक मांडले होते त्यावेळी त्यांना ते विधेयक परत घेण्याची विनंती केली होती. दलित, पददलित, आदिवासी व वंचित यांचा विचार करुन विधेयक मांडावे असे सुचविले होते. परंतु त्यांनी ते विधेयक मांडले आणि चर्चेनंतर मंजूर झाले. ते विधेयक मंजूर झ ााल्यानंतर मी आदरणीय राज्यपालांची भेट घेतली होती. सभागृहात मंजूर झालेले विधेयक दलित, पददलित, आदिवासी व वंचित लोकांवर अन्याय करणारे असल्यामुळे ते परत घेऊन सुधारणा कराव्या अशी विनंती केली होती. मला सांगण्यास आनंद वाटतो की, आदरणीय राज्यपालांनी त्यांच्या अभिभाषणामध्ये आदिवासी, दलित, पददलित, गरीब जनतेवर या विधेयकाद्वारे अन्याय होणार नाही असे आश्वासन दिले होते. आदरणीय राज्यपालांनी आम्हाला आश्वासन दिलेले असतानाही माननीय अर्थमंत्र्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, त्यावेळी मंजूर झालेल्या विधेयकात ग्रामीण भागात प्रत्येकाच्या घरात 8 x 4 या साईजचे शौचालय असेल तरच ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला उभे राहता येईल अशी तरतूद होती. ती तरतूद अन्यायकारक आहे, शौचालयांची व्यवस्था शासनाच्या खर्चातून करावी, असे मी त्यावेळी सांगितले होते. दलित, पददलित, आदिवासींची घरे मुळातच 10 x 10 ची असतात. त्यामुळे ते 8 x 4 या साईजचे घरात शौचालयच बांधू शकत नाहीत. ग्रामीण भागात आजही पिण्याच्या पाण्यासाठी टँकर्स चालू आहेत. त्यामुळे शौचालयासाठी पाणी उपलब्ध होऊ शकत नाही. शौचालयांसाठी 5 हजार, 10 हजार रुपयांचे अनुदान देऊन काही उपयोग होणार नाही. म्हणून शासनाने शौचालये बांधण्याची हमी देऊन ती बांधावीत. तसेच चैत्य भूमी व दीक्षा भूमीसाठी भरीव तरतूद करण्याचे आम्हाला मंत्री महोदयांनी आश्वासन द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, आणखी एक छोटासा मुद्दा मी मांडू इच्छितो. 6 डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा स्मृती दिन साजरा केला जातो. त्या दिवशी सबंध राज्यातून नव्हे तर देशातून लाखो लोक दादरच्या चैत्य भूमीवर दर्शनासाठी येतात. त्याचप्रमाणे राजगृहाला सुध्दा

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.राम पंडागळे....

अनेक लोक भेट देतात. या राजगृह इमारतीमध्ये भाडेकरु आहेत. त्या भाडेकरुंना शासनाने बाजार भावाने पैसे देऊन ती इमारत रिकामी करुन घ्यावी. त्या ठिकाणी शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चांगले स्मारक बांधावे अशी नम्र विनंती करतो. हे स्मारक होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हयात असताना त्यांनी खूप पुस्तके ठिकठिकाणाहून आणली होती. त्यातील काही पुस्तके आता इकडे तिकडे झाली आहेत. त्यामुळे त्या पुस्तकांची अवस्था वाईट झाली आहे. त्यामुळे शासनाने या बाबत गंभीरपणे निर्णय घेऊन राजगृह या इमारतीत स्मारक बांधल्यावर विखुरलेली पुस्तके जतन करावीत. ही पुस्तके जनतेला खुली करावीत अशी विनंती करतो. मी या अर्थसंकल्पाला खुल्या मनाने पाठिंबा देतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र, जय भीम.

------

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सन 2011-12 या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेत असताना मी अतिशय थोडक्यात माझे विचार मांडण्यासाठी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पावर भाषण करण्यासाठी माझ्या सारख्याला एक तास सुध्दा वेळ कमी पडू शकेल इतके माझ्याजवळ मुद्दे आहेत. पण संध्याकाळचे 5 वाजले असल्यामुळे मी केवळ 2-3 महत्वाचे मुद्देच मांडणार आहे. या राज्यावर 2 लाख 39 हजार कोटी इतके कर्ज आहे. ज्यावेळी आमच्या हातात सत्ता होती त्यावेळी राज्यावर 31 हजार कोटींचे कर्ज होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

आमच्या त्यावेळच्या युती शासनाने कामे केली. कृष्णाखो-यातील कामासाठी, मुंबईतील उड्डाण पुलासाठी, गाव तेथे रस्ता होण्यासाठी,शौचालयासाठी युतीच्या शासनाने निधी उभा करुन ती कामे केली. त्या कामांसाठी काढलेले कर्ज त्यावेळी जनतेच्या समोर ठेवले. परंतु मला एक गोष्ट समजलेली नाही, ती मी सभापती महोदय, आपल्या माध्यमातून शासनाला विचारु इच्छितो. हे 2 लाख 39 हजार कोटीचे कर्ज कशासाठी काढण्यात आलेले आहे ? या कर्जासंबंधी श्वेतपत्रिका काढून राज्यातील जनतेला त्यासंबंधीची माहिती देणे आवश्यक आहे. हे कर्ज कशासाठी काढले हे महाराष्ट्रातील जनतेला समजले पाहिजे आणि त्यांचा तो हक्क आहे. हे कर्ज काढल्यानंतर तो पैसा कोणच्या घशात गेला हे समजून घेण्याचा आमचा नैतिक अधिकार आहे आणि तो अधिकार हिरावून घेण्याचे काम या शासनाने केलेले आहे याचे अतिशय दु:ख होते. या कर्जाच्या माध्यमातून उभा केलेला पैसा कोणाच्या घशात घातला, कोठे खर्च केला हे मंत्री महोदय सांगू शकणार नाहीत. एका बाजूला 2 लाख 39 हजार कोटीचे कर्ज डोक्यावर असताना 57 कोटीचा शिलकी अर्थसंकल्प करणे ही हास्यास्पद बाब आहे. एका बाजूला आपण तोट्यात असताना, कर्जाच्या खाईत असताना दुस-या बाजूला 57कोटीचा शिलकी अर्थसंकल्प सादर करुन हे शासन कोणाला फसवित आहे, आकडयांची ही बनवाबनवी कशासाठी केली जात आहे, कोणाच्या डोळयात धूळ फेकली जात आहे ? आपण आकडयांची केलेली फसवाफसवी कोणाला समजत नाही, आम्हालाच काय ते समजते अशा भ्रमात मंत्री महोदयांनी राहू नये. आता अर्थसंकल्पाबाबत चांगले बोलणे हे सत्ताधारी पक्षातील सदस्यांचे कामच आहे. त्यांना तसे बोलावेच लागते. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी हा अर्थसंकल्प कसा चांगला आहे हे सांगून शेवटी त्यांच्या समाजावर कसा अन्याय केलेला आहे हे देखील सांगितले.

सभापती महोदय, या राज्यामध्ये 37 लाख लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. या आधी दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या 31 लाख होती. म्हणजे हा अर्थसंकल्प नेमका कोणासाठी आहे ? या राज्यातील गरीब हा अधिक गरीब होत चालला आहे आणि श्रीमंत हा अधिक श्रीमंत होत चालला आहे. हा श्रीमंतांचा अर्थसंकल्प आहे. एका बाजूला राज्य रु.2 लाख 39 हजार कोटी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

तोट्यामध्ये असताना दुस-या बाजूला "खिशात नाही आणा आणि मला दादा म्हणा" असे मी उप मुख्यमंत्री महोदयांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाबाबत म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये जे कधी घडले नव्हते ते या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने घडलेले आहे हे मला येथे अतिशय खेदाने नमूद करावयाचे आहे. विरोधी पक्षातील शिवसेना आणि भाजपच्या आमदारांच्या मतदारसंघासाठी निधीची तरतूद न करता केवळ काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या मतदारसंघासाठी निधीची तरतूद या अर्थसंकल्पामध्ये केलेली आहे. अशा प्रकारचा विरोधी पक्षातील सदस्यांवर अन्याय करणारा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये कधीही मांडला गेला नाही. सभापती महोदय, मला उप मुख्यमंत्री महोदयांना सांगायचे आहे की, अर्थसंकल्पीय पैसा हा केवळ राष्ट्रवादी काँग्रेसचा पैसा नाही. या पैशावर केवळ राष्ट्रवादी काँग्रेसची मालकी नाही. परंतु या अर्थसंकल्पाच्या वेळी ही मालकी उप मुख्यमंत्री महोदयांनी दाखवलेली आहे. ज्या प्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे लोकप्रतिनिधी लोकांमधून निवडून आलेले आहेत त्याप्रमाणे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना लोकांनी निवडून दिलेले आहे. यांना देखील 3 लाख लोकांनी निवडून दिलेले आहे. म्हणून सर्व सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघामध्ये अर्थसंकल्पीय निधीचे समन्यायी वाटप व्हावयास पाहिजे. परंतु दुर्दैवाने ते झालेले नाही. सत्ताधारी पक्षाला कायमची सत्तेची खुर्ची मिळालेली नाही. म्हणून त्यांनी हा चुकीचा पायंडा पाडू नये. आज आपण सत्तेमध्ये आहात, उद्या तेथे आम्ही असू. आज जे मी बोलत आहे ते दुर्दैवाने उद्या तुम्हाला देखील बोलावे लागेल. म्हणून हा चुकीचा पायंडा तुम्ही पाडू नका. या अर्थसंकल्पीय निधीवर महाराष्ट्रातील जनतेचा अधिकार आहे. हा अधिकार हिरावून घेण्याचा नैतिक अधिकार उप मुख्यमंत्र्यांना नाही. परंतु दुर्दैवाने तो अधिकार त्यांनी घेतलेला आहे.

सभापती महोदय, खरे तर मी बोलणार नव्हतो, परंतु एक गोष्ट मला सांगावयाची आहे की, अर्थसंकल्प कशाला म्हणावयाचे हे तरी सत्ताधारी पक्षाला माहीत आहे काय ? मी नागपूरच्या अधिवेशनामध्ये भ्रष्टाचाराची 16 प्रकरणे उप मुख्यमंत्री महोदयांकडे दिली होती. त्यावेळी ते असे म्हणाले होते की, "तुम्ही याबाबतीत आता काही बोलू नका, परंतु या 16 प्रकरणी काय कारवाई केली हे मुंबईला होणा-या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अगोदर तुम्हाला कळवू."

...नंतर श्री. गिते...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

तीन महिन्यात या सर्व प्रकरणाबाबतची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करु आणि त्याबाबतचा अहवाल आपणास देऊ असे मला सांगितले गेले. भ्रष्टाचाराची एकूण 16 प्रकरणे दिली आहेत. कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार या प्रकरणांमध्ये झालेला आहे.

सभापती महोदय, मी म्हाडातील भ्रष्टाचाराचे एक प्रकरण दिले आहे. त्या प्रकरणामध्ये 10 हजार कोटी रुपयांचा घोटाळा आहे. म्हाडातील जे फ्लॅट जनतेसाठी राखून ठेवतो. ते फ्लॅट म्हाडातील अधिकारी आणि विकासक यांनी संगनमताने परस्पर विकून टाकले. अशी मी 16 प्रकरणे दिली आहेत. त्या प्रकरणांचे काय झाले ? या प्रकरणाची वसुली झाली असती तर 57 हजार कोटी रुपयापेक्षा जास्त रकमेचा शिलकी अर्थसंकल्प शासनाने मांडला असता. या भ्रष्टाचाराच्या प्रकरणामध्ये मंत्र्यांपासून ते खालपर्यंतच्या अधिकाऱ्यांचे हात असतील तर या प्रकरणाची चौकशी कशी काय पूर्ण होईल ? माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार साहेबांनी मला सांगितले पाहिजे की, या प्रकरणांच्या बाबतीत मी माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली आणि त्या प्रकरणांच्या संदर्भातील संदेश तुम्हाला देण्यास सांगितले आहे. या प्रकरणांचे काय झाले याची माहिती माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिली पाहिजे. मला या संदर्भात सभागृहात आश्वासन मिळालेले आहे. जर ते पाळले गेले नाही तर मी सभागृहात विशेषाधिकारभंगाची सूचना दाखल करीन. जर आम्हाला माननीय मंत्र्यांकडून माहिती मिळत नसेल तर मग आम्ही सभागृहात का म्हणून यावयाचे ? रेकॉर्डवर भाषणे रहावीत म्हणून आम्ही सभागृहात यावयाचे काय ? मी पुन्हा उल्लेख करतो की, भ्रष्टाचाराची 16 प्रकरणे दिली आहेत, त्यांचा रिझल्ट मला मिळाला पाहिजे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी आणखी एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे. निवडणुकीच्या कालावधीत कोकणासाठी 3.50 हजार कोटी रुपयांचे पॅकेज शासनाने दिले होते. त्याचे काय झाले ? ते पॅकेज कोठे गेले ? त्या पॅकेज संबंधीचा उल्लेख या अर्थसंकल्पात का केला गेला नाही ? या सर्व गोष्टींची माहिती मला मिळाली पाहिजे. हे शासन कोकणाला फक्त वाटाण्याच्या अक्षदा लावत आहे. या अर्थसंकल्पात शासनाने सिंचनासाठी 5 ते 10 कोटी रुपयांची तरतूद ठेवली आहे. सिंचन क्षेत्र वाढीसाठी कोणत्या विभागासाठी किती निधी उपलब्ध करुन देणार आहात या बाबतचे चित्र सभागृहात स्पष्टपणे दिसले पाहिजे. " जिसके हाथ मे लाठी, उसकी भैंस"



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

असा प्रकार होता कामा नये. या शासनाचा आम्ही चांगल्या प्रकारे अनुभव घेतलेला आहे. विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. विदर्भात सिंचनाची व्यवस्था झाली तर तेथील शेतकरी आत्महत्या करणार नाहीत. तसेच ते शासनाकडून कर्ज घेण्यास देखील येणार नाहीत. "राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला" असा या शासनाचा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांना बिनव्याजी 50 हजार रुपयांचे कर्ज देणार आहात, तीन लाख रुपयांचे कर्ज दोन टक्के व्याजाने हे शासन उपलब्ध करुन देणार आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी 5 हजार कोटी रुपयांचा निधी ठेवला आहे, त्यातील जास्तीत जास्त निधी विदर्भासाठी आणि कोकणासाठी खर्च केला तर शेतकऱ्यांना कर्ज देण्याची आवश्यकता भासणार नाही. परंतु सर्वात जास्त पैसा पश्चिम महाराष्ट्राकडे वळविला जातो आहे.

आमचे दुर्दैव आहे की, संबंध देशामध्ये सिंचन क्षमता 58 टक्के एवढी आहे. महाराष्ट्रातील सिंचन क्षमता फक्त 18 टक्के एवढीच आहे. कोकणामध्ये सर्वात जास्त पाऊस पडतो. संपूर्ण महाराष्ट्रात जेवढा पाऊस पडतो, त्याच्या 40 टक्के पाऊस कोकणात पडतो. संपूर्ण देशात सिंचन क्षेत्र 58 टक्के आहे. महाराष्ट्रात सिंचन क्षेत्र 18 टक्के आहे आणि कोकण विभागात फक्त 2 टक्के सिंचन क्षेत्र आहे. सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांना सांगू इच्छितो की, मी या ठिकाणी अतिशय जबाबदारीने बोलतो आहे. काही चुकीची माहिती देत असेल व तसे कोणी सिध्द करुन दाखविले तर मी या सदनातील सदस्यत्वाचा राजीनामा देईन. जो फावडा मारतो तोच माती खेचतो या गोष्टीची मला माहिती होती. मला या ठिकाणी विचारावयाचे आहे की, 5 हजार कोटी पैकी किती निधी कोकणातील सिंचन कामासाठी उपलब्ध करुन देणार आहात ? शिवशाहीच्या काळात आम्ही 35 मोठया पाटबंधारे प्रकल्पांची कामे हाती घेतली होती. दुर्दैवाने आमचे राज्य गेले. त्या 35 पाटबंधारे प्रकल्पांची कामे प्रलंबित ठेवलेली आहेत. या प्रकल्पाच्या कामांना शासनाकडून निधीच उपलब्ध करुन दिलेला नाहीत म्हणून ही कामे 1998 पासून तशीच पडलेली आहेत. कोकणाच्या लोकांनी पाप केले आहे काय ? कोकणातील लोकांनी या शासनाचे घोडे मारले आहे काय ? या प्रकल्पांच्या कामांसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

3...



श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, कोकण वैधानिक विकास मंडळास अजून मान्यता मिळत नाही. यासंदर्भात दोन वेळा विधानसभेत ठराव पास झाले, ते ठराव केंद्र शासनाकडे पाठविले. अजूनही त्या ठरावास केंद्र शासनाकडून मान्यता मिळत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आता शासनाने कोकणातील लोकांच्या माथ्यावर जैतापूर प्रकल्प आणला आहे. या प्रकल्पास विरोध करण्यासाठी आम्ही लाठया, काठया, गोळया छातीवर घेऊ. परंतु जैतापूर प्रकल्प आम्ही होऊ देणार नाही. आम्ही आमचा कोकण आमच्या डोळयासमोर उद्ध्वस्त होऊ देणार नाही ही बाब मी प्रामुख्याने या ठिकाणी सांगतो.

सभापती महोदय, कोकणासाठी 3.50 हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते, त्या पॅकेजचे काय झाले, ते पॅकेज कोठे गेले ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.......

तुम्ही कोकणात आलात, मासे खाल्ले, आंबे खाल्ले आणि कोकणासाठी 3500 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. त्या पॅकेजचा पैसा कुठे गेला? कोकणाला त्या पॅकेजमधील एक दमडी मिळाली नाही. छत्रपती शिवरायांचे नाव घेतले जाते. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात छत्रपती शिवरायांचे भव्य स्मारक अरबी समुद्रात उभे करण्यासाठी घोषणा केली होती आणि 100 कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्या स्मारकाचे काय झाले? यंदाच्या अर्थसंकल्पात त्या संदर्भात कोणताही उल्लेख केलेला नाही. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून घोषणा केल्या जातात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, फुले यांचे नाव घेतले जाते. मात्र स्वत:च्या भल्याशिवाय कोणताही विचार केला जात नाही याबद्दल मी तीव्र निषेध करतो. शेवटी मी एवढेच सांगतो की, मी भ्रष्टाचाराची 16 प्रकरणे शासनाकडे दिली आहेत. माझ्याकडे भ्रष्टाचाराची आणखी 20-25 प्रकरणे पडून आहेत. मंत्र्यांचा त्या प्रकरणांमध्ये सहभाग आहे. सभागृहात शब्द दिल्याप्रमाणे सचिवांपासून मंत्र्यांपर्यंत जे या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये सहभागी असतील त्याची माहिती माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांनी जनतेसमोर उघड करावी एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदया, सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वसामान्यांवर कोणताही कराचा बोजा न टाकता कर वसुलीवर भर दिला गेला आहे. गेले वर्षभर विक्रीकराची वसुली करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले आहेत. विक्रीकर, मुद्रांक शुल्क व उत्पादन शुल्कापासून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. कर वसुलीवर भर दिल्यामुळे आणि प्रशासकीय खर्चावर अंकुश ठेवल्यामुळे सर्वसामान्यांवर कराचा बोजा टाकण्यात आलेला नाही. या भूमिकेला सर्वसामान्यांनी दाद दिलेली आहे. जीवनावश्यक वस्तूंवर असलेली सवलत कायम ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे तांदूळ, गहू, डाळी, पीठ, मिरची, हळद आणि इतर अनेक गोष्टींवरील कर न वाढविल्यामुळे जनतेला दिलासा मिळाला आहे. सोलापूर चादरी, टॉवेल, विशेषत: गॅस सिलेंडरवर कर न लादल्यामुळे महागाईने त्रस्त झालेल्या गृहिणींना देखील दिलासा मिळाला आहे.

सभापती महोदया, मागील वर्षी महागाईचा डोंब ऊसळला होता. अर्थसंकल्पामध्ये जीवनावश्यक वस्तूंवर कर न लादल्यामुळे किंमतीमध्ये वाढ होणार नसली तरी मला एक सूचना करावयाची आहे. मागील वर्षी जी महागाई वाढली होती त्याला दलाल वर्ग कारणीभूत होता. वाशी येथील घाऊक बाजारपेठेत तूरडाळीची किंमत 55 रुपये किलो असताना मुंबईमध्ये तूरडाळ 100 रुपये किलो या दराने विकण्यात येत होती. भाज्यांबाबत तोच प्रकार झाला होता. वाशीच्या बाजारपेठेत फ्लॉवरचा 10 किलोसाठी 60 रुपये दर असताना मुंबई शहर व उपनगरात 40 रुपये प्रती किलो दराने विक्री केली जात होती. या वाढत्या किंमतीचा फायदा सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. दलाल लॉबीचा या महागाईवर प्रभाव असतो. घाऊक बाजारातील दर आणि मुंबई उपनगरातील दरामध्ये तीन पट फरक असतो. धान्य, डाळींच्या किंमती तिप्पट आकारल्या जातात. शासनाने या किंमतीवर अंकूश ठेवला पाहिजे. वाहतूक खर्च, नफा याचा विचार करुन दर निश्चित केले पाहिजेत. आज घाऊक बाजारपेठेत 30 ते 40 टक्के मालाची नासाडी होत आहे. 30 ते 40 टक्के माल फेकून दिला जातो. एकीकडे शेतकरी उन्हातान्हात राबतात, मेहनत करतात आणि दुसरीकडे अशाप्रकारे शेतीमालाची नासाडी होत आहे. आपण अन्न हे पूर्णब्रम्ह मानतो. त्यामुळे शेतीमाल व अन्न पदार्थाची नासाडी करणाऱ्यांवर कडक कारवाई केली पाहिजे. ग्राहक जी वाढीव किंमत देतो त्यातील फायदा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. भाव चढे ठेवण्यासाठी जीवनावश्यक वस्तूंची नासाडी केली जाते.

नंतर 3एस.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले..... 17:30

श्रीमती विद्या चव्हाण ......

मालाची साठवण करुन काळा बाजार करणाऱ्या साठेबाजांवर कारवाई केली तरच महागाई नियंत्रणात येऊ शकते व यासाठी शासनाची इच्छाशक्ती असली पाहिजे. तसेच देशी व विदेशी मद्यावरील करामध्ये शासनाने वाढ केली, ही गोष्ट चांगली आहे. कारण मद्य हे आरोग्याला हानीकारक असते आणि त्यात वाढ केली तर सामान्य व गरीब माणसाला सुख दु:ख नसते म्हणून ही वाढ योग्य आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात शासनाने अनेक महत्वपूर्ण योजना, विकास कामे तसेच नवीन उपक्रमांसाठी तरतूद केली आहे. तसेच आवश्यक असेल त्या योजना समर्थपणे राबविण्याबाबत शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. अशा काही महत्वाच्या व ठळक वैशिष्ट्यांवर शासनाला भर द्यावा लागणार आहे. त्यात घर, शिक्षण, आरोग्य आणि शेती यासंबंधी मी थोडक्यात बोलणार आहे.

महोदय, दिवसेंदिवस शहरीकरण मोठ्या प्रमाणावर वाढत असून त्यामुळे शहरांचा बकालपणा समोर येऊ लागला आहे. दैनंदिन जीवनात अनेक प्रश्नही त्यामुळे निर्माण झाले आहेत. त्यात वाहतुकीची समस्या, घरांचा प्रश्न अशा अनेक समस्या आहेत. राज्यातील निवडक शहरात महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती वर्षात शासनाने 12 प्रकल्पांना मंजुरी दिली आहे व त्यासाठी 250 कोटीची तरतूद सुध्दा केली आहे. मुंबईतील नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातील टप्पा क्र.1 साठी शासनाने 2500 कोटीची कामे हाती घेतली व त्यापैकी सन 2010 पर्यंत 2000 कोटी एवढी रक्कम खर्च झाली. पुढील टप्प्यासाठी 614 कोटी आणि एमएमआरडीए कडून 1400 कोटी मिळून ही कामे जलद गतीने होणे आवश्यक आहे. तसेच मुंबईत वाहतुकीचाही प्रश्न मोठ्या प्रमाणावर समोर आलेला असून आज लोकलने प्रवास करणे कठीण झाले आहे. लोकलच्या गर्दीतून प्रवास करणे किती कठीण असते हे माननीय मुख्य मंत्री महोदयांनी दादर, कुर्ला किंवा अंधेरी येथील रेल्वेच्या पुलावर 15 मिनिटे तरी उभे राहून प्रत्यक्ष पहावे जेणेकरुन त्यांच्या लक्षात येईल की, मुंबईत लोकलने प्रवास करणारे लोक किती कठीण परिस्थितीत दररोज आपला जीव धोक्यात घालून प्रवास करतात. त्यातून दरवर्षी या लोकलच्या प्रवासात 4500 लोक मृत्युमुखी पडतात तर काही लोकांना कायमचे अपंगत्व येते व हात पाय तुटलेल्या अवस्थेत ते पुढील आयुष्य जगतात. या मुंबईत गर्दी वाढते म्हणून प्रथम 9 डब्यांच्या गाड्या, त्यानंतर 12 डब्याच्या गाड्या आणि नंतर 15 डब्याच्या गाडया करण्यात आल्या. पण असे करुन फक्त प्लॅटफार्म अडविले जातात, गर्दीत

....2....

31-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3S-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ......

काहीही फरक पडणार नाही. त्यासाठी मुंबई शहरात नियोजित मेट्रो प्रकल्पाला चालना देणे आवश्यक असून त्यात वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या पहिल्या टप्प्याचे काम जलद गतीने होणे आवश्यक आहे. त्यानंतर चारकोप-वांद्रे-मानखुर्द या दुसऱ्या टप्प्याच्या कामासाठी 1532 कोटी रुपये मंजूर केले ते काम तातडीने करण्याची गरज आहे.

महोदय, मुंबई ही राज्याची राजधानी असली तरी देशाची आर्थिक राजधानी मानली जाते. असे असताना या शहरातील वाहतूक प्रकल्प निधीअभावी रखडले जाणे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. माझी अर्थमंत्र्यांना विनंती आहे की, 1 कोटी 30 लाख लोकसंख्या असलेल्या मुंबई शहराचा कोणताही प्रकल्प निधीअभावी अडू नये याची दक्षता घ्यावी. या शहरातील वाहतुकीचा विचार केला तर दररोज 65 लाख लोक लोकल ट्रेनने तर 40 लाख लोक बेस्ट बसने प्रवास करतात. हा प्रवास करीत असताना सकाळी गाडी मिळाल्यानंतर आणि संध्याकाळी घरी पोहचल्यानंतर त्या माणसाचा जीव भांड्यात पडतो अशी परिस्थिती आहे. आपण केवळ वांद्रे-वरळी सागरी सेतूवर कोट्यवधी रुपये खर्च करतो पण सर्वसामान्य माणसे, जे लोकलने प्रवास करतात त्यांचा विचार करणेही तितकेच गरजेचे आहे. यासाठी केवळ रेल्वे मंत्रालय अथवा माननीय रेल्वे मंत्री श्रीमती ममता बॅनर्जी यांना दोष देऊन चालणार नाही. कारण आपल्या राज्यातून, एकट्या मुंबईतून 60 टक्के महसूल आपण दिल्लीला देतो पण त्याच्या बदल्यात मुंबईला अधिक सुविधा सुध्दा मिळाल्या पाहिजेत. म्हणून मुंबईतील मेट्रो प्रकल्प 7-8 वर्षे निधीमुळे रखडले आहेत त्याकडे शासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. या निमित्ताने मी शासनाला सूचना करणार आहे की, नुसतेच पैसे देऊन चालणार नाही तर किमान पंधरा दिवस किंवा महिन्यातून तरी या मेट्रो प्रकल्पाचे काम कुठपर्यंत आले याची पाहणी करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड ....

श्रीमती विद्या चव्हाण ...

हे प्रकल्प वेगाने का होत नाहीत, त्यांच्यासाठी निधीची कमतरता असेल तर ती सुध्दा तातडीने भरुन काढण्यात आली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. मुंबई शहराला समुद्र किनारा लाभला आहे.समुद्र मार्गाने प्रवास करण्यासाठी हावर क्राफ्टची सुविधा उपलब्ध करुन दिली तर वाशी, बांद्रा वा बोरिवलीहून तातडीने व्यक्ती मुंबईला पोहोचू शकेल असे मला वाटते.या जलवाहतूकीसाठी मोठया प्रमाणावर खर्च देखील करावा लागणार नाही. रस्त्याने प्रवास करावयाचा असेल तर वाहनासाठी पेट्रोल आणि डिझेल वापरावे लागेल व त्याचे दर सतत वाढत असल्यामुळे ती वाहतूक महाग पडते. त्यामुळे मध्यंतरी हावर क्राफ्टची वाहतूक सुरु केली होती परंतु नंतर ती सोय बंद पडली होती तेव्हा ही सोय सर्व सामान्य माणसांसाठी उपलब्ध करुन दिली तर लोकलवरील ताण थोडा कमी होण्यास मदत होईल.

सभापती महोदय, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियानांतर्गत नागरी पायाभूत सुविधा निर्मितींसाठी केन्द्र सरकारने 12 हजार 489 कोटी रुपयांचे 93 प्रकल्प मंजूर केलेले आहेत. 86 मध्यम व लहान शहरांच्या पायाभूत सुविधांच्या विकास कार्यक्रमासाठी 2 हजार 700 कोटी रुपयांच्या 94 प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. तसेच ड वर्ग महानगरपालिका व नगरपालिकांना दर सूचीतील फरकाच्या 50 टक्के रक्कम अनुदान स्वरुपात दिली जाणार आहे.त्यासाठी 400 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. त्यातून गावापर्यत विकास पोहोचण्यास मदत होणार आहे.तसेच जेएनयुआरएम मार्फत "शहरी गरिबांना मुलभूत सुविधा" व इतर 84 शहरामध्ये "एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून
झोपडपट्टयांचा विकास होईल. या योजनेतून 36 हजार 913 घरकुले बांधण्यात आली असून 83 हजार 951 घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत यासाठी 2 हजार 396 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. या देशाच्या आर्थिक राजधानीत केवळ राज्यातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून लोक येत असतात. मुंबई शहरात 16 टक्के लोक चाळीमध्ये राहतात.65 लाख लोक झोपडपट्टयांमध्ये राहतात.सगळयांनाच मोफत घरे देणे हे शासनाला शक्य नाही हे आपणा सर्वाना माहीत आहेच. या शहरातील आणि उपनगरातील ठरावीक भागात गरीब लोक मोठया संख्येने राहतात. मुंबई शहराची अशी विभागणी झालेली आहे की मलबार हिल, बांद्रा, पाली हिल या सारख्या भागात अत्यंत श्रीमंत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ...

लोक राहतात तर दादर, लालबाग परळ सारख्या भागामध्ये मध्यमवर्गीय लोक राहतात आणि धारावी, कुर्ला ,मानखूर्द या भागामध्ये गरीब आणि कष्टकरी लोक मोठया प्रमाणावर राहतात. त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर झोपडपट्टया आहेत. अशा विभागामध्ये राहणा-या लोकांना मोफत घरे देण्याऐवजी त्यांना नागरी सुविधा देऊन झोपडपट्टया विकसित केल्या तसेच या शहराचा व्यवस्थित प्लॅनक रुन त्यांना भाडे तत्वावर घरे उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये शौचालये, स्नानगृहे, पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी हे पैसे खर्च करण्यात आले तर अधिक बरे होईल. आज कष्टकरी आणि गरीब लोकांना नाईलाजास्तव झोपडपट्टयांमध्ये व घाणीच्या साम्राज्यामध्ये रहावे लागते.

सभापती महोदय, बाल कामगाराना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पा अंतर्गत 15 जिल्हयात 336 शाळा चालविल्या जातात. त्यासाठी या वर्षी 16 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई, नागपूर व पुणे या शहरातसुध्दा रस्त्यावर फिरणारी जी लहान लहान अनाथ मुले आहेत त्यांना शेल्टर उभारण्याची, त्यांचे पालन पोषण करण्याची तसेच त्यांच्या शिक्षणासाठी शासनाने जबाबदारी घेतली पाहिजे. मुंबई महानगरपालिकेचे बजेट 25 हजार कोटी रुपयांचे आहे . मी नगरसेविका असल्यामुळे बाल कामगारांसाठी जास्त जास्त निधी देण्यात यावा अशी मी त्यांच्याकडे सुध्दा मागणी केली आहे. बालकामगार नको असे आपण नेहमी म्हणत असतो. परंतु कोणतीही गोष्ट केवळ " नको " म्हणून चालत नाही तर ती नाहीशी करण्यासाठी पर्याय देणे आवश्यक आहे. तेव्हा बाल कामगारासाठी तसा पर्याय शासनाने उपलब्ध करुन दिला पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, संजय गांधी निराधार योजना व इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजनेच्या माध्यमातून वृध्द निराधार व्यक्तीसाठी 380 कोटी रुपयांची तरतूद केली आहे अनुसूचित जाती व नवबौध्दाच्या दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी 800 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून ती अतिशय महत्वाची आहे. तसेच भटक्या विमुक्त जातीच्या लोकांना मुख्य प्रवाहात आणून त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना यातील दारिद्रय रेषेखालील लोकांना जमीन उपलब्ध करुन देऊन घरे बांधण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. या समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळाल्यास त्या मुलांचे भविष्य उज्ज्वल होईल त्यांच्या घरासाठी 20 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मागासवर्गीय मुलामुलीसाठी 271 वसतिगृहे असून

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ...

त्यातील 189 वसतिगृहे भाडयाच्या इमारतीमध्ये आहेत. पुरेशी वसतिगृहे उभारण्यासाठी 135 कोटी रुपयांची तरतूद केली आहे ती खरोखरच आवश्यक होती.आदिवासी विद्यार्थ्याची शाळेतील गळती रोखण्यासाठी, नियमित उपस्थिती वाढण्यासाठी, त्यांचा शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी सुवर्ण महोत्सवी अदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेसाठी 224 कोटी 97 लाख रुपयांची तरतूद केली आहे.आश्रमशाळेमध्ये निवासी सुविधा देण्यासाठी , शैक्षणिक सुविधा तसेच इमारतीसाठी 196 कोटी 12 लाख रुपयाची तरतूद केली आहे. अल्पसंख्याकाच्या सर्वांगीण विकासासाठी 275 कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

खेडेगावामध्ये राहणाऱ्या गरीब लहान मुलांना अभ्यास कुठे करावा हा प्रश्न असल्यामुळे ग्रामीण भागामध्ये ग्रामपंचायतीमार्फत त्यांच्याकरिता सौर ऊर्जेच्या सहाय्याने सामुदायिक अभ्यासिकेची सोय उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता होती. ही बाब लक्षात घेऊन शासनाने त्यांच्याकरिता एक चांगली व्यवस्था निर्माण केली आहे.

त्याच प्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत आदिवासी ग्रामीण भागातील, नागरी प्रकल्पातील व अंगणवाडयातील 67 लाख 88 हजार बालकांना, गरोदर स्त्रिया,स्तनदा माता यांना दररोज देण्यात येणाऱ्या पूरक पोषण आहाराच्या भत्त्यामध्ये 1 रुपयांची करण्यात आलेली वाढ फार महत्वाची आहे. त्यासाठी 211 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी महिला आयोगाच्या सहमतीने जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा स्तरावर समुपदेशन केंद्र सुरु करण्याकरिता अर्थसंकल्पामध्ये सर्वात महत्वाची व अत्यंत आवश्यक असलेली तरतूद करण्यात आली आहे. महिलांना अत्याचार, बलात्कार, छेडछाड, भ्रूण हत्येला सामोरे जावे लागते इतकेच नाही तर अनेक वेळा स्त्रीवर मातृत्व लादले जाते. या करिता स्त्रीला शिक्षित करणे, कुटुंब नियोजनाचे महत्व पटवून देणे, तो तिचा अधिकार आहे हे तिला समुपदेशनातून सांगणे आवश्यक आहे. आपण अनेक विषयांवर चर्चा करतो. परंतु संपूर्ण देशामध्ये आपण कुटुंब नियोजनाचे महत्व लोकांना पटवून देत नाही, प्राधान्य देत नाही. आज शहरामध्ये बाल मजूरी, कुपोषण, झोपडपट्टया, महागाई, बेरोजगारी, भिक्षेकरी, गुन्हेगारी, ट्रेनला होणारी गर्दी असे अनेक प्रश्न भेडसावित आहेत. या सर्व समस्यांचा आपण आढावा घेतला तर त्या मागील मूलभूत प्रश्न शहराची वाढत चाललेली लोकसंख्या आहे. आपल्या देशाच्या वाढणाऱ्या प्रचंड लोकसंख्येकडे कुणाचेही लक्ष जात नाही. कै. संजय गांधी यांनी 1980 साली कुटंब नियोजनाचा जो अतिरेक केला, त्यानंतर देशातील कोणत्याही नेत्याला कुटुंब नियोजनावर बोलावे असे वाटले नाही. आज आपल्या देशाची प्रचंड लोक संख्या वाढत असतांना कुटुंब नियोजनाचा अतिरेक न करता देशाची असलेली गरिबी याचे मूळ कारण प्रचंड लोकसंख्या हेच आहे हे आपण लोकांना सांगितले पाहिजे. या करिता कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम युध्द पातळीवर राबविला पाहिजे. सुशिक्षित मध्यमवर्गीय कुटुंबे हे आपल्याला एक किंवा दोन मुले होऊ देतात. परंतु मुंबई शहरामध्ये आज भीक मागणे हा एक धंदा झाला आहे. गरिबीचे, लाचारीचे प्रदर्शन करुन व लहान मुलांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्रीमती विद्या चव्हाण ....

अपंग करुन त्याला भीक मागायला लावून त्याचे भविष्य अंधकारमय करणाऱ्या त्याच्या आई-वडिलांना तुरुंगात पाठविले पाहिजे. यासाठी आपण कायदे कडक केले पाहिजेत. आपण पहातो की, आज काल महिला आपल्या जवळील लहान मुलाला हातामध्ये घेऊन रस्त्यावर, ट्रेनमध्ये भीक मागत असतात ते त्यांचे ढोंग असते, नाटक असते अशा प्रकारे लहान मुलांना बरोबर घेऊन पैसे कमाविणे हाच त्यांचा धंदा झालेला आहे. या भीक मागणाऱ्यांना आपण भिक्षेकरी गृहामध्ये पाठविले पाहिजे. पूर्वी या देशामध्ये भिक्षेकरी गृह अस्तित्वात होते त्या ठिकाणी भिकाऱ्यांना पाठविले जात होते. आपण आज काल पहातो की, सिनेमामधून कुपोषण आणि झोपडपट्टयांचे विदारक चित्र दाखविले जाते. आपल्याला गरिबीचे व दारिद्रयाचे उच्चाटन करावयाचे असेल तर या सर्व गोष्टी करणे आवश्यक आहे. या करिता जर कुणाला मुलगी झाली तर त्याला बक्षीस देण्यासाठी योजना केली पाहिजे.

सभापती महोदया, युवा व क्रीडा धोरणासाठी शासनाने 25 कोटींची तरतूद केली आहे. तसेच, नागपूरच्या क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी 40 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कुस्ती, खो-खो, व्हॉलीबॉल या खेळांसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानासाठी 50 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदया, मुंबईच्या तीन मुलींना राष्ट्रीय पातळीवर जिम्नॅस्टिकमध्ये सात सुवर्ण पदके मिळाली आहेत, चार सिल्व्हर व दोन ब्राँझ पदके मिळाली आहेत. यामध्ये अक्षता शेटये या मुलीला चार सुवर्ण पदके मिळाली, क्षिप्रा जोशी या मुलीला तीन सुवर्ण पदके, दोन सिल्व्हर व एक ब्राँझ मेडल मिळाले आहे. सदिच्छा कुलकर्णी हिला एक सिल्व्हर व एक ब्राँझ मेडल मिळाले आहे. या मुलींनी कॉमनवेल्थ जागतिक स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन पदके मिळविल्यानंतर त्यांचे कुठेही कौतुक करण्यात आले नाही. या खेळासाठी लागणाऱ्या बेसिक इन्फ्रास्ट्रक्चरची सुविधा मुंबई शहरामध्ये करण्यात आलेली नाही. परंतु पुण्यामध्ये या खेळासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मागील वर्षी नागपूर अधिवेशनामध्ये त्यांना सांगण्यात आले होते की,तुम्हा मुलांना आणि मुलींना वेगवेगळा छत्रपती पुरस्कार नक्की देऊ. या बाबत आश्वासन दिल्यानंतर आणि त्या बाबतची फाईल माननीय मुख्यमंत्र्यांकडे मान्यतेसाठी गेल्यानंतर आम्ही अशाप्रकारचा ॲवॉर्ड तुम्हाला देणार नाही असे सांगितले गेले, ही एक दुर्दैवाची गोष्ट आहे. या खेळासाठी एक 35 फूट आकाराचा इनडोअर हॉल उपलब्ध असावा लागतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण . . ..

पुणे येथे बालेवाडीमध्ये छत्रपती क्रीडा संकुलामध्ये शासनाने याबाबत व्यवस्था करुन दिलेली आहे. तशा प्रकारची व्यवस्था मुंबईमध्ये देखील करण्याची आवश्यकता आहे. कारण जिम्नॅस्टीकला "मदर ऑफ गेम" असे म्हटले जाते. त्यामुळे मुंबईमध्ये देखील अशी व्यवस्था केली तर बरे होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, मी आता केवळ एक मिनिटांमध्ये भाषण संपविणार आहे. शेतीतील वाढलेल्या विकास दरामुळे देशाने जागतिक मंदीवर मात केलेली आहे. शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांचे कर्ज बिनव्याजाने दिलेले आहे आणि तीन लाखापर्यंतच्या कर्जासाठी फक्त दोन टक्के व्याज आकारण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना वेळेवर खत मिळण्यासाठी खताचा राखीव साठा करण्याकरता 51 कोटी 51 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच कृषी विमा योजना, हवामान पीक विमा योजना इ.साठी 83 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजना केलेली आहे अशा अनेक चांगल्या प्रकारच्या योजना आहेत. पर्यावरणासाठी, रस्त्यांसाठी, हॉस्पिटलसाठी योजना केलेली आहे. नांदेड येथे वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथे कॅन्सर चिकित्सालय यासाठी 5 कोटी 43 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. अशा प्रकारे या अर्थसंकल्पा मध्ये बऱ्याचशा उल्लेखनीय गोष्टी आहेत.

सभापती महोदय, आणखी एक महत्वाची बाब म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवनेरी, सिंहगड, प्रतापगड, रायगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग अशा ऐतिहासिक किल्ल्यांच्या संवर्धना साठी, ते जतन करण्यासाठी, तेथे येणाऱ्या पर्यटकांसाठी साऊंड ॲण्ड लाईट सारखी किंवा त्यांना या किल्ल्यांच्या बाबतीत माहिती मिळावी यासाठी शासनाने 23 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, ती खूपच महत्वपूर्ण आहे. तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला 25 कोटी .....

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : अरबी समुद्रामध्ये शिवाजी महाराजांचा पुतळा उभारावयाचा होता. त्याबाबतीत काय झाले ?

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, अरबी समुद्रामध्येही शिवाजी महाराजांचा पुतळा देखील होईल. या अर्थसंकल्पामध्ये राज्यातील जे किल्ले आहेत त्यासाठी तरतूद केलेली आहे.

**तालिका सभापती (ॲड.उषाताई दराडे)** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छिते की, अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना भाषण करावयाचे आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी त्यांचे भाषण पुढे सुरु करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महाराज, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे लाडके दैवत गणपती आहे. या राज्यातील अष्टविनायक मंदिरासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे आणि तसे करणे हे लाखो भक्तांसाठी फार गरजेचे आणि उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे तीर्थक्षेत्र देहू, आळंदी, गजानन महाराज यांचे तीर्थक्षेत्र असून त्याठिकाणी गरीबांसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी खूप चांगल्या प्रकारे काम करण्यात येत आहे. त्यासाठी सुध्दा 55 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. संत गाडगे महाराजांचे समाधी स्थळ विकसित करण्यासाठी तेथेही शासनाने खूप व्यवस्था केलेली आहे. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या पापळ जि.अमरावती यासाठी सुध्दा 5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, दुसरी आनंदाची गोष्ट सांगावयाची तर मराठी भाषेशी निगडित असलेल्या संस्था आणि मंडळे ही एकाच छत्राखाली आणण्यासाठी स्वतंत्र मराठी भाषा विभाग स्थापन केला आहे. एवढेच नाही तर महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागामध्ये मराठी भाषेच्या विकासासाठी सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालयासाठी 3 कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे. तसेच मराठी सांस्कृतिक कार्यक्रम, लोकनाट्य अशा वेगवेगळया विषयांच्या बाबतीत माननीय अर्थमंत्र्यांनी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. फक्त याचे व्यवस्थापन खूप चांगल्या प्रकारे होईल अशी आपण सर्वजण अपेक्षा करु या. धन्यवाद.

-----

. . . .3 व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, राज्य शासनाच्या वतीने 2011-2012 या आर्थिक वर्षाचे जे अंदाज पत्रक मांडण्यात आलेले आहे, त्यावरील चर्चेमध्ये मला माझे विचार मांडण्यासाठी संधी उपलब्ध करुन दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, शिक्षण आणि शिक्षक व कृषी आणि शेतकरी याबद्दल या सदनामध्ये चिंता व्यक्त करण्यात येते. त्याबाबत गंभीरपणे बोलले जाते. पंरतु त्यानुसार कृती मात्र केली जात नाही ही दु:खाची बाब आहे. आम्ही शेतीला जोपर्यंत उद्योगाचा दर्जा देणार नाही तोपर्यंत आम्ही येथे चिंता व्यक्त करणे व्यर्थ आहे हे मी अत्यंत नम्रपणे याठिकाणी सांगू इच्छितो.जोपर्यंत या राज्या- मध्ये जन्माला येणारा विद्यार्थी बालक राज्याची, राष्ट्राची संपत्ती आहे असे जोपर्यंत आम्ही मानणार नाही तोपर्यंत कुपोषण, बालमजदूरी आणि शिक्षणाची दुर्दशा आम्ही दूर करु शकणार नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे...... 17:50

श्री. नागो गाणार.....

एकीकडे शिक्षणाचा अधिकार आम्ही मान्य केला. 6 ते 14 वर्षे वयोगटातील बालकाला मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची घटनात्मक तरतूद राबविण्याची आम्ही घोषणा केली. पण आजही 6 ते 14 वर्षे या वयोगटातील बालकांच्या पालकाडून शुल्काच्या रुपात पैसे घेणे सुरु आहे. म्हणून घोषणा करुन प्रश्न मिटत नाहीत. आजही तीन हजारापेक्षा जास्त शाळा या राज्यात अशा आहेत की जेथे साधा फळा आणि खडू नाही. फळा आणि खडू नसलेल्या शाळा अस्तित्वात असणे, ही सन्मानाची बाब आहे काय? पिण्याचे पाणी नाही, स्वच्छतागृहे नाहीत. वर्गखोल्या नाहीत की, जिथे विद्यार्थी स्वस्थपणे बसू शकतील. एक शिक्षकी आणि दोन शिक्षकी शाळा आहेत. या शाळांच्या बाबतीतील कायम हा शब्द शासन काढू शकत नाही.

सभापती महोदय, आर्थिक त्रुटीच्या नावाखाली शिक्षण सेवक ही योजना आणण्यात येते आणि वेठबिगारी प्रस्थापित करण्यात येते, तीन हजार रुपये शिक्षकाला शिक्षण सेवक म्हणून देतो, याची लाज शासनाला वाटत नाही, हे आमचे दुर्भाग्य आहे. आश्रमशाळेच्या बाबतीत तर विचारुच नका. मुलांना सकाळचे जेवण 11.30 वाजता मिळते तर संध्याकाळचे जेवण 7.30 वाजता मिळते. दोन जेवणामधील अंतर 16 तासाचे आहे. सकाळी 11.30 वाजता जेवलेला मुलगा संध्याकाळी 7.30 वाजता जेवतो आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा 11.30 वाजता जेवतो. दोन पाळीत शाळा असते. आश्रमशाळेतील शिक्षकांना कधीही महिन्याचे वेतन दिले जात नाही. वर्षातून तीन किंवा चार वेळा वेतन दिले जाते, ही दुर्दशा आहे. स्वच्छतागृहे नाहीतच. विद्यार्थी उघडयावर स्नान करतात. ही दुर्दशा दूर करणे हे शासनाचे काम आहे. शिक्षणाच्या बाबतीत शासनाने आर्थिक टंचाई सांगू नये. सेकंडरी स्कुल कोडमध्ये शासनाने नॉन सॅलरी देण्याचे कमिटमेंट केले आहे. दिनांक 1 एप्रिल, 2004 पासून शासनाने ही जबाबदारी पार पाडली नाही आणि पार पाडण्याची इच्छा कुठेही या अर्थसंकल्पात दिसत नाही. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवर टाकलेली बंदी उठविण्याची शासनाची इच्छा दिसत नाही. शिक्षण सेवक योजना कायम ठेवण्याचा तकादा सरकारचा दिसतो आणि दुसरीकडे मात्र आम्ही मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या गोष्टी करतो. सभापती महोदया, या निमित्ताने मी आपणास आणि या सभागृहाला विनंती करु इच्छितो की, शेतीला उद्योगाचा दर्जा दिला गेला पाहिजे आणि बालकाला राष्ट्रीय संपत्ती समजून अर्थसंकल्पामध्ये तरतुदी केल्या पाहिजे

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो गाणार....

तर आणि तरच आम्हाला महात्मा फुलेंचे नाव घेण्याची नैतिकता राहील. महात्मा ज्योतिबा फुले यांनी हंटर कमिशनपुढे जे निवेदन सादर केले होते, त्याचे अवलोकन आम्ही केले तर समस्या सोडविण्याचा मार्ग आणि दिशा आम्हाला मिळू शकेल. धन्यवाद.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंत जाधव ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, अनेक महानुभावांचे विचार ऐकल्यानंतर या अर्थसंकल्पाचे मी स्वागत करतो. "जो जे वांछिल तो ते लाहो" या उक्ती प्रमाणे आदरणीय उप मुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार यांनी हा अर्थसंकल्प मांडलेला आहे. हा अर्थसंकल्प मांडताना राज्यातील सर्वसामान्य व्यक्तीपासून उद्योग व्यवसाया पर्यंत सर्वांचा वैशिष्टयपूर्ण असा विचार करत प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार यांनी अतिशय प्रामाणिकपणे केलेला आहे, याचे मला मनापासून कौतुक करावेसे वाटते.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव .....

उद्योग व सेवा क्षेत्रातील यशाला कृषी क्षेत्रातील प्रगतीची जोड मिळाल्यास आपले राज्य शाश्वत अशा आर्थिक विकासाकडे वेगाने प्रगती करील असा उदात्त संकल्प उराशी बाळगत माननीय अर्थ मंत्र्यांनी हा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथीसाहेब यांना सांगू इच्छितो की, आपण अनेकदा समाजामध्ये पाहतो की, चांगल्याला चांगले म्हणतातच असे काही नाही. आपल्यासारखे वरिष्ठ सदस्य या सभागृहामध्ये आहेत आणि आपण न्यायाची बाजू सुध्दा सांगितली आणि ज्या ठिकाणी आपण कमी पडतो त्या ठिकाणी काय केले पाहिजे याचा विचार आपण या ठिकाणी व्यक्त केलेला आहे. परंतु अनेकदा हे यांनी सांगितले आहे म्हणून चुकीचे आहे असा विचार केला जातो. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल आता या ठिकाणी उपस्थित नाही. मी एक संस्कृत सुभाषित सांगणार आहे ते सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना त्यांच्या सहकाऱ्यांनी उद्या सांगावे.

"निन्दन्तु नीतिनीपुणा यदि वा स्तुवन्तु
लक्ष्मी: समाविशतु गच्छतु वा यथेष्टम्
अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा न्यायात्पथ:
प्रविचलन्ति पदं न धीरा: "

याचा मराठीत अर्थ असा आहे की, ज्यांना काही चांगले काम करावयाचे आहे ते विरोधकांच्या मतमतांतराची पर्वा करीत नाहीत. सारासार विचाराने न्याय वाटलेली बाजू ते स्वीकारतात आणि न्याय मार्ग अनुसरणे हेच त्यांच्या दृष्टीने परम् कर्तव्य असते. ते परम् कर्तव्य आपल्या अर्थमंत्र्यांनी या ठिकाणी मांडलेले आहे. त्याचा कोठे तरी आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, राज्यावर किती रुपयांचे कर्ज आहे, किती मोठे संकट आहे या बाबत अनेक वेळा या ठिकाणी उल्लेख होतो. पण या मोठ्या संकटाला सुरुवात कोणी केली ? परवा सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, त्यांना लहानपणची गोष्ट आठवली. एक जादूगार या बोटावरची थुंकी त्या बोटावर कसे करीत होता, हे त्यांना आठवले. तशाच पध्दतीने मला सुध्दा माझ्या लहानपणची गोष्ट आठवली. आम्ही ज्या वेळी कबड्डी खेळत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. जयवंतराव जाधव ...

होतो आणि स्पर्धा असावयाची तेव्हा आपल्याला कोठे तरी दुखापत व्हावयाची, जखम व्हावयाची. ती जखम बरी होत नाही तोच पुढची स्पर्धा यावयाची आणि परत खेळताना लागावयाचे. परंतु दुर्दैवाने म्हणा किंवा सुदैवाने म्हणा, तीच जखम परत भळाभळा वाहू लागायची. ती जखम चिघळाची. या राज्याच्या डोक्यावर तुम्ही निर्माण केलेले कर्ज आज इथपर्यंत कसे आले ? ज्या वेळी आपण राज्यावर कर्ज निर्माण केले ते कशा पध्दतीने निर्माण झाले ? 377 कोटी रुपये असलेला शेवटचा अर्थसंकल्प होता तो साधारणत: 7972 कोटी रुपयांपर्यंत गेला. मग या 7972 कोटी रुपयांचे नियोजन पुढच्या अर्थसंकल्पामध्ये कशा पध्दतीने कमी होऊन या राज्यावरचे संकट कसे दूर होणार आहे याची तजवीज करण्याचा त्या वेळी आपण कधी विचार केला होता का ? त्या वेळी आपण हा विचार अजिबात केला नव्हता. म्हणून आपण निर्माण केलेले हे पाप आज आम्हाला या ठिकाणी भोगावे लागत आहे.

सभापती महोदय, आज मला माननीय अर्थ मंत्र्यांचे विशेष कौतुक यासाठी करावेसे वाटते की, ज्या वेळेस हा कर्जाचा डोंगर वाढता वाढता आपला खर्च 70 टक्क्यापर्यंत गेला आणि विकासावर खर्च करण्यासाठी फक्त 30 टक्के निधी उपलब्ध आहे त्या वेळी त्या 30 टक्क्यामध्ये समाजातील प्रत्येक घटकाचे कशा पध्दतीने समाधान करता येईल ही एक मोठी तारेवरची कसरत होती आणि ती तारेवरची कसरत माननीय अर्थ मंत्र्यांनी पार पाडलेली आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, आता 6.00 वाजलेले आहेत. कृष्णा खोऱ्याच्या संदर्भामध्ये ज्या ठिकाणी अपील करावयाचे आहे ते कार्यालय संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत उघडे होते. या संदर्भात निवेदन करण्यासाठी शासन समोर येत नाही. जर अपील केले नाही तर 50 वर्षे महाराष्ट्राला पाणी मिळणार नाही. इतका गंभीर विषय असतानाही निवेदन करण्यासाठी महाराष्ट्र सरकार पुढे येत नाही. 6.00 वाजेपर्यंत मी वाट बघत आहे. सकाळी सभागृहाचे कामकाज सुरु होताच मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करुन याची आठवण करुन दिली. माननीय सभापतींनी प्रश्नोत्तराचा तास बाजूला सारुन या विषयाचे महत्व ओळखून मला माझा औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली. माननीय सभापती महोदय हे पश्चिम महाराष्ट्रातील, कृष्णा खोऱ्यातील आहेत. अजूनही सरकार काही बोलत नाही. हे काय चालले आहे ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आता जो विषय उपस्थित केला आहे, त्या बाबतची माहिती घेऊन सभागृहाला अवगत करण्यात येईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.**: सन 2011-12 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा ( चर्चा पुढे सुरु.....

**तालिका सभापती (ॲड.उषा दराडे)** : सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, अर्थसंकल्पातील अनेक बाबींवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडलेली आहेत. माझ्याजवळ सुध्दा काही आकडेवारी आहे, पण ती वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. या अर्थसंकल्पात सर्वसामान्य जनतेला लागणाऱ्या कोणत्याही वस्तूंवर माननीय अर्थमंत्र्यांनी करवाढ सुचविलेली नाही. या अर्थसंकल्पातून प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. त्यामुळे याची कोठे तरी नोंद होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, ज्यावेळी कांद्याला 1 हजार क्विंटल इतका भाव मिळत होता, त्यामुळे काही काळ तरी शेतकऱ्यांना न्याय मिळत होता. पण त्यावेळी कांद्याची निर्यात थांबविण्यात यावी हे सांगणारे कोण होते ? मध्यमवर्गीयांनी कांद्याच्या विषयाला जीवन मरणाचा प्रश्न बनविला होता. कांदा खाल्ला नाही तर सर्वसामान्य लोक मरुन जातील असे त्याला स्वरुप दिले होते. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना मी सांगू इच्छितो की, आपले भाषण आम्ही गांभीर्यपूर्वक ऐकले आहे. आपण शासनावर केवळ टीका करीत नव्हता तर काही सूचना देखील करीत होता. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी सरकारवर टीकाच करावयाची म्हटले तर त्याच्यातून काही साध्य होत नाही आणि मार्ग सुध्दा निघणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी बिहार सरकारचे उदाहरण दिले. बिहारचे मुख्यमंत्री श्री.नितीशकुमार यांनी अधिकाऱ्यांनी केलेला भ्रष्टाचार सिध्द झाल्यास त्या अधिका-यांची संपूर्ण मालमत्ता व त्यांच्या नातेवाईकाच्या मालमत्तेसह जप्त करण्याचे विधेयक मंजूर करुन घेतले आहे. जर महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराची प्रकरणे पाहिली तर एसीबीच्या ट्रॅपमध्ये सापडलेले अधिकारी 6 महिन्याच्या आत न्यायालयाकडून निर्णय घेऊन पुन्हा कामावर रुजू होतात. त्यामध्ये शासन काही बदल करु शकेल काय, न्याय व्यवस्थेत बदल करण्याचे पाऊल उचलले जाईल काय, या सूचनेबाबत शासनाने गंभीरपणे विचार करावा. अनेक शासकीय कर्मचारी, अधिकारी कामात कुचराई करीत असतात.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव...

जे अधिकारी काम करीत नाहीत, कामामध्ये कुचराई करतात अशा अधिका-यांना दंड ठोठवणारे विधेयक बिहार सरकारने मंजूर केलेले आहे. तसेच जे अधिकारी जनतेला सेवा देण्यामध्ये तत्पर नाहीत, उदा. लोकांना शिधापत्रिका द्यायची असेल, वीज जोडणी द्यायची असेल, पासपोर्ट द्यायचा असेल, ना हरकत प्रमाणपत्र द्यायचे असेल, जातीचे प्रमाणपत्र द्यायचे असेल, अशा कामामध्ये जो कोणी अधिकारी अथवा कर्मचारी दिरंगाई करील त्याला 250 रुपयापासून 5000 रुपयापर्यन्त दंड ठोठावून ती रक्कम त्याच्या पगारातून वसूल करण्याची तरतूद करणारे विधेयक बिहार विधानसभेने मजूंर करुन घेतलेले आहे. त्यामुळे तेथील जनतेच्या दैनंदिन गरजा पूर्ण होत आहेत. अशा त-हेचे काम बिहार राज्यामध्ये होत असताना आपल्या राज्यामध्ये देखील त्या दृष्टीने आमूलाग्र बदल केला पाहिजे. हा बदल आपण केला तरच आपल्या राज्यावरचे कर्ज आपण कमी करु शकू. अपवादाने का होईना विरोधकांनी देखील सत्तेची चव चाखलेली आहे. सत्तेला जशी उब असते तशी धगही असते. विरोधी पक्षाने उब अनुभवलेली आहे परंतु सत्ताधारी पक्षातील महानुभवांनी धग अनुभवलेली आहे. मला या निमित्ताने सदनातील सर्व ज्येष्ठ आणि श्रेष्ठ सन्माननीय सदस्यांना विनंती करुन सांगायचे आहे की, आपण नाहक टीका करत राहाण्यापेक्षा आदर्श महाराष्ट्र निर्माण करण्याकरिता सर्वांनी प्रयत्न करु या एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, अर्थ संकल्पावरील चर्चेत सहभागी होण्यासाठी मी पहिल्या दिवशी माझे नाव दिले होते. मला अद्याप बोलण्याची संधी मिळालेली नाही.

**तालिका सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, 2011-2012 या वर्षाचा अर्थसंकल्प या सभागृहात माननीय वित्त राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी मांडलेला आहे. या अर्थसंकल्पाच्या संदर्भात माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदया, या अर्थसंकल्पाच्या बाबतीत सत्ताधारी पक्षाचे आणि विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते व्यक्त केलेली आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पाचे समर्थन केले आहे, काही सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पातील काही त्रुटी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. शासनाच्या चांगल्या गोष्टीबद्दल सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी तसेच विरोधी पक्षाच्याही काही सदस्यांनी अभिनंदनही केले आहे. मी काही महत्वाच्या मुद्यांबाबत माझे मनोगत व्यक्त करणार आहे. अर्थसंकल्प वाचल्यानंतर दोन, तीन महत्वाचे मुद्दे माझ्या निदर्शनास आले आहेत. राज्याच्या अर्थसंकल्पाचे स्थूल आकारमान 1 लाख 54 हजार 124 कोटी रुपयांचे आहे आणि राज्य योजनेचे आकारमान ते 41 हजार 500 कोटी रुपयांचे आहे. परंतु या राज्यावर जे काही कर्ज आहे, त्या कर्जाचा विचार केला तर शासनावर 2 लाख 26 हजार 926 कोटी रुपयांचे कर्ज आहे. या राज्यावरील कर्जाच्या बाबतीत या सभागृहाचा सदस्य म्हणून सर्वसामान्य जनतेकडून विचारणा होत आहे. या कर्जाच्या बाबतीत पूर्वीच्या शासनावर दोष दिलेला असला तरी सुध्दा या कर्जाबद्दल सर्वांच्या मनामध्ये नक्कीच संभ्रम निर्माण झालेला आहे.

सभापती महोदया, ज्या योजना शासनाने पूर्वी जाहीर केल्या, त्या योजनांच्या कामासाठी निधी उपलबध करुन देण्यात येईल असे शासनाकडून आश्वासन दिले जात आहे. परंतु या योजनेच्या कामांसाठी या अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. या योजनांच्या कामांसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदया, कळवण, जिल्हा नाशिक येथे डाळींब,द्राक्ष व कांदा पिकाकरिता राहाता, जिल्हा अहमदनगर येथे फळे व भाजीपाल्याकरिता आणि यावल, जिल्हा जळगांव येथे केळी पिकाकरिता निर्यात सुविधा केंद्राच्या उभारणीस तसेच त्याभोवती प्रत्येकी 5 फार्म पॅक हाऊसेस उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे व त्यासाठी आवश्यक ती तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल असा उल्लेख अर्थसंकल्पीय भाषणात केलेला आहे. परंतु यासाठी किती तरतूद उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, तसेच ती तरतूद केव्हा पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल याचा या अर्थसंकल्पात कोठेही उल्लेख केलेला मला दिसून येत नाही.

श्री.रामनाथ मोते...

सभापती महोदया, हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरी यांच्या मासिक मानधनात वाढ करण्यात येणार आहे. ती वाढ किती करणार आहात, कधी करणार या गोष्टीचा अर्थसंकल्पीय भाषणात कोठेही उल्लेख दिसून येत नाही.

सभापती महोदया, अंगणवाडी बांधकामासाठी भरीव तरतूद देण्यात येणार आहे, किती तरतूद देण्यात येणार आहे, तसेच ती कधीपर्यंत देण्यात येणार याचा देखील उल्लेख अर्थसंकल्पीय भाषणात करण्यात आलेला नाही. या बाबतचा शासनाकडून खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, हजरत ख्वाजा शमना मोहम्मद मीर साहेब दर्गा हा दक्षिण महाराष्ट्रातील एक जागृत दर्गा आहे. दरवर्षी या श्रध्दास्थानास लाखो भाविक भेट देतात. त्या भाविकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासाठी शासनाकडून कोणकोणत्या सोयीसुविधा पुरविण्यात येणार आहेत, त्यासाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे याचा खुलासा शासनाने करावा. लोकांचे समाधान करण्यासाठी काही योजना व नवीन प्रकारचे काही मुद्दे या अर्थसंकल्पीय भाषणात नमूद करण्यात आले की काय अशी शंका निर्माण होत आहे.

सभापती महोदया, मराठीच्या सर्वांगीण विकासासाठी आणि समृध्दीसाठी तरतूद करण्यात येणार आहे असे अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केले आहे. यासाठी शासनाकडून किती तरतूद उपलब्ध करुन देण्यात येणार आहे व ती तरतूद कधीपर्यंन उपलब्ध करुन देण्यात येईल, यासंदर्भात काय नियोजन करण्यात आले आहे या गोष्टींचा खुलासा या ठिकाणी झाला पाहिजे.

सभापती महोदया, पोलिसांसाठी 115 कोटी 34 लाख रुपयांची तरतूद करण्यात येऊन 6 हजार घरे बांधून देण्यात येतील अशा प्रकारची घोषणा अर्थसंकल्पीय भाषणातून करण्यात आली आहे. हा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी देखील सभागृहात उपस्थित केला आहे. काल माननीय गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी सांगितले की, शासनाकडून 300 चौरस फुटाचे घरे बांधून देणार आहोत. या बाबतीत एकूण बजेट आणि होणारा खर्च याचा विचार केला तर माझ्या माहिती प्रमाणे या तरतुदीमध्ये 2700 पेक्षा जास्त घरे बांधू शकत नाही. या तरतुदीमध्ये शासनाने 6 हजार घरे बांधण्याचा संकल्प केलेला आहे. तो संकल्प कसा पूर्ण करणार ? पोलिसांना किती चौरस

3...



ABG/ प्रथम श्री. शिगम 18:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फुटाची घरे देणार आहात, तसेच धरांचे बांधकाम कशा प्रकारचे करणार आहात याबाबतचा खुलासा या ठिकाणी होणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, शिक्षण विभागाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, शिक्षण हक्क विधेयक आले. सर्वांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण देण्याचे शासनाने ठरविले आहे. अशा धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद या अर्थसंकल्पामध्ये केलेली नाही.

सभापती महोदया, राज्याच्या तिजोरीवर हमी भार आहे. ही हमी फी संबंधितांकडून भरली जात नाही. त्यांचा दंड भरण्यासाठी, त्यांची फी भरण्यासाठी राज्य शासनाकडूनच त्यांना अनुदान दिले जाते. हा एक वेगळा प्रकार या राज्यात पहावयास मिळतो आहे. या संदर्भात माननीय अर्थमंत्र्यांनी उत्तर द्यावे.

सभापती महोदया, ज्या संस्थांना 100 वर्षे पूर्ण होत आहेत. त्यात शैक्षणिक संस्था असतील, ग्रंथालये असतील, काही धर्मादाय संस्था असतील. या संस्थांनी आपापल्या क्षेत्रामध्ये 100 वर्षाचे योगदान दिले आहे. त्या संस्थांना उभे राहण्यासाठी शासनातर्फे त्यांना आर्थिक मदत करण्यात येते.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..........

मागील वर्षी तत्कालीन अर्थमंत्री श्री.सुनील तटकरे यांनी रायगडमधील काही शिक्षण संस्थांना चांगल्याप्रकारे आर्थिक मदत केली. त्या शैक्षणिक संस्थांना आर्थिक आधार मिळाला. यंदाच्या अर्थसंकल्पात एकाही शिक्षण संस्थेला शासनाने आर्थिक मदत जाहीर केलेली नाही. हा मुद्दा अर्थसंकल्पातून पूर्णपणे वगळण्यात आला आहे.

सभापती महोदय, आम्ही सर्वजण मुंबई परिसरात राहणारे आहोत. आम्हाला मुंबईची चांगली माहिती आहे. मुंबईत सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल आहे. या हायस्कूलला 100 वर्षे पूर्ण झाली आहेत. मुंबई आणि मुंबई परिसरात या संस्थेने शिक्षण क्षेत्रात चांगले योगदान दिले आहे. या संस्थेला 100 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आर्थिक मदत करावी यासाठी आदरणीय वित्त मंत्री व मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे. आठ दिवसांपूर्वी दूरदर्शनवरुन या संस्थेबद्दल चांगली माहिती मिळाली. या संस्थेला शासनाने अद्याप कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. नाट्य क्षेत्रात, सांस्कृतिक क्षेत्रात, मुंबईतील शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना आर्थिक मदतीचा हात दिला पाहिजे. नाटय क्षेत्राचा विषय निघाला की आपल्याला छबिलदास हायस्कूलची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. छबिलदास हायस्कूल चालविणाऱ्या जनरल एज्युकेशन सोसायटीला 100 पेक्षा अधिक वर्षे पूर्ण झाली आहेत. या संस्थेने मुंबई आणि रायगडमध्ये शैक्षणिक क्षेत्रात खूप मोठे योगदान दिले आहे. शैक्षणिक क्षेत्राचे जाळे निर्माण केले आहे, अशा संस्थेला कोणतीही आर्थिक मदत दिलेली नाही. यापूर्वी अशा शिक्षण संस्थांना आर्थिक मदत दिली जात होती. शासनाने छत्रपती शिक्षण मंडळ, अमरावती या संस्थेला आर्थिक मदत दिलेली आहे. रयत शिक्षण संस्था आणि अन्य संस्थांना आर्थिक मदत केलेली आहे. अशा प्रकारे 100 वर्षे शिक्षण क्षेत्रात योगदान दिलेल्या संस्थांना अर्थसंकल्पातून वगळले आहे.

सभापती महोदया, शिक्षण क्षेत्रासाठी केलेली तरतूद ही खर्च न मानता गुंतवणूक आहे असे मानले पाहिजे. माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी सांगितले की, अनेक शाळांमध्ये स्वच्छतागृहाची सोय नाही, वर्गखोल्यांची सोय नाही. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे असे आपण म्हणतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचे नाव घेतो. खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या, बालकांच्या विकासासाठी प्रयत्न करतो असे म्हणत असताना या राज्यातील पहिली ते चौथी व पहिली ते सातवीच्या 4000 पेक्षा अधिक शाळा या एकशिक्षकी आहेत. या संदर्भात इन्फ्रास्ट्रक्चर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..........

सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ग्रामीण भागातील बालकांच्या विकासासाठी या रचनेमध्ये बदल होणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, हे संगणकाचे युग आहे. संगणक साक्षरता वाढली पाहिजे. शाळांमध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत संगणक उपलब्ध करुन दिले आहेत. शासनाची नक्की मानसिकता काय आहे, खरोखरच या मुलांना संगणक साक्षरतेकडे घेऊन जाण्याचे शासनाचे धोरण आहे का? मी रत्नागिरी जिल्हयाचे उदाहरण देऊ इच्छितो. रत्नागिरी जिल्हयामध्ये जिल्हा परिषदेच्या 2748 प्राथमिक शाळा आहेत. यापैकी विद्युत जोडणी असलेल्या शाळांची संख्या 2380 असून जवळजवळ 448 शाळांमध्ये अद्याप विजेचे कनेक्शन जोडलेले नाही. त्या ठिकाणी वीज पुरवठा केला जात नाही. ज्या शाळांमध्ये वीज पुरवठा सुरु होता तेथील वीज बिलाचे दर वाढल्यामुळे जवळजवळ 97 शाळांमधील वीज कनेक्शन तोडण्यात आले आहे. 2748 पैकी संगणक पुरविलेल्या शाळांची संख्या 505 इतकी आहे. मी शिक्षणाधिकाऱ्यांकडून आठ दिवसांपूर्वी जी माहिती उपलब्ध झाली त्या आधारे बोलत आहे. फक्त 505 शाळांमध्ये संगणक उपलब्ध करुन दिले आहेत. संगणक उपलब्ध नसलेल्या शाळांची संख्या 2243 आहे. आपले राज्य शैक्षणिक क्षेत्रात संगणक साक्षरतेबाबत काय प्रयत्न करीत आहे हे यावरुन स्पष्ट होते. हे संगणकाचे युग आहे, स्पर्धेचे युग आहे. खऱ्या अर्थाने प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, शासनाने विजेबाबत चांगली घोषणा केली आहे. आतापर्यंत शिक्षण संस्थांना घरगुती दराने वीज बिलाची आकारणी केली जात होती. आता मात्र वाणिज्यिक दराने या शिक्षण संस्थांना वीज पुरवठा केला जाणार आहे. शासन या शिक्षण संस्थांना अनुदान देत नाही.

नंतर 4 सी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

माननीय सभापती महोदया आपल्या जिल्ह्यात देखील अशा अडचणी असतील आणि एक लोक प्रतिनिधी म्हणून आपल्याकडे तशा तक्रारी सुध्दा आल्या असतील. ज्या ठिकाणी 680 रुपये विजेचे बिल येते त्याऐवजी आता 5680 रुपये एवढे वाणिज्यिक दराने बिल येऊ लागले व ते शाळेला भरावे लागते. एक तर शासन या शाळांना वेतनेतर अनुदान देत नाही किंवा अन्य कोणत्याही प्रकारची फी आकारण्याची परवानगी देत नाही, मग या संस्था कशा चालणार, संगणक कसे चालणार, विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरवर प्रयोग कसे करुन दाखविणार, याचा विचार करणे आवश्यक आहे. वेतनेतर अनुदान हा अत्यंत महत्वाचा विषय आहे त्यासाठी मात्र अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केलेली दिसत नाही म्हणून मुद्दाम मी या गोष्टी सभागृहाच्या पटलावर आणण्याचा प्रयत्न करीत आहे. कारण या सर्व बाबतीत सातत्याने शालेय शिक्षण विभागाकडून उत्तर दिले जाते की, यासंबंधीचा प्रस्ताव आम्ही वित्त विाागाकडे पाठविला होता पण वित्त विभागाने तो नामंजूर केला. माननीय श्री. दिलीप वळसे-पाटील हे वित्त मंत्री असताना त्यांनी देखील सांगितले होते की, 522 कोटीचा प्रस्ताव सादर केला आहे पण संबंधित अधिकाऱ्यांनी तो डंप करुन ठेवला आणि त्यांचे मंत्री पद गेले व ते दुसऱ्या खात्याचे मंत्री झाले, या प्रस्तावाला मात्र अजूनही मान्यता मिळाली नाही. यासाठी मंत्रिमंडळाची एक उप समिती सुध्दा गठित झाली होती. त्या समितीने 5 टक्के वेतनेतर अनुदानाची शिफारस करुन सुध्दा वित्त विभागाने या प्रस्तावाकडे दुर्लक्ष केले, त्यामुळे हा प्रस्ताव अद्यापही प्रलंबित आहे.

महोदय, यानंतर शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्यासंबंधी मंत्री महोदयांनी अनेक वेळा मान्य करुन प्रस्ताव सादर केला, त्यासाठी उप समिती स्थापन केली व त्या उप समितीचा अहवालही शासनाला प्राप्त झाला. शासनाने तो अहवाल वित्त विभागाला सादर केला पण अद्यापही मान्यता मिळाली नाही. अशा प्रकारे चार-चार वर्षे प्रस्तावाला वित्त विभागाकडून मान्यता मिळत नाही हे दुर्दैव आहे. म्हणून आमची विनंती आहे की, चार-चार वर्षे नव्हे तर त्या त्या वर्षीची मागणी शासनाने मान्य करुन हे वेतनेतर अनुदान शाळांना दिले पाहिजे.

महोदय, पायाभूत शिक्षण वाढावा असे आपण म्हणतो पण त्यासाठी आवश्यक असलेली पदे मंजूर केली जात नाहीत. वाढीव तुकड्यांचे प्रस्ताव मंजूर केले जात नाहीत. तुकड्या सुरु

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .......

करण्यासाठी परवानगी मिळते, त्यानंतर त्यांचे मूल्यांकन होऊन अनुदानास पात्रही ठरतात. पण शालेय शिक्षण विभागाने नुकताच जी.आर. काढलेला आहे त्यानंतर देखील या अनुदानास पात्र असलेल्या शाळांना वित्त विभागाकडून मान्यता मिळत नाही, म्हणून अशा वेगवेगळ्या समस्या निर्माण होत असतात. हा विषय सातत्याने सभागृहात मांडण्याची वेळ येते.

महोदय, शासनाने सरकारी कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना 50 हजार रुपयापर्यंत संगणक अग्रीम देण्याचा निर्णय घेतलेला आहे तो शिक्षकांनाही देण्यात यावा अशी माझी विनंती आहे. कारण आपण ज्यावेळेस विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करावे असे म्हणतो तेव्हा शिक्षक संगणक साक्षर झाल्याशिवाय ते विद्यार्थ्यांना शिकवू शकणार नाहीत, म्हणून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही संगणकासाठी अग्रीम मिळावा अशी मी विनंती करतो.

महोदय, ठाणे जिल्ह्यातील 7 पूल आजच्या परिस्थितीत मोडकळीस आलेले आहेत. ते केव्हाही पडू शकतात व धोकादायक परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळावा म्हणून अर्थसंकल्पात तरतूद करावी अशी मी विनंती करतो. कारण या रस्त्याच्या बाबतीत नागरिकांच्या सातत्याने तक्रारी येत असतात. म्हणून या पुलाच्या दुरुस्तीसाठी अथवा नवीन पूल बांधण्यासाठी तरतूद व्हावी अशी मी अपेक्षा करतो, कारण अर्थसंकल्पात यासाठी कोणतीच तरतूद केलेली नाही.

महोदय, अपंग एकात्मिक विकास योजना आपल्या राज्यात सुरु होती पण केंद्र शासनाने अनुदान देणे बंद केल्याचे कारण सांगून ती योजना बंद करण्यात आली. पण त्यातील 545 शिक्षकांचे जे समायोजन इतर विभागात करण्यात आले, त्यासाठी शासनाने जी.आर. सुध्दा काढला आहे. त्यांचे चालू वेतन सुरु झाले पण मागील जवळपास दोन वर्षांपासून ते प्रतिकूल परिस्थितीत काम करीत आहेत, त्यांना कोणतेही वेतन मिळालेले नाही, याचाही विचार मंत्री महोदयांनी करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-------

यानंतर श्री. गायकवाड

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदया, 2011-2012 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,सभागृहाचे नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी आघाडी सरकारच्या वतीने 2011-2012 सालचा अर्थसंकल्प विधानसभेला सादर केला आहे. त्याच प्रमाणे माननीय वित्त राज्य मंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी. विधान परिषदेमध्ये 2011-2012 सालचा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पाचे मी मनापासून स्वागत करतो.

सभापती महोदया, राज्यामध्ये कृषी व उद्योग क्षेत्राची उन्नती व्हावी व त्या माध्यमातून तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा तसेच राज्यातील सर्व भागांचा व समाजातील सर्व घटकांचा विशेषत: दुर्बलांचा विकासात वाटा असावा हा दृष्टीकोन समोर ठेवून हा अर्थसं कल्प मांडण्यात आलेला आहे. राज्याच्या प्रगतीत कृषी क्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे.कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास व्हावा व त्या माध्यमातून शेतक-यांचे व ग्रामीण भागातील जनतेचे राहणीमान सुधारावे यासाठी सातत्याने प्रयत्नशील असणा-या शासनाने अतिशय उत्कृष्ट आणि अभिनंदनीय असा अर्थसंकल्प सादर केला आहे. शेतक-यांचा व शेतीचा विकास व्हावा याकरिता 50 हजार रुपयापर्यतचे कर्ज शून्य टक्के व्याजाने उपलब्ध करुन दिले जाणार आहे. सन्माननीय सदस्य श्री पाशा पटेल आता सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु ते जर येथे उपस्थित असते तर मला अधिक बरे वाटले असते. शेतक-यांना 50 हजार रुपयापर्यतचे कर्ज शून्य टक्के व्याजाने या सरकारने प्रथमच दिलेले आहे आणि 3 लाख, रुपयांपर्यतचे कर्ज 2 टक्के व्याजाने उपलब्ध करुन दिले जाणार आहे. शेतकरी हा केन्द्रबिंदू मानून जर काम केले तर राज्यातील शेतीचे उत्पादन वाढून राज्यातील व देशातील जनतेला चांगल्या प्रकारचे अन्नधान्य मिळू शकते. या दृष्टीने या देशाचे कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद पवार साहेब यांनी सुध्दा देशातील शेतक-यासाठी तसेच शेतीतीत उत्पादनासाठी वेगवेगळया प्रकाराचे चांगले निर्णय घेतलेले आहे. सभापती महोदया, देशातील शेतक-यांना 71 हजार कोटी रुपयांची कर्ज माफी देण्यात आली आहे. अशा प्रकारे एवढया मोठया प्रमाणावर कर्ज माफी होईल, याचा कोणी स्वप्नात सुध्दा विचार केलेला नव्हता. जगामध्ये हा ऐतिहासिक निर्णय आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी घेतला आहे.सन्माननीय सदस्य श्री पाशा पटेल सुध्दा हे मान्य करतील की देशातील इतर कोणत्याही राज्यकर्त्यांना जे जमले नाही ते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे ....

आदरणीय श्री शरद पवार यांनी केलेले आहे. आज आघाडी शासनाच्या माध्यमातून आदरणीय श्री अजित पवार आणि वित्त राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्यात देखील शेतक-यांसाठी चांगल्या योजना आहेत असे दिसून येत आहे.

सभापती महोदया, कृषी पंपाना अडीच हजार कोटी रुपयांचे अनुदान या अर्थसंकल्पात दिलेले आहे. कृषी संजीवनी योजना आणि शेतक-यांचे वीज बिल थकबाकी योजना या दोन योजना शेतक-यांसाठी अत्यंत आवश्यक अशा योजना आहेत.

सभापती महोदया, या योजना आणत असतांना मला एक सूचना करावयाची आहे. ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीना जी वीज बिलाची आकारणी केली जाते ती व्यापारी पध्दतीने केली जाते .त्यामुळे त्यांना जास्तीचे वीज बिल येते व त्यांची थकबाकी शिल्लक राहते. मला गेल्या दोन दिवसांपासून ग्रामपंचायतीच्या सरपंचानी फोन करुन असे सांगितले की, त्यांना व्यापारी पध्दतीने वीज बिल न आकारता शेतीच्या दराने आकारणी केली तर ते त्यांना सुसहय होईल.

सभापती महेदय, राष्ट्रीय पीक विमा योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना या माध्यमातून राज्यातील शेतक-यांना चांगली मदत होत आहे. महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेसाठी 745 कोटी रुपयांचे नियोजन केलेले आहे. या अगोदर या योजनेसाठी मजूर मिळत नव्हते. परंतु आता मजुरीच्या दरात वाढ केलेली असल्यामुळे या योजनेसाठी मजूर उपलब्ध व्हावयास लागले आहेत. त्यामुळे अनेक कामे पूर्ण होतील व त्याचा फायदा ग्रामीण भागातील लोकांना निश्चितपणे होईल.

सभापती महोदया, एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमासाठी केन्द्र सरकारकडून आपल्या राज्याला 1255 कोटी रुपये मंजूर करुन घेतले. त्याबद्दल मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो. .सभापती महोदयर, कुक्कुट पालन हा शेतीला पूरक असा व्यवसाय आहे आणि कंत्राटी पध्दतीने कुक्कुटपालन करण्याची योजना राज्यातील गोरगरीब शेतक-यांसाठी अतिशय चांगली आहे. कंत्राटी पध्दतीने ही योजना राज्याने सुरु केलेली आहे. त्याला चांगल्या प्रकारचा प्रतिसाद मिळत आहे. त्यासाठी 20 कोटी रुपयांचे नियोजन केलेले आहे. या निमित्ताने मला शासनाला एक विनंती करावयाची आहे ज्या प्रकारे गोरगरीब शेतक-याला मदत व्हावी म्हणून शेती पूरक व्यवसाय म्हणून कुक्कुट पालन योजना सुरु केलेली आहे, त्याचप्रमाणे शेळी मेंढी व्यवसायासाठी कंत्राटी पध्दतीने योजना सुरु करण्याचा विचार केला तर गोर गरीब शेतक-यांना चांगल्या प्रकारची मदत होऊ शकेल .

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

सभापती महोदया, पाटबंधारे विकास क्षेत्रासाठी 7 हजार 393 कोटींचे उल्लेखनीय असे नियोजन करण्यात आले आहे. राज्याची सिंचन क्षमता वाढवीत असतांना मला हे सांगितले पाहिजे की, या राज्यामधील अनेक तालुके कायम दुष्काळी आहेत. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणामधील काही तालुके कायम दुष्काळी आहेत. कोकणामध्ये पाऊस भरपूर पडतो परंतु पडणारे पावसाचे पाणी जमिनीमध्ये मुरत नाही त्यामुळे त्या ठिकाणी उन्हाळयामध्ये दुष्काळसदृश स्थिती असते. तेव्हा आपल्याला हा निधी वापरुन सिंचन क्षमता वाढवितांना कायम दुष्काळी तालुक्यांकडे अधिक लक्ष दिले पाहिजे, त्यांच्याकरिता जास्तीचा निधी देण्यात यावा आणि त्यांचा अनुशेष दूर करण्यात यावा आणि त्यानंतरच राहिलेला निधी इतर ठिकाणी वापरण्यात यावा आणि तो वापरीत असतांना तालुका हे घटक आपण कायम ठेवावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, केंद्र शासनाची वेगवर्धित सिंचन लाभ योजना आपल्या राज्यामध्ये आणून 1257 कोटी रुपये शासनाने प्राप्त केले आहेत त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. त्याच योजनेसाठी 2772 कोटींचे नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आले आहे, त्या करिता सुध्दा मी शासनाचे अभिनंदन करतो. सर्व समाजाचा विचार करीत असतांना राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी 275 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पर्यावरण संतुलन ग्राम विकास योजनेकरिता 200 कोटींचे नियोजन करण्यात आले आहे. आज आपल्या राज्यात निर्माण झालेली रोजगार हमी योजना देश पातळीवर केंद्र सरकारने अंमलात आणण्याचे ठरविले. त्या प्रमाणे देश पातळीवर महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या नावाने योजना सुरु करण्यात आली. त्याच प्रमाणे आज आपण राज्यामध्ये पर्यावरण संतुलन ग्राम विकास योजना सुरु केली असून तिचे सुध्दा देश पातळीवर स्वागत केले जात आहे. आज आपण पहात आहोत की, ग्लोबल वार्मींगच्या माध्यमातून, मानव निर्मित संकटामधून, नैसर्गिक संकटामधून पर्यावरणामध्ये बदल होत आहेत. काही दिवसापूर्वी सुनामीसारख्या आलेल्या संकटामुळे शहरे वाहून गेल्याचे आपण पाहिले आहे. तेव्हा या योजनेकरिता आपण फक्त 16 कोटींचे नियोजन केले आहे. पर्यावरणाचा नैसर्गिक धोका लक्षात घेता या निधीमध्ये अधिक वाढ करावी अशी मला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदया, या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. शरद पवार साहेबांनी पहिल्यांदाच महिलांसाठी धोरण अंमलात आणले. त्यानंतर महिलांसाठी 33 टक्के आरक्षणावरुन 50 टक्के आरक्षणाची भूमिका या राज्यामध्ये मांडीत असतांना महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला प्रतिबंध



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करुन त्यांना संरक्षण देण्यासाठी  समुपदेशन मदत केंद्र सुरु करण्यात येत आहेत ही बाब अतिशय अभिनंदनीय आहे. हे सुचवित असतांना या राज्यामध्ये मतिमंद मुली किंवा मतिमंद महिला आहेत त्यांच्याकडे आपण विशेष लक्ष दिले पाहिजे. याचे कारण या मतिमंद मुली किंवा महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढल्याचे तुम्हाला आम्हाला दिसत आहे. तेव्हा हे नियोजन करीत असतांना मतिमंद मुली व महिलांसाठी वेगळे नियोजन करुन त्यांच्याकडे जास्तीचे लक्ष दिले गेले पाहिजे अशी मला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदया, माजी खासदार हिंद केसरी मारुती माने हे आमच्या सांगली जिल्ह्यातील नामांकित पहिलवान होते. अशाप्रकारे या  राज्यातील पहिलवांना आणि कुस्तीगिरांना स्फूर्ती मिळावी या करिता मारुती माने यांच्या मिरज तालुक्यातील कवठेपिरान या गावामध्ये स्मारक उभे करण्याचे ठरविल्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. अनुसूचित जाती व नव बौध्द प्रवर्गातील दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी घरकुल योजना राबविण्यासाठी आपण 800 कोटींचे नियोजन केले आहे त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या महाराष्ट्रामध्ये आपण ही योजना राबवीत आहात ही कौतुकास्पद बाब आहे. बऱ्याच वेळेला शासन नियोजन करीत असते परंतु त्याचा उपयोग खालच्या वर्गापर्यंत होत नाही. मी नुकताच या योजनेचा आढावा घेतला असता सांगली जिल्ह्यातील घरकुल योजनेसाठी आलेल्या 16 कोटी रुपयांचा वापर न झाल्यामुळे ते पैसे दुसऱ्या जिल्ह्यांना देण्यात यावेत किंवा ते परत पाठविण्यात यावेत असे सांगितले. ज्यावेळी शासन जनतेसाठी योग्य प्रकारे चांगले निर्णय घेत असते त्यावेळी प्रशासन जर योग्य प्रकारे काम करीत नसेल तर आपण कितीही चांगल्या योजना आणल्या तरी सर्वसामान्य लोकांपर्यंत त्या योजनेचा लाभ पोहोचत नाही.

सभापती महोदया, यशवंत ग्राम समृध्दी योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये जे पैसे येतात त्यासंबधीचे पत्र या महिन्याच्या 24-25 तारखेला पाठविण्यात आले आणि त्यापुढे असे आदेश आले की, या योजनेसाठी 15 टक्के असलेली लोकवर्गणी तुम्ही 25 तारखेला भरा, जर ही लोकवर्गणी भरली नाही तर तुमचे पैसे परत जातील. आमच्या भागातील काही गावामध्ये 15 टक्के लोकवर्गणी एका दिवसात जमा होऊ शकत नसल्यामुळे ते पैसे परत गेले आणि काही ठिकाणी ठेकेदारांनी ती लोकवर्गणी भरली. त्यामुळे त्या ठिकाणी त्या पैशाचा वापर झाला. बाकीच्या ठिकाणी ग्रामीण भागामध्ये आलेले पैसे परत गेले. सभापती महोदया, 15 टक्के लोकवर्गणी भरण्याकरिता



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

फक्त तीन ते चार दिवसांची मुदत देण्यात आली ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे, याकडे आपण लक्ष देणे गरजेचे आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेबद्दल मी शासनाचे आभार मानतो. घरकुल योजनेच्या माध्यमातून आपण राज्यातील भटक्या-विमुक्त लोकांचा विचार पहिल्यांदा करीत आहात.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे . . . .

यासाठी 20 कोटी रुपयांचे नियोजन केले त्याबद्दल मी माननीय वित्त मंत्र्यांना पुन्हा एकदा धन्यवाद देतो. या राज्यात सौर ऊर्जेच्या सहाय्याने सामुदायिक अभ्यासिका असणे अतिशय आवश्यक आहे. आपण आता 4035 इतक्या गावांचा यामध्ये समावेश केलेला आहे. माझी शासनाला अशी विनंती आहे की, या राज्यामध्ये जी खेडी आहेत, जेथे अजूनपर्यंत वीज गेलेली नाही किंवा ज्याठिकाणी वीज असूनही ती जाते त्याठिकाणी अभ्यासकांसाठी 100 टक्के गावांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून आपण नियोजन केले पाहिजे.

सभापती महोदय, नवीन वस्त्रोद्योग धोरण राबवित असताना कापसावर प्रक्रिया करुन रोजगाराची संधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने अतिशय चांगल्या प्रकारचा उपक्रम हाती घेतल्याचे दिसत आहे. मला अशी विनंती करावयाची आहे की, ज्याप्रमाणे कापसावर प्रक्रिया करुन रोजगाराच्या संधी वाढवत आहात, त्याप्रमाणे या राज्यामध्ये लोकरीवर प्रक्रिया करणारा शासनाचा किंवा खाजगी स्वरुपाचा उद्योग किंवा प्रकल्प उपलब्ध नाही. त्यामुळे वस्त्रोद्योगाच्या बाबतीत विचार करताना लोकरीवर प्रक्रिया करुन ज्या गोष्टी बनविल्या जातात उदाहरण द्यावयाचे तर ब्लँकेट असेल, स्वेटर असेल किंवा मफलर असेल इ.बाबतचे उत्पादन वाढविले तर त्यातून शासनाला चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळू शकेल. मुंबईत नागरी पायाभूत सुविधांतर्गत आतापर्यंत 2500 कोटी रुपये खर्च केलेला असून आता यासाठी जवळजवळ 1400 कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. तसेच मुंबईमध्ये एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून हजारो कोटी रुपयांची कामे सुरु केलेली आहेत. त्यामुळे शासनाने मुंबईकडे देखील चांगल्याप्रकारे लक्ष दिलेले आहे.

सभापती महोदय, आपण पर्यटनाच्या बाबतीत देखील लक्ष दिले पाहिजे असे मला वाटते. महाराष्ट्र राज्य हे देशामध्ये परदेशी पर्यटकांना आकर्षित करणारे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. एक नंबर वर तामिळनाडू राज्य आहे. हे होत असताना मागच्या वर्षी 19 लाख 33 हजार पेक्षा जास्त पर्यटक राज्यामध्ये आले. पण असे झाले असले तरी आपण इतर राज्यांच्या तुलनेमध्ये वजा 2 टक्के आहोत. परंतु याबाबतीत गोवा राज्याच्या तुलनेमध्ये आता बिहार राज्य आता पुढे गेलेले आहे. म्हणून इतर राज्ये अशा प्रकारे प्रगती करीत असताना आपण देखील विचार करावयास पाहिजे. पर्यटनाच्या माध्यमातून मग ते परदेशी पर्यटक असतील किंवा देशातील पर्यटक असतील त्यांच्या माध्यमातून सरकारला चांगले उत्पन्न मिळते. त्यामुळे याकडे देखील लक्ष द्यावयास पाहिजे असे मला वाटते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे . . . .

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांची अंमलबजावणी करताना, पुरोगामी महाराष्ट्र निर्माण करताना या राज्याने देशाला एक अभिमानास्पद गोष्ट दिली आणि ती म्हणजे या राज्यातील अनुसूचित जातीसाठी 4233 कोटी आणि अनुसूचित जमातीसाठी 3393 कोटी 50 लाख रुपयांचे नियोजन आदिवासी उपाययोजनांकरता करण्यात आले आहे. म्हणून फुले, शाहू, आंबेडकर यांचे केवळ विचार न सांगता, ते प्रत्यक्षात राबविण्याचे जे स्वप्न पाहिले आहे, जी दूरदृष्टी ठेवलेली आहे त्याबद्दल मी पुन्हा एकदा शासनाचे अभिनंदन करतो. या राज्यामध्ये जशा अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे लोक आहेत त्याच प्रमाणे विमुक्त जाती व भटक्या जमातीचे सुध्दा लोक आहेत आणि राज्यात त्यांचे प्रमाण सुध्दा 15 टक्के आहे. त्यामुळे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे लोक जे जीवन जगतात, त्याच पध्दतीचे जीवन विमुक्त जाती व भटक्या जमातीचे लोक सुध्दा जगत असतात. म्हणून त्यांच्या साठी सुध्दा अशाच प्रकारचे नियोजन करण्यात यावे. मी असे म्हणणार नाही की, त्यांच्यासाठी लगेच 4-5 हजार कोटी रुपयांचे नियोजन करावे. परंतु या राज्यामध्ये एकंदर 15 टक्के असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांसाठी निदान दोन हजार कोटी रुपयांचे नियोजन करावे अशी मी आपल्याला आग्रहाची विनंती करीत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र ही शूरांची, वीरांची, साधुसंतांची भूमी आहे. म्हणून या अर्थसंकल्पामध्ये देखील ही जाणीव कायम ठेवण्यात आली आहे. यापूर्वीच्या अर्थसंकल्पामध्ये आणि आजच्या अर्थसंकल्पामध्ये सुध्दा राज्यातील जी तीर्थक्षेत्रे आहेत, किल्ले आहेत, दर्गा आहेत, मंदिर आहेत त्यांच्या विकासासाठी देखील तरतूद करण्यात आलेली आहे. विशेष करुन मी शासनाचे आभार मानतो की, सांगली जिल्ह्यातील मिरज येथे ख्वाजा हजरत शमसूद्दीन मोहंम्मत पीरसाहेब या दर्ग्याच्या विकासासाठी सुध्दा नियोजन केलेले आहे. तसेच मी असे सांगू इच्छितो की, कवठे-महांकाळ तालुक्यात "आरेवाडी" नावाचे देवस्थान आहे. त्यासाठी 4 कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. पण प्रत्यक्षात 85 लाख रुपये प्राप्त झाले असून उरलेला निधी देण्याच्या दृष्टीने देखील प्रयत्न करण्यात यावेत अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मी माझे भाषण संपवित असताना एक गोष्ट सांगू इच्छितो की, मागासवर्गीय असेल, ओबीसी असेल, बहुजन समाज असेल किंवा अल्पसंख्यांक समाज असेल, या समाजातील लोक जीवन जगत असताना आपापल्या पध्दतीने वैयक्तिकदृष्ट्या आपला विकास करीत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे . . . .

असताना त्यांच्या उपयोजनांसाठी आपण हजारो कोटी रुपयांचा निधी देतो. पण वैयक्तिक लाभाच्या योजना राबवत असताना जर मळके कपडे घातलेला दलित बांधव किंवा खांद्यावर घोंगडे घेऊन आमचा मेंढपाळ बांधव एखाद्या बँकेच्या दारामध्ये गेला तर त्यांना तेथे प्रवेश दिला जात नाही.त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जात नाही. म्हणून याबाबतीत राज्य शासनाने दूरदृष्टी ठेऊन राज्यात वेगवेगळी महामंडळे स्थापन केली आहेत. जसे आमचे वसंतराव नाईक भटके-विमुक्त महामंडळ आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे.......

संत रोहिदास चर्मकार उद्योग महामंडळ, अन्नाभाऊ साठे हे मातंग समाजाचे महामंडळ आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महामंडळ, ओ.बी.सी. महामंडळ अशा प्रकारची जी अनेक महामंडळे आहेत ही त्या त्या समाजाच्या वर्गासाठी कुठे 25 हजार, 50 हजार, लाख ते दोन लाख रुपये अशा प्रकारची मदत त्यांना देऊन त्यांच्या स्वत:चा आणि त्यांच्या कुटुंबीयांचा विकास करण्यासाठी मदत व्हावी म्हणून ही महामंडळे स्थापन झालेली आहेत. ज्या समाज घटकाला सोयी-सवलत आणि आर्थिक मदत या महामंडळांच्या माध्यमातून दिली जाते त्या कुठल्याही महामंडळाला या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. म्हणून मला या ठिकाणी सूचना करावयाची आहे की, जे सर्व समाज घटक या महामंडळांशी जोडलेले आहेत, त्यांच्या भावनांचा आदर ठेवून या महामंडळाला सुध्दा चांगल्या प्रकारचा निधी देण्यात यावा.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी या ठिकाणी सांगितल्या प्रमाणे आता मलाही मागणी करावयाची की नाही याबाबत विचार करावा लागतो. कारण पुण्यश्लोक अहिल्या देवी शेळी मेंढी महामंडळाला मागील 32 वर्षामध्ये फक्त दहा कोटी रुपये आठ वर्षापूर्वी दिलेले आहेत. अनेक वेळा मागणी करुन या महामंडळाला एक रुपयाची तरतूद या शासनाला करता आली नाही म्हणून ती तरतूद करता आली तर फारच चांगले होईल. या महामंडळावर अवलंबून असलेल्या जवळ जवळ 1 कोटी 20 लाख समाजाचा विचार करावा, एवढेच मला या माध्यमातून सांगावयाचे आहे. सभापती महोदय, हा अर्थसंकल्प जनतेच्या हिताचा आहे, हे सर्वांना पटलेले आहे. म्हणून हा अर्थसंकल्प जनतेमध्ये गेला तर कदाचित जनतेमध्ये लोकशाही आघाडी सरकारच्या बाबतीत चांगल्या प्रकारची लाट येईल, ती येऊ नये, हा अर्थसंकल्प जनतेपर्यंत जाऊ नये, म्हणून प्रयत्न झालेला आहे. परंतु हा अर्थसंकल्प जनतेपर्यंत पोहचलेला आहे आणि या राज्यातील जनतेमध्ये अतिशय चांगल्या प्रकारचा उत्साह निर्माण झालेला आहे म्हणून मी शासनाचे, माननीय मुख्यमंत्र्यांचे, माननीय उप मुख्यमंत्र्याचे आणि माननीय राज्य मंत्र्यांचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, राजकारणात "जो बोले तैसा न चाले, त्याची वंदावी पाऊले" असे म्हणतात. परंतु "जे बोलणार ते करुन दाखविणार" हे माननीय श्री. अजित पवार यांच्या माध्यमातून संपूर्ण जनतेने पाहिलेले आहे. म्हणून "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले" अशा प्रकारचे व्यक्तिमत्व आदरणीय मुख्यमंत्र्यांनी, आदरणीय उप मुख्यमंत्र्यांनी या राज्य शासनाच्या माध्यमातून आघाडी

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे.....

सरकारसाठी जनतेमध्ये पोहचवलेले आहे, त्याबद्दल आणि अतिशय चांगल्या अशा प्रकारचा अर्थसंकल्प या राज्यातील जनतेला दिल्या बद्दल मी या अर्थसंकल्पाचे स्वागत करतो. सभापती महोदय, आपण मला याठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो. धन्यवाद.

----

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, आपण मला सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत माझे मत मांडू देण्यास परवानगी दिली याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदया, विधिमंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षात आणि पुरोगामी महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात खऱ्या अर्थाने माझे हे पहिले अधिवेशन आणि त्यातील हा पहिला अर्थसंकल्प आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी दोन दिवसापासून बऱ्याच गोष्टी या ठिकाणी सुचविलेल्या आहेत. मला या ठिकाणी सर्व विषयांवर बोलावयाचे नाही. पण आरोग्य या विभागाबद्दल काही सूचना करावयाच्या आहेत म्हणून मी या ठिकाणी बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मानव विकास परिगठीत करण्यासाठी आरोग्य हा महत्वाचा घटक आहे. स्वातंत्र्या नंतर खऱ्या अर्थाने भारतामध्ये आरोग्य विषयक पायाभूत सुविधा तसेच या देशाने आरोग्य या विषयात सार्वजनिक क्षेत्रातून म्हणजे शासनाच्या स्तरावरुन, सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून आणि खाजगी क्षेत्रातून समाजासाठी आरोग्य सुविधा पुरविलेल्या आहेत. अलीकडच्या काळात आयुष या सदराखाली आयुर्वेदिक, युनानी सिध्द, नॅचरोपॅथी आणि होमियोपॅथी यांनी सुध्दा आपापला भार उचलून ग्रामीण जनतेसाठी आरोग्य सुविधा पुरविलेल्या आहे.

यानंरत श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील ....

या अर्थसंकल्पामध्ये नुसती 1 हजार कोटी रुपयांची तरतूद म्हणजे एकूण अर्थसंकल्पाच्या 0.5 टक्के एवढी तरतूद आरोग्य विभागावर झालेली आहे. कोणत्याही राज्यामध्ये आरोग्य विभागावर एवढी कमी तरतूद नसते. आपण पुरोगामी आणि प्रगल्भ महाराष्ट्र म्हणतो परंतु आपल्या आजूबाजूची राज्ये पाहिली तर ज्यांची प्रगती आपल्यापेक्षा कमी समजली जाते त्या ठिकाणी सुध्दा आरोग्य विभागासाठी अर्थसंकल्पामध्ये यापेक्षा जास्त तरतूद केलेली दिसेल. आपल्या राज्यामध्ये त्रिस्तरीय आरोग्य सुविधा असून ग्रामीण आरोग्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून सुविधा देतो. त्यासोबतच उपकेंद्रे आहेत तसेच सामायिक आरोग्य केंद्रे आहेत. ही व्यवस्था आपण आपल्याकडे ग्रामीण स्तरावर आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी केलेली आहे. यानंतर नागरी आणि अर्धनागरी भागातील व्यवस्थेसाठी आपल्याकडे कुटीर रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये आणि उप जिल्हा रुग्णालये आहेत आणि जिल्ह्याचा विचार केला तर त्या ठिकाणी आपल्याकडे सुपर स्पेशालिटी रुग्णालये व जिल्हा शासकीय रुग्णालये आहेत आणि जो तिसरा स्तर आहे त्यामध्ये टर्सरी सेंटर्स, वैद्यकीय महाविद्यालये आणि अनुसंधान केंद्रे यामधून आपण सुविधा देतो. या सर्व आरोग्य केंद्रामध्ये जर आपण आंतररुग्ण किती जागेवर करतो याचा विचार केला तर पूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी साधारणत: 2500 च्या आसपास अशी केंद्रे सापडतील की, ज्या ठिकाणी आंतररुग्ण असणारी व्यवस्था आहे, असे आपण म्हणू शकतो. परंतु खऱ्या अर्थाने आपल्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आंतररुग्ण करण्याची व्यवस्था आहे का ? त्या ठिकाणी इंजेक्शन देण्यासाठी स्पिरीट सुध्दा आहे की नाही, त्या ठिकाणी कोणकोणती औषधे देता येतात, याचा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, कुटीर रुग्णालये किंवा ग्रामीण रुग्णालयांमध्ये नुसता प्राथमिक इलाज म्हणजे ज्याला आपण फर्स्ट एड ट्रिटमेंट म्हणतो एवढाच फक्त उपचार त्या ठिकाणी केला जातो. एरवी आपली जी प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत, जी उपकेंद्रे आहेत, जी सामायिक आरोग्य केंद्रे आहेत त्या ठिकाणी ट्युबेकटॉमी आणि व्हॅसेकटॉमी याच्या पलीकडे कोठलीही शस्त्रक्रिया होत नाही. या शस्त्रक्रिया सुध्दा कॅम्प बेसिसवर होतात. त्या जागेवर कोठेही आंतररुग्ण करण्याची व्यवस्था उपलब्ध नाही. आपण गेल्या 20 वर्षात पाहिले तर लोकसंख्येच्या तुलनेत आंतररुग्ण करण्याची जी व्यवस्था महाराष्ट्राची आहे तिचा विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल की, 1991 साली दर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. रणजित पाटील .....

1 लाख लोकसंख्येमागे 144 खाटांची व्यवस्था महाराष्ट्र सरकारची होती. आज 2011 साली आपण विचार केला तर आज 1 लाख लोकसंख्येमागे केवळ 102 खाटांची व्यवस्था आहे.

काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी बोलताना असे सांगितले की, वर्तमानाचे भान असणारा आणि भविष्याचा वेध घेणारा हा अर्थसंकल्प आहे. जर आपण हे खरे मानले तर आरोग्य विभागात जे प्रगतीचे निर्देशांक दिलेले आहेत त्यानुसार 1 लाख लोकसंख्येमागे किती आंतररुग्ण करण्याची आपली व्यवस्था आहे ते पाहता आपण दिवसेंदिवस ही व्यवस्था कमी करत चाललो आहोत. मला असे सुचवावेसे वाटते की आपण जर लोकसंख्या वाढीला दोष देत असू तर लोकसंख्या वाढणे हा काही अपघात नाही. हा अर्थसंकल्प भविष्याचा वेध घेणारा आहे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा पुढील दहा वर्षानंतर किती लोकसंख्या असेल याचा विचार करुन जर आपण आपल्या तरतुदी करीत नसू तर आज जे 102 खाटांचे प्रमाण आहे ते दहा वर्षानंतर कदाचित 50 खाटांवर येईल आणि या राज्यामध्ये अराजकता माजल्या शिवाय राहणार नाही. जर आंतररुग्ण करता येत नसेल, आपण आरोग्याच्या सोयीसुविधा देऊ शकत नसू, आपण कोणतीही गोष्ट पूर्ण करु शकत नसू तर हा अर्थसंकल्प भविष्याचा वेध घेणारा आहे असे आपण कसे म्हणू शकतो ?

सभापती महोदय, 2009 मध्ये मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा कायदा झाला. त्याच धर्तीवर आपण आरोग्याच्या विषयामध्ये या राज्याच्या जनतेसाठी सगळ्यांना अधिकाराचे आरोग्य मिळावे या दृष्टीने काही प्रयत्न करणार आहोत का ? अतिशय जबाबदारीने आणि खेदाने नमूद करावेसे वाटते की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये असो किंवा जिल्हा रुग्णालये असो, जे.जे. हॉस्पिटलही त्याला अपवाद नाही, त्या ठिकाणी बहुतांश रुग्णांकडून ऑपरेशन थिएटरमध्ये त्याबद्दलची काही औषध सामुग्री पेशन्टकडून विकत आणावयास सांगितल्याशिवाय त्या ठिकाणी पेशन्टची शस्त्रक्रिया होत नाही.

**( सभापती स्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते )**

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.....

त्या ठिकाणी हर्नियाचे ऑपरेशन करावयाचे असेल तर मेश विकत आणावयास सांगतात, हाडाचे फ्रॅक्चर झाले असेल आणि त्याचे ऑपरेशन करावयाचे असेल तर स्टीलचे स्क्रू व पट्टी आणावयास सांगतात. या सर्व सुविधा जर शासकीय रुग्णालयातून मिळत नसतील तर महाराष्ट्र शासनाची आरोग्य सेवा कुचकामी झालेली आहे असे म्हणण्यास वाव राहतो. त्यामुळे हेल्थ सर्व्हिसेस या शब्दातून सर्व्हिसेस हा शब्द काढून टाकला पाहिजे असे मला वाटते. सेवा या शब्दाचा अर्थ मला जो अभिप्रेत आहे त्यानुसार कोणत्याही कामाचा जर आपण मोबदला नसेल तर त्याला सर्व्हिसेस म्हणतो. जे.जे.हॉस्पिटलमध्ये टर्सरी सेंटरमध्ये ट्रिटमेंट दिली जाते. तेथे ऑपरेशनसाठी लागणारे इम्प्लान्टस् किंवा औषधे रुग्णांना विकत आणावयास सांगितले जात असेल तर आरोग्य सेवा या शब्दातून सेवा शब्द काढून घ्यावा का, यावर सरकारने विचार करण्याची वेळ आली आहे. शासकीय रुग्णालयात विशेष चाचण्या केल्या जातात. मग सी.टी.स्कॅन असो, एमआरआय असो, अँजिओग्राफी असो, अँजिओप्लास्टी असो, व्हेंटिलेटर सपोर्ट असो, स्कॅन इमेज इन्टेंसिफायरचा सपोर्ट असो, या सगळया गोष्टींचा विचार केला तर संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयातील 30 ते 40 टक्के मशिनरी बंद आहे, हे मी दाव्याने सांगतो. अनेकदा एका मागोमाग एक मशिनरी खरेदी करण्याचे प्रस्ताव पाठविले जातात. ही मशिनरी अत्यंत महागडी असते. या मशिनरीची देखभाल करण्याची जबाबदारी शासन कोणावर तरी निश्चित करणार आहे की नाही ? सिव्हिल सर्जन म्हणतात की, मी या बाबतचा प्रस्ताव पाठविलेला आहे, डीन म्हणतात की, मी प्रस्ताव पाठविलेला आहे. पण ही मशिनरी ज्या लोकांच्या, तज्ज्ञांच्या हातामध्ये असते त्या लोकांना एक तर ती चालविण्याचे प्रशिक्षण दिलेले नसते किंवा आपल्या कामावरील ताण कमी व्हावा म्हणून त्या हेतूपुरस्सरपणे बंद पाडलेल्या असतात. कोणत्याही जिल्हा रुग्णालयाच्या सेंट्रल कुलिंग सिस्टिमवर कोट्यवधी रुपये खर्च केलेले असतात. परंतु ही सिस्टिम मेंटेन न केल्यामुळे कायम नादुरुस्त स्थितीत असते.

सभापती महोदय, अकराव्या पंचवार्षिक योजनेतील आरोग्य सेवेतील मुख्य उद्दिष्टे आहेत. ती अशी आहेत की, लोकसंख्येला नियंत्रित ठेवणे, विविध स्तरावरील आरोग्य सेवा वाढविणे व बळकटीकरण करणे, प्रादेशिक व आंतरप्रादेशिक विषमता दूर करणे, प्रादेशिक स्तरावर संदर्भ

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.रणजित पाटील.....

सेवेचे बळकटीकरण करणे. याबाबत मला सांगावेसे वाटते की, कोणत्याही राज्याचे मानांकन पाहिले तर आरोग्य सेवेचा निर्देशांक त्या राज्यातील अर्भक मृत्यू दर, माता मृत्यू दर यावरुन निश्चित केला जातो. मी चालू आर्थिक वर्षाबद्दल माननीय अर्थमंत्री श्री.अजित पवार यांचे आभार मानतो. त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागातील विविध आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी 241 कोटी 95 लाख रुपयांचा निधी ठेवलेला आहे. पण राज्यातील 11 कोटी जनतेसाठी आणि ज्या रुग्णालयांमध्ये 2500 ते 3000 ओपीडी असते त्या ठिकाणच्या पायाभूत सुविधांसाठी ही रक्कम अगदी तोकडी आहे असे मला नमूद करावयाचे आहे.

माननीय अर्थमंत्र्यांनी भाषणात असे म्हटलेले आहे की, ग्रामीण भागातील रुग्णांना एक्स-रे, इसीजी इत्यादी सुविधा प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्तरावर उपलब्ध करुन देणार आहे. पण आज कोणत्याही प्रा.आ.केंद्रात गेलो तर जेथे रुग्णवाहिका आहे तेथे चालक नाही, चालक आहे तेथे रुग्णवाहिका नाही. जेथे चालक आहे तेथे गाडी नादुरुस्त आहे. त्यामुळे तो चालक गावात राजकारण करीत असतो, लोकप्रतिनिधींच्या मागे फिरत असतो. बदलीसाठी प्रयत्न करीत असतो. त्या चालकाला काम नसल्यामुळे तो रिकामा बसलेला असतो. आज अनेक प्रा.आ.केंद्रांमध्ये व ग्रामीण रुग्णालयांमध्ये इसीजी व एक्स-रे मशिन्स उपलब्ध आहेत, परंतु तेथे टेक्नीशियन्स नाहीत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील

जेथे एक्स-रे आणि ईसीजी मशिन्स आहेत त्या बंद पडलेल्या आहेत. तेथे टेक्निशियन्स आहेत परंतु मशिन बंद पडलेल्या असल्यामुळे टेक्निशियन रिकामे बसून पगार घेत आहेत. अशा परिस्थितीमध्ये ईसीजी आणि एक्स-रे मशिन प्राथमिक आरोग्य केन्द्राला देत असाल तर ती आनंदाची गोष्ट आहे. परंतु या एक्स-रे आणि ईसीजी मशिन्स घेऊन आपले उद्दिष्ट साध्य होणार नाही. एक्स-रे आणि ईसीजी मशिन्सना रिकरिंग एक्सपेण्डिचर असतात. ईसीजी, एक्स-रे मशिन्सची नेहमीच देखभाल करावी लागते. एक्स-रे मशिनची देखभाल जास्तच करावी लागते. डार्करुम, डेव्हलपर, फिक्सर अशा गोष्टी कराव्या लागतात. या एक्स-रे मशिनचे देखील आयुष्य असते. 10 दिवसांनी डेव्हलपर फिक्सर बदलावे लागतात. हे सर्व करीत असताना गोष्टींचा आपण भविष्याचा वेध घेतला आहे काय ? प्रत्येक ग्रामीण रुग्णालयासाठी आपण ब्लड बँक चालू करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. ज्या कोणत्या ब्लड बँका सध्या अस्तित्वात आहेत त्यांचे तरी व्यवस्थापन नीट होते आहे किंवा नाही हे आपण कधी पाहिले आहे काय, ज्या ब्लड बँका चालू ठेवलेल्या आहेत त्या किती कार्यरत आहेत ? कुटीर आणि ग्रामीण रुग्णालयामध्ये जिथे अॅनेमिया शिवाय दुसरा कोणताही रुग्ण तपासला जात नाही अशा ठिकाणी आपण ब्लड बँक देत आहात ही समर्थनीय आणि आनंदाची गोष्ट आहे. परंतु त्याच बरोबर आपण ब्लड बँकेच्या ठिकाणी काही काम करु शकतो काय, तेथे छोट्या मोठ्या शस्त्र क्रिया करु शकतो काय हे देखील पाहिले पाहिजे. जिल्हा रुग्णालयातून त्या ब्लड बँकेच्या ठिकाणी आपण टीम पाठवू शकलो तर त्या ब्लड बँकेचा ख-या अर्थाने आपल्याला उपयोग होईल.

सभापती महोदय, ससून रुग्णालयासाठी 20 कोटीची तसेच नांदेड मधील वैद्यकीय कॉलेजला 8.33 कोटीची, औरंगाबाद मधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी 25 कोटीची तरतूद केलेली आहे. मी अमरावती विभागातून येथे आलो आहे. अमरावती विभागामध्ये 5 जिल्हे आहेत. आता असा एकही विभाग राज्यामध्ये नाही की जेथे कॅन्सर रुग्णासाठी कोबाल्ट थिअरपी आणि रेडिओ थिअरपी नाही. मला अतिशय कळकळीने शासनाला विनंती करावयाची आहे की, अमरावती विभागामध्ये दोन दोन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये असून सुध्दा त्याठिकाणी कॅन्सर रुग्णासाठी 5 जिल्ह्यामध्ये कोणत्याही प्रकारची व्यवस्था नाही. रेडिओ थेअरपी किंवा कोबाल्ट युनिट

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील...

उभे करण्यासाठी 5 कोटी पेक्षा जास्त खर्च येत नाही. मग या पाच जिल्ह्यातील लोकांवर हा अन्याय कशासाठी केला जातोय ? या 5 जिल्ह्यातील कॅन्सरच्या रुग्णांना 250 कि.मी.वर असलेल्या नागपूरला जावे लागते किंवा 600 कि.मी.वर असलेल्या मुंबईच्या टाटा रुग्णालयात जावे लागते. सभापती महोदय, कॅन्सरचा रुग्ण हा त्या कुटुंबात आधीच जास्तीचा झालेला उपेक्षित रुग्ण असतो. अशा रुग्णाच्या घरामध्ये मुलांचे शिक्षण असते, लग्न असते आणि अशा परिस्थितीमध्ये हा रुग्ण टाईम बॉम्ब लावून जगत असतो. कारण संपूर्ण कुटुंबाला माहीत असते की या रुग्णाचे आयुष्य जास्तीत जास्त दोन ते तीन वर्षाचे आहे. असे असताना या सरकारला अमरावती विभागासाठी रेडिओ थेअरपी आणि कोबाल्ट थेअरपी युनिट देण्यासाठी पान्हा का फुटू नये ? तेव्हा कॅन्सरवरील उपचारासाठी या अमरावती विभागासाठी रेडिओ थिअरपी किंवा कोबाल्ट थिअरपी युनिट द्यावे अशी मी या निमित्ताने शासनाला कळकळीची विनंती करीत आहे.

सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान ही संपूर्णपणे केन्द्र पुरस्कृत योजना आहे. हे अभियान आपल्या राज्यामध्ये 2005 पासून राबविण्यात येत आहे. आम्हाला महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीचे जे पुस्तक दिलेले आहे त्यामध्ये ग्रामीण आरोग्य अभियानासाठी राज्याचा हिस्सा म्हणून 166 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या पुस्तिकेमध्ये ही तरतूद दाखविण्यामध्ये काही चूक झालेली आहे किंवा कसे याबाबत राज्य मंत्री महोदयांनी खुलासा करावा. कारण राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान ही संपूर्णपणे केन्द्र पुरस्कृत योजना आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 19:00

डॉ. रणजित पाटील...

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा मला सांगावयाचा आहे की, केंद्रशासित एक प्रकल्प पायलट स्तरावर राबविला गेला. त्याचे नाव राष्ट्रीय सुरक्षा विमा योजना होते. या योजनेखाली दारिद्रय रेषेखालील कुटुंबीयांना एक स्मार्ट कॉर्ड वितरित केले गेले. या योजनेचा पूर्ण भार केंद्र शासनाने घेतलेला होता. 600 रुपये प्रिमियम भरुन कुटुंबातील पाच व्यक्तींसाठी 30 हजार रुपयांचे कॅशलेस कॉर्ड देऊन, त्या पाचही व्यक्तींचे बायोमॅट्रीक करुन केंद्र शासनाने हा प्रकल्प या राज्यात प्रायोगिक तत्वावर सुरु केला होता. शासनाने अशा प्रकारचा प्रकल्प संपूर्ण राज्यात राबविला तर रुग्णांपासून डॉक्टरापर्यंत कोणतीही एजन्सी यामध्ये असणार नाही. ते कॅशलेस कॉर्ड घेऊन रुग्ण पाहिजे त्या रुग्णालयात जाऊन आरोग्य सेवेचा लाभ घेऊ शकतो. औषधे विकत घेण्यापासून ते उपचार होईपर्यंत आपला हिस्सा ठेवणारी एजन्सी राहणार नाही. त्यामुळे ही योजना शासनाने राज्यात राबवावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे ( नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, राज्याच्या हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक असून कुठलीही करवाढ नसलेला, 57 कोटी रुपयांचा शिलकीचा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल राज्याचे माननीय मुख्यमंत्री, राज्याचे उप मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री आणि वित्त राज्यमंत्री यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. सहावा वित्त आयोग लागू झालेला आहे. त्याचप्रमाणे महागाई दरातही वाढ झालेली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर खऱ्या अर्थाने शिलकी अर्थसंकल्प सभागृहात सादर करणे ही अवघड गोष्ट होती. परंतु हे कौशल्य माननीय वित्तमंत्र्यांनी दाखविलेले आहे, त्याबद्दल मी मनापासून त्यांचे अभिनंदन करतो. अर्थसंकल्प सादर करीत असताना त्यांनी एक महत्वाची गोष्ट केलेली आहे. कोणत्याही प्रकारची करवाढ न करता, प्रभावी कर वसुली केल्यामुळे शिलकी अर्थसंकल्प ते सादर करु शकले.

सभापती महोदय, विक्रीकरामध्ये 26 टक्के वाढ झालेली आहे. मुद्रांक शुल्कात 31 टक्के वाढ झालेली आहे. सर्वसामान्याना दिलेल्या सवलती तशाच ठेवून, सर्वसामान्यावर कोणत्याही प्रकारचा बोजा न टाकता हा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. आर्थिक शिस्तीच्या बाबतीत काही पावले टाकलेली आहेत, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या बाबतीत दोन्ही बाजूच्या सदस्यांनी आपापली मते व्यक्त केलेली आहेत. सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती न करता तसेच आकडेवारी न सांगता काही मुद्दे मी उपस्थित करणार आहे. अभिनंदना सारख्या अनेक गोष्टी शासनाने केलेल्या आहेत. शेतीसाठी शासनाने भरीव योजना तयार करुन त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज व तीन लाखापर्यंत दोन टक्के व्याज दराने देण्याचे शासनाने ठरविले आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांकडे असलेले कृषी पंपाचे वीज बिल शासनाने मोठया प्रमाणात माफ केलेले आहे त्याबद्दलही मी शासनाचे अभिनंदन करतो. वीज निर्मितीसाठी 2755 भरीव तरतूद शासनाने केलेली आहे. या अनुषंगाने मला एक मुद्दा उपस्थित करावयाचा आहे की, राज्यामध्ये काही वर्षापूर्वी अक्षय प्रकाश योजना चालू झाली होती. ही योजना खूप चांगली होती. ज्या गावाला या योजनेच्या माध्यमातून वीज देत होतो, त्यामुळे गावातील ग्राहकांना चांगली शिस्त लागली होती. वीज कशी वापरावयाची याचे स्वातंत्र्य योजना राबविणाऱ्या गावास दिले होते, त्यामुळे विजेचे नियोजन अतिशय चांगल्या प्रकारे होत होते. अक्षय प्रकाश योजनेमध्ये काही त्रुटी

3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

असतील. त्या त्रुटी दूर करुन ही योजना पुन्हा सुरु केली पाहिजे. गावांमध्ये भार नियमन करीत असतो, ठराविक तासच वीज पुरवठा करीत असतो. त्यामुळे विजेचे नियोजन चांगल्या प्रकारे होते. परंतु गावातील सर्व ग्राहक एकाच वेळी वीज वापरण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे ट्रान्सफॉर्मर जळतात. ते दुरुस्त करण्यासाठी खूप अडचणी येतात. मला असे वाटते की, यातून आपले प्रश्न अधिक बिकट होतात. अक्षय प्रकाश योजनेचा लाभ घेणाऱ्या गावात किती युनीट वीज वापरली जाते, याबाबतची गेल्या पाच वर्षाची सरासरी काढून आवश्यक असेल तेवढीच वीज उपलब्ध करुन दिली तर त्या गावात चोवीस तास वीज पुरवठा उपलब्ध होऊ शकतो. तसेच एकाच वेळेला संपूर्ण वीज वापरली जाणार नाही...

यानंतर श्री. भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे.........

त्यातून चांगल्या प्रकारे विजेचे नियोजन करता येईल.

सभापती महोदया, सिंचन क्षेत्रासाठी 6300 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. राज्यामध्ये फक्त 19 टक्के क्षेत्र ओलिताखाली आलेले आहे. पुढच्या काळात सिंचन प्रकल्प करीत असताना पाणलोट क्षेत्र, शेततळयांना प्राधान्य देण्याबरोबरच ठिबक व तुषार पध्दती लोकांमध्ये अधिक लोकप्रिय कशी होईल, शेतकऱ्यांना स्वस्त दरामध्ये कशी मिळेल याचा विचार होणे आवश्यक आहे. उपलब्ध पाण्याबाबत योग्य ते नियोजन केले तर दीडपट किंवा दुप्पट सिंचन क्षेत्र वाढवू शकतो. त्यादृष्टीने नियोजन करणे अत्यंत महत्वाचे आहे.

सभापती महोदया, माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी आरोग्य विषयाबाबत सविस्तर विवेचन केले आहे. राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजनेबद्दल मला सांगितले पाहिजे की, ही योजना अतिशय चांगली आहे. ही योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत नेली पाहिजे. दरमहा 30 रुपये भरुन संपूर्ण कुटुंबाला 30 हजार रुपयांपर्यंत विम्याची सवलत मिळणार आहे. 80 टक्के आजारावर उपचार मिळणार आहेत. ही योजना जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्याचा शासनाने प्रयत्न केला पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांनी राजीव गांधी जीवनदायी योजना राबविण्याचा संकल्प केला आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. जीवनदायी योजनेमध्ये विम्याची रक्कम शासन भरणार आहे.

सभापती महोदया, शिक्षणाच्या विषयावर या सभागृहात नेहमी चर्चा होत असते. खरे म्हणजे शिक्षण आणि आरोग्य विषयावर बोलत असताना मला हे सांगावयाचे आहे की, कल्याणकारी शासनाची ही जबाबदारी असते, शिक्षण हे लोकांना मोफत दिले गेले पाहिजे. दुर्दैवाने आज असे झ ााले आहे की, आपण शिक्षण हक्क कायदा मंजूर केला. परंतु अजूनही शिक्षण क्षेत्रातील अनेक महत्वाचे प्रश्न अद्याप सोडवू शकलो नाही. सभागृहात अनेकदा शासनाकडून आश्वासने दिली जातात परंतु या आश्वासनाची पूर्तता करण्यामध्ये वित्त विभागाकडून अडथळे निर्माण केले जातात. कायमस्वरुपी विनाअनुदानित शाळांचा प्रश्न असेल, दहा-दहा वर्षे अशा संस्थांमध्ये काम करणारे कर्मचारी आहेत, शिक्षक आहेत त्यांच्या प्रश्नाकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्याची आवश्यकता आहे. हे शिक्षकांचे प्रश्न आहेत असे समजता कामा नये. खऱ्या अर्थाने हे सामाजिक प्रश्न आहेत. ग्रामीण भागात कायम विनाअनुदानित शाळा सुरु झाल्या नसत्या तर जे लाखो विद्यार्थी आज या शिक्षण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 19:05

डॉ.सुधीर तांबे.........

संस्थांमधून शिक्षण घेत आहेत ते शिक्षणापासून वंचित राहिले असते. शिक्षण हक्क कायदा मंजूर करुन आठवीपर्यंत मोफत शिक्षण देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. यासाठी 2012 पर्यंत वाट न पाहता शाळांचे तातडीने मूल्यांकन झाले पाहिजे. मूल्यांकनाचे निकष पूर्वी ठरविले असताना नव्याने मूल्यांकन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. हा मूल्यांकनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण केली पाहिजे, त्यादृष्टीने पावले उचलण्याची गरज आहे.

सभापती महोदया, 11 वी आणि 12 वी पर्यंतचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देत असताना ते एकाच सूत्रामध्ये येत असल्यामुळे 10 वी पर्यंतच्या शाळांबाबत 'कायम' शब्द वगळण्यात आला. परंतु 11 वी व 12 वी च्या शाळांबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून 64 वर्षे झाली आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला राज्य घटना दिली. त्यावेळी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे असावे असे त्यांनी सुचविले होते. त्यावेळची प्राथमिक शिक्षणाची व्याख्या आणि आजची प्राथमिक शिक्षणाची व्याख्या यामध्ये खूप फरक पडलेला आहे. 12 वी पर्यंतचे शिक्षण हे मूलभूत किंवा प्राथमिक शिक्षण समजले गेले पाहिजे. 12 वी पर्यंतचे शिक्षण सर्वांना मोफत दिले गेले पाहिजे. राज्यात आज जी कनिष्ठ महाविद्यालये आहेत त्या सर्व महाविद्यालयांना तातडीने अनुदानावर आणणे गरजेचे आहे. शाळांच्या वेतनेतर अनुदानाबद्दल या सभागृहात वारंवार चर्चा झाली आहे. या शाळा संस्थांमार्फत चालविल्या जात आहेत. लोकांकडून पैसे गोळा करुन, देणग्या मिळवून इमारती उभ्या केल्या जातात. एवढी मोठी गुंतवणूक शासनाला करणे शक्य झाले नसते. शिक्षणाचा प्रसार झाला नसता. जे काही योगदान या शैक्षणिक संस्थांनी आजपर्यंत दिले आहे त्या संस्थांच्या शाळांना वेतनेतर अनुदान दिले जात नाही. या शाळा कशा चालवाव्यात असा यक्षप्रश्न या संस्थांसमोर उभा राहिला आहे.

नंतर 4एम.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे .......

महोदय, त्याचप्रमाणे तंत्रशिक्षणाच्या बाबतीत सांगायचे झाले तर इंजिनिअरिंग व मेडिकल कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय व गरीब विद्यार्थ्यांना आपण मोठमोठ्या शिष्यवृत्ती देतो, ही चांगली गोष्ट आहे. त्याप्रमाणे आयटीआयमध्ये शिक्षण घेणारी मुले सुध्दा अतिशय गरीब असतात, त्यांना ही सवलत मिळत नाही, ही एक प्रकारची विसंगती आहे. काही आयटीआय संस्था खाजगी तर काही अनुदानित असतात अशा सर्व संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याच्या बाबतीत शासनाने जरुर विचार करावा.

महोदय, शासनाने हा शिलकी अर्थसंकल्प सादर केलेला आहे. पण मला असे म्हणावयाचे आहे की, एक-दोन हजार कोटीचा तुटीचा अर्थसंकल्प असता तरी चालले असते पण समाजातील वंचित व गरजू लोकांमध्ये जी दरी वाढत चालली आहे ती कमी करावयाची असेल तर त्यांचाही शासनाने विचार केला पाहिजे. त्यात संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना अथवा सार्वजनिक वितरण व्यवस्थेसारख्या योजना असतील त्यात फेरबदल करण्याची गरज आहे, त्यावर जास्तीचा खर्च करण्याची गरज आहे. कारण गोवासारख्या छोट्या राज्यांनी शेतकऱ्यासाठी पेन्शन योजना सुरु केली आहे. त्यानुसार ज्या शेतकऱ्याचे वय 60 वर्षे झाले त्यांना पेन्शन लागू होईल. आपल्या राज्याने सुध्दा जो गरीब शेतकरी आहे, वृध्द शेतकरी आहे, ज्याला कोणाचाही आधार नाही त्यांनाही योजना लागू करावी अशी मी विनंती करतो. एकंदरित विचार केला तर हा अर्थसंकल्प अत्यंत चांगला असून त्यातून राज्याला एक प्रकारे आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न केलेला आहे, करप्रणाली अतिशय सोपी करुन प्रभावी वसुली केली तर निश्चितपणे अधिक निधी निर्माण होऊ शकतो, असे मला वाटते. म्हणून विकासाची दृष्टी असलेला अर्थसंकल्प, सर्वांना सामावून घेणारा अर्थसंकल्प राज्याला सादर केला त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री आणि माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कृष्णा पाणी तंटा लवाद-2 च्या निर्णयासंबंधीची कार्यवाही

**मु.शी.**: कृष्णा पाणी तंटा लवाद-2 च्या निर्णयासंबंधीची कार्यवाही
या विषयासंबंधी माननीय जलसंपदा मंत्र्यांचे निवेदन

श्री. रामराजे-निंबाळकर (जलसंपदा मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आज दि. 31.3.2011 रोजी सकाळी सभागृहात उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने आपण निदेश दिल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने पुढील निवेदन सादर करीत आहे.

महोदय, कृष्णा पाणी तंटा लवाद-2 ने त्यांचा अहवाल व निर्णय दिनांक 30 डिसेंबर, 2010 रोजी जाहीर केला. आंतरराज्य पाणी तंटा अधिनियम 1956 मधील कलम 5 (3) नुसार निर्णयाबाबत काही स्पष्टीकरण/मार्गदर्शन आवश्यक असल्यास ते 90 दिवसात लवादाकडे मागण्याची तरतूद आहे. नवीन कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याशी निगडीत विविध मुद्यांबाबत शासनाचे सल्लागार व विधिज्ञ यांच्याशी सविस्तर चर्चा करुन दिनांक 29.3.2011 रोजी लवादाकडे स्पष्टीकरणार्थ अर्ज सादर करण्यात आला आहे. पण मी आपल्यामार्फत माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, यासंबंधीची माहिती अद्याप मला मिळाली नाही, त्याला थोडा उशीर लागेल, उद्याही कदाचित मिळेल की नाही हे सांगू शकत नाही. पण सोमवार किंवा मंगळवारला ही माहिती प्राप्त होईल. तसेच मी सभागृहाच्या माध्यमातून राज्याला आश्वासित करु इच्छितो की, काहीही झाले तरी यामध्ये शासन कमी पडलेले नाही.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मी प्रथम माननीय मंत्री महोदयांचे आभार मानतो. कारण शासनाने वेळेत आपली पुनर्विचार याचिका दाखल केली आहे. पण आंध्र प्रदेशाला ज्याप्रमाणे खोऱ्याच्या बाहेर पाणी वापरण्याची परवानगी दिली त्याचा विचार केला तर आपल्या राज्यातील मांजरा खोऱ्यासारख्या दुर्भिक्षीत खोऱ्याचाही विचार झाला पाहिजे. या खोऱ्याला सुध्दा अशाच प्रकारे पाणी वापरण्याची परवानगी मिळाली पाहिजे. अर्थात आपण हे पाणी या भागात वापरण्याची परवानगी देणार की नाही हा नंतरचा व आपला अंतर्गत प्रश्न आहे. पण तशी मागणी करणेही आवश्यक आहे, ती आपण करावी. राज्यातील जनतेला विशेषत: कृष्णा खोऱ्यातील लोकांना हे माहिती झाले पाहिजे की, राज्य सरकार नक्की कोणती मागणी करीत आहे. यासंबंधीचे निवेदन आपण नंतर करणारच आहात, त्याबद्दल मनापासून धन्यवाद देतो.

------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ प्रथम श्री.खर्चे 19.15

पृ.शी. अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.:सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे चालू )

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,सभागृहाची आताची स्थिती पाहिल्यानंतर मला एका गाण्याच्या मैफिलीची आठवण झाली असल्यामुळे ती आठवण मी येथे सांगू इच्छितो. त्या ठिकाणी गायक गाणे गात असतो परंतु एक एक करीत सर्व ऐकणारे त्या कार्यक्रमातून निघून जातात व शेवटी एकच व्यक्ती तेथे उपस्थित असते. गाणा-याला असे वाटले की आपली गाणी खूपच चांगली झालेली आहेत. त्या एकमेव प्रेक्षकाला त्याने सांगितले की, तू शेवट पर्यत थांबलास त्याबद्दल तुला धन्यवाद .तर त्या व्यक्तीने असे उत्तर दिले की, मी गाणे ऐकण्यासाठी थांबलेलो नसून ज्या सतरंजीवर आपण बसलेला आहात ती माझी आहे व ती परत घरी घेऊन जाण्यासाठी मी येथे थांबलो आहे. माननीय वित्त राज्य मंत्र्यांची स्थिती अशीच झालेली आहे. माननीय वित्त राज्य मंत्र्यांना अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर द्यावयाचे असल्यामुळे त्यांना थांबावेच लागणार आहे.

सभापती महोदय, भारत आणि पाकिस्तान यांच्या मधील कालच्या क्रिकेटच्या मॅचमध्ये पाकिस्तानमधून मोहाली येथे मोठया प्रमाणावर लोक या आशेने आले की आपला देश क्रिकेटची मॅच जिंकणार आहे.त्यांची एका अर्थाने जशी निराशा झाली आहे तशीच निराशा माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे अर्थसंकल्पाचे भाषण ऐकल्यानंतर माझी झाली आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये अनेक गोष्टी तोंडाला पाने पुसल्यासारख्याच आहेत.ए शेतक-याला 50 हजार रुपयां पर्यतचे कर्ज शून्य टक्के व्याजाने आणि 3 लाख रुपया पर्यतचे कर्ज 2 टक्के व्याजाने दिले जाणार आहे. या एका घोषणे संबंधी सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत परंतु याकरता या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये फक्त 84 कोटी 88 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. सबंधित शेतक-याने कर्जाचे हप्ते व्यवस्थितपणे भरल्यानंतर त्याने भरलेल्या व्याजाची रक्कम त्याला परत देण्यात येणार आहे. 84 कोटी 88 लाख रुपयामधून फक्त 30 हजार शेतक-यांनाच फायदा देऊ शकणार आहोत. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांचा विचार केला तर एका जिल्हयामध्ये फक्त एक हजार शेतक-यांना या योजनेचा फायदा

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील ....

मिळणार आहे परंतु तीन लाख रुपया पर्यतचे कर्ज दोन टक्के व्याजाने देण्यात येणार आहे या योजनेचा गाजावाजा मात्र मोठया प्रमाणावर केला गेला आहे.व्याजाची जी परतफेड केली जाणार आहे ती फक्त 30 हजार शेतक-यांना केली जाणार आहे.सभापती महोदय अर्थसंकल्पाच्या भाषणातील प्रत्येक घोषणेच्या खोलामध्ये गेल्यानंतर आपल्या असे लक्षात येईल की, हा संपूर्ण् अर्थसंकल्प म्हणजे तोंडाला पाने पुसणारा आहे.

सभापती महोदय, शेतक-यांचे कृषी पंपाचे वीज बिल भागविण्यासाठी दोन हजार 500 कोटी रुपयांचे विशेष अनुदान दिले जाणार आहे असे या अर्थसंकल्पात सांगण्यात आलेले आहे परंतु या शेतक-यांना वीजच दिली जात नाही. दिवसातील 14 ते 16 तास भारनियमन असल्यामुळे शेतक-यांना पुरेशी वीज मिळत नाही. त्यामुळे विजेचे बिल भरण्यासाठी मदत करण्यात येणार आहे हे म्हणणे देखील अत्यंत चुकीचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, ज्या शेतक-यांची विजेची बिले थकलेली आहेत त्यांना व्याज व दंड माफ करण्यात येईल असे सांगण्यात आलेले आहे परंतु अशाच प्रकारची घोषणा नागपूरच्या अधिवेशनामध्ये करण्यात आली होती. ज्या शेतक-यांची विजेची बिले थकलेली आहेत त्यांची कनेक्शन तोडली जाणार नाहीत असे त्यावेळी सांगण्यात आले होते. परतु त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे मोठया प्रमाणावर शेतक-यांच्या विजेची कनेक्शन्स तोडण्यात आली होती.शेतक-यांच्या बाबतीत त्यांची फसवणूक करण्याचा प्रयत्न झाला असून त्यामुळे शेतक-यांची घोर निराशा झालेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी एक मुद्दा या ठिकाणी मांडला होता तो मी अधोरेखित करतो. शालेय विद्यार्थी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्याची संख्या राज्यामध्ये जवळजवळ दीड कोटी एवढी आहे. या संदर्भात अर्थसंकल्पामध्ये नेमकी किती तरतूद करण्यात आली आहे हे शोधण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य डॉ सुधीर तांबे यांनी असे सांगितले की, विना अनुदानित तत्वावरील शाळेतील 37 हजार शिक्षकांना गेली दहा वर्षे पगार मिळालेला नाही त्यांना जूनपर्यत अनुदान देण्यात येणार आहे.असे माननीय शालेय शिक्षण मंत्र्यानी सांगितले होते.. त्यांच्यातील "कायम" हा शब्द काढून दोन वर्षे होऊन गेली आहेत .

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील...

त्यांना येत्या जून महिन्यापर्यन्त आपण अनुदान देणार असल्याचे जाहीर केले परंतु त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये आपण तरतूद केली नाही. आपण याठिक्‌ाणी घोषणा करता परंतु त्यासाठी तरतूद करीत नाही अशी शिक्षणाच्या बाबतीत स्थिती झाली आहे. त्याच प्रमाणे 1 एप्रिलपासून ड वर्ग महानगरपालिकेचा जकात कर रद्द करुन त्यापोटी स्थानीय कर लावल्यानंतर जी तूट असेल ती भरुन काढण्यासाठी अनुदान देणार आहात. परंतु या अर्थसंकल्पामध्ये 14 ड वर्ग महानगरपालिकांना अनुदान देण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. कोल्हापूर महानगरपालिकेचा विचार केला तर जकातीचे उत्पन्न 128 कोटी रुपयांचे आहे, त्याठिकाणी लावण्यात येणाऱ्या स्थानीय करातून त्यांना 50 कोटींपेक्षा जास्त उत्पन्न मिळणार नाही तर जवळ जवळ 78 कोटींची तूट त्यांना सहन करावी लागणार आहे. ही तूट आपण कशी भरुन काढणार आहात. संपूर्ण महानगरपालिकेचे बजेट 170 कोटींचे आहे. त्यांना जर आपण 78 कोटी रुपयांची तूट अनुदान रुपाने देणार नसाल तर कोल्हापूर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे पगार करता येणार नाहीत. अशा प्रकारच्या अनेक गोष्टींच्या घोषणा आपण केल्या आहेत. परंतु तशा प्रकारची तरतूद बजेटमध्ये केलेली नाही. या ठिकाणी दोन-तीन छोटया छोटया गोष्टींचा उल्लेख करुन मी माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, सर्वात महत्वाची गोष्ट अशी की, या अर्थसंकल्पामध्ये आपण आदिवासी समाजाकरिता मोठया प्रमाणात तरतूद केल्याचे सांगतो. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये 2200 कोटी रुपयांची तरतूद आदिवासी समाजासाठी करण्यात आली होती, परंतु ती खर्च करु शकलेलो नाही. शेवटी आपल्या सरकारमधील एका मंत्र्याने दुसऱ्या मंत्र्यांवर आरोप करीत असताना ही गोष्ट लक्षात आली. आदिवासी, मागासवर्गीय समाजाकरिता मोठया प्रमाणात करण्यात आलेली तरतूद शेवटपर्यंत खर्ची न पडल्यामुळे 2200 कोटी रुपये शिल्लक रहातात व ते पैसे दुसऱ्या खात्याकडे वळविले जातात याचा आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, अशा प्रकारची गळती महाराष्ट्राच्या संपूर्ण इन्कम सोर्सला लागली आहे. या बाबतीत मी दोन गोष्टींचा उल्लेख करु इच्छितो. एका कुटुंबाला संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान 500 रुपये मिळते. ते अनुदान बायोमेट्रिक पध्दतीने देण्याचा निर्णय घेण्यात आला. आणि प्रयोग म्हणून कोल्हापूर जिल्ह्याची निवड करण्यात आली. परंतु या जिल्ह्यामध्ये बायोमेट्रिक पध्दतीने अनुदान देत असतांना जवळ जवळ 124 लाख रुपयांचे अनुदान उचलले गेले नाही. याचा

श्री. चंद्रकांत पाटील...

अर्थ असा की, आता पर्यंत बोगस नावाने हे अनुदान उचलले जात होते. त्याच प्रमाणे कालच या सभागृहात आणखी एका गोष्टीचा उल्लेख करण्यात आला. या वर्षीपासून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांची शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या अकाऊंटमध्ये जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला, तेव्हा 12 लाख मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळालेली नाही हे लक्षात आले. याचा अर्थ 12 लाख बोगस मुलांची नावे दाखवून ते पैसे शाळेमध्ये जात होते परंतु ते मुलांना मिळत नव्हते. असाच प्रकार कर्जमाफीच्या बाबतीत लक्षात आला त्यावेळी फार मोठया प्रमाणात खोटी कर्जे वाटली गेल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे अवेळी आलेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीबद्दल 1 हजार कोटी रुपयांचे अनुदान दिले गेले.त्यावेळी मोठया प्रमाणात शेतीचे खोटे पंचनामे करण्यात आले . जोपर्यंत आपण ही आर्थिक गळती थांबवीत नाही तो पर्यंत योग्य कारणांसाठी आपल्याला पैसे मिळणार नाहीत. या संपूर्ण अर्थसंकल्पामध्ये केवळ घोषणा करण्यात आल्या आहेत, परंतु त्याच्या खोलात गेल्यानंतर किमान मदत दिली गेली असल्याचे आढळते. त्याचे उदाहरण ध्यावयाचे झाले तर फक्त 30 हजार शेतकऱ्यांना 3 लाखाचे कर्ज देणार आहोत, पोलिसांच्या घरांच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर आपण त्यांना 6 हजार घरे देणार असल्याचे सांगितले, परंतु फक्त 2700 लोकांनाच घरे देणार आहात. आपल्या घोषणा खूप चांगल्या असल्या तरी प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होणार नाही. त्यामुळे एका अर्थाने जनतेची फसवणूक करणारा हा अर्थसंकल्प आहे असे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते)** : माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी आपले भाषण सुरु करावे. त्यांनी कमीत कमी वेळामध्ये आपले भाषण पूर्ण करावे.

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर मी कमीत कमी शब्दात आणि कमीत कमी वेळामध्ये बोलण्याचा प्रयत्न करणार आहे. मला या सभागृहामध्ये येऊन तीन वर्षे झाली, परंतु या तीन वर्षाच्या काळात आपल्या आसनावर बसलेल्या कोणत्याही पीठासीन अधिकाऱ्यांनी मला कमीत कमी वेळामध्ये भाषण पूर्ण करा, शेवटचे भाषण तुमचे असाच संदेश दिला आहे. मला कधीच अधिकची संधी दिली गेली नाही. या सभागृहात मला कां अस्पृश्य मानले जाते हे कळले नाही. इतकेच नाही तर मी दिलेल्या लक्षवेधी सूचना सुध्दा स्वीकारल्या जात नाहीत, मी दिलेले विशेष उल्लेख सुध्दा स्वीकारले जात नाहीत. माझ्या सहनशक्तीचा गैरफायदा घेतला जातो की काय...

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावरील भाषण सुरु करावे.

श्री. भगवानराव साळुंखे : मला माझ्या भावना या ठिकाणी मुद्दाम मांडल्या पाहिजेत, त्या पटलावर आल्या पाहिजेत म्हणून मी या ठिकाणी बोलत आहे.

**तालिका सभापती** : या आसनावरुन कुणावरही अन्याय केला जात नाही.

श्री. भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर बोलत असतांना मला दोन बाबींकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे . . . .

सभापती महोदय, मला या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना दोन बाबींकडे लक्ष वेधावयाचे आहे. पहिली बाब अशी की, आम्हाला ज्यादिवशी अर्थसंकल्प दिला जातो, तेव्हा भली मोठी बॅगही दिली जाते. यावेळेस बॅगेमध्ये 47 पुस्तके आणि त्याशिवाय आणखी 5 पुस्तके अशी एकूण 52 पुस्तके देण्यात आली आहेत. परंतु या विषयाबाबत बोलण्यासाठी 52 मिनिटांचा वेळही दिला जात नाही म्हणजेच आपण किती विरोधाभासामध्ये काम करीत आहोत हा एक मुद्दा मला याठिकाणी नोंदवावयाचा आहे.गेल्या वर्षी बजेट मांडण्यात आले,त्यानंतर दोन वेळा पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या.मार्च-एप्रिल मध्ये होणाऱ्या अधिवेशनाला अर्थसंकल्पिय अधिवेशन म्हणतो. परंतु यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे असे मला वाटते.यासाठी अधिवेशनाचे पहिले चार दिवस किंवा आठ दिवस हे गेल्या वर्षभरामध्ये जी तरतूद केली होती, त्याप्रमाणे किती खर्च झ ाला,त्यातून काय आऊटपुट मिळाला याबाबत सदनामध्ये जर चर्चा झाली तर मग आपला प्रशासनावर अंकुश राहील,त्याला अकाऊंटॅबिलीटी येईल तसेच अन्सरेबिलीटीही येऊ लागेल. त्याचबरोबर आपण जे सगळे ज्यासाठी करीत आहोत त्यासंदर्भात योग्य रितीने मोजमापही करता येईल अशा प्रकारची पध्दत रुढ करता येईल काय याबाबत मंत्रिमंडळाने विचार करावा अशी सूचना मी शासनाला करीत आहे.त्याचबरोबर एकदा बजेट मांडल्यानंतर त्यावर चर्चा करताना जेवढे हेडस् आहेत,त्याप्रमाणे त्या बाबी विषयपत्रिकेवर चर्चेसाठी ठेवावयास पाहिजेत, म्हणजे आपण आज दोन तास शिक्षण विभागावर चर्चा करणार आहोत,दुसऱ्या दिवशी शेतीच्या संबंधात चर्चा करणार आहोत अशी पध्दत सुरु केली तर चर्चा दर्जेदार होईल अशी माझी दुसरी सूचना आहे.

सभापती महोदय, जो संक्षिप्त अर्थसंकल्प आहे.त्याबाबत सांगावयाचे तर रुपया येतो कसा आणि कसा खर्च होतो? याचे विश्लेषण दिलेले आहे.परंतु ज्या सामान्य माणसाच्या खिशातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कर रुपाने पैसा कसा काढला जातो आणि मग तो पैसा कुठे जातो, त्याला त्याचे किती रिटर्न देतो अशा तऱ्हेचे ग्राफीकल रिप्रेझेंन्टेशन दिलेले आहे, पुस्तकामध्ये वर्तुळाकार पध्दतीने माहिती दिलेली आहे.सामान्य माणसाच्या खिशातून पैसा घेतल्यानंतर त्याला आपण कशा पध्दतीने सेवा देत आहात अशी माहिती देखील द्यावयास पाहिजे एवढे मला या बजेटच्या बाबतीत प्राथमिक स्वरुपामध्ये बोलावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मी ज्या मतदार संघामधून आलो आहे त्याबद्दल अगोदरच्या ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे . . . .

वक्त्यांनी केलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती टाळून कमीतकमी शब्दामध्ये बोलणार आहे. या बजेटमध्ये धक्कादायक बाब अशी लक्षात आली आहे की, यावेळेस कधी नव्हे एवढया मोठया प्रमाणात वेतनेतर अनुदानावर विचार सुरु आहे, तरी सुध्दा वेतनेतर अनुदानाची खाजगी पूर्व प्राथमिक शाळांसाठी 6 कोटी रुपयांची तरतूद दाखविली आहे. पण मी गोंधळून गेलो की, 6 कोटी रुपये नक्की कोणाला दिले जाणार आहेत? कसे दिले जाणार आहेत ? कारण एवढा गदारोळ होत असताना देखील हा निधी दिलेला आहे. मला असे वाटते की, या तरतुदीबाबत स्वागत केले पाहिजे. याठिकाणी 6 कोटी रुपयांची तरतूद करीत आहोत आणि मघाशी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते साहेबांनी 52 कोटी सरसकट 5 टक्क्याने देण्याबाबत उल्लेख केला. खरे म्हणजे आमचा मुद्दाच असा आहे की, संरक्षणानंतर महत्वाचे शिक्षण खाते आहे. शाहू,फुले,आंबेडकर यांच्या महाराष्ट्रामध्ये कै.यशवंतराव चव्हाण यांनी घालून दिलेल्या पध्दतीचा विचार केला तर शिक्षणाला अग्रक्रम देत आलो म्हणून वाड्या-वस्तीतील मुले शिकली. परंतु आज त्या शाळा जवळजवळ ओस पडत आहेत. त्या शाळांना वेतनेतर अनुदान दिले जात नाही, इमारत भाडे दिले जात नाही. खेड्या-पाड्यातील शाळांची अगदी दुरावस्था झालेली आहे. एवढेच नाही तर आमच्याच कार्यकर्त्यांनी तेथेच आता इंग्रजी माध्यमाच्या शाळा काढलेल्या आहेत आणि जिल्हा परिषदेच्या, नगरपरिषदेच्या शाळा वर्ग करुन घेत आहेत आणि त्याचा कमर्शिअल उपयोग करीत आहेत म्हणजे आम्ही कोणत्या पध्दतीची पावले उचलत आहोत हा प्रश्न आहे आणि आपण किती चुकीच्या दिशेने निघालो आहोत हे लक्षात येईल. याठिकाणी 6 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, त्याप्रमाणे आज सुध्दा शासनाने अतिशय गंभीरपणे ज्या काही तरतुदी करावयाच्या आहेत, त्या कराव्यात. पण कोणत्याही परिस्थितीत सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक एवढेच नव्हेतर सिनिअर कॉलेजेसचे सुध्दा मेन्टेनन्स ग्रँट दिलेल्या नाहीत, वेतनेतर अनुदान दिलेले नाही. या सगळयाची तरतूद करावयास पाहिजे अशा प्रकारची मागणी करतो.

सभापती महोदय, या बजेटमध्ये मला आणखी एक धक्कादायक बाब पहावयास मिळाली ती म्हणजे कधी नव्हे ते 1.42 कोटी रुपयांची तरतूद पूर्व प्राथमिक शाळा म्हणजे बालवाड्या उघडण्यासाठी केलेली आहे. बालवाड्या उघडण्यासाठी तरतूद करण्यात येत आहे ही स्वागतार्ह गोष्ट आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 19:30

श्री. भगवान साळुंखे.....

राईट टू एज्युकेशन बाबत सांगावयाचे तर महाराष्ट्र शासनाच्या इयत्ता पहिली ते इयत्ता आठवी पर्यंतच्या शिक्षणची जवळ जवळ संपूर्ण जबाबदारी केंद्र शासन घेत आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षणाच्या माध्यमातून केंद सरकार मोठया प्रमाणात पैसे देणार आहे. उच्च शिक्षणाच्या बाबतीत सुध्दा केंद्र सरकार 80 टक्के पैसे देते आहे. मग या शिक्षणाच्या बाबतीत राज्य शासनाची जबाबदारी किती आहे? मला असे वाटते की, राज्य सरकारची एकूण शिक्षणाची जबाबदारी काढली तर ती 10 ते 15 टक्के इतकी येते. केंद्र शासनाने प्राथमिक शिक्षणाची सर्व जबाबदारी उचललेली असेल तर राज्य सरकारने महाराष्ट्रातील पूर्व प्राथमिक शिक्षणाची सर्व जबाबदारी का उचलू नये? बालवाडया उघडण्यासाठी केवळ दीड कोटी रुपयांची तरतूद करुन शासन बालवाडया उघडीत आहे, अशा प्रकारचा देखावा निर्माण न करता, या संदर्भात एक चांगली महत्वाकांक्षी योजना आखली पाहिजे. नगरपालिकेच्या प्राथमिक शाळा असतील महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा असतील, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा असतील किंवा खाजगी शिक्षण संस्थांच्या प्राथमिक शाळा असतील त्यांनाच प्राथमिक शाळा दिल्या पाहिजेत. या शाळांमध्ये सावित्रीबाईंचा पुतळा उभा केलेला असतो, डॉ. आंबेडकरांचा पुतळा उभा केलला असतो, महात्मा फुल्यांचा पुतळा उभा केलेला असतो मात्र तेथे बालवाडीतील प्रवेशासाठी लाख ते दोन लाख रुपयाचा सौदा चालू असतो, हे कुठे तरी रोकावे लागेल. त्यासाठी या बालवाडया शासनाच्या शाळांना जोडून पूर्व प्राथमिक शिक्षण शासनच्या खर्चातून दिले पाहिजे. दोन-तीन वर्षामध्ये यासंबंधीचा एक महत्वाकांक्षी कार्यक्रम हातामध्ये घेतला पाहिजे, अशा प्रकारची विनंती मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाचा अभ्यास करीत असताना माझ्या आणखी एक गोष्ट लक्षात आलेली आहे. प्राथमिक शाळांच्या इन्स्पेक्शनसाठी आणि माध्यमिक शाळांच्या इन्स्पेक्शनसाठी चांगली तरतूद करण्यात आलेली आहे. पण ही मंडळी ज्यावेळी इन्स्पेक्शन करण्यासाठी जातात त्यावेळी त्यांच्याकडून अशा प्रकारचा निरोप येतो की, आमच्या गाडीत डिझेल भरायला पैसे द्या, बंद पाकीट द्या, आमच्या जेवणाची व्यवस्था करा. मग ही सगळी तरतूद जाते कुठे? अशा प्रकारचा प्रश्न माझ्या मनामध्ये निर्माण होतो. त्याच बरोबर हे अधिकारी इन्स्पेक्शन काय करतात हाही मोठा प्रश्न आहे. म्हणून मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो की, इन्स्पेक्शनसाठी जर इतक्या मोठया प्रमाणात तरतूद करण्यात येत असेल तर शाळांची वार्षिक तपासणी गुणवत्तापूर्ण होते काय,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. भगवान साळुंखे......

योग्य रीतीने होते काय? याबाबत एक काऊंटर चेक ठेवणारी यंत्रणा निर्माण करावी लागेल. ज्यांनी इन्स्पेक्शन करावयाचे आहे, ती यंत्रणाच जर भ्रष्टाचारी झाली असेल, उदासीन झाली असेल किंवा तिला आणखी अन्य कारणांनी काही मर्यादा आल्या असतील तर त्या सगळयांचे मोजमाप करुन चांगल्या पध्दतीने इन्स्पेक्शन कसे होईल याकडे लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सबंध महाराष्ट्रामध्ये शिक्षकांच्या मुलांना मोफत प्राथमिक शिक्षण देण्याचा कायदा, नियम, शासन निर्णय हा 1995-96 ला झाला. त्यासाठी 1 कोटी 33 लाख रुपये तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ 20 ते 22 हजार माध्यमिक शाळा आणि जवळ जवळ तेवढयाच प्राथमिक शाळा, तेथे शिकविणारा शिक्षक वर्ग, त्या शिक्षकांची मुले यांच्यासाठी सुविधा देण्यात आलेली आहे. मला हे मान्य आहे की, ही सुविधा राज्य शासनातील कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी नाही. याबाबतीत त्यांनीही मागणी करावी, सरकार त्याबाबतीत विचार करील. परंतु या योजनेचा फायदा या शिक्षकांच्या हातात पडू द्यावयाची नाही, असा प्रशासनातील मंडळींचा प्रयत्न असतो तसेच याबाबतीत शासनाची उदासीनता आहे. ही उदासीनता किती आहे तर 1995-96 ला एम.बी.बी.एस.साठी फक्त चार हजार रुपये फी होती. आज ती चार लाख रुपयावर गेलेली आहे. एखाद्या शिक्षकाचा मुलगा एम.बी.बी.एस.साठी गेला असेल, इंजिनियरिंगसाठी गेला असेल तर त्याच्या शैक्षणिक फीचा चार ते पाच हजार रुपयाचा प्रस्ताव करायचा, तो प्रस्ताव तो मुलगा ज्या जिल्हयातील कॉलेजमध्ये शिकत असेल त्या जिल्हयातील शिक्षणाधिकाऱ्याकडे पाठवायचा, शिक्षणाधिकारी तो प्रस्ताव स्वीकारत नाहीत. तो स्वीकारावा म्हणून दहा वेळा पाठपुरावा करावयाचा त्यानंतर तो प्रस्ताव स्वीकारला तर चार हजार रुपये मिळतात. मग त्या कॉलेजचे प्राचार्य असे सांगतात की, तुझ्या मुलाची रोख फी भर आणि चार हजार रुपये मला देणगी म्हणून दे. सभापती महोदय, शिक्षक पाल्य मोफत शिक्षण योजनेचे आधुनिकीकरण करावे लागेल, आताच्या सुधारित दराने फी द्यावी लागेल. अशा प्रकारे या याजनेमध्ये सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता आहे.

यानंतर श्री. बरवड...

अधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ......

या बरोबरच न्यायाधिकरण म्हणजे ज्याला आपण स्कूल ट्रिब्युनल म्हणतो त्यासाठी सुमारे अडीच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रामध्ये 35 जिल्हे आहेत आणि साधारणत: 3-4 जिल्हे मिळून एक ट्रिब्युनल आहे. डिव्हीजनल पातळीवर ट्रिब्युनल आहे. एका एका ट्रिब्युनलकडे दाखल झालेल्या केसेसची संख्या लक्षात घेतली तर त्या ठिकाणी शेकडोच्या घरामध्ये केसेस पडलेल्या आहेत आणि एका एका केसचा निकाल 7-8 वर्षे लागत नाही. त्याला दुसरा पर्याय नसतो त्यामुळे त्याच मार्गाने जावे लागते. हे ट्रिब्युनल जिल्हा पातळीवर असले पाहिजे. त्यांची कार्यकक्षा रुंदावली पाहिजे तसेच त्यांना गती दिली पाहिजे. ज्याला फास्ट ट्रॅक म्हणतो त्या पध्दतीने त्यांची गती वाढली पाहिजे यासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. माझी शासनाला विनंती आहे की, या ट्रिब्युनल्सची संख्या सुध्दा चांगल्या पध्दतीने कशी वाढेल आणि जिल्हा पातळीवर ट्रिब्युनल कसे येतील हे पाहण्याची गरज आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये पहाटशाळा आणि संस्कृत विषयाचा अभ्यास आणि विकासासाठी 4 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रासाठी 4 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. आज संस्कृत भाषा मृतावस्थेकडे जात आहे. या देशाच्या सर्व भाषांची जननी असलेल्या संस्कृतच्या बाबतीत जर एवढी उदासीनता असेल तर काय होणार ? उद्या आपण त्या संदर्भात संशोधन करण्यासाठी परदेशामध्ये जाणार आहोत काय ? या ठिकाणी तरतूद वाढविण्याची नितांत आवश्यकता आहे, असे मला वाटते. युती शासनाच्या काळामध्ये तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी महाराष्ट्र छात्रसेनेचा एक चांगला कार्यक्रम घेतला होता. तो कार्यक्रम गेली पंधरा वर्षे जवळजवळ गोठलेल्या अवस्थेमध्ये आहे. त्या वेळी विद्यार्थीनींना जे गणवेश दिलेले होते तेच आहेत. त्यांचे बूट फाटले आहेत. शिक्षकांकडेही गणवेश नाही. पण या वेळी मात्र या संदर्भात 6 कोटी 71 लाख रुपयांची म्हणजे जवळजवळ 7 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही तरतूद मी समजू शकतो. परंतु या तरतुदीने संपूर्ण महाराष्ट्राची गरज भागणार का ? महाराष्ट्र शासनाने उशिरा का होईना, बेटर लेट दॅन नेव्हर या न्यायाने छात्रसेनेकडे राजकीय परिभाषेमध्ये न बघता त्यांना हे देण्याचे मान्य केले आहे. माझी शासनाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. भगवान साळुंखे ...

विनंती आहे की, महाराष्ट्र छात्र सेनेचा उपक्रम हा अत्यंत चांगला उपक्रम आहे. त्याला शैक्षणिक मूल्य आहे. तो उपक्रम आपण पुनरुज्जीवित करीत आहात, त्यासाठी तरतूद करीत आहात पण त्यासाठी पूर्ण ताकदीने तरतूद करण्याची आवश्यकता आहे. ती सरकारने करावी अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. 100 वर्षे पूर्ण केलेल्या संस्थेला अर्थसहाय्य मिळण्याच्या संदर्भात मघाशी उल्लेख करण्यात आला. या वर्षी शासनाने फक्त डेक्कन कॉलेजला 3.29 कोटी रुपये एवढी रक्कम देण्याचे मान्य केले आहे. 100 वर्षे पूर्ण केलेल्या डेक्कन कॉलेज सारख्या अनेक संस्था महाराष्ट्रामध्ये आहेत. एकाच संस्थेला हा निकष न लावता 100 वर्षे पूर्ण झालेल्या सर्व संस्थांना सिनियॉरिटीनुसार संपूर्ण महाराष्ट्रात अर्थसहाय्य दिले तर काय हरकत आहे ? याबाबत शासनाने निर्णय घेतला पाहिजे.

सभापती महोदय, शासनाने ग्रंथालयांच्या विकासासाठी जिल्हा परिषदेला दीड कोटी रुपये दिलेले आहेत. त्यांच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळ विकसित केली जावी या दृष्टीने ही तरतूद केलेली आहे. गाव तिथे ग्रंथालय असा कायदा करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. या चळवळीबाबत शासनाचा दृष्टीकोन असा असला पाहिजे की, महाराष्ट्रामध्ये 43 हजार खेडी आहेत त्यातील ग्रंथालय नसेलेली किती खेडी आहेत आणि त्या ठिकाणी ग्रंथालय करण्यासाठी किती तरतूद लागेल आणि ते किती वर्षात पूर्ण करता येईल या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. परंतु दुर्दैवाने तो प्रयत्न होत नाही. या वेळेला शासनाने आर्थिक दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न 15 हजार रुपये आहे अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी शुल्क देण्याकरिता फक्त 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. खरे म्हणजे या महागाईच्या काळामध्ये ही मर्यादा 1 लाख रुपयापेक्षा जास्त वाढविली पाहिजे आणि तरतुदही वाढविण्याची आवश्यकता आहे. नाही तर काही मुले या शैक्षणिक शुल्कापासून वंचित राहतील. ते यापासून वंचित राहणे बरोबर नाही. या वेळेला संशोधन संस्थांना फक्त 30 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. खरे म्हणजे संशोधन संस्थांसाठी प्रचंड तरतूद करण्याची आवश्यकता आहे. कारण संशोधन होण्याच्या दृष्टीने ते शासनाने करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ....

सभापती महोदय, मघाशी कायम विनाअनुदानितच्या संदर्भात एक उल्लेख येऊन गेला. कायम विनाअनुदानितच्या जवळजवळ 1834 माध्यमिक शाळा आहेत आणि जवळजवळ 1600 प्राथमिक शाळा आहेत. 8466 तुकड्या आहेत. या सगळ्यांच्या बाबतीत कायम शब्द काढून याच वर्षामध्ये त्या बाबत आर्थिक तरतूद केली जावी.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी दारुबंदीसाठी केवळ 53 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. दारुबंदीचा प्रचार करण्यासाठी ही रक्कम तुटपुंजी आहे. दारुबंदी करणे, त्याचा प्रचार करणे हा शासनाच्या जबाबदारीचा भाग आहे, दारुबंदीसाठी प्रबोधन करणे, उपक्रम राबविणे, समुपदेशन करणे, व्यसनमुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न बाळगणे, यासाठी या अर्थसंकल्पात तरतूद करण्याची आवश्यकता आहे एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो.

------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**हरकतीचा मुद्दा**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. "घटनेच्या कलम 371 (2) नुसार संविधानात काहीही असले तरी महाराष्ट्र व गुजरात या राज्यांबाबत आदेश करुन त्याद्वारे राष्ट्रपतींना पुढील गोष्टींसाठी राज्यपालांवर कोणतीही विशेष जबाबदारी सोपवण्याचा उपबंध करता येईल. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र किंवा यथास्थित सौराष्ट्र, कच्छ व उर्वरित गुजरात यांच्यासाठी अलग अलग विकास मंडळे स्थापन करुन, त्यापैकी प्रत्येक मंडळाच्या कामकाजाचा अहवाल दरवर्षी राज्य विधानसभेसमोर ठेवला जाईल व तशी तजवीज करण्यात येईल. (ख) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्रांवरील म्हणजे मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रातील क्षेत्र या क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधीचे समन्यायी वाटप करणे आणि सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्रातील तंत्र शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त सोयी व व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीची पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्यायानुसार व्यवस्था करणे," अशी घटनेत तरतूद आहे.

सभापती महोदय, या अनुषंगाने अनेक अधिवेशनामध्ये आम्ही हा विषय सातत्याने मांडत आलो आहोत. यासंबंधी त्यावेळी सभागृहात रामायण घडले होते. या भागांसाठी वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्यासाठी उशीर झाला, ते कार्यान्वित करण्यासाठी उशीर झाला म्हणून, राज्यपालांचे निर्देश मिळावेत याकरिता आणि समन्यायी तत्वानुसार निधीचे वाटप होण्यासाठी सभागृहात आम्ही प्रचंड महायुध्द निर्माण केले. शेवटी आम्ही न्यायालयात गेलो. न्यायालयाने सुध्दा घटनेतील तरतुदीनुसार निर्णय दिला. तेव्हापासून या राज्याचा अर्थसंकल्प सभागृहात सादर होण्यापूर्वी समन्यायी तत्वानुसार वाटप केल्याचा प्रथम गोषवारा आम्हाला देण्यात येत होता. त्यानंतर अर्थसंकल्प मांडला जात होता व नंतर त्यावर चर्चा होत होती. हा गोषवारा वितरित होण्याची आम्ही आतापर्यंत वाट पाहिली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडे तो असेल तर मला माहीत नाही. इतर सन्माननीय सदस्यांकडे त्याची प्रत असेल तर माझ्या बुध्दीत भर पडेल व माझी अपुरी माहिती असेल तर सदनाची माफी मागून मी खाली बसेन. पण दरवर्षी अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी 5-6 दिवस अगोदर माननीय राज्यपालांचे निर्देश सभागृहात वितरित केले होते. त्या

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते....

निर्देशानुसार अर्थसंकल्पात तजवीज करण्याबाबत सरकारला त्यांनी काय आदेश दिले आहेत ते त्यातून स्पष्ट होत असते. मागील 3-4 वर्षे आम्हाला निर्देषाच्या गोषवाऱ्याची प्रत मिळालेली आहे. परंतु या वर्षी आम्हाला ती प्रत उपलब्ध झालेली नाही. सिंचनाच्या बाबतीतील अहवाल आम्हाला मिळालेला आहे. परंतु राज्यपालांचे निर्देश आम्हाला प्राप्त झालेले नाहीत. या अर्थसंकल्पात अनुशेषग्रस्त भागाकरिता पुरेसा निधी मिळालेला नाही. त्याची चर्चा या अधिवेशनात करणार आहोत. राज्यपालांच्या निर्देशानुसार अर्थसंकल्पात निधीची तरतूद केलेली आहे की नाही हे आम्हाला पडताळून पाहता आलेले नाही. मुळात या अर्थसंकल्पाची मांडणीच अपुऱ्या पायावर निर्माण झालेली आहे.

घटनेतील तरतुदीनुसार राज्यपालांचे निर्देश आल्यानंतर ते सभागृहासमोर मांडून सभागृहाला ते जाणीवपूर्वक सादर केल्यानंतर त्या निर्देशाप्रमाणे अर्थसंकल्प मांडला गेला की नाही हे पडताळण्याचा आमचा अधिकार आहे तो प्राप्त झालेला नाही. या अर्थसंकल्पावर चर्चा झालेली आहे. पण मांडण्यात आलेला अर्थसंकल्पच चुकीचा आहे. त्या दिवशी माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले होते. आज ते या चर्चेला उत्तर देणार आहेत. जो पर्यंत राज्यपालांचे निर्देश वितरित होत नाहीत तो पर्यंत त्यांना उत्तर देण्याचाच अधिकार नाही. घटनेतील तरतुदीनुसार विनियोजन विधेयक मंजूर करुन दिले आहे. कारण ते आज मंजूर करणे भाग होते.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

परंतु हे सगळे योग्य पायावर नसल्यामुळे, या अर्थसंकल्पातील तरतुदी आमच्या पुढे व्यवस्थितपणे आलेल्या नसल्यामुळे या चर्चेला माननीय मंत्री महोदय कशाच्या आधारे उत्तर देणार आहेत हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. आम्ही चर्चेमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांना माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देणे हा भाग वेगळा. परंतु या अर्थसंकल्पाच्या संदर्भात ज्या काही त्रुटी आम्ही शासनाच्या आणि या सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत त्यासंबंधी शासनाकडे काही माहिती उपलब्ध झाली असेल तर ती आम्हास द्यावी अन्यथा माननीय मंत्री महोदयांना या ठिकाणी उत्तर देण्याचा अधिकार नाही अशा प्रकारचा माझा हरकतीचा मुद्दा आहे. या संदर्भात घटनेला धरुन मला आपणाकडून निर्णय अपेक्षित आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. गेली तीन चार वर्षे या सभागृहामध्ये अर्थसंकल्प सादर होण्याच्या आधी माननीय राज्यपालांच्या निर्देशासंबंधीचे विवरणपत्र सभागृहाला सादर केले जाते. महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे दिनांक 19 मार्च 2010चे विवरणपत्र आहे. मागील वर्षीचा अर्थ संकल्प 25 मार्च रोजी मांडला गेला होता. त्या आधी देखील अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी माननीय राज्यपालांच्या निर्देशासंबंधीचे विवरणपत्र आम्हाला देण्यात आले होते. माननीय राज्यपालांचे निर्देश काय आहेत ? विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळे आदेश 1994च्या खंड 7 अन्वये या ठिकाणी निवेदन केले जात होते. परंतु यावेळी अंदाजपत्रक मांडण्यापूर्वी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी माननीय राज्यपालांनी काय निर्देश दिलेले आहेत हे समजणे आवश्यक होते. कारण त्या निर्देशाच्या आधारावरच अर्थसंकल्पामध्ये तरतुदी केल्या जातात. या अंदाजपत्रकातील तरतुदी आणि माननीय राज्यपालांचे निर्देश हे आम्ही व्हेरिफाय करतो. माननीय राज्यपालांच्या निर्देशांचे पालन अंदाजपत्रकामध्ये झालेले आहे की नाही हे आम्ही पहात होतो. परंतु या वर्षी अशा प्रकारचे निर्देश आले अथवा नाही याची सभागृहाला माहिती नाही किंवा यासंबंधी कोणाला काही कळविण्यात आलेले नाही. हे निर्देश सरकारकडे आले असतील तर तसे सरकारने सांगावे. विरोधी पक्षातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांना तशा प्रकारचे परिपत्रक देण्यात आलेले नाही. या अंदाजपत्रकीय भाषणामध्ये राज्यपालांच्या निर्देशासंबंधीचा कुठेही उल्लेख नाही. तेव्हा सरकारला आता असे सांगावयाचे आहे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

काय की, राज्यपालांनी निर्देश देणे बंद केलेले आहेत. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी राज्यपाल महोदय आता निर्देश द्यायला तयार नाहीत, त्यासंबंधी राज्यपालांना काही निधी सुचवायचा नाही, असे राज्यपालांचे म्हणणे आहे काय ? या सर्व गोष्टींचा खुलासा व्हायला पाहिजे. अन्यथा विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र मग त्यामध्ये कोकण असेल, पश्चिम महाराष्ट्र असेल, त्याचा उल्लेख या अंदाजपत्रकीय भाषणामध्ये कुठेही केलेला नाही. समन्यायी तत्वावर निधीचे वाटप झाले पाहिजे हा खरा महत्वाचा मुद्दा आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्याचे मी समर्थन करीत आहे. या हरकतीच्या मुद्यासंबंधी निर्णय द्यावा अशी माझी विनंती आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यु. जमा : सभापति महोदय, तीन वैधानिक विकास महामंडल बनने के बाद भारतीय संविधान के आर्टिकल 371 के मुताबिक राज्यपाल का आदेश सरकार को आता है और उसमें तीन वैधानिक विकास महामंडल के लिए जो फंड दिए जाते हैं उसकी रिपोर्ट भी आती है कि बॅकलाग का काम कितना हुआ और कितना नहीं हुआ. माननीय राज्यपाल महोदय ने अभी जो अभिभाषण दिया उसमें तीन नंबर के पाइंट में उन्होंने कहा है कि "The Government is continuing its efforts to remove regional imbalances in the State. To revisit the issue of backlog and equitable distribution of development expenditure with fresh insight and explore alternate ways of ensuring equitable allocation of resources, a committee of experts is being constituted." राज्यपाल महोदय ने अपने अभिभाषण में कहा कि फिर से एक कमेटी बनायी जाएगी कि हमारे यहां पर फिजिकल बॅकलॉग कितना बाकी है. यह कमेटी फिजिकल और इकॉनामिकल बॅकलॉग के बारे में अध्ययन करेगी. लेकिन आर्टिकल 371 के मुताबिक यह लिखित आदेश आता है. मेरे समय में तो राज्यपाल महोदय का लिखित आदेश आता था और माननीय सदस्यों को वह दिया जाता था. लेकिन इस साल का वह आदेश नहीं आया है. मैं इस बारे में कोई टेक्नीकल मुद्दा उठाना नहीं चाहता हूं क्योंकि एप्रोप्रिशन बिल आज ही पास होना जरुरी है. यही बात अन्य दो माननीय सदस्यों ने भी कही है. लेकिन यह आदेश क्यों नही आ पाया इस बारे में सरकार की ओर से स्पष्टीकरण दिया जाना चाहिए. क्योंकि तीनों विकास महामंडलों की 10 साल की अवधि समाप्त होने के बाद सरकार ने बड़ी मुश्किल से वह अवधि पांच साल के लिए बढ़ायी है. उस में फंड देने का जो प्रोवीजन था उसको भी अभी बंद किया है. सरकार ने इस बारे में निर्णय लेकर तीन विकास महामंडलों को फंड देना बंद किया है. कमेटी बनने के बाद बॅकलॉग की स्टडी होगी वह अलग बात है. लेकिन अभी माननीय राज्यपाल महोदय का क्या आदेश है, उसकी जानकारी शासन द्वारा यहां पर दी जानी चाहिए, यही मेरा अनुरोध है.

**तालिका सभापती** : शासनाच्या वतीने निवेदन करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या बाबतीत अजून काही माहिती सभागृहाला देऊ इच्छितो. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाले, त्या दिवशी मी एक मुद्दा सभागृहात उपस्थित

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

केला होता. श्री.कदम नावाचे ॲडव्होकेट जनरल आहेत. त्यांनी न्यायालयात सरकारची बाजू मांडणे अपेक्षित होते. जी सोफिया कंपनी कोर्टात गेलेली आहे, मुळात या कंपनीने घटनात्मक अधिकारालाच हायकोर्टात आव्हान दिलेले आहे. घटनेप्रमाणे माननीय राज्यपालांना असा अधिकार नाही. या संदर्भात हायकोर्ट जो काही निर्णय देईल तो देईल. परंतु आपले ॲडव्होकेट जनरल यांनी सरकारची बाजू मांडण्याऐवजी त्या कंपनीच्या वतीने बाजू मांडल्याप्रमाणे सरकारच्या विरोधात बाजू मांडली ही बाब मी शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. ॲडव्होकेट जनरल हे सरकारचे आहेत की कंपनीचे आहेत? त्याचवेळेला डावपेचाचा एक भाग म्हणून याच विषयाच्या अनुषंगाने पश्चिम महाराष्ट्रातून उच्च न्यायालयात एक याचिका दाखल झालेली आहे. राज्यातील अनुशेषग्रस्त भागातील लोकांना सिंचनाची व्यवस्था व्हावी यासाठी आम्ही सभागृहात टाहो फोडला होता. या सदनाने तो एक इतिहास घडविला आहे. घटनेतील कलम 371(1) या तरतुदीला आव्हान देऊन एका मोठया भांडवलदारास मदत करण्याचे काम चालले आहे. अनुशेषाबाबत महाराष्ट्र सरकारला आदेशच आलेले नाहीत. त्यामुळे माननीय वित्त मंत्र्यांना उत्तर देण्याचा घटनात्मक अधिकार नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे. सरकारला या संदर्भात निवेदन करावयाचे असेल तर त्यास आमची काही हरकत नाही. त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सभापती महोदय आपण आपला निर्णय द्यावा.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे, त्या अनुषंगाने माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, व सन्माननीय सदस्य एस.क्यु.ज़मा यांनी काही विचार व्यक्त केलेले आहेत. त्या बाबतीत शासनाकडून निवेदन केले जाईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मला देखील या विषयाच्या बाबतीत बोलावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण निर्णय दिल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे बोलण्यासाठी उभे राहिले आहेत...

**तालिका सभापती** : माझे बोलणे पूर्ण होण्यापूर्वी मी सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे.

3..


असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, घटनेच्या कलम 371(1) च्या अनुषंगाने या सभागृहात ऊहापोह झालेला आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला व त्यास माननीय विरोधी पक्ष नेते यांनी पाठिंबा दिला तसेच या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.ज़मा यांनी देखील काही मुद्यांचा उल्लेख केला, त्या संदर्भात मी बोलतो आहे. यावेळेला अनुशेषाच्या बाबतीत माननीय राज्यपालांच्या निर्देशबाबतचे विवरण या सभागृहास प्राप्त झालेले नाही ही वस्तुस्थिती खरी आहे. या बाबतीत मी सांगू इच्छितो की,ग्रीन बूक या पुस्तकामध्ये त्या संबंधीचा उल्लेख आलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला थोडे बोलण्याची पुन्हा संधी द्यावी.

श्री. भाई जगताप : माझे बोलणे पूर्ण करु द्यावे अशी माझी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना विनंती आहे. सिंचनाच्या अनुशेषाबाबतचे माननीय राज्यपालांच्या निर्देशाचे विवरणपत्र सन्माननीय सदस्यांना मिळालेले नाही...

श्री.दिवाकर रावते : सिंचनाच्या अनुशेषाबाबत माननीय राज्यपालांच्या निर्देशाचे विवरणपत्र सन्माननीय सदस्यांना मिळालेले नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. भाई जगताप : अनुशेषाच्या बाबतीत माननीय राज्यपालांच्या निर्देशाचे विवरणपत्र सन्माननीय सदस्यांना प्राप्त झालेले नाही या संबंधीचा उल्लेख मी मघाशीच केला आहे..

श्री. दिवाकर रावते : आपण सुतावरुन स्वर्ग गाठण्याचा प्रयत्न करु नका..

श्री. भाई जगताप : माननीय सभापतींना हरकतीच्या मुद्याबाबत निर्णय द्यावयाचा आहे. त्यामुळे मी कशाला सुतावरुन स्वर्ग गाठू. मी या ठिकाणी माझे मत मांडतो आहे. ज्याचा उल्लेख आपण केला, त्याचप्रमाणे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी देखील उल्लेख केला. या विषयाच्या बाबतीत या ठिकाणी भाष्य केले गेले.....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 19:55

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

श्री.भाई जगताप........

आपण त्याचा उल्लेख केला आहे. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत 38 सदस्यांनी भाग घेतला आणि आपले विचार मांडले आहेत. या सभागृहाचा सदस्य म्हणून मला देखील हा मुद्दा महत्वाचा वाटतो. तो मुद्दा महत्वाचा आहेच, याबद्दल कोणाचे दुमत असू शकत नाही. अनेक अधिवेशनांमध्ये हा मुद्दा उपस्थित झालेला आहे. परंतु अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर 38 सदस्यांची भाषणे झाली आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण आपण सगळ्यांनी ऐकून घ्यावे, मलाही ऐकावयाचे आहे. तांत्रिक मुद्याबद्दल माननीय पीठासीन अधिकारी निर्णय देतील. परंतु सदस्य म्हणून माझी विनंती आहे की, अर्थसंकल्पावर सांगोपांग चर्चा झाली आहे, जे मुद्दे तुम्ही आम्ही मांडले आहेत त्यासंबंधी काय उत्तरे दिली जातात ती आपण सगळ्यांनी ऐकली पाहिजेत. आम्हाला सगळ्यांना ती ऐकावयाची आहेत. मंत्री महोदयांना त्यांचे उत्तराचे भाषण पूर्ण करु द्यावे, त्यानंतर पीठासीन अधिकाऱ्यांनी तांत्रिक मुद्याबद्दल रुलिंग द्यावे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, घटनेतील कलम 371 आपण वाचून दाखविले. ते कलम महाराष्ट्र राज्याने स्वीकारले असून कोणत्या वैधानिक विकास मंडळाला किती निधी द्यायचा याचे अधिकार त्यांना दिले आहेत. विदर्भ वैधानिक विकास मंडळ, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाला मिळून एकूण 31 हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. त्यानंतर 10 हजार कोटी रुपये संपूर्ण राज्यासाठी शासनकडून दिले जाणार आहेत. या संदर्भातील उल्लेख हिरव्या पुस्तिकेमध्ये केलेला आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे काही कायदेशीर त्रुटी राहिल्या असतील तर त्या त्रुटींची पूर्तता होईल. परंतु कोणत्या वैधानिक विकास मंडळाला किती निधी दिला जाणार आहे याची माहिती हिरव्या पुस्तिकेमध्ये दिलेली आहे. विदर्भ वैधानिक विकास मंडळाला 9217 कोटी रुपये, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला 5134 कोटी रुपये आणि उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाला 16335 कोटी रुपये असे एकूण 30686 कोटी रुपये दिले जाणार आहेत. त्यानंतर राज्य शासनाने संपूर्ण राज्यासाठी 10813 कोटी रुपयांचे वाटप करावयाचे आहे, त्याचे डिटेल्स या ठिकाणी नमूद केलेले आहेत. तांत्रिक त्रुटी राहिल्या आहेत त्याची पूर्तता करुन घ्यावी. माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण स्वीकारावे अशी माझी विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. माननीय राज्यपालांनी वाटप करावयाच्या निधीचा तपशील मी देखील वाचला आहे. एक वाद नक्की आहे, घटनात्मक तरतुदींची पूर्तता करणे यासाठी हे सदन आहे. घटनात्मक तरतूद डावलून चालवून घ्यावे याकरिता आपण या ठिकाणी काम करीत नाही. पीठासीन अधिकाऱ्यांचे हे आद्य कर्तव्य आहे, या ठिकाणी घटनेचे अवमूल्यन होणार नाही हे त्यांनी पाहिले पाहिजे. सावरुन घेणे हा विषयच नाही. मी असे म्हटले की, जाणीवपूर्वक माहिती लपविण्यात आली, आमच्यापर्यंत पोहोचविण्यात आली नाही. खरे असेल तर आम्हाला तसे सांगावे असे मी म्हटले. मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, 2008 साली माननीय राज्यपालांचे निर्देश 6 मार्च, 2008 रोजी आले आणि 19 मार्च, 2008 रोजी अर्थसंकल्प मांडला गेला. 2009 साली माननीय राज्यपालांचे निर्देश 27 फेब्रुवारी, 2009 रोजी आले आणि 17 मार्च, 2009 रोजी अर्थसंकल्प मांडण्यात आला. 2010 साली 19 मार्च, 2010 रोजी माननीय राज्यपालांचे निर्देश आले आणि 25 मार्च, 2010 रोजी अर्थसंकल्प मांडण्यात आला. अर्थसंकल्पाबाबत माननीय राज्यपाल चुकले आहेत, जमवून घ्यायचे राहिले आहे असे कृपया सांगू नये. माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी निर्देशातील एकाच वाक्यावर अर्धातास भाषण केले. मी त्यांचे अभिनंदन केले होते. हा मुद्दा मांडून त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले होते. माननीय राज्यपालांनी 10 मार्च, 2011 रोजी निर्देश दिले आहेत.

नंतर 4 डब्ल्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

हे संकेत स्थळावर दिलेले आहेत पण सभागृहात का सादर करण्यात आले नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे. याउप्परही सन्माननीय सदस्यांना काही बोलण्यासारखे असेल तर त्यांनी जरुर बोलावे. माननीय राज्यपालांनी आपले कर्तव्य व्यवस्थित पार पाडलेले आहे. त्यांनी दि. 10 मार्च, 2011 रोजी निर्देश दिलेले आहेत व आपल्या राज्याचा अर्थसंकल्प 23 मार्च, 2011 रोजी सभागृहात सादर करण्यात आला. तत्पूर्वी माननीय राज्यपालांचे निदेश प्राप्त झालेले असताना सभागृहापासून ते का लपविण्यात आले याचा बोध होत नाही. वास्तविक हे निदेश अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी सभागृहाच्या पटलावर ठेवणे आवश्यक होते. म्हणून माझा मंत्री महोदयांच्या उत्तराला आक्षेप नाही, मंत्री महोदयांनी सभागृहाला उत्तर दिले पाहिजे हा वेगळा भाग आहे पण घटनात्मक तरतुदीचा मुद्दा उपस्थित झालेला असल्याने याचा खुलासाही होणे आवश्यक आहे. मी हा मुद्दा उपस्थित करीत असताना सुरुवातीला मुद्दाम तो हळूहळू उलगडला, सर्वच मुद्दे एकदाच उपस्थित केले नाहीत. त्यातून आपल्याकडचेही मत बदलत गेले. माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश शासनाने सभागृहासमोर ठेवणे क्रमप्राप्त होते, ते शासनाचे कर्तव्य होते पण ते सभागृहापासून लपविण्यात आल्याने या अर्थसंकल्पात अपूर्णता राहिली आहे, असा आमचा मुद्दा आहे.

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, माननीय राज्यपालांनी जे निदेश दिलेले आहेत त्यासंबंधीची माहिती लवकरात लवकर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, 10 मार्च, 2011 रोजी माननीय राज्यपालांनी निदेश पाठविले व राज्याचा अर्थसंकल्प 23 मार्च, 2011 रोजी सभागृहात सादर करण्यात आला. माननीय राज्यपालांनी निदेश दिल्यानंतर अर्थसंकल्प सादर होईल तोपर्यंत 13 दिवसांचा काळ शासनाकडे होता. तरी देखील सभागृहाला त्याची माहिती दिली गेली नाही. मागील वर्षी 19 मार्च, 2010 रोजी राज्यपालांचे निदेश प्राप्त झाले होते व 25 मार्च, 2010 रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर झ ाला. पण यावर्षी मात्र शासनाकडून हे निदेश सभागृहात सादर करण्यासाठी जाणीवपूर्वक 13 दिवस विलंब करण्यात आला तरीही ते निदेश सभागृहापासून लपविण्यात आले,. याचा खुलासा शासनाने करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी ही

....2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .........

तांत्रिक बाब असल्याचा उल्लेख केला पण ही घटनात्मक बाब असून घटनेला डावलून सभागृहाचे कामकाज चालणे हा एक प्रकारे माननीय राज्यपालांचे अवमान आहे. अर्थात याची कारणे अनेक असतील आणि शासनाकडे यंत्रणा नाही असेही आपण म्हणू शकत नाही पण तरी देखील हे निदेश सभागृहाला अवगत करण्यात आले नाही तो एक प्रकारे राज्यपालांचा अवमान आहे. त्याचबरोबर राज्यातील जनतेचाही तो अवमान आहे. म्हणून मंत्री महोदयांनी सभागृहात केवळ थातूरमातूर उत्तर देऊन चालणार नाही. सभागृहात आम्ही अर्थसंकल्पापूर्वी विनियोजन विधेयक ताबडतोब मंजूर केले आहे, आमचा अडवणूक करण्याचा कोणताही हेतू नव्हता. वास्तविक तेव्हा देखील आमच्याकडे हा मुद्दा होता तरी देखील आम्ही विनियोजन विधेयक मंजुरीसाठी अडवणूक केली नाही. पण आता जोपर्यंत हे निदेश सभागृहाच्या पटलावर ठेवले जात नाहीत तोपर्यंत उत्तर देता येणार नाही.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : माननीय विरोधी पक्षनेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सभागृहात जो मुद्दा उपस्थित केला त्यासंबंधी शासनाने हे निदेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्याचे मान्य केले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एक अत्यंत महत्वाची आणि सत्य बाब मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सरकारने समोरच्याला सुनावतांना विचार करावयाचा असतो.या ठिकाणी माझ्यासाठी, माझ्या कुटुंबासाठी मी येथे भांडत नाही. माझे भांडण हे राज्याच्या मराठी भाषेसाठी आहे.आज मी या ठिकाणी अधिकृतपणे सांगत आहे . मराठी भाषा विभागाचा अभिमान आहे असे आम्हाला शासनाकडून सांगण्यात येते परंतु अनुशेषाच्या बाबतीत माननीय राज्यपालांच्या निर्देशाच्या विवरणपत्राचे मराठी भाषेमध्ये भाषांतर झालेले नाही त्यामुळे त्याच्या प्रती आमच्यापर्यंत सरक्युलेट झालेल्या नाहीत, असा माझा दावा आहे.या सदर्भात मी माननीय मंत्र्यांना दोष देऊ इच्छित नाही. परंतु शेवटी मला या शासनाशी भांडावयाचे आहे.भाषांतर करण्याच्या बाबतीत अधिका-याकडून दुर्लक्ष होत असेल तर जोपर्यंत विधिमंडळाच्या माध्यमातून जबाबदार अधिका-याला जाब विचारला जात नाही तोपर्यंत हे प्रशासन सुधारणार नाही हेच माझे भांडण आहे.राज्य शासनाने निर्णय घेतलेले आहे, राज्य शासनाने कायदा केलेला आहे परंतु अधिकारी ते अंमलात आणत नाहीत तरीसुध्दा तुम्ही त्यांच्याच बाजूने बोलता आणि आम्हाला सुनावता हे बरोबर नाही. होय, आम्ही ठेकेदार आहोत. आम्ही मराठीचे ठेकेदार आहोतच. आमचा ठेका बरोबर आहे की चूक आहे हे आपणच आम्हाला सांगावे. केवळ मराठी भाषांतर झाले नाही म्हणून आम्हाला त्याच्या प्रती देण्यात आलेल्या नाहीत. संबंधित अधिका-यामुळे घटनेची पायमल्ली झाली आहे. तेव्हा सबंधित अधिका-याच्या विरुध्द कारवाई करावी आणि मगच आमच्या समोर यावे.या संदर्भात आम्ही आपले ऐकणार नाही. या विधिमंडळामध्ये शपथ घेतांना आम्ही घटनेशी बांधील राहू अशा प्रकारची शपथ घेतो आणि त्याप्रमाणे काम करतो. तुम्ही आम्हाला मराठी भाषेचा मोठेपणा का सांगत आहात ? या सरकारला मान खाली घालायला लावणारे जर या विभागाचे अधिकारी असतील तर भविष्यामध्ये आणखी काय घडणार आहे हा माझा वादाचा मुद्दा आहे. हा मुद्दा सर्वानी समजावून घेतला पाहिजे. मराठी भाषांतर न केल्यामुळे त्याच्या प्रती आमच्यापर्यंत आलेल्या नाहीत. सरकारला गोत्यात आणावयाचे . सरकार गोत्यात आल्यानंतर तुम्ही आम्हाला विनंती करावयाची आणि आम्ही त्यांना सांभाळावयाचे परंतु हा सर्व विषय घटनात्मक आहे. घटनेची पायमल्ली करणारी परिस्थिती निर्माण होत असेल तर त्या अधिका-याला कोणी जाब विचारावयाचा नाही

काय ? आमच्याकडे बोटे दाखवून आम्हाला ठेकेदार म्हणण्यापर्यंत ठीक आहे. परंतु अधिका-याला कोणीच जाब विचारणार नाही काय ? हीच आमची या मागची तळमळ आहे.

--



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय., मराठी भाषेचा आब आणि रुबाब राखण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्नशील असतो. तुम्ही एकटेच ठेकेदार आहात असे या बाकावरील कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी म्हटलेले नाही. किंबहुना या राज्यामध्ये जेवढे शासन निर्णय निघतात किंवा जेवढे राजपत्र निघते ते सर्व मराठीतूनच असले पाहिजे अशा प्रकारचा आग्रह दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी नेहमीच धरलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की आपण गट नेते आहात आणि आपण नेहमीच जबाबदारीने सांगत असता. इंग्रजी प्रत आहे आणि त्याचे मराठी भाषांतर झालेले नाही म्हणून त्या संदर्भात सरकारलाच विचारले जाणार आहे. ही गोष्ट ख-या अर्थाने गंभीर आहे. यास जे कोणी सेक्रेटरी वा अधिकारी जबाबदार असतील तर त्यांच्या संदर्भात ही बाब शासनाने गंभीरपणे घेतली पाहिजे. त्याप्रमाणे ती घेतली जाईल असा माझा स्वत:चा समज आहे.परंतु या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, अर्थसंकल्पावर आपण गेली तीन दिवस चर्चा केलेली आहे आणि माननीय वित्त राज्य मंत्र्यांच्या उत्तराकडे तुमचे आमचे सर्वाचे लक्ष लागलेले आहे.आपआपल्या विभागाच्या संदर्भात आपण काही बाबी सुचवलेल्या आहेत तेव्हा माननीय वित्त राज्य मंत्र्यांचे उत्तर आपण ऐकून घ्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. जे काही घडलेले आहे ते अतिशय गंभीर असून त्या बाबतीत चर्चा होईलच.या विषयावर केवळ वेगळी चर्चाच नव्हे तर सरकारने नक्कीच संबंधित अधिका-याला जबाबदार धरले पाहिजे व आपण सर्वानी त्यासबंधीची आपली भूमिका मांडली पाहिजे परंतु माननीय मंत्र्यांना आता उत्तर देण्याच्या दृष्टीने सहकार्य करावे अशी माझी माननीय विरोधी पक्ष नेते आणि गट नेत्यांना विनंती राहील.

-

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या चर्चेमध्ये 36 - 37 सन्माननीय सदस्यांनी भाषणे केलेली असून माननीय मंत्र्यांना उत्तराचे भाषण करु द्यावे असे या ठिकाणी वारंवार सांगितले जात आहे. परंतु लोकशाहीमध्ये विधिमंडळ हा एक महत्वाचा स्तंभ आहे.घटनात्मक ज्या तरतुदी आहेत त्याचे पालन केले जात नसेल तर आपण जी शपथ घेतो त्यालाही अर्थ राहणार नाही.

नंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

आणि त्यामुळे ते मराठीमध्ये भाषांतरीत झाले की नाही वगैरे कोणतेही कारण असले तरी ही एक घटनात्मक बाब आहे. इतर वेळी आपण एकत्र बसून प्रश्न सोडवितो परंतु या मधून एक वेगळया प्रकारचा मेसेज लोकांपर्यंत जाणे योग्य होणार नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व गट नेत्यांनी या ठिकाणी वारंवार ही घटनात्मक बाब असल्याचे सांगितले आहे. ही घटनात्मक बाब असल्यामुळे यामध्ये जे जबाबदार असतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली पाहिजे. या बाबतीत पीठासीन अधिकाऱ्यांतर्फे शासनाला योग्य ते निर्देश दिले गेले पाहिजेत तोपर्यंत अर्थसंकल्पावरील चर्चेचे उत्तर सुरु करता कामा नये असे मला सांगावयाचे आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी./मु.शी.**: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे

श्री. राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

विधान परिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार, दिनांक 31 मार्च, 2011 रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीत समितीने विचार विनिमय करुन शुक्रवार, दिनांक 1 एप्रिल ते गुरुवार 21एप्रिल, 2011 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढील प्रमाणे निश्चित केले.

एप्रिल, 2011

| | |
|---|---|
| शुक्रवार, दिनांक 1 | अशासकीय कामकाज (ठराव) |
| शनिवार, दिनांक 2 | सुट्टी |
| रविवार, दिनांक 3 | सुट्टी |
| सोमवार, दिनांक 4 | सुट्टी (गुढी पाडवा) |
| मंगळवार, दिनांक 5 | 1. शासकीय कामकाज |
| | 2. सत्तारुढ पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा |
| बुधवार, दिनांक 6 | शासकीय कामकाज |
| गुरुवार, दिनांक 7 | 1. शासकीय कामकाज |
| | 2. विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा |
| शुक्रवार, दिनांक 8 | शासकीय कामकाज |
| शनिवार, दिनांक 9 | अशासकीय कामकाज (विधेयके) |
| रविवार, दिनांक 10 | सुट्टी |
| सोमवार, दिनांक 11 | बैठक होणार नाही |
| मंगळवार, दिनांक 12 | सुट्टी (राम नवमी) |
| बुधवार, दिनांक 13 | बैठक होणार नाही |
| गुरुवार, दिनांक 14 | सुट्टी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती) |



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

| | |
|---|---|
| शुक्रवार, दिनांक 15 | बैठक होणार नाही |
| शनिवार, दिनांक 16 | सुट्टी (महावीर जयंती) |
| रविवार, दिनांक 17 | सुट्टी |
| सोमवार, दिनांक 18 | शासकीय कामकाज |
| मंगळवार, दिनांक 19 | 1. शासकीय कामकाज<br>2. सत्तारुढ पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा |
| बुधवार, दिनांक 20 | अंतिम आठवडा प्रस्ताव |
| गुरुवार, दिनांक 21 | शासकीय कामकाज |

**तालिका सभापती** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हरकतीचा मुद्दा**

"चर्चा पुढे चालू"

**तालिका सभापती** : माननीय अर्थमंत्र्यांनी उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी मघाशी मांडलेल्या मुद्दयाबाबत शासनाची भूमिका स्पष्ट झाली पाहिजे त्यानंतरच मंत्री महोदयांनी भाषण सुरु करावे.

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांचे उत्तर महत्वाचे आहे. या बाबत माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना कांही सांगावयाचे आहे काय?

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व इतर अनेक माननीय सदस्यांनी महत्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत व त्या मुद्दयांच्या अनुषंगाने त्यांनी माननीय राज्यपालांचे निर्देश आणि त्या संबंधीच्या नोटिफिकेशनच्या प्रतिंची मागणी केली. तसेच, त्यांनी ही बाब घटनात्मकदृष्टया आवश्यक असल्याचे सांगितले आहे. सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार हे कुणामुळे घडले, याला जबाबदार कोण आहे यासंदर्भात निश्चितपणे चौकशी करण्यात येईल. तेव्हा मला असे वाटते की, आपण माननीय राज्यमंत्र्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. या संदर्भात चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशीमध्ये जे कुणी दोषी सापडतील त्यांच्यावर पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा नेहमीसारखा विषय नसून घटनात्मक विषय आहे. म्हणून माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपण याची नेहमीसारखी चौकशी करावी अशाप्रकारचा हा विषय नाही. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मुद्दा उपस्थित केला की, याचे मराठीमध्ये भाषांतर वेळेवर कां झाले नाही? माननीय राज्यपालांनी 10 मार्च रोजी निदेश दिल्यानंतर 10 ते 23 तारखेपर्यंत 13 दिवसांच्या कालावधीत याचे मराठीमध्ये भाषांतर न झाल्यामुळे ते सभागृहापुढे ठेवले गेले नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

13 दिवस झाले आहेत. मागच्या वर्षी माननीय कामकाज मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील साहेबांनी 19 मार्च 2010 रोजी सदनासमोर माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार माहिती सादर केली होती आणि 25 मार्चला अंदाजपत्रक सादर केले होते आणि दोन दिवस अगोदर माहिती सादर केली होती. परंतु यावेळेस 13 दिवस झालेले आहेत.त्यामुळे ही अत्यंत गंभीर घटना आहे.याठिकाणी माननीय राज्यपालांच्या निर्देशाचा अवमान झालेला आहे.सभागृहाचा अवमान झालेला आहे आणि मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रातील जनतेचा अवमान आहे.ही घटना साधी नाही. यामध्ये टेक्नीकल चूक झालेली नाही. जर माननीय राज्यपाल महोदयांनी जर सरकारकडे 10 मार्च रोजी माहिती पाठविली असेल तर सरकारने 10 मार्च ते 13 मार्च पर्यंत काय केले ? मग मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी जी शंका उपस्थित केलेली आहे ती खरी आहे काय ? जर ती खरी असेल तर त्याबाबत कारवाई झालीच पाहिजे. पण आमची मागणी अशी आहे की, अनेक वेळा चर्चा होते आणि त्यासंबंधीचे उत्तर दुसऱ्या दिवशी दिले जाते. पण आम्ही ॲप्रोप्रिएशन बिल चर्चेच्या अगोदर पास केले. त्याबाबत आम्हाला माननीय सभापती महोदयांनी, सर्वांनी विनंती केली त्यामुळे आम्ही ते बिल अडविले नाही. आमच्याकडे यासंबंधातील पुस्तक सकाळपासून आहे त्यामुळे बिल मंजूर करण्याच्या वेळेसही आम्ही हा मुद्दा मांडू शकलो असतो, पण आम्ही हा मुद्दा उपस्थित केला नाही. परंतु येथे घडलेले आहे तो घटनेचा अवमान आहे, माननीय राज्यपालांचा अवमान आहे. ही गंभीर गोष्ट आहे. म्हणून जोपर्यंत माननीय राज्यपालांनी दिलेले निर्देश सदनाच्या पटलावर ठेवण्यात येणार नाहीत, हे निर्देश रात्री छापून उद्या सकाळी सादर करावेत.

श्री.अरुण गुजराथी (खाली बसून) : सदरहू निर्देश रात्री छापावेत आणि मग उद्या चर्चा करावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याबाबत उद्या सकाळी चर्चा ठेवण्यात यावी, आमचे काही म्हणणे नाही. आता ॲप्रोप्रिएशन बिल पास झालेले आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांचे उद्यापर्यंत राखून ठेवावे, ते दोन दिवसानंतर देखील देऊ शकता. आता विधानसभेमध्ये विभागवाईज चर्चा सुरु आहे. तुम्ही त्याची उत्तरे पुढच्या आठवड्यामध्ये देणार आहात.परंतु माननीय राज्यपालांचे निर्देशाची माहिती न मिळणे ही बाब घटनेचा अवमान करणारी आहे. त्यामुळे या घटनेला बाजूला सारुन कामकाज दाबून पुढे नेऊ नये अशी आमची आग्रहाची विनंती आहे. परंतु जर तुम्ही तसेच



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करणार असाल तर आम्ही माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे उत्तर ऐकणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी अर्थसंकल्पाच्या संबंधात चांगली चर्चा झ ाली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी मनापासून आपले विचार मांडले आहेत. उद्या अशासकीय कामकाज असल्याने, माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देऊ नये. त्यापेक्षा सोमवारी या चर्चेला उत्तर दिले तरी चालेल. परंतु आम्ही या सदनामध्ये घटनात्मक एखादी बाब टाळून . . . .

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : माननीय वित्त मंत्री महोदयांनी अर्थसंकल्पाबाबत मंगळवारी उत्तर द्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ते चालेल.

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : माननीय वित्त मंत्री महोदयांनी उद्या उत्तर द्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उद्या उत्तर देऊ नये. कारण अशासकीय कामकाज आहे. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी सोमवारी उत्तर द्यावे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि विशेषत: सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो निश्चितपणे गंभीर आहे. सदनातील सन्माननीय सदस्यांना माननीय राज्यपालांचे निर्देश अगोदर मिळाले नाहीत हा मुद्दा आहेच परंतु 13 दिवसामध्ये मराठीमध्ये भाषांतर होऊ शकले नाही ही आणखी गंभीर बाब आहे. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, विधानसभेमध्ये अर्थसंकल्पाच्या संबंधात उत्तर दिले आहे.

श्री.दिवाकर रावते : होऊ देत.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यामुळे हे वरिष्ठ सभागृह आहे हे आता सिध्द झालेले आहे. कारण आपल्या सगळया सहकाऱ्यांपैकी कोणाच्याही ही बाब लक्षात आली नाही. त्यामुळे मी विनंती करतो की, आता सन्माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे ....

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : ते वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष आहेत . . ..

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, तेव्हा याठिकाणी माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे उत्तर होऊ द्यावे. आता आपण एवढा वेळ बसून सर्वांचे मनोगत ऐकले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे अर्धसत्य झाले. परंतु आज या विषयावरील चर्चा थांबवून मंगळवारी माननीय राज्यपालांचे निर्देशांबाबतची माहिती दिली जाईल आणि माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे उत्तर होईल, तेव्हा हे सभागृह खऱ्या अर्थाने वरिष्ठ सभागृह आहे असे म्हणता येईल.

श्री एस.क्यु.जमा :सभापति महोदय, अभी सम्माननीय विरोधी पक्ष नेता श्री पांडुरंग फुंडकर जी ने कहा कि उनकी मंशा विनियोजन विधेयक को रोकने की नहीं है. अब तो सिर्फ इतना ही काम बचा है कि बजट भाषण के दौरान माननीय सदस्यों ने जो प्रश्न यहां पर उपस्थित किए हैं, उन्हीं का जवाब यहां पर मंत्री महोदय को देना है.उसका जवाब चाहे वे आज दें, कल दें या सोमवार के दिन दें.

सभापति महोदय, किसी को खुश करने के लिए मैं यहां पर कोई बात नहीं बोल रहा हूं. लेकिन सभागृह के सदस्य के नाते मेरी भी यह भावना है कि सरकार के किसी भी अधिकारी की गलती की वजह से 13 दिन के अंदर यदि उस आदेश का अनुवाद नहीं हो पाया है और सिर्फ अनुवाद न हो पाने की वजह से उसकी प्रति यहां पर नहीं दी गयी हैं तो यह एक कॉंस्टीटयुशनल फेल्युअर है और बहुत ही सीरियस बात है. यहां पर हमारे संसदीय कार्य मंत्री महोदय ने भी कहा कि इसकी तुरंत जांच करके, इस पर तुरंत कार्रवाई होनी चाहिए. माननीय विरोधी पक्ष नेता ने यह भी कहा कि उन्होंने एप्रोप्रिएशन बिल इस लिए पास होने दिया ताकि बाद में किसी तरह का क्राइसेस पैदा न हो. इतना ही मुझे कहना है. धन्यवाद.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : सन्माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना विनती आहे की, सर्व सभागृहाने आपल्याला विनंती केलेली आहे तेव्हा आता मंत्री महोदयांचे उत्तर होऊ द्यावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण उद्या किंवा परवा घेण्यात यावे असे सुचविलेले आहे...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहाच्या सन्मानाचा विषय आपल्याकडे आहे. तेव्हा आपण या बाबतीत निदेश द्यावेत. जी घटनात्मक बाब आहे त्यासंबंधीची माहिती या सभागृहाला दिल्या शिवाय मंत्री महोदयांना अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देता येणार नाही. आम्ही विनियोजन विधेयक मंजूर करुन दिले आहे. आजच्या तारखेला अर्थसंकल्प योग्य रीतीने मंजूर झालेला आहे. हे आम्ही कायद्याच्या बाहेर जाऊन केलेले आहे त्याला हरकत नाही. प्रधान सचिव श्री. कळसे या ठिकाणी आले त्यांनी आम्हाला समजून सांगितले, आम्ही त्यांचे म्हणणे ऐकले आणि विनियोजन विधेयक मंजूर केले. त्यामुळे आता अर्थसंकल्प मंजुरीसाठी अडलेला नाही. या ठिकाणी ही घटनात्मक बाब निर्माण झालेली आहे त्याबाबतीत सभापती महोदय, आपण आता आमचे ट्रस्टी आहात तेव्हा आपण योग्य तो न्याय द्यावा. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला आज माननीय उप मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत उत्तर दिलेले आहे. त्यामुळे विधान परिषदेमध्ये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचे उत्तर दोन दिवसांनी दिले तरी ते चालेल. राज्य मंत्री महोदयांच्या दृष्टीने ते चांगलेच आहे. त्यामुळे निदान त्यांचे भाषण वर्तमानपत्रातून छापून तरी येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, उद्या अशासकीय कामकाज आटोपल्यानंतर अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचे उत्तर दिले तरी चालेल. विधानसभेमध्ये अर्थसंकल्पातील विभागवार माण्यांवरील चर्चेला सुरुवात झालेली आहे, त्यामुळे या सभागृहात आजच उत्तराचे भाषण झाले पाहिजे असे काही नाही. त्यामुळे घटनेचा सन्मान केला जाईल आणि सर्व सन्माननीय सदस्यांच्या मताचा देखील सन्मान होईल म्हणून सभापती महोदय, या बाबतचा निर्णय आपण दिला पाहिजे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सदनामध्ये जो मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे, त्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देणे हे क्रमप्राप्त होते परंतु ती माहिती उपलब्ध झालेली नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. या संदर्भातील मराठीतील प्रत सर्व सन्माननीय सदस्यांना मिळणे तेवढेच महत्वाचे आहे. म्हणून मला असे वाटते की, सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे झालेली आहेत. फक्त मंत्रीमंहोदयांचे उत्तर बाकी आहे. तेव्हा मंत्री महोदयांचे उत्तर आज पूर्ण करावे. उपस्थित करण्यात आलेली घटनात्मक बाब अतिशय गंभीर आहे. ते नेमके कोणामुळे राहून गेले, का राहिले याची चौकशी होणे देखील गरजेचे आहे. याबाबतची संपूर्ण चौकशी करण्यात येईल आणि त्यासंदर्भातील अहवाल देखील सभागृहासमोर ठेवण्यात येईल. आपली प्रथा अशी आहे की, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला दोन्ही सभागृहात एकाच दिवशी उत्तर देण्यात येते. विधानसभेमध्ये माननीय वित्त मंत्र्यांचे उत्तर झालेले आहे. मला असे वाटते की, या प्रथेला छेद न देता माननीय वित्त राज्य मंत्र्यांचे उत्तराचे भाषण होऊ द्यावे. निर्देशाची प्रती सन्माननीय सदस्यांना मिळणे हेही तेवढेच महत्वाचे आहे. ती देण्याचे नेमके का राहिले, याबाबतीत कोण दोषी आहेत, या सगळया गोष्टींची चौकशी निश्चितपणे करण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री म्हणत आहेत की, जी प्रथा आहे ती पाळावयास पाहिजे. परंतु या ठिकाणी घटनात्मक बाब निर्माण झालेली आहे. आपापसात बसून आपण अनेक गोष्टी सहमतीने करीत असतो परंतु याचा मेसेज अत्यंत चुकीचा जाणार आहे. ही घटनात्मक बाब आहे आणि यापूर्वी असे कधीही घडलेले नाही. गेल्या चार वर्षाच्या तारखा या ठिकाणी वाचून दाखविलेल्या आहेत. हे वरिष्ठ सभागृह आहे आणि केवळ आज उत्तर देण्याकरिता जर घटनात्मक बाबीची पायमल्ली केली तर ते या सभागृहाच्या दृष्टीने, विधिमंडळाच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही. त्यामुळे शासनाच्या बाजूने अशा प्रकारचा आग्रह होणे हे देखील अयोग्य आहे. एखाद्या घटनेची पायमल्ली होत असताना देखील उत्तराचे भाषण होऊ द्या असे म्हणत राहणे बरोबर नाही. म्हणून आमची सगळ्यांची विनंती आहे की, घटनेचा जो मान आहे तो राहिला पाहिजे. सगळ्यांचा सन्मान राहिला पाहिजे. त्यामुळे ती माहिती आल्यानंतर उद्या उत्तर द्यावे किंवा मंगळवारी उत्तर द्यावे पण आज उत्तर होता कामा नये.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, आताच माननीय संसदीय कामकाज मंत्री नामदार श्री. हर्षवर्धन पाटील साहेब यांनी हा मुद्दा गंभीर असल्याचे मान्य केले आहे तसेच ही एक घटनात्मक चूक झालेली आहे हेही मान्य केलेले आहे. हे मान्य करुन मराठीची प्रत लवकरात लवकर दिली जाईल आणि याला दिरंगाई का झाली याची संपूर्ण चौकशी करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल असे आश्वासन आपणा सर्वांना सदनाच्या वतीने दिलेले असताना मी आता सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपल्याला आता माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकण्यामध्ये काय हरकत आहे ? आपल्या मार्फत मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : आपण वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष आहात. आमच्या मनामध्ये संशय आहे. ज्या अर्थी कोणा तरी एका धनिकासाठी, एका प्रकल्पासाठी घटनेलाच आव्हान देण्यात आलेले आहे आणि पश्चिम महाराष्ट्रातून आव्हान देण्यात आलेले आहे आणि याचिका दाखल झालेली आहे त्या अर्थी मुळामध्ये हा अधिकारच नाही अशा पध्दतीचे वातावरण महाराष्ट्रामध्ये निर्माण करण्यात येत आहे त्या वेळेला मराठवाडा, विदर्भ आणि कोकणासारख्या मागास असलेल्या भागाच्या अस्तित्वालाच आव्हान निर्माण झालेले आहे. ही छोटी बाब नाही. माननीय मंत्री महोदय श्री. राजेंद्र

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते ....

मुळक यांचे भाषण व्हावे ही आमची सुध्दा इच्छा आहे. परंतु हा विषय घटनात्मक आहे. या सदनामध्ये जर आपण घटनात्मक तरतुदी सांभाळणार नसू तर आपल्याला जे काही आदेश द्यावयाचे असतील ते द्यावेत. आपण या घटनेचे ट्रस्टी आहात हे मी आपल्याला जाणीवपूर्वक सांगतो. शेवटी काय रेटून न्यावयाचे आणि काय रेटून न्यावयाचे नाही हे आपण ठरवावे.

**तालिका सभापती** (श्री. मोहन जोशी) : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक रात्री 8.28 ते 8.50 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**उप सभापती** : मघाशी सभागृहात जे काही घडले आहे त्याची मी माहिती घेतली आहे. वास्तविक पाहता झालेला प्रकार निश्चितपणे चुकीचा आहे. शासनाने याची गंभीर दखल घेतली पाहिजे. अर्थसंकल्पावरील चर्चेला माननीय अर्थमंत्र्यांचे उत्तर ही संविधानिक बाब आहे. तसेच राज्यपालांचे निर्देश सभागृहाच्या पटलावर ठेवणे हे देखील तेवढेच महत्वाचे आहे. हे निर्देश पटलावर का ठेवण्यात आले नाहीत याची सखोल चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी व निर्देशांच्या प्रती वरिष्ठ सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात याव्या. सभागृहाची प्रतिष्ठा, दर्जा व संविधानिक तरतुदी लक्षात घेता माननीय मंत्री महोदयांनी आता उत्तराला सुरुवात करावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,....

श्री.राजेंद्र मुळक ( वित्त व नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2011-12 या वर्षाच्या अर्थसंकल्पावर अनेक सन्माननीय सदस्यांनी.....

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला सचिवांना असे विचारावयाचे आहे की, रात्री 9 वाजता सर्क्युलेशन केले जाते का, या सभागृहाचा आब राखणार की नाही की, कामकाज असेच रेटून नेणार आहात ? माननीय सभापतींना सचिवांनी योग्य ते मार्गदर्शन करावयाचे असते. सचिव हे केवळ सत्तारुढ पक्षाचे नाहीत, ते सर्वांचे आहेत. त्यामुळे माननीय सभापतींना सल्ला देताना सचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे संरक्षण केले पाहिजे. हे त्यांचे काम आहे. या सदनामध्ये कोणतीही माहिती रात्री 9 वाजता सर्क्युलेट केली जाणे, हे बरोबर आहे काय ? आम्ही आपल्याला एवढीच विनंती केली की, ही घटनात्मक बाब असल्यामुळे घटनेचा आदर ठेवून मंत्री महोदयांनी परवा उत्तर द्यावे. मंत्री महोदयांबद्दल आमचा वाद नाही. सभापती महोदय, घटनेचा मान राखणे हे आपले काम आहे. आपण बोलल्यानंतर मंत्री महोदय उत्तर देण्यासाठी उभे राहिले, म्हणजे कामकाज रेटून नेण्याचा हा प्रकार आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, मी या सर्व प्रकाराची माहिती घेतल्यानंतर...

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्याला जर अशा प्रकारे कामकाज करावयाचे असेल तर आपण ते करावे. घटनात्मक बाबीसंबंधी आपल्याकडून या सदनाला संरक्षण मिळणार नसेल तर या सदनाचे कामकाज कसे करणार ? मी व्यक्तिगत संरक्षणाबद्दल बोलत नाही तर घटनेच्या संरक्षणासंबंधी बोलत आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, मी आपले म्हणणे ऐकण्यास तयार आहे. मी नाही म्हणालो नाही.

श्री.दिवाकर रावते : अधिकाऱ्यांच्या मुजोरीवर आजपर्यंत सर्व रेटून नेले. आम्ही सहन करतो याचा अर्थ आम्ही सर्व सहन करावयाचे काय ? ठीक आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आता आपण निदेश दिलेले आहेत. माझी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विनंती आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे हे शासनाने मान्यच केलेले आहे. सभापती महोदय, याची ग्रीन बुकमध्ये नोंद झाली, वेब साईटवर ही बाब आलेली आहे हे सर्वांना माहिती आहे. ही घटना दुर्लक्षित करण्यासारखी नाही. या सर्व प्रकाराची चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्याचे आता आपण आदेश दिलेले आहेत. आपल्या आदेशानुसार शासनाकडून निश्चितपणे चौकशी केली जाईल. या सर्वोच्च सभागृहाचा मान राखला जाईल. तसेच या सर्वोच्च सभागृहात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडणार नाहीत अशीही खबरदारी घेतली जाईल. आपण जो निदेश दिलेला आहे तो सभागृहाने मान्य करावा अशी माझी सर्वांना विनंती आहे. यानंतर मंत्री महोदयांनी उत्तर सुरु करावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी आम्हाला विनंती केली. खरे तर आमची ही व्यक्तिगत बाब नाही. आपण मघाशी सभागृहात नव्हता, मी सुरुवातीला सुध्दा सांगितले होते की, राज्यपालांनी शासनाकडे 10 मार्च रोजी निर्देश पाठविले आहेत. 10 ते 13 मार्चपर्यंत ते तसेच पडून राहिले. त्याच्या पुस्तिका तयार झाल्या नाहीत. मागील वेळी 19 मार्च रोजी निर्देशांची पुस्तिका सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली होती. त्यानंतर दोन दिवसांनी अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. या वेळी मात्र हे निर्देश एवढे दिवस पडून होते. त्यामुळे राज्यपालांचा, विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील जनतेचा आणि या सर्वोच्च सभागृहाचाही अवमान झ ालेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 20:55

श्री. पांडुरंग फुंडकर....

अशा प्रकारे अवमान करुन येथे कामकाज चालू असेल तर ते आम्ही ऐकू शकत नाही. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी ही संविधानिक बाब आहे असे सांगितले. मग काल अर्थसंकल्पावरील चर्चेचा शेवटचा दिवस असताना माननीय राज्यमंत्री महोदयांनी चर्चेला कालच उत्तर द्यायला पाहिजे होते. हे उत्तर आज का ठेवले ? विनियोजन विधेयक या सभागृहामध्ये संमत होऊन ते विधानसभेमध्ये गेले पाहिजे यासाठी आम्ही सरकारला प्रामाणिकपणे सहकार्य केले. आम्हाला त्या विनियोजन विधेयकाच्या वेळी सरकारला अडवता आले असते. परंतु त्यावेळेला आमची अडवणुकीची भूमिका नव्हती. कारण ते विधेयक जर थांबले असते तर सर्व कारभार ठप्प झाला असता. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि मी, आम्ही दोघांनी माननीय अर्थ राज्यमंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणाच्या वेळी हा मुद्दा उपस्थित करण्याचे ठरविले. चर्चेमध्ये सहभागी होणा-या सन्माननीय सदस्यांवर अन्याय होऊ द्यायचा नाही, त्यांची भाषण होऊ द्यायची आणि मग हा मुद्दा उपस्थित करायचा असे आम्ही ठरविले. त्याप्रमाणे हा घटनात्मक मुद्दा आम्ही या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. हा मुद्दा उपस्थित करताना राज्यमंत्री महोदयांचे उत्तर उद्या किंवा परवा ऐकण्याची आमची तयारी आहे, परंतु तत्पूर्वी राज्यपाल महोदयांचे निर्देश सभागृहाच्या पटलावर ठेवावेत अशी आमची मागणी आहे. माननीय राज्य मंत्री महोदयांचे उत्तर उद्या, सोमवारी किंवा मंगळवारी ऐकण्याची आमची तयारी आहे. या चर्चेला आजच उत्तर दिले पाहिजे असा काही आमचा आग्रह नाही. आम्ही सरकारला अशा प्रकारे सहकार्य करीत असताना सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे, घटनेला संरक्षण दिले पाहिजे. अशा परिस्थितीमध्ये अर्थ राज्यमंत्री चर्चेला उत्तर देणार असतील तर आम्हाला या सभागृहामध्ये बसण्यात स्वारस्य नाही. अशा प्रकारे घटनेचा अवमान करुन, राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निर्देशांचा अवमान करुन ज्यांना हे सरकार चालवायचे आहे त्यांनी ते जरुर चालवावे. आम्ही सभागृहामध्ये बसू इच्छित नाही, आम्ही बहिर्गमन करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत बहिर्गमन करतात.)

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कुणाचाही अवमान करण्याचा आमचा उद्देश नाही. रेकॉर्डवर या गोष्टी आल्यामुळे मला याबाबतीत स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. इंग्रजीच्या प्रती आमच्याकडे तयार आहेत. ग्रीन बुकात त्याची नोंद झालेली आहे. वेबसाईटवर देखील नोंद झालेली आहे. ही तांत्रिक बाब आहे. मराठीची प्रत सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. सभापती महोदय, या बाबतीत आपण निदेश दिल्याप्रमाणे ही प्रत सन्माननीय सदस्यांना कशामुळे मिळाली नाही, का मिळाली नाही याबाबतची सर्व चौकशी केली जाईल आणि अशा प्रकारची घटना पुन्हा घडणार नाही याची खबरदारी सरकारकडून घेतली जाईल. माझी विनंती आहे की, माननीय राज्यमंत्री महोदयांनी चर्चेला उत्तर द्यावे.

**उप सभापती** : मंत्री महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, ज्या गोष्टी राज्य शासनाच्या अधिका-यांनी करायला पाहिजेत त्या त्यांनी योग्य वेळी करायला पाहिजेत. त्यांनी त्या योग्य वेळी न केल्यामुळे शासनाची नामुष्की होते. या ठिकाणी सभापती स्थानी माननीय सभापती असतील, मी असेन किंवा तालिका सभापती असतील, कारण नसताना अधिका-यांनी केलेल्या चुका निस्तरण्याचे काम आपल्याला करावे लागते. आज विरोधी पक्षाने आतापर्यन्तच्या कामकाजामध्ये आपल्याला सहकार्य केलेले आहे. परंतु हा एक तांत्रिक मुद्दा उपस्थित झाल्यामुळे सर्वांचाच नाईलाज झालेला आहे. विरोधी पक्षाने केलेली मागणी चुकीची नव्हती. त्याच प्रमाणे उत्तराचे भाषण देखील आजच होणे हे तितकेच महत्वाचे आहे. विनियोजन विधेयक संमत करण्यासंबंधी विरोधी पक्षाला विनंती केल्यानंतर त्यांनी ती विनंती ताबडतोबीने मान्य केली आणि ते विधेयक मंजूरही करुन दिले. याबाबतीत जी काही कारवाई व्हायची आहे ती होईल. ती कारवाई झालीच पाहिजे. परंतु अशा प्रकारची पुनरावृत्ती शासनाकडून किंवा शासकीय अधिका-याकडून पुन्हा होता कामा नये याची खबरदारी या पुढच्या काळात घेतली गेली पाहिजे अशा माझ्या सूचना आहेत.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण सांगितल्या प्रमाणे याबाबतीत निश्चितपणे खबरदारी घेतली जाईल आणि या सगळया प्रकरणाची चौकशी केल्यानंतर यामध्ये जो कोणी दोषी असेल त्याच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

---

...3...



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 20:55

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.**: सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु)

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2011-2012च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये अनेक मान्यवरांनी भाग घेतला. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री.दिवाकर रावते, धनंजय मुंडे, हुसेन दलवाई, प्रकाश बिनसाळे, एस. क्यू जमा, डॉ. दीपक सावंत अशा दोन्ही बाजूच्या जवळ जवळ 38 सन्माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेतला.

..नंतर श्री. गिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक....

त्यांनी अतिशय चांगले मुद्दे आणि चांगल्या सूचना या निमित्ताने केल्या आहेत. सभापती महोदय, वित्त विभागाचा राज्यमंत्री म्हणून मला गेल्या तीन,चार महिन्यापासून संधी प्राप्त झाली आहे. या प्रसंगी राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेब आणि ज्यांनी हा अर्थसंकल्प अतिशय यशस्वीपणे मांडला असे आपल्या राज्याचे उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री श्री. अजित पवार साहेब यांना मी मनापासून धन्यवाद देतो. अत्यंत चांगला असा अर्थसंकल्प मांडण्याची मला तरुण अवस्थेमध्ये संधी मिळाली. 57 कोटीचा शिलकीचा अर्थसंकल्प अनेक वर्षानंतर या राज्यात मांडण्यात आला आहे. या अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी तसेच विरोधी पक्षातील सदस्यांनी अत्यंत चांगल्या सूचना केल्या आहेत. 2009-10 मध्ये 86 हजार 910 कोटी रुपये महसुली जमा होती. 2010-11 मध्ये महसुली जमा 1 लक्ष 7 हजार 159 कोटी एवढी आहे. म्हणजे महसुली जमेत 23.03 टक्के एवढी वाढ झालेली आहे. 2009-10 मध्ये विक्रीकराचे संकलन होते त्यामध्ये 2010-11 मध्ये विक्रीकराच्या संकलनात 26 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. मुद्रांक शुल्कात 31 टक्क्यांची वाढ झालेली आहे. या सर्व बाबींकडे लक्ष टाकले तर अशा पध्दतीने आपली महसुली वाढ होत आहे. 2011-12 मध्ये अपेक्षित महसूल 1 लक्ष 21 हजार 503 कोटी रुपये एवढा आहे. सांगण्याचे तात्पर्य एकच आहे की, 1999 मध्ये युतीचे सरकार सत्तेवरुन गेले आणि कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाचे सरकार सत्तेवर आले. तेव्हापासून या राज्यामध्ये आर्थिक शिस्त लावण्याचा तत्कालिन मुख्यमंत्री, वित्तमंत्री प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे गेल्या दहा, बारा वर्षाच्या कालावधीनंतर आपण 57 कोटी रुपयांचा शिलकीचा अंर्थसंकल्प मांडू शकलो. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, सर्व गोष्टींचे सोंग घेता येवू शकते, परंतु पैशांचे सोंग घेता येऊ शकत नाही हे मला या ठिकाणी आवर्जून सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मी राज्यावरील कर्जाच्या बाबतीत या सभागृहाला थोडक्यात माहिती देऊ इच्छितो. राज्यावरील कर्जाच्या बाबतीत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अनेक टीका टिप्पणी केली. 1995 ते 1999 पर्यंत युतीचे सरकार सत्त्ेवर होते. 1995 ते 1999 या कालावधीमध्ये मोठया कर्जाच्या विळख्यात टाकण्याचे काम युती सरकारने केले. एवढेच नव्हे तर त्या कालावधीत अनेक

2...

श्री. राजेंद्र मुळक......

वेळा ओव्हर ड्रॉफ्ट काढण्याची वेळ देखील भाजप आणि शिवसेनेच्या युती सरकारने राज्यावर आणली. सभापती महोदय, राज्यावरील कर्जाच्या बाबतीत मी या सदनाला थोडक्यात माहिती देऊ इच्छितो ....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक......

सन 2010-2011 या आर्थिक वर्षात राज्याचे एकूण संचित दायित्व स्थूल उत्पन्नाच्या 20 टक्के असून 2011-2012 या आर्थिक वर्षात 19.2 टक्के एवढ्या मर्यादेत ठेवण्याचे प्रस्तावित आहे. एकंदरीत 2004-05 चे सुधारित बेस इयर स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत 26.1 टक्के मर्यादेच्या आत आहे. 2011-2012 मध्ये केंद्र शासनाने कर्ज उभारणी मर्यादा राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या 3 टक्के एवढी विहित केली होती. 35160 कोटी रुपये एवढी कर्ज मर्यादा केंद्र शासनाने राज्यासाठी विहित केली होती. 2011-2012 या वर्षासाठी स्थूल उत्पन्नाच्या 1.93 टक्के एवढी कर्ज उभारणी मर्यादा प्रस्तावित केली आहे. मी सभागृहाला आणि राज्याला सांगू इच्छितो की, 2005 मध्ये शासनाने 1292.23 कोटी रुपयांचा ओव्हर ड्राफ्ट घेतला आणि त्यानंतर आजपर्यंत एकही रुपयाचा ओव्हर ड्राफ्ट शासनाने घेतलेला नाही. ही आपल्या राज्याची आर्थिक परिस्थिती आहे.

सभापती महोदय, विभागनिहाय जो काही निधी वाटप करावयाचा होता त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, 2010-2011 मध्ये 37916 कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध होता आणि या वर्षी तो 41500 कोटी रुपये इतका आहे. 2010-2011 करिता कृषी विभागासाठी 509 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला होता व या वर्षी 2011-2012 साठी 694 कोटी रुपये तरतूद केली आहे. जवळपास 36 टक्के वाढ झालेली आहे. सहकार आणि पणन विभागाकरिता 6 टक्के वाढ झालेली आहे. वस्त्रोद्योग विभाग म्हणजे ज्या विभागामध्ये रोजगार निर्मिती होऊ शकते अशा अत्यंत महत्वाच्या विभागासाठी 41 टक्के वाढ झालेली आहे. रोजगार व स्वयंरोजगार विभागासाठी 391 टक्के वाढ झाली आहे. अशा प्रकारे सर्व विभागांची तरतूद लक्षात घेतली तर 37916 कोटी रुपये 2001-2011 करिता नियतव्यय असताना 2011-2012 करिता 41500 कोटी रुपये नियतव्यय उपलब्ध केलेला आहे. सर्व विभागांची तरतूद लक्षात घेता सरासरी 9.45 टक्के तुलनात्मक वाढ दिसून येईल.

सभापती महोदय, महसुली तुटीबाबत विरोधी पक्षाच्या अनेक माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. 13 व्या वित्त आयोगाने निर्धारित केलेल्या तत्वाप्रमाणे राज्याची महसुली तूट नियंत्रण करणे आवश्यक असते. त्यानुसार महसुली उत्पन्नात वाढ व महसुली तूट भरुन काढण्याचे प्रयत्न सरकारने केलेले आहेत. ग्रीन बुकमधील पृष्ठ क्रमांक 18 वर याचा तपशील दिलेला आहे. 2010-2011 या वर्षासाठी सुधारित अंदाजानुसार अपेक्षित येणे आणि व्याज शिल्लक आहे

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक......

त्यानुसार आपल्या राज्याची आर्थिक स्थिती दर्शविलेली आहे. 2011-2012 ची आर्थिक स्थिती मी सभागृहाला सांगू इच्छितो. अनुशेषाबाबत माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी उल्लेख केला. जलसंपदा विभागासाठी विदर्भातील अनुशेषाबाबत 1117 कोटी रुपये अपेक्षित आहेत असे सांगितले आहे. जलसंपदा विभागाचा 31.12.2011 पर्यंत विदर्भातील सिंचनाबाबत अकोला व वाशिम जिल्हयासाठी 65.50 कोटी रुपये इतका वित्तीय अनुशेष असून 2011-2012 या आर्थिक वर्षात सिंचन क्षेत्रातील अनुशेषासाठी विदर्भाकरिता 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तंत्रशिक्षण व सार्वजनिक आरोग्य या क्षेत्रात विदर्भातील अनुशेषाकरिता 3028.7 कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

नंतर 5जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ........

महोदय, मानव विकास योजना आपल्या राज्यात बंद झाल्याचा येथे उल्लेख करण्यात आला. मी त्यांसदर्भात असे सांगू इच्छितो की, मानव विकासाचा निर्देशांक वाढविण्यासाठी शासनाने राज्यातील 25 तालुक्यात सन 2006-07 ते 2009-10 या चार वर्षात वेगवेगळे कार्यक्रम राबविले. तसेच आता मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार जिल्हा व तालुका पातळीपर्यंत हा कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न देखील शासन करणार आहे. तसेच कार्यक्रम यशस्वीपणे राबविता यावा म्हणून 500 कोटीची तरतूद नियोजन विभागाने केली आहे. त्यानुसार हा कार्यक्रम सन 2011-12 या वर्षापर्यंत राबवावयाचा आहे. त्यात चालू वर्षासाठी 425 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील मानव विकास योजना या वर्षी सुध्दा चांगल्या प्रकारे राबविता येईल. अर्थसंकल्पाला नियोजन विभागाच्या माध्यमातून मान्यता घेतली जाते. परंतु तत्पूर्वी एस्टीमेट कमिटीबरोबर जवळपास चार पाच बैठका झाल्या. कारण नियोजन आयोगासमोर आपल्या राज्याचा नियोजन आराखडा घेऊन जाण्यासाठी वेळ मागून जावे लागते. साधारणत: असा प्रिसिडन्स आहे की, आपल्या राज्यासंबंधीची ही माहिती दिल्यानंतरच आपल्याला नियोजन आयोगाकडून तसा वेळ मिळतो. त्यानंतर नियोजन आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे आपल्या राज्याचा नियोजनाचा आराखडा तयार करावा लागतो. त्याच पध्दतीने आपण आपल्या राज्याच्या नियोजनाचा आराखडा येत्या काही दिवसात पूर्ण करण्याचे ठरविले आहे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी भाषण करताना असे सांगितले की, 40959 कोटी एवढी रक्कम आपल्या राज्याला केंद्राकडून मिळणार आहे तसेच 8 हजार कोटीपेक्षा जास्तीचा निधी सुध्दा केंद्राकडून प्राप्त होणार आहे. या अनुषंगाने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देणार आहे की, सन 2010-11 मध्ये केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून आपल्या राज्याला एकूण 10995 कोटी इतका निधी प्राप्त झाला आणि वेळोवेळी शासनाकडून त्यासंबंधीची पूर्तता झालेली आहे. तसेच केंद्राच्या जास्तीत जास्त योजना आपल्या राज्यात याव्यात त्या अनुषंगाने अनेक चांगल्या सूचना सभागृहात केल्या त्यांचे मी आभार मानतो. त्यात माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी अशी सूचना केली की, महाराष्ट्र शासनाचे दिल्लीत एक मिनी मंत्रालय तयार करावे. त्यात आयएएस दर्जाचे अधिकारी

....2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ........

ठेवून केंद्राकडून विविध योजनांसाठी जास्तीत जास्त निधी कसा आणता येईल यासाठी या मिनी मंत्रालयाचा उपयोग होईल. मग त्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून अधिकचा निधी मिळविता येईल. कर्मधर्म संयोगाने माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्याकडेच केंद्र शासनामध्ये या विभागाचा कार्यभार असल्याने केंद्राच्या योजना आपल्या राज्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी अधिकचा निधी कसा उपलब्ध करुन घेता येईल, यासाठी त्यांची मदत होईल. तसेच ज्या योजना आपण प्लॅन मध्ये घेऊ शकत नाही, अशा योजना देखील आपण राबवू शकतो. उदा. शेती पांदण रस्ते, रोजगार हमीतून विहिरी घेणे, पाणी अडवा व पाणी जिरवा, शेत तळयांसारख्या योजना यशस्वीपणे राबवू शकतो.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नक्षलग्रस्त भागासंबंधीचा उल्लेख केला. त्या अनुषंगाने मी सभागृहाला अवगत करणार आहे की, 60 कोटीचा विशेष कार्यक्रम आपण नक्षलग्रस्त भागात राबविण्याचे ठरविले आहे. त्यातून या भागात आरोग्य, शिक्षण अशा मूलभूत नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी या निधीचा उपयोग करता येईल. तसेच भविष्यात केंद्राकडून जो विशेष निधी या कामासाठी प्राप्त होणार आहे त्या माध्यमातून आपण या योजनांना मूर्त स्वरुप देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGJ/ 21:15

श्री. राजेंद्र मुळक ...

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी विक्री कर विभागाच्या बाबतीत चांगल्या सूचना केल्या आहेत तर काही सन्माननीय सदस्यांनी टीकाही केलेली आहे. राज्यातील अर्थ विभागातील रेव्हेन्यू जनरेशन करणारा विभाग हा विक्रीकर विभाग आहे. आपल्याला जवळपास 26 टक्क्याची वाढ विक्रीकर विभागाच्या माध्यमातून रेव्हेन्यू जनरेशनमध्ये भेटलेली आहे. आपले राज्य देशातील एकमेव असे राज्य आहे की, आपल्या राज्याने विक्री कर विभागाचा आधुनिकीकरण केलेले आहे. टीनीक्स सिस्टम द्वारे राज्य आणि देशपातळीवर जे व्यवहार करतो त्याला एका जागेवर आणण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. इकॉनॉमिक इंटेलिजन्स युनीट, इ पेमेंटची सुविधा, इ मेल सुविधा अशा नव्या तांत्रिक बाबी लक्षात घेऊन संगणकीकरण करुन विक्री कर विभागाला सशक्त करण्याचे काम केलेले आहे. त्यामुळेच आपल्या विक्री कर विभागामध्ये रेव्हेन्यू जनरेशनचे मोठया प्रमाणात काम झालेले आहे. सन 2010-11 मध्ये आपण रेव्हेन्यू जनरेशनच्या बाबतीत 26 टक्क्यापर्यंत पोहचलो आहे व सन 2011-2012 मध्ये आपण 26 टक्क्याच्या पुढेच राहू. आता आपण जी नवीन सिस्टम निर्माण केलेली आहे ती वर्षभर सुरु राहिली तर आपला रेव्हेन्यू निश्चितपणे 26 टक्क्याच्यावर सुध्दा जाऊ शकेल अशी अपेक्षा ठेवली तर ती वावगी राहणार नाही एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, आपण विक्री कर विभागाच्या माध्यमातून फ्यूचर प्लॅन तयार केलेला आहे, कृती आराखडा तयार केला असून त्यामध्ये विक्री कर विभागाची पुनर्रचना करणे,जुन्या कायद्यांचे निर्धारिकरण व वसुलीची कामे पूर्ण केली जाणार आहे. काही सन्माननीय सदस्यांनी अपिल्समध्ये आपले काही मॅटर अजूनही पेन्डिंग्स आहेत. विक्री कर विभागाची थकीत कर वसूलीमध्ये अडथळा निर्माण होतो व त्यामुळे मोठया स्वरुपातील निधी अजूनही आपल्याकडे येऊ शकत नाही. सदर निधी कंपनीकडे, ट्रेडर्स अथवा ग्राहकाकडे पेन्डिग आहे. आपण विक्री कर विभागाच्या अनुषंगाने ज्या काही नवीन सिस्टम्स आणलेल्या आहेत त्यामुळे आपल्या ज्या काही केसेस अपिलेट कोर्टस्मध्ये असतील त्याचा लवकर निपटारा होऊ शकेल तसेच आपला जो थकीत कर आहे तो सुध्दा आपल्याला मिळेल व आपल्या रेग्युलर ॲसेसमेंटच्या कामात त्याची मदत होईल. हे करीत असतांना इलेक्ट्रॅनिक्स पध्दतीने परतावा करणे,

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ...

विवरणपत्र तयार करणे, इ पेमेंट करणे, व्यापा-यांकरिता डिलर इन्फॉर्मेशन सिस्टीम संगणकावर उपलब्ध करणे, असे अनेक विषय आपण आपल्या फ्यूचर प्लॅनमध्ये, कृती आराखडयामध्ये तयार केलेले आहेत. यासंदर्भातील कामकाज ऑलरेडी सुरु झालेले आहे. या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये आपण अपेक्षित करतो आहोत की, हा जो कृती आराखडा आपण तयार केलेला आहे त्याच्या माध्यमातून विक्री कर विभागाला निश्चितपणे मदत होईल.

सभापती महोदय, विक्री कर विभाग, मुद्रांक शुल्क विभाग, एक्साईज डिपार्टमेंट अशा तीन चार विभागाच्या द्वारे आपल्या राज्याला जास्तीत जास्त रेव्हेन्यू जनरेशन होत असतो. जेथे आपल्याला मोठया प्रमाणात रेव्हेन्यू मिळतो त्या ठिकाणीच सिस्टम ॲनालिसीस व्हावयास पाहिजे अशा शासनाचा मुख्य हेतू होता. व्यवस्थित व्यवस्थापन करणे, ॲडमिनिस्ट्रेटीव्ह कंट्रोल ठेवणे व कोठेहे लिकेजेस राहणार नाही याची काळजी घेतली गेली आहे. ज्या विभाकडून राज्याला जास्तीत जास्त रेव्हेन्यू मिळतो ते संतुलीत पध्दतीने चालावयास पाहिजे हा आपला यामागील हेतू आहे. जेव्हा शासनाकडे जास्त पैसा उपलब्ध असेल तेव्हाच शासन सोशल योजना राबवू शकेल. सामाजिक योजना राबविण्यातसाठी जास्त प्रमाणात निधीची आवश्यकता असते. विक्री कर विभागाचे आधुनिकीकरण केल्यामुळे जो निधी उपलब्ध होईल तो निधी सर्वसामान्य जनतेच्या कामासाठी खर्च करता येईल.

या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी व्हॅटच्या बाबतीत विचार व्यक्त केलेले आहेत. व्हॅट लागू होण्याच्या अगोदर आपल्या राज्याची आर्थिक परिस्थिती काय होती व व्हॅट लागू केल्यानंतर आपल्या राज्याच्या आर्थिक परिस्थितीत काय बदल झाला याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो व्हॅट लागू होण्याच्या अगोदर म्हणजे सन 2004-05 मध्ये 20494 कोटी रुपये आपल्याला मिळत होते.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक ...

व्हॅट इन्ट्रोडयूस झाल्यानंतर 22 हजार 464 कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. जवळजवळ 2 हजार रुपयांनी वाढ 2005-2006 साली झाली होती.ही वाढ होत होत आज आपण 46 हजार 561 रुपयांपर्यत पोहोचलो आहोत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते आणि विनोद तावडे यांनी जे प्रश्न या ठिकाणी उपस्स्थित केलेले आहेत त्या सदर्भात मी या ठिकाणी खुलासा केलेला आहे.

सभापती महोदय, थकीत कर वसुलीच्या बाबतीत मी मघाशीच सांगितले आहे की थकीत कर वसुलीसाठी कार्यप्रणालीचे मॉर्डनायझेशन केल्यामुळे नक्कीच फायदा होणार आहे. रेव्हेन्यू जनरेशन अधिक होण्यासाठी काही वस्तूंवर नव्याने कर लावलेला आहे. काही सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला होता की गॉगल्सवर का कर लावण्यात आला आहे त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की,सामान्य कुटुंबातील व्यक्ती जे गॉगल्स वापरतात त्यावर कर वाढविण्यात आलेला नाही तर विशिष्ट किंमतीच्या पुढे जे गॉगल्स वापरतात त्यावरील करात वाढ करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने अनेक विषयांवर सन्माननीय सदस्यांनी चर्चा केलेली आहे. सिंचनाच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्य बोलले आहेत. 2010-2011 साली 7 हजार 918 कोटी रुपयांची तरतूद शासनाने केलेली आहे ही तरतूद सर्वात जास्त आहे असे मला सांगावयाचे आहे. 6 हजार 250 कोटी रुपयांचे वितरण या माध्यमातून करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय प्रकल्प म्हणून गोसीखूर्द प्रकल्पासाठी 737 कोटी रुपये दिलेले आहेत. ए.आय.बी.पी.चा कार्यक्रम या देशात सर्वात जास्त आपल्या राज्यात राबविण्याचे काम राज्य शासनाने केलेले आहे. ए.आय.बी.पी.चा सर्वात जास्त निधी आपल्या राज्याला मिळाला आहे. त्यामुळे आपल्या राज्यातील वेग वर्धित सिंचनं लाभ कार्यक्रमाला मोठी मदत झालेली आहे.

सभापती महोदय,ऊर्जा विभागाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी तक्रार करण्यासारखी भाषणे केलेली आहेत. त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की,2012 साला पर्यत आपले राज्य भार नियमन मुक्त होणार असून त्यामध्ये काहीही दुमत नाही. सध्या आपली ऊर्जेच्या बाबतीत जी स्थिती आहे तिची तुलना देशातील ऊर्जा स्थितीशी

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक ...

केली तर ती चागली आहे . परळी, कोराडी, खापरखेडा इत्यादी औष्णिक विद्युत केन्द्रामध्ये कॅपेसीटी एनहान्समेन्ट, मेन्टेनन्सची कामे करण्यात आलेली आहेत. आता उन्हाळा सुरु झाल्यामुळे लोड इनक्रीज होणार आहे ती बाब आपण डिसेंबर महिन्यातच ॲन्टीसिपेट केली होती. भविष्यातील उन्हाळयात जो काही आपला लोड वाढणार आहे तो विचारात घेऊन या प्रकल्पाच्या सर्व मेन्टेनन्सची कामे केली आहेत. कोराडीमध्ये कॅपेसिटी एनहान्समेन्ट होऊन जवळपास 660 मेगॅवॅटचा विद्युत पुरवठा वर्षभरामध्ये होईल अशी आपण अपेक्षा करीत आहोत. खापरखेडामध्ये सुध्दा कॅपेसिटी एनहान्समेन्ट होणार आहे. अशा प्रकारे आपले स्वत:चे प्रकल्प ज्या ज्या ठिकाणी आहेत त्या त्या टिकाणी एनहान्समेन्ट करुन त्याच इन्फ्रास्ट्रक्चरमधून जास्तीत जास्त मेगावॅट विद्युत निर्मिती करीत आहोत. याचा उल्लेख या ठिकाणी करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, विदर्भ आणि कोकणामध्ये 2350 कोटी रुपये देऊन नवीन प्रकल्प आणत असल्यामुळे तेथे अधिक प्रदूषण निर्माण होणार आहे. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा जो नियतव्यय नवीन पॉवर स्टेशनसाठी देण्यात आलेला आहे. हा नियतव्यय आपल्या एक्झिस्टीग प्लॅनमधून खर्च करण्यात येणार आहे.. ज्या ठिकाणी आपले इनफ्रास्ट्रक्चर आहे ज्या ठिकाणी ऑलरेडी आपली सर्व यंत्रणा उभी असून वीज निर्मिती होते.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक....

त्याच प्रकल्पावर अथवा त्या ठिकाणी आपल्या कॅपॅसिटी अनेन्समेंटच्या कार्यक्रमामध्ये हा पैसा खर्च करणार आहोत. गावठाण फिडर आणि सिंगल फेजिंगची योजना सुध्दा आपण यशस्वी रित्या राबविली आहे. राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना देखील चांगल्या पध्दतीने राबवीत आहोत. दहाव्या आणि अकराव्या पंच वार्षिक योजनेमध्ये दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना कनेक्शन देण्याचे काम केले आहे. अशा पध्दतीने आपल्या ऊर्जा विभागातील जे जे कार्यक्रम होते ते यशस्वीरित्या राबविण्याचा प्रयत्न या वर्षी केला गेला असून भविष्यात देखील हा कार्यक्रम आपण चांगल्याप्रकारे राबविणार आहोत.

सभापती महोदय, गेल्या दोन वर्षात विजेची उपलब्धता पाहिली तर हळू हळू लोड शेडींगचे प्रमाण कमी होत चालले आहे. साधारणपणे या देशात आठ तासापेक्षा कमी वीज शेतकऱ्यांना दिली जाते, म्हणजेच आपण आज आठ तासापर्यंत शेतकऱ्यांना वीज पुरवठा करु शकतो अशी परिस्थिती आहे. भविष्यात येणाऱ्या वर्षामध्ये प्रत्येक महिन्यातील दोन आठवडे आणि दहा तास आपण शेतकऱ्यांना वीज देणार आहोत तशा प्रकारचा आराखडा तयार केला आहे. याचे सरासरी प्रमाण काढले तर महिन्याला किमान 9 तासापेक्षा जास्त अबाधितपणे वीज शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणार आहोत. त्या सोबत डिस्ट्रीब्यूशनची कामे असतील किंवा फिडर सेपरेशनची कामे असतील त्या बाबतीत सांगू इच्छितो की, सन 2008-09 मध्ये 8 लाख 97 हजार 398 घरगुती कनेक्शन देण्यामध्ये वाढ केली, सन 2010-11 मध्ये 70 लाख 94 हजार 461 घरगुती कनेक्शन देण्यामध्ये वाढ केली, त्याच प्रमाणे औद्योगिक क्षेत्रामध्ये 16 हजार 520 नवीन ग्राहक जोडले गेले आहेत. कृषी पंपाच्या विद्युतीकरणासाठी सन 2010-11 मध्ये 2 लाख 73 हजार 353 कनेक्शन देण्याचे काम करण्यात आले. आपण 2 लाखाचे लक्ष्य ठेवले असतानाही त्यापेक्षा जास्त म्हणजे 73 हजार 353 कनेक्शन देण्याचे काम केले आहे. आजची आपली ऊर्जा निर्मितीची परिस्थिती पाहिली तर दाभोळमध्ये सन 2009-10 मध्ये वाढीव ऊर्जा निर्मितीची क्षमता 970 मेगावॅट आहे, एनटीपीसीच्या कहलगाव येथील केंद्रामध्ये 1 हजार 91 मेगावॅटने वाढ केली आहे. सन 2010-11 मध्ये 908 मेगावॅटने क्षमता वाढली. सन 2011-12 चे पाहिले तर 2 हजार 480 अधिक हजार म्हणजे 3400 मेगावॅटने क्षमता वाढविण्याचा लक्ष्यांक होता. सन 2011-12 मध्ये खापरखेडा येथे 500 मेगावॅटचे 2 यूनिट सुरु करण्यात येत आहेत, भुसावळ येथे 500 मेगावॅटचे 4 यूनिट सुरु करण्यात येत आहेत. अशाप्रकारे 1500 मेगावॅट इतकी आपली क्षमता वाढ होणार आहे. केंद्रीय क्षेत्रामधून आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. राजेंद्र मुळक....

जी वीज घेतो त्यामध्ये 980 मेगावॅटची भर पडणार आहे, त्याचप्रमाणे खाजगी ठिकाणाहून 1 हजार मेगावॅट इतकी वीज विकत घेऊन आपण अशा प्रकारचा कार्यक्रम राबविणार आहोत. या वरुन एक गोष्ट लक्षात येईल की, आपली दरवर्षीची मागणी आहे त्यापेक्षा ऊर्जा निर्मितीच्या क्षमतेमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे सन 2012 पर्यंत लोड शेडींग मुक्त हे राज्य होईल असे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या राज्यातील शेतकऱ्यांच्या थकित बिलासंदर्भात त्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकाने कृषी संजीवनी योजना तयार केली आहे. अशाप्रकारे ऊर्जा विभागाला अधिक गतिमान करण्याचा शासनाच्या माध्यमातून प्रयत्न सुरु आहे. आज संपूर्ण देशामध्ये कोळसा इंधनाच्या उपलब्धतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक . . . .

म्हणून कुठेतरी अणुऊर्जेबाबत विचार करावयास पाहिजे. म्हणून अणूकरार झाल्यानंतर अणु ऊर्जा प्रकल्प आपल्या देशामध्ये यावा आणि आपल्या राज्यामध्ये यावा यादृष्टीने प्रयत्न करण्यात आला. त्यानुसार जैतापूर येथे एक नवीन अणू ऊर्जा प्रकल्प यावा यादृष्टीने प्रयत्न करण्यात आले. जेणेकरुन आपल्या राज्यामध्ये 1 लक्ष कोटी रुपयांची इन्व्हेस्टमेंट व्हावयास पाहिजे अशा प्रकारचा आपल्या सर्वांचा मानस आहे. परंतु हल्लीच जपान मध्ये सुनामी मुळे जे काही झाले आणि तेथील अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये जे काही तांत्रिक बिघाड झाले त्यामुळे स्फोट झाले. ते लक्षात घेता आपण देखील यासंबंधातील जे सर्व सेफ्टी मेजर्स् असतील ते देश पातळीवर आणि असोसिएशन ऑफ ॲटॉमिक एनर्जी यूजर्स् ही जगप्रसिध्द एजन्सी आहे. ही एजन्सी सतत या सर्व गोष्टींना मॉनिटर करीत आहे. यातून नवीन गोष्टी निघतील किंवा सेफ्टी मेजर्स निघतील ते निश्चितपणे जैतापूरच्या प्रकल्पासाठी कार्यान्वित केले जातील. तसे पाहिले तर जैतापूर साईट 60 मीटरवर आहे, म्हणजे जरी सुनामीसारखी परिस्थिती आली तरी आपल्या प्रकल्पापर्यंत जाणार नाही. ज्यावेळेला 9 रिष्टर स्केल तीव्रतेचा जपान येथे भूकंप झाला होता तेव्हा जवळपास 15 ते 20 मी.पर्यंत लाटा उसळल्या होत्या. अशा वेळी आपल्या भागामध्ये जरी 9 रिष्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला तरी आपली साईट 60 मीटर पर्यंत आहे. त्यामुळे तेथपर्यंत लाटा जाणार नाहीत आणि प्रकल्पाला काही धोका निर्माण होणार नाही अशा प्रकारची आपली अत्यंत चांगली साईट आहे.परंतु तरीही जैतापूरच्या प्रकल्पाच्या बाबतीत आपल्याला ज्या काही सिक्युरिटी मेजर्स् घ्यावयाच्या आहेत, त्याबाबतीत सांगावयाचे तर जपानमध्ये घडलेल्या घटनेमुळे आता वरिष्ठ पातळीवर, इंटरनॅशनल पातळीवर संशोधन सुरु झाले आहे. ते सर्व लक्षात घेता भविष्यामध्ये हा प्रकल्प यशस्वीरित्या कसा उभारु शकतो यादृष्टीने निश्चितपणे काळजी घेतली जाईल.

सभापती महोदय, उद्योग विभागाच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आपल्या राज्यामध्ये छोटे आणि मोठे प्रकल्प आल्यामुळे रोजगाराची संधी वाढेल, गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होईल. या संदर्भात महाराष्ट्र राज्य हे देशातील एकूण नवीन प्रकल्पांच्या गुंतवणूकीमध्ये आजही अग्रेसर आहे. मार्च 2011-2012 च्या अहवालानुसार डिसेंबर 2010 मध्ये राज्यात एकूण 8101 प्रकल्पांमध्ये 7 लाख 11 हजार 653 कोटी रुपयांची भरीव गुंतवणूक झालेली आहे. म्हणून उद्योग विभागामध्ये ज्या पध्दतीने गुंतवणूक झाली, त्या माध्यमातून भविष्यामध्ये अजून अधिक गुंतवणूक होणे अपेक्षित आहे. यामुळे रोजगार आणि आपली जी इकॉनॉमी आहे त्यामध्ये निश्चित



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक . . . .

स्वरुपात वाढ होईल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. याबाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या आहेत आणि त्याकडेही निश्चितपणे लक्ष दिले जाईल हे मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी आंबा बागायतदारांना कमी प्रमाणात नुकसान भरपाई मिळते याबाबत माहिती दिली. त्याविषयी मी सांगू इच्छितो की, 2004-2005 मधील आंबा पिकाचे जे नुकसान झाले, त्यासाठी प्रति हेक्टर 10 हजार रुपये, 2006-2007 मध्ये 15 हजार रुपये या दराने मदत दिली आहे. अशा प्रकारे आपण आंबा पिकाचे जे नुकसान होते त्या संदर्भात दरवर्षी जी नुकसान भरपाई दिली जाते, त्यामध्ये वाढ करण्याचे काम निश्चितपणे केलेले आहे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर साहेब किंवा भाई जगताप साहेब, केशवराव मानकर साहेब यांनी खताची टंचाई आणि त्यासाठी ठेवण्यात येणारा अपुरा निधी बाबत उल्लेख केला.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक.....

सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, खरीप हंगामामध्ये 2011 साठी 6 लाख मेट्रीक टन संरक्षित साठा करण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे. यासाठी एमआयडीसी मुंबई, बीसीएएमएस नागपूर यांची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. या माध्यमातून खतांच्या टंचाईवर मात करण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार आहे.

सभापती महोदय, पीक विमा योजनेच्या बाबतीत प्रामुख्याने सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी, श्रीमती शोभा फडणवीस, श्री. भाई जगताप व इतर अनेक सदस्यांनी पीक विमा योजना यशस्वीरित्या राबविली गेली पाहिजे या संदर्भात उल्लेख केला. खरीप हंगामामध्ये ज्या वेळी पावसाची आवश्यकता असते त्यावेळी पाऊस येत नाही. आणि ज्यावेळी पावसाची आवश्यकता नसते त्या वेळी पाऊस येतो. रब्बी हंगामामध्येही अशाच प्रकारची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यसाठी शासनाला अनेक वेळा पुढे यावे लागते. काही दिवसापूर्वीच अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भात जवळपास एक हजार कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. पण आता हळूहळू पीक विमा योजना यशस्वी करणे आवश्यक आहे. म्हणून पीक विमा योजना यशस्वीरित्या राबविण्या संबंधीचा निर्णय या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये घेतलेला आहे. 1999 ते 2010 पर्यंत रब्बी पिकाच्या संदर्भात एकूण 583 कोटी रुपयांचा विमा हप्ता भरुन या योजनेमध्ये भाग घेतलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यात आलली आहे. येणाऱ्या वर्षामध्ये हा आकडा वाढवून अधिकची रक्कम पीक विमा योजनेसाठी ठेवलेली आहे त्यामुळे भविष्यामध्ये फळबागा, रब्बीची पिके आणि खरीपातील पिके कव्हर करण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार आहे.

सभापती महोदय, कापसा संबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. मी याबाबतीत सांगू इच्छितो की, या वर्षी सर्वात जास्त भाव कापसाला देऊ शकलो. आधारभूत किंमत प्रती क्विन्टल पाच हजार ते सहा हजार देण्यात आलेली आहे. आता नवीन वस्त्रोद्योग धोरण आलेले आहे. या नवीन वस्त्रोद्योग धोरणाच्या माध्यमातून ज्या ठिकाणी कापूस उत्पादक शेतकरी आहेत, त्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या भागामध्ये सूत गिरण्या व्हावयास पाहिजेत आणि त्या भागातील कापूस उत्पादक शेतकऱ्याला मदत झाली पाहिजे त्या दृष्टिकोनातून कापसावर प्रक्रिया करुन रोजगार निर्मितीचा कार्यक्रम राबविण्याचा या नवीन वस्त्रोद्योग माध्यमातून प्रयत्न केला गेला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक......

सभापती महोदय, वेगळा कृषी अर्थसंकल्प व्हावयास पाहिजे अशा प्रकारची भावना विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. काही सन्माननीय सदस्यांनी कर्नाटक राज्याचा उल्लेख केला. कर्नाटक राज्यामध्ये कृषीचा वेगळा अर्थसंकल्प होतो. पण साधारणत: आपल्या राज्यात जो अर्थसंकल्प आहे, त्यामध्ये मिळणारे उत्पन्न आणि त्या उत्पन्नाच्या विविध कामावर होणारा खर्च असे याचे दोन भाग असून कृषी क्षेत्रासाठी या क्षेत्रावर कोणताही कर आकारला जात नसल्याने उत्पन्नाची बाजू गरजेपेक्षा अत्यंत कमीच राहणार आहे. अर्थात असा अर्थसंकल्प स्वतंत्र तयार केला गेला तरी खर्चासाठी सर्वसामान्य अर्थसंकल्पातून मोठया प्रमाणावर तरतूद कृषी क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात हस्तांतरित करावी लागणार आहे. या कारणांमुळे कृषी क्षेत्रात या क्षेत्रातून शासनाला मिळणारे उत्पन्न व त्यामधून या क्षेत्रावर होणारा खर्च असे समीकरण बसवता येणार नाही म्हणून कृषी करिता स्वतंत्र अर्थसंकल्प तयार करणे फारसे उपयोगी ठरणार नाही.

यानंतर श्री. बरवड.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

अशा प्रकारे मी सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर आणि इतर अनेक सन्माननीय सदस्यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या संदर्भात शासनाच्या वतीने सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपकरकर यांनी गाळ उपसण्यासाठी ड्रेझर खरेदी करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला आणि त्या संदर्भात निधी उपलब्ध नाही अशी माहिती दिली.. सन 2011-2012 मध्ये आपण ड्रेझ ार खरेदीसाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. येत्या वर्षामध्ये निश्चित स्वरुपात ड्रेझरची खरेदी होणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी लहान बंदरांच्या विकासाच्या संदर्भात चांगला उल्लेख केला. त्यामध्ये बिल्ट, ऑपरेट अँड शेअर या पध्दतीने बीओटी तत्वावर त्या बंदरांचा वापर करावयास पाहिजे असे सांगितले. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, रायगड जिल्ह्यातील रेवस, आधारे, दिघी रत्नागिरी जिल्ह्यातील धामणखोल, जयगड, लामणगड सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग, रेडी या सर्व बंदरांवर कामकाज आपण सुरु केलेले आहे. तसेच पनवेल, उलवा, बेलापूर तसेच धरमतर, रेवदंडा अशा प्रकारच्या अनेक बंदरांवर कामकाज सुरु करण्याचे शासनाने निर्धारित केले आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मुंबईत वाढविलेल्या मुद्रांक शुल्काच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, श्री. परशुराम उपरकर व मुंबईतील अनेक सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात उल्लेख केला. या पध्दतीने भाडेकरुंच्या हक्कांचे हस्तांतरण करण्यासाठी मुद्रांक शुल्क वाढवून जी काही सुधारणा केलेली आहे ती वाढ कमी करावी असे सांगितले. विधानसभा सभागृहामध्ये सुध्दा सन्माननीय सदस्यांनी हा विषय अतिशय पोटतिडिकीने मांडला. विधानसभा सभागृहात सन्माननीय सदस्य सर्वश्री बाबा सिद्दीकी, अमीन पटेल तसेच या सभागृहातील सदस्यांनी ही बाब मांडली. दोन्ही सभागृहात मांडलेली ही बाब लक्षात घेता कुळ कायद्याच्या हस्तांतरणासाठी करावयाच्या कागदपत्रासाठी बाजार मूल्याच्या 5 टक्के मुद्रांक शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला आहे तथापि छोट्या कुळ कायद्यांना जादा मुद्रांक शुक्काचा भार पडू नये म्हणून 300 चौ.फुटाच्या आतील कुळ

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राजेंद्र मुळक .....

कायद्यांच्या हस्तांतरणासाठी करावयाच्या कागदपत्रांसाठी मुद्रांक शुल्क पूर्वीच्याच दराने लागू राहील अशा प्रकारचा निर्णय करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, दिवाकर रावते, केशवराव मानकर व इतर अनेक सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबतचा उल्लेख केला आणि त्या संदर्भात काही चांगल्या उपाययोजनाही सुचविल्या आहेत. या विषयाच्या संदर्भात मदत व पुनर्वसन विभागाकडून जी माहिती उपलब्ध झाली त्यानुसार 30 जून, 2006 अखेरच्या शेती कर्जामध्ये एकूण 9 लाख 29 हजार 457 शेतकऱ्यांना 1385.93 कोटी रुपयांचे शेती कर्जाचे पुनर्गठन करुन दिले. सोबतच केंद्र शासनाकडून 41 हजार 878 लाख रुपये आणि राज्य शासनाकडून 41 हजार 878 लाख रुपये व्याज माफ करुन देण्यात आलेले आहे. या पध्दतीने शासनाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी काही उपाययोजना केलेल्या आहेत. केंद्र शासनाने व्याजाची सवलत 2 टक्के, वेळेत परतफेडीसाठी व्याज अनुदान 2 टक्के, राज्य शासनाची सवलत 1 टक्के,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक....

पंजाबराव देशमुख व्याज अनुदान योजनेंतर्गत 50 हजारपर्यंत परतफेडीवर व्याज अनुदान 4 टक्के यानुसार 9 टक्के दर गृहीत धरुन 50 हजारापर्यंत शून्य दराने कर्ज मिळेल व 3 लाखापर्यंत 2 टक्के दराने कर्ज दिले जाईल. या पध्दतीनुसार पैशाची उपलब्धता आणि व्याज दर कमी केल्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्येमध्ये घट होईल.

राज्य सरकारने नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर केलेले आहे. कारण शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रामुख्याने विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात व इतर काही जिल्ह्यात होत आहेत. या भागात कापूस शेतकरी मोठया प्रमाणावर आहे. या वर्षी उत्पादित झालेला कापूस व मिळालेला भाव लक्षात घेऊन या वर्षी वस्त्रोद्योग धोरण आखले आहे. त्यानुसार ज्या भागात कापूस उत्पादक शेतकरी आहेत त्या भागात नवीन सूत गिरण्या निर्माण होणार आहेत. पुढील काळात हे धोरण यशस्वीरित्या राबविले तर निश्चितपणे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये घट होईल असा मला विश्वास वाटतो.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी शेतक-यांची सावकारीतून मुक्तता झाली पाहिजे असा मुद्दा मांडला होता. अधिनियम 1946 अनुसार शेतकऱ्यांची सावकारांकडून होणारी पिळवणूक नियंत्रित करण्यासाठी पुरेसा सावकारी नियमनाचा सर्व व्यापक असा महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम 2010 चे विधेयक सन 2010 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर झाले असून ते केंद्र शासनाच्या मंजुरीसाठी पाठविलेले आहे. केंद्र सरकारची या अधिनियमाला अंतिम मान्यता अपेक्षित आहे. ती मिळाल्यानंतर यावरही नियंत्रण आणू शकू अशी परिस्थिती निर्माण होईल.

सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे व सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी अत्यंत चांगल्या सूचना केल्या. बीड जिल्ह्यामध्ये सीताफळ प्रक्रिया उद्योगासाठी आर्थिक तरतूद करावी असे म्हटले आहे. या उद्योगासाठी निश्चित स्वरुपात भविष्यात विचार केला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी शेत मालासाठी गोदामाच्या बांधकामासाठी 100 टक्के अनुदान दिल्यास शेतकऱ्यांचा फायदा होईल अशी सूचना केली. त्यासंबंधी निश्चितपणे शासनाकडून विचार केला जाईल. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यात यावी अशीही त्यांनी विनंती केली. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी कांदा चाळीची

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.राजेंद्र मुळक....

उभारणी करण्यासाठी 25 टक्के अनुदान देण्यात येईल. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदत होईल.

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी कोकणातील फळ व फळावर प्रक्रिया करण्यासाठी अधिक तरतूद अपेक्षित होती असा उल्लेख केला. सन 2007 मध्ये असे जाहीर केले होते की, या योजनेंतर्गत कोकणातील काजू प्रक्रिया सहकारी संस्थांना देखील अर्थसहाय्य मंजूर करु. चालू वित्तीय वर्षात व सन 2010-11 मध्ये कोकणातील कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांना 1085 लाखांचे अर्थसहाय्य वितरित केलेले आहे. या वर्षाच्या अर्थसंकल्पात त्या विभागातील हा उद्योग वाढावा असा सरकारचा प्रयत्न राहील.

सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी सुशिक्षित बेरोजगारांना भत्ता द्यावा व त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे अशी चांगली सूचना केली आहे. त्यासंबंधी निश्चित विचार केला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण यासंबंधी तरतूद वाढवावी असा मुद्दा मांडला. सन 2010-11 मध्ये यासाठी रु.10.25 कोटीची तरतूद होती. या वर्षी रु.16.6 कोटी इतकी तरतूद केली असून मागील वर्षापेक्षा रु. 6 कोटी अधिक तरतूद केलेली आहे. त्यामुळे या विषयाला नक्कीच न्याय मिळेल.

सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे व सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी शालेय पोषण आहार योजनेसंबंधीचा मुद्दा मांडला. सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी अल्पसंख्याक समाजातील अनाथ मुले व गरीब मुलांसाठी आश्रमशाळांच्या धर्तीवर निवासी शाळा निर्माण करण्याची मागणी केली. मुस्लीम समाजात गरिबीचे प्रमाण जास्त आहे व शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे या निवासी शाळांचा गरीब व अनाथ मुलांचा फायदा होईल असे मत मांडले. या अर्थसंकल्पीय वर्षात त्यासाठी निश्चित स्वरुपात काही तरतूद केली जाईल. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना मदत कशी करता येईल यासंबंधी विचार केला जाईल.

यानंतर श्री.शिगम...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक...

सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी अतिशय चांगली सूचना केली. कोरडवाहू शेतीचा विकास करुन कडधान्ये व तेलबियांच्या उत्पादनामध्ये वाढ करणे आवश्यक असून त्यासाठी इंटरनॅशनल क्रॉप रिसर्च इन्स्टिटयूट फॉर सेमी एअर ट्रॉपिक या संस्थेची संशोधनासाठी मदत घेण्यात यावी असे सांगितले. त्यांच्या सूचने प्रमाणे त्या इन्स्टिटयुटची निश्चितपणे मदत घेतली जाईल. अनेक सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगल्या सूचना केलेल्या आहेत. पर्यटनाच्या संदर्भात देखील अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार येथे मांडले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी पर्यटनाच्या दृष्टीने कोकणाकडे विशेष लक्ष द्यावे असे सांगितले. 12व्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार केन्द्र शासनाने समुद्र किनारा पर्यटन या अंतर्गत 2006 ते 2010 या कालावधीत 225 कोटीची तरतूद वितरित केली असून त्यामधून मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या किना-या लगतच्या जिल्ह्यामध्ये पर्यटन विषयक विकास कामे हाती घेण्यात आलेली आहेत. या कामासाठी अधिकची तरतूद अर्थसंकल्पामध्ये व्हावयास पाहिजे अशा प्रकारचा उल्लेख कोकणातील अनेक सन्माननीय सदस्यांनी केला. मी त्या सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या कामासाठी अधिकची तरतूद करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. कोकणाच्या पर्यटनाला अधिक वेगाने कशी चालना मिळू शकेल यादृष्टीने निश्चितच प्रयत्न केले जातील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मनिष जैने हे उच्च विद्याविभूषित, तरुण आणि तडफदार असे व्यक्तिमत्व या सभागृहामध्ये निवडून आलेले आहे.. त्यांनी आपल्या भाषणामध्ये अनेक चांगल्या गोष्टींचा उल्लेख केला. तांत्रिक पध्दतीने शेती करण्याकडे त्यांनी या सभागृहाचे लक्ष वेधले. भविष्यात ज्ञान आणि तंत्रज्ञान याचा वापर शेतीसाठी केला तर शेतीच्या उत्पादनामध्ये वाढ होईल, रासायनिक खतांचा कमीत कमी वापर करुन चांगल्या दर्जाची शेती कशी करता येईल या संदर्भात त्यांनी सूचना केलेल्या आहेत. मिनरल वॉटरवर जास्त कर लावावा असेही त्यांनी सांगितले. त्याबाबतीत जरुर विचार करण्यात येईल. सभापती महोदय, सोने, चांदी आणि हिरे यांचा व्यापार मुंबईपासून जळगाव, धुळे या पट्टयामध्ये होत होता. परंतु त्यास उद्योगाचा दर्जा प्राप्त झालेला नाही. या व्यवसायाला उद्योगाचा दर्जा प्राप्त करुन द्यावा अशी सूचना त्यांनी केलेली आहे. यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये उद्योगक्षेत्रासाठी जी काही तरतूद केलेली आहे त्यातून अशा प्रकारच्या

..2..

श्री.राजेंद्र मुळक...

उद्योगांना कशी मदत करता येईल यादृष्टीने निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी मुंबईमध्ये अनेक पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या बाबतीत, पर्यटनाच्या बाबतीत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मुंबईच्या विकासाच्या संदर्भात ज्या काही एजन्सीज आहेत त्यांच्या माध्यमातून मुंबई शहरामध्ये चांगल्या पायाभूत सुविधा आणि चांगल्या नागरी सुविधा निर्माण केल्या जातील. या राज्याची आणि देशाची मुंबई ही आर्थिक राजधानी आहे. ही मुंबई दळणवळणाच्या माध्यमातून अधिकाधिक अग्रक्रमावर येण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे हे निश्चितच अभिप्रेत आहे. आता नव्याने वरळी सी-लिंक हा सागरी मार्ग तयार झालेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 21:55

श्री. राजेंद्र मुळक...

हाजी अली पर्यंत मार्ग नेण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. परंतु त्याच्यामध्ये एन्व्हायरमेंट हर्डल्स येत आहे. काही लोकांचे असे मत आहे की, त्याची कॉस्ट जास्त होत आहे म्हणून तो मार्ग कोस्टल लाईनने करता येऊ शकतो काय यासबंधीचा अभ्यास सुरु आहे. हा मार्ग कोस्टल लाईनने करण्याचे ठरविले तर पर्यावरण विभागच्या परवानगीची अडचण समोर येऊ शकते. या मार्गाच्या तांत्रिक बाबी संदर्भात बैठक झाली होती. या मार्गाच्या बाबतीत निश्चितपणे तोडगा निघणार आहे. हाजी अली पर्यंतचा सी-लिंक लवकरात लवकर पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.तिसऱ्या टप्पयात हा सी-लिंक नरीमन पॉईंट पर्यंत करण्याचा देखील शासनाचा मानस आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी कृषी उत्पादन आणि कृषी क्षेत्राशी संबंधीत असलेल्या अनेक गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी केला. त्यांनी काही विषय अतिशय पोटतिडकीने मांडले. पीक विमा योजने संबंधी त्यांनी काही उपयुक्त अशा सूचना केल्या आहेत. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात यावी असाही त्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला. अर्थसंकल्पीय भाषणात प्रत्यक्षात या बाबतचा उल्लेख केलेला आहे. या वर्षापासून अल्यसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा शासनाचा मानस आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी कोकण पॅकेजच्या संदर्भात उल्ल्‌ेख केला. 2009 ते 2011-12 पर्यंतचा 5 हजार कोटी रुपयांचा कोकण पॅकेज होता. कोकण पॅकेजसाठी सन 2009-10 मध्ये 620 कोटी रुपयांचे वाटप झाले आहे. त्याचप्रमाणे 2010-11 मध्ये 677 कोटी रुपयांचे वाटप झाले आहे. 2011-12 या वर्षात देखील पूर्वी एवढाच निधी वाटप करण्याचे शासनाने ठरविले आहे. हे पॅकेज 2011-12 पर्यंत कसे पूर्ण होऊ शकते या बाबतीत शासन निश्चितपणे काळजी घेत आहे.

सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी पांदण रस्त्यांसाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध झाला पाहिजे अशी या निमित्ताने मागणी केली आहे. शेतकऱ्यांचे दळणवळण शेती पांदण रस्त्यावरुन होते. शेतीची आर्थिक उलाढाल ही पांदण रस्त्यावरुन होत असते. पांदण रस्त्यांच्या कामासाठी स्वतंत्र असा निधी देण्याचा कोणत्याही प्रकारची योजना शासनाने तयार केलेली नाही. पांदण रस्त्यासंबंधी स्वतंत्र असे लेखा शीर्ष नाही. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून पांदण रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध होऊ शकतो.

2...

31-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 5P-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय, आपल्याला उत्तरासाठी एक तास वेळ देण्यात आलेला होता. आपणास साधारणत: अजून किती वेळ लागेल ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय,माझे उत्तराचे भाषण पूर्ण होण्यास अजून अर्धा तास वेळ लागेल. सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेस सुरुवात होऊन तीन दिवसांचा कालावधी झालेला आहे. ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेतला आहे, त्या प्रत्येक सदस्यांचे मुद्दे मी लिहून घेतलेले आहे. तीन दिवसात माझ्या एका पेनची शाई सुध्दा संपली आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. आपण आपले उत्तराचे भाषण सुरु करावे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या सभागृहातील ज्या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला, त्यांनी आपला वेळ पूर्णपणे घेतला आहे. विरोधी पक्षाचे सदस्य या सरकारच्या संपूर्णपणे विरोधात आहेत. माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री विधानसभा सभागृहात अर्थसंकल्प सादर करीत होते, त्यावेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला. या राज्यात पूर्वी वित्त राज्यमंत्री म्हणून श्री.दिलीपराव देशमुख यांनी उत्तर दिले होते. त्यानंतर अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला माननीय वित्त मंत्र्यांनीच उत्तर दिले आहे. पहिल्यांदा माझ्या सारख्या तरुणाला उत्तर देण्याची संधी प्राप्त झाली. वडीलधारी मंडळीची जबाबदारी होती की, आजच्या दिवस तरी माझे उत्तराचे भाषण त्यांनी ऐकावयास पाहिजे होते. त्यांनी माझे उत्तराचे भाषण ऐकले असते तर मला खूप आनंद झाला असता. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर हे विदर्भातील आहेत. विदर्भातील एक चांगले नेतृत्व आहे. त्यांच्याशी माझे जिव्हाळयाचे संबंध आहेत. माझे वडील भाऊसाहेब मुळक आणि श्री.पांडुरंग फुंडकर हे अत्यत चांगले मित्र होते. माननीय श्री. पांडुरंग फुंडकर यांनी माझे उत्तराचे भाषण ऐकले असते तर खूपच आनंद झाला असता. एवढया कमी वयामध्ये राज्याचा अर्थसंकल्प मांडण्याची संधी कोणाला मिळत नाही. उत्तर देण्याची संधी प्राप्त होत नाही. अशा प्रसंगी विरोधी पक्षाचे सदस्य उपस्थित राहिले असते तर मला मनापासून बरे वाटले असते.

सभापती महोदय, या राज्याला उत्पन्न वाढीकडे नेत असताना, या राज्याला अग्रक्रमाकडे नेत असताना मी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करु इच्छितो की, देशात महाराष्ट्र हे विकासाच्या बाबतीत एक नंबरचे राज्य आहे....

यानंतर श्री. भोगले.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 22:00

श्री.राजेंद्र मुळक.........

परंतु जगाच्या क्षितिजावर या राज्याला संतुलित करुन प्रशासकीय दृष्टया गतिमान राज्य बनविण्याचा आमचा संकल्प आहे. या राज्याला विकसित करण्याचा आमचा संकल्प आहे. गोरगरिब शेतकऱ्यांना मदत करण्याचे, सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम या अर्थसंकल्पातून होत आहे. अशा प्रसंगी विरोधी बाकावरील मंडळी पोटदुखी झाल्यामुळे सभागृहातून बाहेर निघून गेली आहेत. अर्थसंकल्पीय भाषणाच्या वेळी त्यांनी अडथळे निर्माण केले होते. लोकसभेत अर्थसंकल्प मांडण्याच्या काही दिवस अगोदर तेथील विरोधी बाकावरील सदस्यांकडून गदारोळ केला जात होता. परंतु लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर होत असताना विरोधी पक्षाच्या सदस्यांनी तो शांतपणे ऐकून घेतला व चर्चेतही सहभागी झाले. सर्वच पक्षाचे हायकमांड दिल्लीमध्ये आहेत. हायकमांडनी सभागृहात व्यवस्थितपणे अर्थसंकल्प ऐकून घेतला होता. परंतु विधानपरिषदेत विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पीय चर्चेवरील उत्तराचे भाषण ऐकून घेतले असते तर मला निश्चितच आनंद झाला असता. दोन दिवसांपूर्वी या सभागृहाशी काही संबंध नसताना खालच्या सभागृहातील घटनेचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. मी तीन दिवस सातत्याने सभागृहात बसून माननीय सदस्यांचे अर्थसंकल्पावरील मनोगत ऐकून घेतले. सर्व मुद्यांची नोंद घेतली. मला माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, सर्व मुद्यांची नोंद करुन घेऊन त्या मुद्यांबाबत उत्तर देऊन माननीय सदस्यांचे समाधान करता येऊ शकते. त्यामुळेच मी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांना रोजच्या रोज सभागृहातील मुद्यांची जाणीव करुन देत होतो. सभागृहात कोणकोणते मुद्दे उपस्थित केले गेले याची त्यांना माहिती देत होतो. विभागाचे प्रधान सचिव श्री.श्रीवास्तव यांच्याशी संपर्क ठेवून उपस्थित होणाऱ्या मुद्यांबाबत त्यांचे अभिप्राय घेत होतो. मला अपेक्षित होते की, आज काही चांगल्या गोष्टी घडतील. परंतु माझ्या या भाषणाच्या वेळी अडथळा निर्माण झाल्यामुळे माझ्यामध्ये बोलण्याचा जो जोश होता त्यात व्यत्यय आला. तरी देखील आपण सर्वांनी उपस्थित राहून मला सहकार्य केले आहे. शेवटी आम्ही ज्या भागातून निवडून येतो तो विदर्भातील मागासलेला भाग आहे. जिद्दीने जीवन जगण्याची आम्हाला सवय झाली आहे. अशा प्रकारचा विरोध आम्ही नेहमी अनुभवला आहे. आम्ही अशा प्रकारच्या विरोधातून तयार होऊन आलेले कार्यकर्ते आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2..

श्री.राजेंद्र मुळक.........

सभापती महोदय, या देशाच्या सन्माननीय नेत्या श्रीमती सोनिया गांधी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माननीय श्री.शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली आपले राज्य यशस्वीरित्या काम करीत असल्यामुळे विरोधकांना पोटदुखी झाल्याचे दिसून येत आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी इंदू मिलची 12 एकर जमीन चैत्यभूमीच्या विकासासाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे. चैत्यभूमीचा विकास झालाच पाहिजे. चैत्यभूमीप्रमाणे दीक्षाभूमीसाठी देखील मागील अनेक वर्षे मोठया प्रमाणात निधी देऊन विकास करण्याचे काम शासनाने केलेले आहे. मागील वर्षी जो निधी दिला गेला त्यामध्ये कोणतीही कपात केली जाणार नाही, यापढे आवश्यक तेवढा निधी या दोन्ही कामासाठी उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचले पाहिजेत. यासाठी त्यांच्या सर्व पुस्तकांचे संकलन राजगृह येथे उपलब्ध करण्यात यावे अशी सूचना केली आहे. त्याबद्दल मी एवढेच सांगू इच्छितो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे सर्वसामान्य माणसांचे विचार होते.

नंतर 5आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ......

या देशाची घटना लिहिण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांच्या संग्रही असलेली अनेक उपयुक्त व चांगली पुस्तके भविष्यात नवीन पिढीला वाचायला मिळाली पाहिजेत म्हणून त्यांचा संग्रह व्हावा यासाठी जी सूचना केली ती कार्यान्वित कशी होईल याची दखल घेतली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. नागो गाणार यांनी शिक्षण क्षेत्राबाबत अत्यंत उपयुक्त सूचना केल्या. त्यांनी शिक्षकांचे वेतन व शाळांमध्ये आवश्यक असलेल्या सुविधांचाही उल्लेख आपल्या सूचनांमध्ये केला. त्यांचाही विचार नक्कीच केला जाईल. त्यानंतर नव्यानेच निवडून आलेल्या सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी देखील अत्यंत उपयुक्त सूचना व मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात जीवनावश्यक वस्तुंवरील करामध्ये शासनाने कोणतीही वाढ केली नाही, असा उल्लेख केला. त्याचा फायदा सामान्य कुटुंबातील लोकांना होईल अशी भावना लक्षात घेऊन भविष्यात देखील जीवनावश्यक वस्तुंचे भाव कसे स्थिर ठेवता येतील याचा विचार करुनच ही करवाढ न करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर त्यांनी ज्या ज्या सूचना केल्या त्यांचा विचार नक्कीच या अर्थसंकल्पिय वर्षात केला जाईल आणि हे दर कसे कमी राहू शकतील यासाठी त्यांच्या सूचनांचा नक्कीच उपयोग होईल.

सन्माननीय सदस्य श्री. जयवंत जाधव यांनी कांद्याच्या निर्यातीसंबंधी अनेक चांगल्या सूचना केल्या. तसेच न्याय व्यवस्थेमध्ये काही बदल करण्याची सूचना त्यांनी केली, त्याचाही उपयोग राज्य कारभार करताना होऊ शकतो. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे हे नेहमीच भटक्या व विमुक्त जातींच्या समस्यांबाबत पोटतिडिकीने सभागृहात बोलत असतात, अशी मला माहिती मिळाली. या भटक्या समाजासाठी असलेल्या महामंडळाला अधिकचा निधी मिळण्याची सूचना त्यांनी केलेली आहे. जेणेकरुन या लोकांना मदत होईल. या निमित्ताने मी आश्वासन देऊ इच्छितो की, या अर्थसंकल्पिय वर्षात या भटक्या व विमुक्त जाती महामंडळाला चांगला निधी दिला जाईल. कारण हा समाज माझ्या मतदारसंघात सुध्दा मोठ्या प्रमाणात राहतो आणि राज्यातील काना-कोपऱ्यात राहत असलेल्या या वर्गाला मदत झाली पाहिजे हीच आमची सुध्दा भावना आहे. यानंतर राष्ट्रीय पीक विमा योजना तसेच रोजगार हमी योजनेच्या अनुषंगाने सभागृहात अत्यंत उपयुक्त सूचना केलेल्या आहेत. तसेच मतिमंद मुले व महिलांकडे विशेष लक्ष देण्याची

....2....

श्री. राजेंद्र मुळक .......

गरज सुध्दा सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणातून प्रतिपादित केली. कारण आपण पाहतो की, या मतिमंद मुलींवर अत्याचाराचे प्रमाण दिवसेदिवस वाढत असून ते अत्याचार थांबविण्यासाठी अनेक चांगल्या उपाययोजनाही सुचविल्या आहेत, याबाबत शासन निश्चितच काळजी घेईल असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांनी अमरावती विभागात दोन रेडियोथेरपी युनिट्सची मागणी केली तर. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी पॅकेजबाबतचा उल्लेख केला. तसेच डॉ. सुधीर तांबे यांनी देखील अत्यंत चांगल्या सूचना केल्या आहेत. शिक्षकांच्या विविध समस्या, विना अनुदानित शाळांना वेतनेतर अनुदान याबाबतचाही उल्लेख त्यांनी आपल्या भाषणातून केला. तसेच गोवासारख्या छोट्या राज्याने आपल्या राज्यातील वृध्दांना पेन्शन योजना सुरु केली व त्याच धर्तीवर आपल्या राज्यात सुध्दा ही योजना लागू करावी अशी मागणी केली, या सर्व बाबींकडे शासन जरुर लक्ष देईल. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी संजय गांधी निराधार योजनेसाठी अनुदान देण्याबाबतची मागणी केली. तसेच या योजनेत गैरव्यवहार होत असल्याचेही त्यांनी सांगितले. हे सर्व लिकेजेस दूर करण्याच्या बाबतीत बायोमेट्रिक पध्दती अस्तित्वात आली तर त्यांची अकाऊंटेबिलिटी राहू शकते आणि जे खरे लाभधारक असतील त्यांनाच योग्य प्रकारे मदत मिळू शकते अशीही त्यांनी सूचना केली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पाच्या संदर्भात अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी याकूब सर्व्हर या दर्ग्याकडे जाणारा रस्ता व त्या ठिकाणच्या सुशोभिकरणाच्या संदर्भात तरतूद करण्याची आवश्यकता आहे अशी विनंती केलेली आहे. तसेच त्यांनी सिंधुदुर्ग जिल्हयातील अंगणेवाडी येथील भराडी देवीच्या अवती भवती सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भातही उल्लेख केलेला आहे. त्यामुळे मी यांसदर्भात सांगू इच्छितो की, या वर्षाच्या पर्यटनाच्या निधीतून किंवा तीर्थक्षेत्राच्या निधीतून या ठिकाणी निश्चितपणे तरतूद करण्याचा प्रयत्न केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू. ज़मा यांनी नागपूर व विदर्भाच्या संदर्भातील अनेक बाबींचा उल्लेख केलेला आहे. मिहान प्रकल्पासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात जवळपास 70 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मिहान प्रकल्पात वाढीव तरतूद करण्याचा निर्णय माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्र्यांनी घेतलेला आहे. मिहान प्रकल्पाला कोणत्याही स्वरुपात निधीची कमतरता पडणार नाही याची दक्षता शासनाने घेतलेली आहे. शिवणगाव या ठिकाणी ॲडीशनल एअर स्ट्रीप येणार आहे. त्यामुळे या ठिकाणचे एअर स्ट्रीप आणि एसईझेड यामध्ये जो काही वाद आहे तो सुध्दा येणा-या काही दिवसात निकाली निघणार असून त्यामुळे मिहान प्रकल्पाला निश्चितपणे गती मिळणार आहे. विदर्भासाठी मिहान प्रकल्प हा अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. मिहान प्रकल्पात नव्याने अनेक गोष्टी घडवून आणण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी व उप मुख्यमंत्र्यांनी वरिष्ठांसोबत चर्चा केलेली आहे. आयएएस लेव्हलाचा एक अधिकारी नागपूरला ठेवून या ठिकाणच्या सर्व प्रकल्पांना ते मॉनिटर करणार आहेत. या प्रकल्पातील ज्या काही छोटया मोठया अडचणी आहेत त्या दूर करु. तसेच केंद्राशी काही विषय संबंधित आहेत त्या विषयांच्या संदर्भात समन्वय ठेवून हा प्रकल्प लवकर मार्गी लागेल एवढे मी सन्माननीय सदस्य श्री. ज़मा साहेबांना सांगू इच्छितो. सभापती महोदय, गोरेवाडयाच्या इको टूरीझम संबंधी, रिंगरोडच्या संबंधी सन्माननीय सदस्य श्री. ज़मा साहेबांनी उल्लेख केलेला आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

यावर्षी नागपूरच्या स्पोर्ट कॉम्प्लेक्ससाठी 40 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. हे पैसे जर कमी पडत असतील तर त्यामध्ये अधिक वाढ करण्याचा प्रयत्न शासनामार्फत केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, नागपूर शहराला कोची धरणापासून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जाणार आहे. यामध्ये एनपीव्हीचे काही पैसे भरणे आवश्यक होते व त्यासाठी 28 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. यामुळे कोची धरणाच्या कामाला वेग येईल व भविष्यात नागपूर शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेऊन नागपूर वासियांना कोची धरणातून पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध करुन दिले जाणार आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, चंद्रपूर शहरासाठी शासनाने 250 कोटी रुपये दिलेले आहेत. चंद्रपूर येथे मोठया प्रमाणात कोळशा पासून वीज निर्मिती होत असते व त्यामुळेच या ठिकाणी मोठया प्रमाणात प्रदूषण होत असते. भारतामध्ये सर्वात जास्त प्रदूषण चंद्रपूर शहरात आहे. चंद्रपूर शहरातील नागरिकांना नागरी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे तसेच या ठिकाणी मोठया प्रमाणात ग्रिनरी वाढविण्याच्या कामावर सुध्दा भर दिला जाणार आहे व त्यासाठीच चंद्रपूर शहराला 250 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. चंद्रपूर शहराला या वर्षी 500 वर्ष पूर्ण होत आहे व ही ऐतिहासिक बाब लक्षात घेऊन चंद्रपूर शहरासाठी हा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, नागपूर येथे वंसतराव देशपांडे सभागृह असून हे सभागृह खूप नावाजलेले आहे. वसंतराव देशपांडे सभागृहाचे सुशोभिकरण करण्याची विनंती सन्माननीय सदस्य श्री. ज़मा साहेबांनी केलेली आहे.

सभापती महोदय, संपूर्ण देशाचा मध्य बिंदू, झीरो माईल नागपूर येथील विधान भवनाच्या शेजारीच आहे. झीरो माईलचे सुशोभिकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी विनंती सन्माननीय सदस्य श्री. ज़मा साहेबांनी केलेली आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या सर्व बाबीकडे निश्चितपणे लक्ष देण्याचे काम केले जाईल.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण साहेबांनी एलोरा -म्हैसमाळा-खुलताबाद या ठिकाणच्या पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी प्राधिकरण स्थापन करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. तसेच त्यांनी औरंगाबाद येथे येणा-या पर्यटकांसाठी चांगले रस्ते उपलब्ध करुन देण्यासंबंधी विनंती केलेली आहे. प्रादेशिक पर्यटन योजनेअंतर्गत प्रर्यटनस्थळाच्या ठिकाणी पोहच रस्ते, विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत असतो. या निधीचा वापर औरंगाबाद शहराचा विकास व त्या ठिकाणचे रस्ते चांगले करण्यासाठी अशा प्रकारची व्यवस्था निश्चितपणे केली जाईल एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, अजून ब-याच विषयावर विचार व्यक्त करण्याची माझी इच्छा होती. चांगल्या अर्थसंकल्पाचे पायगुण इतके चांगले आहे की, कालच्या भारत पाकिस्तान क्रिकेट मॅचमध्ये भारताने पाकिस्तानला हरवून भारत फायनल मध्ये आलेला आहे. शनिवार, दिनांक 2 एप्रिल, 2011 रोजी वानखेडे स्टेडियममध्ये भारत-श्रीलंका क्रिकेटची फायनल मॅच आहे. दोन्ही सभागृहाच्या सदस्यांनी क्रिकेटच्या संदर्भात अतिशय चांगल्या भावना ठेवल्या होत्या व त्यामुळेच भारत जिंकला ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण सभागृहात येत असतांना चांगल्या भावना ठेवून यावे व या राज्याच्या विकासासाठी आपण सर्वांनी हातभार लावावा. असे जर झाले तर हे राज्य अधिक चांगल्या प्रकारे प्रगतीकडे जाऊ शकेल. ज्यावेळेस पाच बोटे एकत्र येतात तेव्हाच ताकद निर्माण होत असते. त्यामुळे राज्याला पुढे नेत असताना, राज्याला आर्थिक दृष्टीने बळकट करीत असताना आपण सर्वांनी एकत्रित राहणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, स्थानिक विकास निधीमध्ये वाढ करावी अशा प्रकारची मागणी जवळपास सर्व सन्माननीय सदस्य सातत्याने करीत होते. स्थानिक विकास निधी 1.5 कोटी रुपये होता त्यामुळे यासंदर्भात मी सभागृहाला आश्वासीत करु इच्छितो की, आता स्थानिक विकास निधी मध्ये 50 लाखांनी वाढ करण्यात येत असून आता आमदारांचा स्थानिक विकास निधी 2 कोटी रुपये एवढा करण्यात आलेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक...

सभापती महोदय, सन 2011-2012 चा अर्थसंकल्प मांडण्याची संधी मला मिळाली ही माझ्या दृष्टीने फार आनंदाची बाब आहे. अर्थसंकल्पाच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी चांगल्या प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो व आपल्या सर्वांची रजा घेतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र....

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, वित्त राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी अर्थसंकल्पाच्या संदर्भात अतिशय चांगली माहिती सभागृहाला दिलेली असल्यामुळे त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. सभागृहाच्या वतीने मी सन्माननीय वित्त राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक यांचे अभिनंदन करतो.

सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावरील चर्चा आता पूर्ण झालेली आहे.

सभा□हापुढील □म□ज आता संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार, दिनांक 1 एप्रिल,2011 रोजी सकाळी 10.00 ते 11.15 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल. त्यामध्ये नियम 97 अन्वये " रायगड जिल्हयातील प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या संपादित केलेल्या जमिनी " या प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी 11.30 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 10 वाजून 18 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 1 एप्रिल 2011 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यत स्थगित झाली )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही